# रुणझुणत्या पाखरा

डॉ. शैला लोहिया

# रुणझुणत्या पाखरा

लेखिका
डॉ. शैला लोहिया

■ रुणझुणत्या पाखरा
(Runzunatya Pakhara)

■ लेखिका
डॉ. शैला व्दारकादास लोहिया.
संगीतविशारद (गांधर्व विद्यालय)
पत्ता - ३२, किनारा, विद्याकुंज वसाहत,
अंबाजोगाई, जि. बीड - ४३१५१७
दुरध्वनी क्रमांक -घर - (०२४४६) २४७०१६

■ प्रकाशक
दिशा पब्लिकेशन्स्,
पुणे-३०

■ अक्षरजुळणी
विवेक साळुंखे

■ मुखपृष्ठ
प्राची पानसे

■ प्रथम आवृत्ती: एप्रिल २००९

■ मुद्रक
दिशा ऑफसेट, राष्ट्र सेवा दल बिल्डिंग,
दांडेकर पूल, पुणे-३० फोन:०२०-६०७०११४२

■ मुल्य
रुपये एकशे साठ मात्र

© सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधिन

# मनोगत

डिसेंबर २००६ च्या सुरुवातीचे दिवस. दैनिक लोकसत्ताच्या कार्यालयातून मुकुंद सांगोराम यांचा दूरध्वनी आला. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतून जाणाऱ्या अंकातील 'संवाद' या सदरात लिहिण्याची अपूर्व संधी दै. लोकसत्ता परिवाराने मला दिली होती. माझ्यातल्या लेखिकेचा हात पुन्हा एकदा 'लिहिता' झाला. दै. लोकसत्ता परिवार, संपादक श्री. कुमार केतकर, निवासी संपादक मुकुंद संगोराम आणि लेख मिळाल्याची मी चौकशी करताच 'हं बोला शैला भाबी' अशा मधुर शब्दात संवाद साधणारे श्री. प्रमोद माने, माझे जीवनसाथी डॉ. द्वारकादास लोहिया, डी.टी.पी. करणारे श्री. बिभीषण घाडगे, श्री. अशोक केदार, अंजली इंगळे, धावपळ करणारी अंजू कोदरकर आणि अनेक अनेक...

...प्रस्तावना लिहिण्याची विनंती करताच तात्काळ होकार देणारे माझे छोटे स्नेही, प्रा. विश्वास वसेकर त्यांची पत्नी सौ. शैला हे सगळे, ज्यांनी 'संवाद' सुफळ समृद्ध केला त्या सर्वांची मी ऋणी आहे.

**– शैला लोहिया**

# प्रस्तावना

कथा व कविता हे आरंभापासून वाङ्मयाचे मूलभूत प्रकार दिसून येतात. प्राचीन व मध्ययुगीन वाङ्मयात त्यांचीही सरमिसळ झालेली दिसते. ऋग्वेदात कथात्मता आणि काव्यात्मता यांचे एकजीव व अनेकदा मोठ्या विलोभनीय स्वरूपात प्रत्ययाला येते. कथा आणि कवितेचा जन्म जरी एका वेळी झालेला असला तरी कथात्मक वाङ्मयाचा विकास अधिक झालेला दिसून येतो. मुद्रण कलेमुळे अठराव्या शतकानंतर वाङ्मयप्रकारांना निश्चित आणि नवीन अशी रुपे प्राप्त व्हायला लागली. प्रत्येक सजीवत्वाला काही अवस्थांमधून जाणे श्रम प्राप्रच असते. हे लक्षात घेऊन 'फॉर्म' ची 'फॉर्म' म्हणून जी वाटचाल आहे ती सांगणे महत्त्वाचे असते. वाङ्मयेतिहास लिहिणारांकडून नेमकी इथेच चूक होते. ते प्रायः अशा याची वाटचाल सांगताना दिसतात; 'फॉर्म' ची नाही. ही चूक आपल्याला टाळता आली पाहिजे.

आणखी एक चूक संभाव्य असते. कथा आणि कादंबरी, एकांकिका आणि नाटक यांच्यातला फरक हा संख्यात्मक असतो; गुणात्मक नाही. जी. ए. कुळकर्णी किंवा आसाराम लोमटे यांच्या कथांना अनेकदा लघुकादंबरी म्हणता येईल. 'सावित्री' आणि 'मानव' मधील लेखनाची तपासणी करताना अशा प्रकारच्या फोल चर्चेचे घोळ घालता येतील. अनेकत्वातून एकख सूचित करणे हो सर्वच ललित कलांचा धर्म आहे. लघुकथेतील अनेकत्व हे कादंबरीच्या मानाने कमी असते असे म्हणावे हाच न्याय एकांकिका आणि नाटक यांना लावता येईल.

मुद्रणकलेमुळे जसे वाङ्मयप्रकारांना निश्चित आणि नवीन स्वरूप येऊ लागले तसे काळाच्या आणि उत्क्रांतीच्या ओघात नाट्यछटेसारखा एखादा वाङ्मय प्रकार नष्ट

ही होऊ शकतो. लघु निबंधातून सर्वस्वी नवीन असा ललित गद्य जन्माला येतो हेही लक्षात घेतले पाहिजे.

ललित गद्य हा एक उभयलिंगी वाङ्मयप्रकार आहे. त्यात कवितेची कमनीयता, स्त्रीसुलभता आणि वैचारिक आणि पौरुष यांचा सुंदर संयोग झालेला असतो.

डॉ. सुधीर रसाळ यांनी 'अनुभवाचे असे आकार जे कथा, कादंबरी, एकांकिका, नाटक या प्रकारातून व्यक्त होऊ शकत नाहीत, त्याला ललित गद्य म्हणावे अशी नास्तिपक्ष मांडणारी व्याख्या केली आहे. आठवणी प्रवासवर्णन, निसर्गवर्णन, विनोद, व्यक्तिचित्र अशा सगळ्यांना सामावून घेणारे ललित गद्य हे 'महापोट' आहे असंही म्हटलं जातं.

वरील तिन्ही विचारांत ललित गद्याची निरनिराळी वैशिष्ट्य आणि लक्षणं सूचित होतात.

आजचे ललितगद्य हे पूर्वीच्या लघुनिबंधाचे उत्क्रांत रूप आहे. लघुनिबंधाला वैचारिक निबंधापेक्षा वेगळा मानून एक ललितकलेत समाविष्ट होणारा असा वाङ्मयप्रकार म्हणून इ.स.१५८० च्या आसपास प्रथम फ्रेंच लेखक माँर्तन यांनी रूढ केले असे मानले जाते. प्रा. नरहर कुरुंदकरांनी आल्फा ऑफ प्लो पासून लघुनिबंधाची सुरुवात मानली आहे. मराठीत ना. सी. फडके यांनी गुजगोष्ट म्हणून आणि वि. स. खांडेकरांनी लघुनिबंध म्हणून जो चार्ल्स लॅम्बना लिहिला तो या 'पर्सनल एस्से' ला मराठीत आणण्याच्या भूमिकेतून अनंत काणेकर, म. ना. अदवंत, हेही याच माळेचे मणी. इंग्रजी साहित्यात ज्याला 'एसे' किंवा निबंध म्हणतात त्यात विचारांची वस्तुनिष्ठ मांडणी असते. अनुभवाचे किंवा 'मी' चे निवेदन करणे हा त्याचा हेतू नसतो. तिथे अनुभव हे साध्य मुळीच असत नाही. त्या उलट लघुनिबंधाचे १ लघु निबंधात अनुभव आणि तद्नुषंगिक विचारांचा विमुक्त असा आविष्कार असतो.

मराठी समीक्षेत ललित वाङ्मयाचा एक प्रकार म्हणून चर्चा करताना त्याची तुलना ललित वाङ्मयाच्या इतर प्रकारांशी करण्याची पद्धत रूढ झाली आहे. कथा कादंबरी- एकांकिका- नाटक यांच्याशी त्याची तुलना करणे निरर्थक आहे. त्यातून डॉ. सुधीर रसाळांनी केली तशी अभावात्मक व्याख्याच संभवते. मग वेद जसे देवाचं वर्णन अमुक म्हणजे तो नाही, तमुक म्हणजे तो नाही. असं 'नेति नेति'च्या भाषेत करतात तसा प्रकार एक वाङ्मयप्रकार म्हणून ललित गद्याच्या बाबतीत होतो. आणि मग

लघुनिबंधात विचार डोकावणे त्याच्या प्रकृतीला कसे बाधक आहे वगैरे बाळकळ मुद्दे मांडले जातात. उदा. 'एखाद्याने सहजच भेटीसाठी आलो अशी सुरुवात करून इकडच्या तिकडच्या गप्पा माराव्या व सहज ओघात 'यंदा कर्तव्य आहे काय' असे विचारावे म्हणजे जसे वाटते, तसा प्रत्यय फडके- खांडेकरांचा निबंध वाचताना मला पुनः पुनः येतो. एका क्षणात भेटीसाठी येण्याचा हेतू कळला म्हणजे गप्पांतील स्वाभाविकपणा हा अभिनय हा लघुनिबंधात जाणवतो. शेवटी मतेच मांडायची म्हटल्यावर सगळा खेळकरपणा, सगळे चिंतनाचे प्रयोग, अभिनय ठरतात. विचार सजवून मांडण्याचा प्रयत्न करणारी धडपड ठरतात.

एका प्रख्यात समीक्षकाचे हे विचार वाचून असे वाटते की जण 'विचार' या घटकाची ललितगद्याला ॲलर्जीच आहे की काय! 'विचार' प्रविष्ट झाला की ललित निबंध संपला!

बाकीच्या वाङ्मयप्रकारामध्ये कितीही मोठी परिवर्तने झाली तरी याचे नाव बदलले नाही. हरिनारायण आपटे यांची ही कादंबरी आणि भालचंद्र नेमाडे यांची सुद्धा कादंबरीच; ना. सी. फडके यांची लघुकथा आणि जी. ए. कुळकर्णी यांची देखील लघुकथाच. गोविंद बल्लाळ देवल यांचे ते नाटक आणि महेश एलकुंचवार यांचे ते नाटकच! असे असताना मराठी लघुनिबंधाच्या बाबतीतच असे का व्हावे? त्याचे नाव टाकून देऊन त्याला ललितगद्य हे नवे नाव द्यावे लागावे?

प्राचीन साहित्यात सगळे वाङ्मयप्रकार पद्यमय राहण्याच्या धडपडीत होते. मुद्रणकलेचा जेव्हा शोध लागलेला नव्हता तेव्हा लेखन जपण्याचा सगळा भार स्मरणशक्तीवर पडायचा तेव्हा गद्यरचना क्वचितच केली जायची. स्मरणसुलभता हे पद्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. संस्कृत न येणाऱ्या कित्येकांना गीतेचा पंधरावा अध्याय, रामरक्षा पाठ असते याचे कारण हे ग्रंथ पद्यात आहेत. वेदांचे जतन त्यांच्या या स्मरणसुलभतेमुळेच करणे शक्य झाले.

प्राचीन साहित्यातला दासबोध हा वैचारिक गद्याचा ग्रंथ आहे (कविता नव्हे) तर ज्ञानेश्वरी हे ललित गद्य आहे (कविता नव्हे) असा विचार कधी कुणी का केला नाही याचे नवल वाटते. दासबोधात गद्याचे पौरुष फक्त आहे, करुणाष्टकात कवितेचे स्त्रीत्व फक्त आहे. पण ज्ञानेश्वरीत कवितेच्या ललित्याशी वैचारिकतेचा सुंदर संयोग झाला आहे. ज्ञानेश्वरी हा थेट माधव आचवट, दुर्गा भागवत इरावती कर्वे, गो. वि. करंदीकर, विजय तेंडुलकरांच्या प्रखर वैचारिकतेशी नाते सांगणारा प्राचीन काळातला सुंदरतम ललितगद्याचा ग्रंथ आहे.

आता मी ही व्याख्या पुन्हा सांगतो की ललितगद्य हा उभयलिंगी वाङ्मयप्रकार आहे. वैचारिक निबंध आणि कवितेचा त्यात अप्रतिम 'अर्धनटनारीश्वर' झालेला दिसून येतो.

प्रवासवर्णन, व्यक्तिचित्र, विनोदी लेख आणि निसर्गावर ललितगद्यात सर्वात महत्त्वाची ठरते ती लेखकाच्या संवेदनस्वभावाचा अपरिहार्य घटक असले व त्याची वैचारिकता त्याचे अलोकतारतम्य ही वैचारिकता एवढी तरह, सुक्ष्म, प्रखर आणि उत्कट असते की कवितेखेरीज कोणीच तिला पेलू शकत नाही. अशा वेळी भावुक होऊन वाचऊ म्हणतात की हे साक्षात् 'गद्यकाव्य'च आहे!

कवीनं लिहिलेलं ललितगद्य हा माझ्यासाठी नेहमीच भुवया उंचवायला लावणारा, विलक्षण कौतुकाचा आणि स्वागताई प्रकार असतो.

विंदा करंदीकर, आरती प्रभु, ग्रेस यांनी ललितगद्य लिहिले नसते तर?

पाडगावकरांनी आपली सगळी शक्ती कवितेतच पणाला लावली आणि खर्चून टाकली. या कवीने 'निंबोणीच्या झाडामागे' लिहून काय उपयोग? पु. ल. देशपांडे या कवीने अज़िबात कविता न लिहिता सगळी शक्ती ललित गद्यावर पणाला लावली. मराठीचे सर्वश्रेष्ठ ललितगद्यकार तर ते आहेतच पण प्रवासवर्णन, व्यक्तिचित्र, विनोद आदी सर्व शक्यतांना कवेत घेणारी महान अशी त्यांची प्रतिभा होती. आणि पु. लं. एवढे कवितेवर कुणी प्रेम केले आहे काय?

प्रखर तरीही तरल वैचारिकता आणि काव्यप्रतिभा या दोन गोष्टी एकाच संवेदनस्वभावात असणाराच श्रेष्ठ दर्जाचं ललितगद्य लिहू शकतो. प्रवासवर्णनात ते प्रवासस्थल निमित्त मात्र असते; व्यक्तिचित्रात ती व्यक्ती काय आहे या पेक्षा चित्रण करणाराला काय भावले हे महत्त्वाचे असते आणि परम कारुणिक असल्याशिवाय परिहासात्मक, सदअभिरुचीसंपन्न विनोद संभवत नाही. चि. वि. जोशी, पु. ल. देशपांडे, माधव आवचट, मधुकर केचे, ग्रेस, गो. वि. करंदीकर, चि. त्र्यं. खानोलकर यांच्या प्रतिभेत ललितगद्याच्या सुंदर शक्यतांचा प्रदेश कवेत घेण्याची ताकद होती. मंगेश पाडगावकर, कुठे तरी कमी पडले. रमेश मंत्री, महेश एलकुंचवार, यांच्या संवेदनस्वभावात कणभर कविश्व नव्हते. म्हणून त्यांचे ललितगद्य यशस्वी होऊ शकले नाही.

महान ललित गद्य लिहिले जाण्याची उपरोक्त सर्वच्या सर्व कारणे डॉ. शैला लोहिया यांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वात आणि संवेदनस्वभावात उपस्थित आहेत.त्यांच्या

सामाजिक कार्याची विशेषतः 'मानवलोक' या सेवाभावी संस्थेच्या द्वारा त्यांनी केलेल्या समाजसेवेची कीर्ती जगभर पसरली आहे. राष्ट्र सेवा दलाचे संस्कार पचवलेल्या त्या कर्त्या सुधारक आहेत. याला जोडून त्या प्रकृतीने ललित लेखिका आहेत. लोकसाहित्याच्या गाढ्या व्यासंगाने त्यांच्या सगळ्याच लेखनाला एक लोकतत्त्वीय परिमाण प्राप्त झालेले आहे. मुख्यम्हणजे त्या भारीच्या कवयित्री आहेत. 'सिटीझन आर्टिस्ट' ही महान आणि समाजसन्मुख प्रतिभावंतासाठी वापरली जाणारी संज्ञा ही खऱ्या अर्थाने त्यांच्यासाठीच योजिता येईल. प्रखर वैचारिकता हे त्यांच्या लेखनात सर्वत्र जाणवणारे सूत्र आहे. त्यामुळे विचार आणि कवितेच्या संयोगातून आलेले 'रुणझुणत्या पाखरा' या संग्रहातील ललित गद्य, ललित गद्याच्या सर्व महान आणि सुंदर शक्यतांचा प्रदेश कवेत घेऊनच आपल्या समोर ठाकले आहे.

'संक्रांत... प्रकाशपर्व' या लेखात बालपणीची संक्रांत उमटते. समाजवादी घर, देवघर, देवपूजा वा कर्मकांड नाही. पण सणानिमित्त गोडधोड खायला मिळे संक्रांतीचे साखरतीळ ऊर्फ हलवा करण्याच्या घरोघरच्या पद्धती, फसलेल्या काटे न आलेल्या साखरतीळांची चेष्टा, कुचेष्टा. तेराव्या वर्षापर्यंत नवरात्र आपटे आजी कुमारिका म्हणून सन्मान करायच्या. मग याच वर्षी का नाही बोलवलं हा बालसुलभ प्रश्न प्रौढांना अर्थ सुचवून जातो. समाजजीवनाचा धांडोळा असा प्रत्येक लेखात स्वाभाविकपणे घेतला जातो. 'अक्षरांना अर्थ देऊन' मध्ये तेजस्वी 'महा-तारे' प्रेरणा देऊन जातात. 'हे स्वरांनो गंध व्हा रे' मध्ये बालकामगारांचे प्रश्नोपनिषद कासावीस बनवते, अस्वस्थ करून टाकते.

कविवर्य भा. रा. तांब्यांनी तरुणपणी उत्कट प्रेम कविता तर लिहिलीच; पण वृद्धपणीदेखील प्रेमाविषयी त्यांना वाटणारे कौतुक, अप्रुप संपले नाही. डॉ. शैला लोहियांनी क्रांतिकारी असा प्रेमविवाह केला (याही अर्थाने त्या कर्त्यासुधारक) पण आज साठीनंतरही त्या प्रेमाचा, प्रेम विवाहाचा किती उत्साहाने पुरस्कार करतात आणि त्या मागची वैचारिक भूमिका सूचीत करतात ते 'प्रेम, धर्म, बांधीलकी,' 'तू ऐल राधा,' 'थंडी, थंडी... थंडी,' किंवा 'आषाढाचा पहिला दिवस' या लेखांतून वाचण्यासारखे आहे. एकदा राधेला कुतूहलाने म्हणा, मत्सराने म्हणा रुक्मिणी सत्यभामांनी घरी बोलावलं. तिथे पाय धुवून, त्यावर चंदन कुंकुम रेखून, वस्त्र देऊन पाठवले. मात्र पाणी उकळते वापरले. राधेला काही फरक पडला नाही. परंतु त्या रात्री कृष्ण घरी परतला तो लंगडत लंगडतच त्याच्या पायावर पोळल्यामुळे मोठे फोड आले होते. ही सुंदर कथा मी

या ललितगद्यातच प्रथम वाचली आणि विलक्षण प्रभावित झालो. असे प्रभावित करणारे, झपाटून टाकणारे अधूनमधून सारखे या लेखांतून भेटेल.

द्रंकेच्या बुडाशी एखादी अत्तराची कुपी जपून ठेवावी तशा डॉ. शैला लोहियांनी माहेरच्या आठवणींना जोपासले आहे. राष्ट्रीय भावनेने ओथंबलेले माहेर सूत कातणारे, खादी वापरणारे आईवडील. साने गुरुजी, एस. एम. जोशी, डॉ. राम मनोहर लोहिया, बॅ. नाथ पै, जयप्रकाश यांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेल्या लेखिकेचा खरंच हेवा वाटावा. त्यांची समृद्ध वैचारिक जडणघडण झाली ती या सर्वांच्या चर्चा ऐकून. ही वैचारिकताच त्यांच्या संवेदनस्वभावाचा अविभाज्य घटक झाली आहे. इतकेच नाही तर गेल्या तीस पस्तीस वर्षांच्या सगळ्या महान चळवळींत आणि आंदोलनात लेखिकेने प्रत्यक्ष सहभाग नोंदवला आहे. त्यांचे पडघम या लेखांतून अनुभवता येतात. बंगलोर येथे २८ जानेवारी १९९५ रोजी झालेल्या 'जनसुनवाई' बहुएका 'जखमी झाडांच्या साक्षी ऐकताना' हा ललितलेख शीर्षकापासून अंतरंगापर्यंत वेधक आहे. स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या, विलक्षण अस्वस्थ करून टाकणाऱ्या अनुभवकथनांचा समारोप करताना त्या लिहितात, जनसुनवाईचा कार्यक्रम संपला होता. आता प्रत्येकीच्या देहात 'मनसुनबाई' सुरू होती. भूमिकन्या भवरीबाई, हा लेख तर विलक्षण जीवन, थरारक अनुभव अनोखे व्यक्तित्व लाभलेले भंवरीबाई हा लेख वाचणारे जन्मभर विसरू शकणार नाहीत. सेवा दलाचे 'महाराष्ट्र दर्शन' असेच प्रेरणादायी, चैतन्यमय अनुभूती देणारे. 'इंद्रदिनांचा असर सरेना, विसरू म्हणता विसरेना' या श्रेणीमधले लेखिकेने अनुभवलेले असे अनेक मंतरलेले दिवस विलक्षण प्रत्ययकारित्वासह या संग्रहात अवतीर्ण झाले आहेत.

या संग्रहात काही भावोरकट व्यक्तिचित्रंही आहेत. बाबा आमटे (त्र्याण्णव वर्षांच्या तरुणाकडून ऊर्जा चेतवून घेताना), वसंत बापट (हारवलेला वसंत), भास्कर चंदनशिव (फुलता मळा सतत बहरत राहो), साने गुरुजी (जून महिना आला की...), अनंत भालेराव (माहेरचा खोपा), महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात सर्वांना माहीत असणारी ही नाव असली तरी त्यांचे वस्तुनिष्ठ चित्रण करण्याचा इथे प्रश्नच येत नाही. या व्यक्तिरेखा लेखिकेच्या अनुभवांगाचा भाग म्हणूनच साकारताना दिसतात. निवेदक 'मी' चा त्यांना झालेला अनुभव स्पर्श या व्यक्तिरेखांना वेगळी परिमाणे प्राप्त करून तर देतोच. पण त्याही पेक्षा महत्त्वाचे असते ते त्यांतून सूचित होणारा लेखिकेचा जीवन विषयक दृष्टिकोन अनुभवणे विचारांचे एक सुंदर अस्तर याही, पटाला असतेच.

ज्या कारणासाठी आपण डॉ. शैला लोहियांना 'सिटिझन आर्टिस्ट' म्हणून गौरविले तो सामाजिक कार्यकर्तीचा त्यांचा पिंड या पुस्तकात महत्त्वाचा आणि सर्वात मोठा असा ललितलेखांचा विभाग होऊन येतो. शैला लोहिया ग्रामीण, दलित, परित्याक्ता, अन्यायपीडित महिलांसाठी कार्य करणाऱ्या महत्त्वाच्या आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कार्यकर्त्या आहेत. त्याच्यातला पीर पराई जाणणारा वैष्णवजन हे स्वतंत्र वहिरवातं नसून लेखक, कवी म्हणून असणाऱ्या संवेदनस्वभावाचा तो एक अविभाज्य घटक आहे. 'आला श्वास, गेला श्वास... एक भास' 'धोबीका कुत्ता', 'आमच्यातलं माणूसपण कमी होतय का?', 'हे विठुराया', 'आपणच लिहूया नवी कहाणी', 'सुफळ गोष्टी', 'सुभगा सावित्री,' 'आम्ही बाया', किती तरी अशा 'राणी' हे लेख वाचताना तीव्रतेने जाणवले की अशा स्वरूपाचं लेखन हे हजार वर्षाच्या मराठी साहित्याच्या परंपरेने कुणीही केलं नाही. हे लेख वाचल्याच्या रात्री तुम्हांला झोप येणार नाही. विलक्षण अस्वस्थ करून टाकण्याचं सामर्थ्य या लेखांत आहे. सौंदर्य माणसाला अस्वस्थ करतं आणि श्रेष्ठ दर्जाच्या सौंदर्यात माणसाला अस्वस्थ करतं आणि श्रेष्ठ दर्जाच्या सौंदर्यात माणसाला अधिकच अस्वस्थ करण्याचं सामर्थ्य असतं असं गुरुवर्य वा. ल. कुळकर्णी म्हणायचे. ते असं का म्हणायचे याच प्रत्यंतर देणारे असे हे लेख आहेत. कारण ते एका महान सिटीझन आर्टिस्टच्या लेखणीतून उतरले आहेत. कळवळ्याची ही महान जाती आप ल्पाए़ जीवनाचे जे दर्शन घडवते ते खरोखर अस्वस्थ करून टाकणारे असते.

डॉ. शैला लोहिया हे अत्यंत संपन्न, विदग्ध असं व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे या लेखांचा सर्वांगांनी आस्वाद घ्यायला आपली रसिकताही चोरवंदळ आणि विभिन्ननुगामी असावी लागते. ते एकेरी असेल तर हत्ती आणि दहा अंधळ्यांच्या गोष्टीला एखादा आंधळा व्हायची वेळ आपल्यावर यायची! हे लेख कळायला तुम्हांला प्राचीन, आधुनिक आणि लोकसाहित्याचे सूक्ष्म वाचन असावे लागते, समकालीन सामाजिक वास्तवाचे प्रखर भान असावे लागते, स्त्रीवाद आणि स्त्रियांच्या प्रश्नांची गुंतागुंत ज्ञात असावी लागते, बदलते आणि अजूनही न बदललेले खेडे माहिती असावे लागते. अनवट गाणाराला साथ करताना वादळांची भंबेरी उडावी तसे काहीसे सामान्य आणि एक पेडी वाचकांचे हे लेख वाचताना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्रस्तुत संग्रहात प्रवासवर्णनपर लेखांचाही एक मोठा विभाग आहे. 'भरदुपारी घनगर्द रानात', 'बीजिंगने दिलेला मंत्र रुजतोय का समाजवादी 'समुद्र आणि समूह',

‘सात बहिणींच्या तनामनापर्यंत’, कविताच ती... ’ ‘कुलाई खोरेः देवभूमी,’ ‘अनाघ्रात समुद्रानुभव’ या आणि अशा स्वरूपाच्या प्रवासवर्णनांत आपण त्या त्या स्थलप्रदेशांची नवी माहिती किंवा तिथला इतिहास समजून घ्यायचा नसतो. तर त्या त्या स्थलप्रदेशाचे व्यक्तिमत्त्व आणि त्याला भेट देणाऱ्या डॉ. शैला लोहियांचे व्यक्तिमत्त्व यांच्यातील अद्वैत साधणारी अनुभवविशिष्टता अनुभवायची असते. या प्रकारच्या ललितगद्यांत प्रवासकालीन अनुभवांचा स्मृतिरुप संस्कार जागवून स्थलप्रदेशाचे भावचित्र आकाराला येते तेव्हा स्वाभाविकपणे डॉ. शैला लोहियांच्या अनुभूतीला त्या त्या स्थलप्रदेशाच्या वस्तुनिष्ठ वर्णनापेक्षा अधिक महत्त्व प्राप्त होते. डॉ. शैला लोहियांनी आपल्या प्रवासवर्णनपर लेखांचे स्वतंत्र पुस्तक केले पाहिजे इतके ते पृथगात्म आणि महत्त्वाचे आहेत एवढेच सुचवून ठेवतो.

उर्दूत गझल मधील सर्वात आवडलेल्या शेराला हासिले गझल शेर म्हणतात. ‘पुनव... पौर्णिमा’, ‘विधिव्रतांतली सामूहिकता’, ‘हिंदू जीवनदृष्टी’, ‘भादवाः कृषी समृद्धीचा’, ‘राखीः एक बंधन’, ‘आई म्हणोनी कोणी’, ‘पापड कुरुड्यांचे दिवस’, ‘दीपोत्सव’, ‘भूमिकन्या’, ‘दशम्या धपाट्याच्या चवींची वेळा आवस’, ‘रंगवल्ली... रांगोळी’, ‘घट’ हे या संग्रहातले हासिले गझल शेर आहेत. अक्षरशः नादावून टाकले त्यांनी मला. पण त्याच बरोबर हेही जाणवले की त्यांचा आनंद कसा घ्यायचा हे समजून सांगायला दुर्गा भागवत किंवा द. ग. गोडसे हवे होते. किंवा आत्ताच्या आता हे लेख घेऊन डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. तारा भवाळकर किंवा डॉ. तारा परांजप्यांकडे जावे आणि या लेखांचे कौतुक त्यांच्या कडून ऐकावे.

संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर आपल्याला ताजमहाल पाहून आल्यासारखे होते. यातल्या व्यक्ती, स्थळ, विचार, लोकसाहित्य धूसरपणे आठवत राहते पण आपल्या मनात वेगळंच चांदणे पडलेले असते. ते असते डॉ. शैला लोहियांच्या संवेदनशीलतेचे, त्यांच्या विचारांचे, त्यांच्या काव्यात्म प्रतिभेचे. आपल्या नकळत आपल्यावरचा ताबा या लेखांनी काढून घेतलेला असतो. उत्कृष्ट कलाकृतीकडून आणखी कोणती अपेक्षा करायची असते?

**– प्रा. विश्वास वसेकर**

# अनुक्रम


१ आम्ही बाया ........................................ १
२ भूमीकन्या भंवरीबाई ........................................ ४
३ किती तरी अशा 'राणी' ........................................ ७
४ पुनव...पौर्णिमा ........................................ १०
५ सुभगा सावित्री ........................................ १३
६ 'वॉटर' आणि ........................................ १६
७ सुफळ गोष्ट ........................................ १९
८ महाराष्ट्र दर्शन आणि १ मे १९६० ........................................ २२
९ विधीव्रतांतली सामूहिकता: गणगौर, चैत्रगौर ........................................ २६
१० भादवा : कृषि समृद्धीचा ........................................ ३१
११ आषाढाचा पहिला दिवस ........................................ ३५
१२ हिंदू जीवन दृष्टी: तिच्यात उमललेले चार्वाकाचे लोकायत तत्वज्ञान ...... ३८
१३ गौतम बुद्धाचा धम्म आणि धम्मावर नवा प्रकाश ........................................ ४२
१४ पापड कुर्डयांचे दिवस आणि नवी दिशा ........................................ ४६
१५ जखती झाडांच्या साक्षी ऐकतांना (२८-२९ जानेवारी १९९५) ........ ४९
१६ आई म्हणोनी कोणी ........................................ ५५
१७ प्रेम, धर्म, बांधिलकी ........................................ ५८
१८ आपणच लिहूया नवी कहाणी! ........................................ ६१
१९ हे रचनात्मक वादळ जागवायला हव ........................................ ६५
२० स्वप्नातून खुणावणारं मधाळ आजोळ ........................................ ६९
२१ दिपोत्सव ........................................ ७२
२२ राखी : एक बंधन ........................................ ७६
२३ भूमीकन्या ........................................ ७९
२४ भरदुपारी घनगर्द रानात ........................................ ८३
२५ सुगंधी वादळे : शुभ्रांकित निरामयता ........................................ ८७

२६ जणू देखणी कविताच ती... नेहमी मनात फिरणारी! ........................ ९१
२७ बीजिंगने दिलेला मंत्र रूजतोय का समाजात? ........................ ९५
२८ सूर्यकिरण पहिले पाऊल टेकते ते अरूणाचल ........................ ९९
२९ सात बहिणींच्या तनामनापर्यन्त ........................ १०२
३० समुद्र आणि समुद्र ........................ १०५
३१ साद हिमशिखरांची... उंच उंच चढताना ........................ १०८
३२ रोहतांगच्या खिंडीत ........................ १११
३३ कुलुई खोरे : देवभूमी ........................ ११४
३४ दशम्या धपाट्याच्या चवीची वेळा आवस ........................ ११७
३५ हरवलेला वसंत ........................ १२०
३६ त्र्याण्णव वर्षाच्या तरुणाकडून उर्जा चेतवून घेतांना ........................ १२३
३७ आमच्यातलं माणूसपण कमी होतेय का? ........................ १२६
३८ माहेरचा खोपा ........................ १२९
३९ जून महिना आला की ........................ १३२
४० हे विठूराया ........................ १३४
४१ फुलता मळा सतत बहरत राहो. ........................ १३७
४२ धोबीका कुत्ता ........................ १४०
४३ संक्रांत... प्रकाशपर्व ........................ १४२
४४ अनाघ्रात समुद्रानुभव... ........................ १४४
४५ तू ऐल राधा ........................ १४७
४६ श्रावण अंगणी ........................ १५०
४७ अक्षरांना अर्थ देऊन ........................ १५४
४८ रंगवल्ली... रांगोळी ........................ १५७
४९ घट ........................ १६०
५० आला श्वास, गेला श्वास... एक भास! ........................ १६३
५१ थंडी, थंडी ...थंडी ........................ १६६
५२ हे स्वरांनो गंध व्हा रे ........................ १६९

# १

# आम्ही बाया...

दुपारचे दोन वाजले की ती जिना उतरून खाली येणारच. रोज चार पाच जण सही घेण्यासाठी आलेलेच असत. एखादी वृद्धा. मुलांना तिच्या नावची संपत्ती हवी असे. मुले तिला घेऊन येत. तिच्या संमतीपत्रावर त्या बाईंची सही असे. पण बाई सगळी सविस्तर चौकशी केल्याशिवाय सही देत नसत. कुण्या आसन्नमरण व्यक्तीची साक्ष नोंदवायला तिला जावे लागे. ती तांगा वा मोटारीची अपेक्षा न करता घरापर्यंत पायी जाऊन, त्या व्यक्तीला दिलासा देणाऱ्या गोष्टी बोलून सही करी. तिला त्या लहानशा जिल्ह्याच्या गावचे लोक बाई म्हणत. घर समतावादी. ओळखीच्यांना थेटवर प्रवेश असे. बाईच्या या मधाळ स्वभावामुळे गावातल्या सर्व जाती जमातीच्या बाया स्वतःचे दुःख मोकळं करायला बाईकडे येत. दुःख कोणतं? नवरा दारू पितो.. बेदम मारतो. सासू कोंडून घालते.. उलथनं तापवून चटके देते.. जेवायला देत नाही.. नवऱ्याशी बोलू देत नाही. सासरा शिव्या घालतो.. माहेरून पैसे, सोनं आण म्हणतो. दिराची नजर चांगली नाही.. जाऊ जाच करते. वगैरे..वगैरे..वगैरे.

एक दिवस एक मध्यमवयीनबाई मोठमोठ्यांने रडत आली. बरोबर दोन तीन बाया. आल्या आल्या डोक्यावरचा पदर काढून तिने पाठ दाखवली. पोलके फाटले होते. पाठीवर वेताचे सप् सप् वार केलेले. इंचभर जागा मोकळी नव्हती. घाव रक्ताळले होते...

त्या बाई दोन शब्द गोड बोलण्या पलिकडे, नवऱ्याला समजावून सांगते, आणि चहा पाजण्या पलिकडे काय करणार होत्या ?...?

'बाई हम औरतांका जीना धोबी के कुत्तो जैसा. न घरका ना घाटका. ऐसा क्यूं?.. प्रश्न करीत ती मार खाल्लेली महिला दिलाशाचा श्वास घेऊन निघून गेली.

...मी असेन तेव्हा ११/१२ वर्षांची. ऑनररी मॅजिस्ट्रेट बाई माझी आई होती. तो प्रसंग आजही चोपन्नवर्षानंतर जसाच्या तसा समोर येतो. त्या प्रसंगाने माझ्या अंतर्मनाची खिडकी खटकन उघडली गेली आणि 'हे असं का?' हा प्रश्न तिथे कायमचा तोरणासारखा टांगला.. कोरला गेला. नंतर देवलांची 'शारदा', ह.ना.आपट्यांची 'यमू' मनाचे पडदे गदगदा हलवून गेल्या. साने गुरूजींची सगळी पुस्तके अधमुऱ्या वयात हाती आली. त्यांनी गोळा केलेल्या स्त्री जीवनातील सुखं दुःख घरगुती भाषेत मांडणाऱ्या स्त्रीरचित ओव्यांनीही मन अस्वस्थ केले.

**सासरचे बोल कडू विषाचे ग प्याले**
**तुझ्यासाठी गोड केले मायबाई ।।**
**स्त्रियांचा हा जन्म नको घालू सख्या हरी**
**रात्र ना दिवस परक्याची ताबेदारी ।।**

बहुदा त्या वयातच मनाची पाठराखण करणारा जीवनसाथी शोधण्याची ठिणगी मनात पेरली गेली असावी. आणि एका वेगळ्या वळणाची दिशा अस्फूटपणे मनाला दिसली असावी.

देवीप्रसाद चटोपाध्यायांच्या 'लोकायत' या ग्रंथाचे वाचन करीत असतांना सर्व सामान्य लोकांनी अनुभवातून निर्माण केलेल्या, वास्तवाशी नाते जोडलेल्या इहवादी तत्वज्ञानाची ओळख झाली. एका नव्या खिडकीचे दार किलकिले होऊन समोर आले. चार्वाकाच्या 'ऋणं कृत्वा घृतं पिवेत्' चा विकृत अर्थ शाळेत असतांना सांगितला गेला होता. पण त्याचा नेमका संदर्भ, जो जीवनात श्रम.. कष्ट यांच्या आधाराने आर्थिक समृद्धीची दिशा दाखवतो, तो हाती आला. 'लोकायत' मधली 'गौरी' स्त्रीची स्वयंसिद्ध प्रतिमा घेऊन समोर आली. आणि व्यास महर्षींचे महाभारत वाचतांना स्त्रीची अत्यंत झळझळीत, अशी सतेज प्रतिमा हाती आली, द्रौपदींच्या रूपाने. द्रौपदीने भर दरबारात सिद्ध केले की, स्वतः द्यूतात हरलेल्या युधिष्ठिराला पत्नीला; मला पणाला लावण्याचा अधिकारच नाही. ती स्वतःच्या मनाने निर्णय घेत असे. ज्या अश्वत्थाम्याने तिची सर्व मुले मारली, त्या अश्वत्थाम्याच्या भळभळत्या चिरजखमेला शांतवण्यासाठी तिनेच त्यात तेल घालून दिलासा दिला. तिला व्यासांनी तीन विशेषणांनी गौरविले आहे. अग्नि कन्या, भाविनी आणि मनःस्विनी. अग्निसारखी तेजस्वी..स्पष्टवक्ती. दुसऱ्याच्या वेदना जाणणारी संवेदनशील भाविनी. आणि मनाचा कौल घेऊन कृती करणारी मनस्विनी.

कोणत्याही विषयाच्या शोधयात्रेचा नाद लागला की त्यात व्यक्तीमनाचं अस्तित्व बुडून जातं. तसा नाद लागला. भारतीय जीवनप्रणालीत 'बाई' च्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा. मग गीता साने, आ.ह.साळुंके, पुष्पा भावे, गुरूवर्य प्रभाकर मांडे, स. रा. गाडगीळ अशा अनेकांच्या साक्षी. ग्रंथ.. प्रत्यक्ष चर्चा.. काळही बदलतच असतो.

..आणि १९९५ च्या बिर्जींगच्या जागतिक महिला परिषदेत इराणची ती सखी भेटली. भर उन्हात काळा बुरखा घालून फिरणारी. बरोबर पुरोगामी पुरूष होते. हसण्या इतपत ओळख झाली. आणि तिला एकटीला गाठून मी विचारलेच. खूप गोड हसून तिने उत्तर दिले.

"जर मी हा बुरखा पांघरला नसता तर तुझी नी माझी.. एवढ्या महिलांची भेट झाली असती ? आणि 'विमेन्स राईटस् आर ह्यूमन राईटस्' या घोषणेचे संदर्भ कळले असते? आपण कितीही दूर दूर असलो तरी हातात हात घट्ट धरून कडं करू या. बरोबरचे पुरूषही नव्या विचारांचे स्वागत करणारे प्रत्येक देशात, धर्मात आहेत. त्यांचे हात हाती घेतले तर जग आपल्याला 'माणूस.. स्वतंत्र परिपूर्ण व्यक्ती' म्हणून नक्कीच मान्यता देईल..."

❑

२

# भूमीकन्या भंवरीबाई

भंवरीबाई त्यावेळी वर्तमानपत्रांच्या मथळ्यांतून केवळ भारतभरच नव्हे तर भारताबाहेर जाऊन पोचली होती. भंवरीबाई जयपूर परिसरातली. एक हुशार आणि धाडसी, शिक्षण नसलेली कुंभारीण. चाकोरीतलं अ..आ..ई.., १,२,३ असं शिक्षण नसले तरी सामान्य व्यक्तीजवळ नव्या उजळत्या प्रकाशाची किरणे हवेतून सर्वांपर्यंत पोचतातच. भोवतालच्या गप्पा, चर्चा, बातम्या यांतून अडाणी मानली जाणारी व्यक्तीपण खूप काही शिकते. महिलांच्या सर्वांगीण विकासाचे काम १९७५ पासून जागतिक पातळीवर सुरू झाले. १९८४-८५ पासून त्याला वेग आला. काम तळागाळापासून सुरू केले तर ते सर्वांपर्यंत पसरते याचे भान शासनाला आले. राजस्थानात शासनाने 'साथिन' हे पद ग्रामीण परिसरातील महिलांच्यात सर्वांगीण महिला विकास व्हावा या हेतूने निर्माण केले. भंवरी जयपूर जवळच्या खेड्यात साथिन म्हणून काम करू लागली. घरोघरी जाऊन मुलींना शाळेत घालण्यासाठी आई, आजीशी संवाद करीत असे. मुलगी वयात आली, की नैसर्गिक बदल होतात. पण ती लग्नाला योग्य होत नाही. आपण मातीची कुंडी बनवतो तिला आकार देतो. पण ती सर्वांगानी भाजल्या शिवाय परिपूर्ण बनत नाही. तिच्यात माती, पाणी घालून रोप लावता येत नाही. ती कच्ची राहिली तर कुंडीच मोडून विरघळून जाते. पोर तेरा चौदाची असेल नि बापानी लगिन लावले तर गर्भाशयात बीज रूजत नाही. अपकार होतात. त्यात मुलीची शक्ती जाते. तिला वेगवेगळे आजार होतात. पोरीला शिकवा. असे ती सांगे. बाईला मारहाण करू नका, दारू पिऊ नका सांगे. महिलांची मंडळे तिने तयार केली.

**बहेना चेत सको तो चेत**
**जमानो आयो चेतन को...**
**तू खुदको बदल, तू खुदको बदल**
**लबही तो जमाना बदलेगा...**

यासारखी अर्थपूर्ण गाणी खड्या सुरेल आवाजात गाऊन ती महिलांना एकत्र आणी. तीज, गणगोर, शिळासात या सारख्या पारंपारिक उत्सवांना महिलांना जमवून नवे विचार सांगणारी नवी गाणी सांगे. स्त्रियांच्यात भंवरीबाई लाडकी साथीन् बनली. पण गावातल्या पुरूषांच्या डोळ्यांना ती काट्यागत खुपू लागली. घरातल्या स्त्रिया नवऱ्याच्या दारू पिण्याला विरोध करू लागल्या. दहा बारा वर्षाच्या लेकीचा 'ब्याव'.. लगिन करायला, प्रौढ पुरूषासोबत बालिकेचा विवाह करायला नकार देऊ लागल्या. स्त्रियांचे जागे होणे, नव्या विचारांनी चालणे हे पुरूषांना खपेना. आणि एक दिवस नको ती वेळ गाठून भंवरीवर गावातील पुरूषांच्या बहकाव्यात येऊन काही गुंडानी सामूहिक बलात्कार केला. भंवरी काही अठरा..वीस..तीसची तरूणी नव्हती. ती जाणत्या लेकरांची माय होती. प्रौढा होती. राजस्थानातल्या महिला संघटना, अरूणा रॉय सारख्या कार्यकर्त्या, काही सुजाण पुरूष कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था यांच्या सह अनेक लहान गावा मोहल्ल्यातल्या महिला तिच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. "ज्या राज्याच्या सर्वोच्च न्यायालयात 'न स्त्री स्वातंत्र्यम अर्हति' असे म्हणणाऱ्या तत्वज्ञाचा(?) पुतळा उभा असतो ते राज्य भवरीला काय न्याय देणार?" अशी कठोर टीका महिलांनी केली. ती भंवरीबाई १९९५ च्या बिर्जीगच्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत अगदी जवळून अनुभवायला, मिळाली. संवाद झाला. आणि माझ्या मनांत ओळी भंवरल्या..

**त्या विभोर सांयकाळी**
**कृष्णतुळशीच्या रंगातून**
**मिणमिणत्या पहाट डोळ्यांतून**
**अंगभर जाणवलीस**
**तनामनात भंवरलीस**
**आणि बीजींगची वाट कशी**
**पायाखाली आल्यागत वाटली.**
**मीरेच्या पायात रूतणारी वाळू**
**तुझ्याही पायाखाली. विषाचा पेला तोच.**
**फक्त समोर ठेवणारे चेहरे वेगळे..**

मीरेला वाटलं होत की 'धीरज का घागरा' नि 'सच की ओढणी' पहेनल्यावर तरी तो देश,.. जिथे स्त्रीच्या भावना, वेदना 'माणूस' या नात्याने जाणल्या जातील, तो सापडेल. पण..!! आज अनेकजणी माणुसकीहीन परंपरा, स्त्रियांना पायदळी तुडवणारे रीतीरिवाज, अंधश्रद्धा यांनी रचलेले उंच उंच गड उतरून जमिनीवर पाय ठेवीत आहेत. पायात रूतणारे काटे काढून नव्या वाटा धांडोळत आहेत.

...मार्च आला की महिला दिनाच्या निमित्ताने भंवरीबाई आठवतेच. मध्यतंरी कोलकत्याला महिलांचा राष्ट्रीय पातळीवरचा मेळावा झाला होता तिथे भंवरी आली होती. मी भंवरीची आठवण काढताच सुनिताने लगेच माहिती दिली.

"भाभी, भंवरी कोलकत्याला भेटली होती. तिने साथिन्‌ची संघटना बांधली आहे. तिचा पोषाख, तो घागरा... डोळ्यातली चमक, माथ्यावरचे बोर, ओढणी अगदी आहे तसेच आहे..."

अशावेळी मन उद्याच्या आशांनी लखलखून जाते. ओठावर ओळी येतात

**माझ्या कातडीचे लिलाव**
**चौरस्त्यात मांडलेस**
**वयाचे हिशेब मांडित.**
**आणि तरीही**
**सात जन्मांचे वायदे स्मरून**
**तुझ्याच अंगणात बहरले**
**तुळस होऊन.**
**व्यास महर्षींची**
**आर्द्र हाक**
**जागी होतेय मनात.**
**हे भाविनी, हे अग्निकन्ये, हे मनस्विनी !!!**
**आणि दगडी वृंदावनाचे चिरे फोडून**
**पुन्हा एकदा जन्माला येतेय**
**भूमीकन्या सीता**
**नवे रामायण लिहिण्यासाठी...**

❑

## ३

# किती तरी अशा 'राणी'

अगदी अशात मध्य प्रदेशातील लेखिका मेहेरूनिसा परवेझ यांची कथा वाचण्यात आली. त्या विशिष्ट जमातीत मोठी मुलगी वयात आली की, तिला साग्रसंगीतपणे देवीला अर्पण करण्याची परंपरा शेकडो वर्षांपासून चालत आलेली आहे. मेहंदी चढविण्याच्या रिवाजापासून ते पहिली रात्र सजविण्यापर्यंतचे सर्व रिवाज खऱ्याखुऱ्या लग्नासारखेच. मात्र त्या रात्रीची बोली. किंमत, बाप वा मोठा भाऊ ठरविणार. प्रत्येक घरात बडी बुआ... आत्या, एखादी आजी 'अशी' असणारच. मग गावात वा मोहल्ल्यात जी सर्वात वयस्क आजी असेल, तिने त्या दोघांना खोलीत बंद करून दाराला बाहेरून कडी लावायची. त्या खोलीला बिनगजाची एक खिडकी. पहाट होत आली की पहिल्या रात्रीच्या मालकाने त्या खिडकीतून पळून जायचे. सकाळी भाचीला सुगंधी स्नान घालून मोठ्या आत्याने तिला गावाबाहेरच्या देवीला नेऊन आणायचे... गावातील प्रत्येक स्त्री-पुरूष हा धार्मिक(?), पारंपारिक विधी नेमकेपणाने पार पडतो की नाही हे पाहण्यात दक्ष असणार. कारण त्या पुण्यमय विधीत त्या व्यक्तीचाही खारीचा वाटा. मात्र पोरीच्या मनातील वादळांची दखल कोण घेणार? त्या कथेतील राणीने त्या मोकळ्या खिडकीचा उपयोग विषव्यूहातून पळून जाण्यासाठी केला. एका तरूण शिक्षकाने तिच्या भांगात सिंदूर भरून तिचा चेहरा ओढणीने झाकून 'कुलवधू' होण्यासाठी मदत केली. पण ही एक कथा. कल्पित सत्याच्या अवकाशातली. प्रत्यक्षात अशा किती 'राणी' सापडतील!

इतिहास असे नमूद करतो की, भारतात पूर्वी मातृसत्ताक जीवनपद्धती होती. स्त्री उत्पादनाच्या क्षेत्रात होती. शेतीचा शोध, अन्न शिजविण्याची कला, कुटुंबाचे व्यवस्थापन यांची निर्माती तीच. मानवी विकासाच्या प्रवासात यंत्राच्या शोधानंतर ती प्रजननाच्या नैसर्गिक जबाबदारीमुळे बाजूला पडली. बीज पेरणारा पुरूष महत्त्वाचा ठरला आणि उत्पादनात, कौशल्यात व्यवस्थापनात अग्रेसर असणाऱ्या स्त्रीचे समाजात 'देहस्विनी' हे रूप रूजले. स्थिर झाले. तिचे समाजातील वा कुटुंबातील स्थान जुजबी, दुय्यम झाले. पण शेवटी जगाचा गाडा प्रत्यक्षपणे चालवणारी 'ती'च. तो 'निमित्त'. यातून निर्माण झाल्या विविध प्रथा आणि रीतीरिवाज. सुमारे पंधराशे वर्षांपूर्वीच्या दाक्षिणात्य साहित्यातून कळते की, स्त्रियांचा महत्त्वाचा व्यवसाय देहाशी जोडलेला होता. अर्थात त्यातही दोन महत्त्वाचे प्रकार. सौंदर्य आणि विद्वत्ता यांच्या भट्टीत तयार झालेले स्वतंत्र तेजस व्यक्तिमत्व असलेल्या आम्रपाली, चित्रलेखा यांसारख्या गणिका किंवा दासी गणराज्यात सर्वात बुद्धीमान रूपवती आणि विविध कलांत निष्णात असलेली तरूणी सन्मानित केली जाई. प्रतिष्ठितांचे मनोरंजन करून त्यांना राज्य चालवितांना येणार ताण हलका करण्याची जबाबदारी तिच्यावर शासन यंत्रणेने सोपविलेली असे. अशा गणिकांच्या मागे-पुढे दास/दासी यांची फौजच असे. मात्र या स्त्रियांवर देह अर्पण करण्याची सक्ती नसे. तो त्यांचा निर्णय असे. नृत्य, संगीत, वाद्यवादन यांच्याद्वारे त्या मनोरंजन करीत. अर्थातच तो त्यांचा व्यवसाय होता. कवी राजेश्वरने आपल्या काव्यात गणिकांच्या विद्वत्तेचा, त्यांच्यातील कलागुणांचा भरभरून गौरव केला आहे.

इ.स. एक हजार साली दक्षिणेतील देवालयात शेकडो देवदासी होत्या. पण मंदिराची देखभाल करणे. परिसर स्वच्छ ठेवणे या 'देवा'च्या सेवेव्यतिरिक्त समाजातील प्रतिष्ठितांचीही वेगळी 'सेवा' करावी लागे. देवदासी म्हटले की बाकी बाब कवी बा. भ. बोरकरांची 'भाविण' ही कादंबरी आठवतेच. याशिवाय मुरळी, जोगतिणी वगैरे वगैरे. चरितार्थासाठी देहप्रदर्शन, देहविक्रय करणाऱ्या अनेक स्त्रिया असत. दासीप्रथा, त्यांच्या विक्रीच्या बाजारांचे संदर्भ प्राचीन साहित्यात सापडतात. बाईचे जगणे कबंधासारखे. शिर नसलेला जिताजागता देह म्हणजे कबंध.

गेल्या काही वर्षात 'बाई' बोलू लागलीये. तरीही अजून मनावरचे गडद पडदे उतरलेले नाहीत. काही वर्षांपूर्वी स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांची बैठक होती. सांगली, कोल्हापूर भागात काम करणाऱ्या कार्यकर्तीने स्वत:बरोबर पूर्वी या व्यवसायात असलेली, बालपणी देवीला 'सोडलेली' एक महिला आणली होती. या संस्थेच्या संपर्कात आल्यानंतर तिने हा

व्यवसाय सोडला होता. अशा देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांना स्वत:च्या जगण्याचे भान देण्याचे काम त्यांच्यात जाऊन ती करू लागली होती. गप्पा मारतांना माझ्यासमोर एक प्रश्न तिने फेकला होता.

"ताई तुमी कालिजात शिकविता. तुमचं पोट, घर चालविता. आमच्यासारख्या गरिबाच्या घरात जलमलेल्या पोरींना ना शिकशन ना काही. तुमच्यासारख्या हापिसात जाणाऱ्या बाया त्यांचचं डोकं इकतात नि पैसे कमवतात. आमच्यापैकी काहींजवळ असतं सुंदर शरीर, त्यातून जवान वय. मंग आमी त्ये इकतो नि पोरा-बाळांचं, आई-बापाचं पोट भरतो. फरक काय? काही तरी इकायचं नि पैसे मिळवायचे! त्यातून आपल्यात पोरग्यांसाठी नवस बोलून पोरी देवीला वाहतात. अशा पोरींना साळंत कोण घालणार?"

❑

४

# पुनव...पौर्णिमा

त्या दिवशी सकाळीच मोठ्या घरून निरोप आला. आज पौर्णिमा आहे. दोघांना जेवायला घरीच बोलावलंय. मी इथे संसार मांडून जेमतेम महिना झाला होता. जातपात, विवाह जुळवण्याची पारंपरित रीत....यांच्या सीमा ओलांडून दसऱ्याला खऱ्या अर्थाने सीमोल्लंघन केले होते. त्याच्या घरच्यांना सद्भावाने जिंकायचे एवढेच उद्दिष्ट समोर होते. शिवाय विवाहाला होकार देतांना पिताश्रींनी एकच मंत्र दिला होता.

...प्रेमात पडलं की फक्त गुणच दिसतात. संसारात सारीपाट एकदा मांडलात की मतभेद एकमेकांचे स्वभावदोष यांचाही अनुभव येईल. पण त्यावेळी शांतपणे एकमेकांना समजून घ्या आणि दोषासकट 'आपलं माणूस' म्हणून एकमेकांचा स्वीकार करा. अशा तऱ्हेचे विवाह यशस्वी होणे देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. ...आज या सर्वात्मक स्वीकाराची चाळिशी उलटून गेली आहे. पण त्यांचे शब्द ताजे आहेत.

तर, सासरच्यांचे मन जिंकायचे म्हणजे 'या' म्हटले की जायचे. हा म्हणाला थोडी लवकर जा. मदत कर. घरी पुरणावरणाचा तळणा, भज्यांसकट साग्रसंगीत स्वयंपाक झालेला होता. मी घरात शिरले तर सासूजी मोठ्या भाभीजींना सांगत होत्या.

'बिनणी, पैले बिरामणीने... रसोईवाल्या दादीजीने जिमाई दे. पछे टाबरटुबर, मोठ्याराना पुरस दे...'

त्यावेळी बिनणी, टाबरटुबर, मोट्यार शब्द कळले नाहीत 'रसोईवाल्या दादीजींना जेवू घाल... बिरामणी म्हणजे ब्राम्हणबाई' ऐवढे अंदाजाने कळले. आज कधीतरी भेटणाऱ्या नातलगांना मी मीरवाडीत सहजपणे बोलतेय हे पाहून आश्चर्य वाटते. भाभीजी मात्र हसत सांगतात 'न आवान कांई हुयो ए कालिजमा मराठी भाषाकी मास्तरणी हे. किशीभी भाषा आवेच ना?'

हळूहळू मी घरात लोणच्यासारखी मुरत गेले. आणि प्रश्नही विचारत गेले. प्रत्येक पौर्णिमेला मोठ्या घरी जेवायला जाणे, पुरणावरणाचा स्वयंपाक वगैरे सुरूच होते.

'भाभीजी, प्रत्येक पौर्णिमेला पुरणाचा वाटण्याघाटण्याचा स्वयंपाक म्हणजे घरातल्या बायकांची कंबर तोड. (तेव्हा मिक्सरचा जमाना तालुक्यापर्यंत पोचलेला नव्हता) त्यापेक्षा खीरपोळी का नाही का करू?'

'हे बघ पोरी, पुनव म्हणजे चंद्राचा पूर्ण प्रकाश. तो समद्या जगाला शांती देतो. पुरणाचा स्वयंपाक म्हंजी पूर्णान्न. आपल्या जीवनात नेहमीच आनंद नसतो. संकटच लई. तुकाराम बाप्पा काय म्हंतात? सुख पहाता जवा पाडे दु:ख पर्वता ऐवढे । पौर्णिमेला चंद्र पूर्ण असतो. पूर्ण सुखाचे रुप म्हणून पुनवेला पुरण घालायचं ग!' माझ्या सासूर्जीना शेवटची अनेकवर्षे दिसत नव्हते पण पुनवेकडे पहाण्याची नवी दृष्टी मला त्यांनी दिली. मग मलाही नाद लागला प्रत्येक पौर्णिमेचा चन्द्र आणि चांदणरात न्याहाळण्याचा. आषाढ श्रावणातला ढगांच्या मलईदार बुरख्यातून जाणवणारा तलम चन्द्रप्रकाश. तर कवी धुवांधार पावसातली काळोखी पुनव. पण त्या काळोखावरही चंदेरी हल्लक झिलई. भाद्रपदात कधी कधी गणपतींची सजावट पार भिजून जाई. पण अनंत चतुर्दशी आणि भादव्याच्या पुनवेचा ओलाचिंब प्रकाश, आश्विन पौर्णिमा बुचाच्या झाडावर उतरून आल्याची जाणीव देई. भाद्रपदातली अवस असावी त्या अंधारात गच्चीवर निवांतपणे बसून उंचउंच सरसरत गेलेल्या बुचाच्या झाडाच्या शेंड्याकडे पहावे. आश्विन पौर्णिमा त्या झाडावर उतरून वाहणाऱ्या सुगंधी प्रवाहात नाहतांना दिसेल. बुचाला कोणी अजरणीची फुले म्हणतात. पण मी मात्र त्या फुलांना आकाश मोगरीच म्हणणार!

आश्विन पौर्णिमेला शिवपत्नी गौरी 'को जागर्ति? को जागर्ति' असे विचारीत अवघ्या विश्वाला वेढून टाकते. ही पुनव सर्वार्थाने स्वत:च्या अस्तित्वाचा, भवतालचा निसर्ग, समाज, कुटुंब यांच्यामधले नाते यांचा निरामय होऊन शोध घ्या, म्हणून 'जागे व्हा' म्हणत रात्रभर फिरणारी पार्वती. ती एक पूर्ण माणूस... मानुषी. म्हणूनच शिवाला,

आपल्या सहचराला प्रश्न विचारून भंडावून सोडणारी. आणि तो चुकतोय असे वाटले तर त्याच्याशी भांडणारी. त्यालाही सल्ला देणारी. अशी 'पूर्णा'.

या दिवशी मोठ्या मुलीला रात्री आई ओवाळते. हा मान ज्येष्ठ मुलाला नाही हं. कोजागिरी म्हटले की आटवलेले दूध हवेच. पावसाचे दिवस ओसरलेले. भरपूर हिरवा चारा नदी नाले वाहणारे. जनावरांनाही विश्रांती मिळण्याचे दिवस. रब्बीच्या पेरणीची तयारी किंवा पेरणी सुरू. अशा वेळी

**वावर फुललंय,**
**जित्राप झुललंय,**
**साळूनं घातली भलरी... म्हणावेसे वाटणारच.**

पहिल्या सुगीचे धान्य हाती येण्याचे दिवस. अशावेळी गोठ्यात दुभतं बहरलेलं. दुधाची चव न्यारीच. पौर्णिमेची रात्र जागवायलाच  हवी. दुधात पौर्णिमेच्या चांदण्याची शर्करा विरघळलेली. दुधाचे घोट घेत 'को जागर्ति विचारणाऱ्या पार्वतीला आपण 'अहं जागर्मि' असे उत्तर द्यायलाच हवे ना?

भारतीय जीवनरीतीने केवळ पौर्णिमेचे पावित्र्य जाणले नाही तर त्या प्रकाशात अमावस्येचा अंधारही कर्म आणि कर्तव्याने उजळून टाकण्याच्या दिशा शोधल्या. आषाढातल्या अमावस्येला दीपपूजा केली जाते. वा दिवाळीची सुरूवात धन त्रयोदशीने होते. तर अमावस्येला लक्ष्मीपूजन केले जाते. खरी दिवाळी तीच. लक्ष्मी, केवळ चांदीच्या नाण्यांची वा सोन्या मोहरांची नाही.

**...दिन दिन दिवाळी,**
**गायी म्हशी ओवाळी**
**गायी म्हशी कोणाच्या? लक्ष्मणाच्या....**

आमची संपत्ती...लक्ष्मी, शेतभात, जनावरे, दुभते यांत आहे. आणि आमचे आदर्श पुरुष गुरे राखणारा कृष्ण, लक्ष्मण, शेतात श्रम करणारा बळिराजा. ह्या सर्वांच्या श्रमावरच आपल्या सर्वांच्या जीवनात पौर्णिमा प्रकाशत असते.

❑

५

# सुभगा सावित्री

''थांबा. यशवंता तू जातीचा नाहीस. तू एका विधवेला बळजबरीतून झालेली नीच अवलाद आहेस. जोतीरावांनी तुला दत्तक घेतले म्हणून काय झाले? जातीच्या माणसानेच त्यांच्या प्रेतासमोरचे मडके हाती घेतले पाहिजे. चला मंडळींनो परत...'' तो प्रौढ गृहस्थ गडगडाट करीत बोलला.

''थांबा'' असे म्हणत ती स्त्री पुढे आली.

'मी तर आहे ना तुमच्या जातीची? मी घेते ते मडके हाती आणि माझ्याच पतीच्या अर्थीपुढे...अंत्ययात्रेत पुढे रहाते..' ती नऊवारी लुगडे गुंडाळलेली मुलगी पुढे आली आणि तिने सुतळीने बांधलेले ते मडके हातात घेतले...

एक विचित्र सुन्नता. इतक्यात एक कन्या उभी राहिली आणि तिने प्रश्न केला.

'मॅडम, आपलं पथनाट्य उठावदार व्हावं म्हणून तर हा प्रसंग त्यात घुसडला नाही ना?'

प्रश्न मला नक्कीच बोचला आणि आवडला.'' बेटा जी व्यक्ती प्रत्यक्ष जगून गेली, अशा आगळ्यावेगळ्या व्यक्तीच्या चरित्रात घुसडंपट्टी केली तर प्रेक्षक.. वाचक सहन करतील?.. पण हे असत्य का वाटते तुम्हाला? आपण एकविसाव्या शतकात जगतोय, म्हणून ते असत्य वाटतेय,'' मला मध्येच अडवीत दुसरी कन्या बोलू लागली.

"..म्हणून तर! मॅडम २१ व्या शतकातही जाती बाहेरच्या मुलावर प्रेम केलं म्हणून मुलगी मारली जाते.. एखादी मुलगी आपल्याशी लग्न करायला नकार देते म्हणून तिच्या अंगावर ॲसिड फेकून तिला विद्रुप केले जाते..

"हो आमच्या गावातल्या जेमतेम चौदा वर्षाच्या मुलीचे लग्न करून दिले. बिचारी आठवीत होती. हुशार होती. लग्न लवकर का? तर मुलगा मुंबईत नोकरीला आहे, कुठल्याशा कंपनीत. नि त्याला महिना पाच हजार रुपये पगार आहे.. पण मॅडम दीडवर्षात तो एडस्‌ने मेला नि ती मुलगी आली माघारी. आता तर फार वाईट अवस्था आहे तिची. तिला घरात घेत नाहीत. शिळे तुकडे खायला देतात. एडस् बद्दल धड माहिती कोणालाच नाही मग यात त्या मुलीचा काय दोष?" तिसरीचा प्रश्न. लगेच चवथीने खंत बोलून दाखवली.

"दीडशे वर्षांपूर्वी ज्योतिबांनी आपल्या आईवडिलांना स्पष्टपणे सांगितले होते की मूल न होणे हा केवळ पत्नीचा दोष नसतो. पुरूषातही दोष असू शकतो. सावित्रीत जर दोष आढळला तर मी जरूर दुसरा विवाह करीन पण माझ्यात दोष आढळला तर सावित्रीचा दुसरा विवाह करून देण्याचे वचन..आश्वासन मला द्याल? खरंच! हे जेव्हा वाचतो, ऐकतो तेव्हा वाटतं ज्योतीराव आणि सावित्रीबाई एकविसाव्या नव्हे तर एकतिसाव्या शतकात जगत होते..." "हो ना. आणि आपण? आपले विचार, आपली जगण्याची रित.. सगळेच सतराव्या शतकातले. आपल्या मेंदूचे कंडिशनिंग कोणी केलेय? धर्मानी की जातीपातीच्या जख्खड परंपरांनी?" आणखी एकीची खंत.

...गेल्यावर्षीची ही हकीकत. तीन जानेवारी हा क्रांन्तीज्योती सावित्रीबाईंचा जन्मदिवस. त्या निमित्ताने पथनाट्य बसवले जात होते. गाव तसे तालुक्याचेच. पण आडवळणाचे. जीवनविषयक तंत्रशिक्षण देणारे मुलींचे गृहविज्ञान महाविद्यालय. जेमतेम शंभर मुलींचे. त्यावेळची ही चर्चा.

ते संवाद ऐकून मीच नाही तर नोकरी आणि भाकरीच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या आम्ही पाच सहा जणी खूप अंतर्मुख आणि अस्वस्थ झालो.

आणि माझ्या मनात दहा बारावर्षापूर्वीचा तो प्रसंग जागा झाला. ते सुशिक्षित मध्यमवर्गीय घर. गृहस्थ वकील. सुसंस्कृत. प्रगत आणि प्रगल्भ विचारांचे. अचानक पोटाचा विकार जडला. मग डॉक्टर्स.. तपासण्या वगैरे. तो आजार जीव घेणाऱ्या कॅन्सरचा ठरला. सद्‌गृहस्थांनी हे सत्य पचवले. त्यांची आज सुविद्य असणारी पत्नी विवाहाचे वेळी जेमतेम आठवी-नववी उत्तीर्ण होती. परंतु पतीच्या प्रोत्साहनाने त्या पदवीधर झाल्या. मुले शिकली. जणू पाचही बोटे तुपात. त्यात हे नवे संकट. पण

वकीलसाहेबांनी अत्यंत हळुवारपणे आणि जीव लावून ते सत्य पत्नीला स्वीकारण्याचे धाडस दिले. आणि वचन घेतले. मृत्यू हा प्रत्येकाचा साथी आहे. आज मी उद्या तू. पण आपल्या जीवनात आपले जे भावबंध जुळले तीच आपल्या दोघांची खरी संपत्ती. 'मी नसलो तरी मी तुझ्या मनात असणारच. आपल्या नातवंडांतून असणार.. मी गीतेचा सेवक. माझ्या शेवटच्या क्षणी तुझ्या ओठातून बहरणाऱ्या गीतेच श्लोक ऐकत मला शेवटचा श्वास घ्यायचाय..मी तुझ्यात आहेच. परंपरेने स्वीकारलेले सौभाग्यलेणे केवळ माझ्या असण्याची खूण नाही. तू माझे जीवन फुलवलेस, मला भाग्यवान केलेस. तू माझी सुभगा आहेस. तू सौभाग्य लेणे उतरवायचे नाहीस. ते तुझे आणि माझे सौभाग्य आहे. आपल्या कुटुंबाला भाग्य देणारे तुझे कपाळ पांढरे राहणार नाही. सर्व सौभाग्यलेणी तू उतरवणार नाही असे आश्वासन मला दे..'

वकीलसाहेबांना दिलेले आश्वासन त्यांच्या सखीने पाळले.

अगदी परवा त्यांच्या घरी जाण्याचा योग आला. कुंकवाने रेखलेले सुभग कपाळ, पायात जोडवी, गळ्यात मंगळसूत्र अशी ती सुभगा नातवाला खेळवीत अंगणात स्वागताला उभी होती...माझे स्वागत तिनेच केले. संध्याकाळी परत निघाले. "बाई, देवघरातली समई चेतवना ना?" सुनेने हाक दिली. मराठवाड्यात राजस्थानी कुटुंबात आईला 'बाई' म्हणतात.

त्यांनी निघताना मला कुंकू लावले. खणानारळाने माझी ओटी भरली. ती सुभगा सावित्री नेहमीच मनात उगवलेली असेल.

❑

६

# 'वॉटर' आणि...

निरागसतेच्या कोमल झाडाला आलेले ते गोंडस फूल. त्या फुलांचे नावं आहे छुंईया. आपल्याला त्या फुलाचे दर्शन उरात ठसून आठवते, ते त्याच्या डोक्यावरचे काळेभोर केस कापताना. हजामाचा वस्तरा त्या निरागस लेकराच्या डोक्यावरून फिरतोय. कारण सात वर्षांची छुंईया विधवा 'विगत: धव:' भाग्यहिन आहे. तिचे दर्शनही पापाचा शिडकावा करणारे आहे. पण तिचे डोळे? अम्माचा ...आईचा शोध घेणारे. गंगेकाठच्या विधवाश्रमात सोडून जाणाऱ्या वडिलांना तिच्या जगण्याचा, अस्तित्वाचा अर्थ विचारणारे. अत्यंत निरामय, कोवळी नजर पांढऱ्या वस्त्रात आकंठ लपेटलेला चिमणा देह. तो भवतालच्या माणसांना वाहत्या गंगेला काहीतरी विचारतो आहे. त्या आश्रमात भवताली शुभ्र, एकवस्त्रांकिता विधवा आहेत. विविध वयाच्या, विविध आकाराच्या, विविध आवाजाच्या, विविध नजरेच्या. स्वत:च्या आशा आकांक्षा, इच्छा, राग, लोभ, द्वेष... सारे पांढऱ्या वस्त्रात बांधून श्वास मोजून जगणाऱ्या. त्यात एक ऐंशीचा घाट पार केलेली वृद्धा. बुंदीच्या लाडूसाठी तरसणारी. तो मिळताच कायमचे डोळे मिटणारी. अर्थात हा लाडू देण्याचे धाडस छुंईयाच करणार.

'सप्तवर्षात् भवेत् कन्या' अशी छुंईया आश्रमात येते आणि सगळ्यांच्या एकसुरी जगण्यावर एक कोमल रंग चढतो. त्या आश्रमाची प्रमुख ढोलमटोल मधुमती. छुंईयाला अम्माकडे जायचेय. तिला पकडून आणायला सांगणाऱ्या मधुमिताला ती दुधाच्या दातांनी कडकडून चावते. कौतुकाची तृप्त लहर इतर सगळ्या विधवांच्या चेहेऱ्यावर.

कल्याणी, मुलामय आरसपानी कांतीची लख्ख गौरांगना देखणी कल्याणी. तिचे काळेभोर केस मात्र वाढलेले. शेठकडे पाठवून आश्रमाचा खर्च भागवण्याचे मधुमिताने शोधलेले माध्यम. मनाने मलीन न झालेली अनाघ्रात अशी कल्याणी, छुंईयावर सतत पाखर घालणाऱ्या दोन पक्षिणी. कल्याणी आणि शकुंतला दिदी. कल्याणीने स्वत:ची माया ममता बारक्या काळू कुत्र्यावर पांघरली आहे. छुंईया पण त्याच्यात रमते. रात्रंदिवस. एक दिवस ते छुंईयाच्या हातून निसटते नि रस्त्यावरून धावू लागते. मागे सुसाट धावणारी छुंईया. नारायण त्याला उचलतो तिथे धापा टाकत पोचलेली छुंईया. मागोमाग कल्याणी. नारायण गांधीजींच्या विचारांवर श्रद्धा असलेला तरूण वकील. श्रीमंत सेठचा एकुलता एक मुलगा. प्रथमदर्शनीच कल्याणीच्या प्रेमात खोल बुडालेला. छुंईया बद्दल आस्था, करूणा.

'माझ्या आईचं ऐकून बाबूजींनी माझं लग्न केलं असतं तर छुंईया एवढी बेटी असती मला.' नारायण.

निरभ्र मनाचा नारायण आईला विधवेशी लग्न करणार असल्याचे सांगतो. कल्याणीला घरी घेऊन जायला येतो. कल्याणीच्या विवाहाचे लाडू, पुरी खाण्याची स्वप्ने पहाणारी छुंइया, कल्याणीच्या पुनर्विवाहाला मधुमिताचा विरोध. मधुमिता संतापाने तिचे केस कापते. तरीही इतर सर्वांच्या नि:शब्द शुभेच्छा घेऊन कल्याणी नारायण बरोबर नावेत बसते. नारायण पल्याडच्या तीरावर असलेला त्याचा वाडा तिला दाखवतो. कल्याणी चमकते आणि दृढ शब्दात सांगते, नांव परत मागे फिरव.

...तो वाडा. ज्या सेठकडे मधुमिता कल्याणीला रात्री पाठवीत असते. त्या सेठचा असतो. आणि जगण्याचा अर्थ हरवलेली कल्याणी एक दिवस गंगेत नाहीशी होते. मधुमिताशी खिडकीतून गप्पा मारणारा, तेथील सुंदर विधवांना रात्रीचा शेठ शोधून देणारा एक 'तृतीय-पुरूषी'. मधुमिता छुंईयाला त्याच्या बरोबर सेठकडे पाठवते. परंतु पांखर घालणारी दुसरी पक्षिणी हा डाव उधळते. छुंइयाला कडेवर घेऊन पळत सुटते. नारायणाला शोधणार कुठे नि कसे? पण अलोट गर्दी रेल्वेस्टेशनकडे धावणारी. महात्मा गांधीजी रेल्वेतून जातांना वाराणशीला दोन मिनिटे थांबून लोकांसमोर बोलणार असतात. तिथे गांधीभक्त नारायण नक्कीच असेल. पुन्हा छुंईयाला कडेवर घेऊन जीव समर्पून धावणे.

..गाडी सुटली आहे. दरवाजात नारायण. शकुंतला दिदी, चालत्या गाडीत छुंइयाला त्याच्या हातात देते. नारायणच्या डोळ्यातली आश्वासकता आणि छुंइयाचे तृप्त निरागस डोळे, शकुंतला दिदीला जगण्याचे अर्थ ...संदर्भ सापडल्याचा निरामय अनुभव.

...दिपा मेहेताचा 'वॉटर' हा चित्रपट बघायला मिळणे एक अस्वस्थ अनुभव. कल्याणीच्या पुनर्विवाहाला नाकारणाऱ्या मधुमिताच्या पोटऱ्या, पायांनी चेपतानां तिच्या अंगावर दणादणा नाचून...तुडवून छुंईयाने व्यक्त केलेला संताप. होळीच्या वेळी छुंईयाला कृष्ण बनवून विधवा आश्रमात एकमेकींच्या अंगावर गुलाल उधळून साजरी केलेली रंगपंचमी. सारेच न विसरता येणारे अनुभव.

आम्ही राष्ट्रीय आणि महाराष्ट्र प्राधिकरणाच्या वतीने यावर्षी मार्च मध्ये परित्यक्ता व एकाकी महिलांचे संमेलन घ्यायचे ठरवले. विधवा हा शब्द का वापरायचा? ती स्त्री मुलांना अन्न, शिक्षण देण्यासाठी, त्यासाठी अर्थार्जन करण्यासाठी दहा दिशा धुंडाळते. तिला भाग्यहीन का म्हणायचे? म्हणून आम्ही 'एकाकी' हा शब्द योजिला. त्यांचे दैनंदिन जगण्याचे आर्थिक, सामाजिक प्रश्न जाणण्यासाठी सर्वेक्षण पत्रिका तयार केली. वाटले होते ३००/३५० महिला येतील. आठशेच्या आसपास आकडा गेला. जिलब्या, मसालेभात खातानाची धडपड, चढाओढ..! परित्यक्तांपेक्षा एकाकी, निराधार जीवन जगणाऱ्या विधवांची संख्या जास्त, वॉटर पहातांना मला त्या परिषदेचा अनुभव आठवला.

...'वॉटर'च्या चित्रीकरणाला विरोध झाला. मग पात्रं बदलली. श्रीलंकेत तो चित्रित झाला. आमच्या धर्माने समाजाच्या अंगावर केलेल्या खोल जखमा आम्ही किती दिवस झाकून पाकून ठेवणार? आमचा धर्म.. जो जन्माने दिला, मग तो कोणताही असो, निरोगी, करण्याची बांधिलकी त्या धर्माचे म्हणून आपण स्वीकारायला नको? आपले घर आपणच झाडून स्वच्छ ठेवायला हवे ना?

❑

७

# सुफळ गोष्ट

रणरणत्या उन्हात तापलेला माळ. धगधगणारे जळते डोंगर. रानोमाळ भटकणारी गुरे नि माणसे. वणवण. का? भूक भागवणाऱ्या बरबड्याच्या दाण्यांसाठी! बरबडा हे दाणे देणारे रानगवत ...आगाताच्या सुगीचे १९७० साल बिनपावसाचे उलटले. पाठोपाठ १९७१ ही तसेच. १९७२ ची आशा होती. पण तेही तोकड्या पावसाचे. अवघा मराठवाडा दुष्काळाने हैराण. होरपळणारी. खंगलेली जनावरे कत्तल खान्याच्या दिशेने नेणारे उदास शेतकरी. गंगथडीचा पट्टा सोडला तर इथून तिथून तीच तऱ्हा.

बीड जिल्हा तर कायमचा तहानलेला. दुष्काळी. आष्टी, पाटोदा, केज, अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामीण परिसरातील हजारो कुटुंबांनी भाकरीसाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सुरत असे रस्ते धरले. घरादाराला कडी घालून. चिरेबंदी वाडा मोकळा सोडून. देशमुख पाटलाच्या घरातल्या मध्यमवयीन बाया हळदीकुंकवाच्या निमित्ताने वलगट पांघरून घराबाहेर पडणाऱ्या. त्या पितळी टोपली घेऊन रोजंदारीच्या कामावर, दगडमाती भरून एकमेकींना देऊ लागल्या. घरची म्हातारी कोतारी दीड दोन एकर रान.. शेत सांभाळण्यासाठी. दारात बसवली गेली.

...१९४७ साली आम्ही स्वतंत्र झालो. १९५२ साली जात, धर्म, लिंग निरपेक्ष समतावादी स्वतंत्र राष्ट्राची राज्यघटना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली तयार झाली. आमच्या हक्कांचे, अधिकारांचेक नेमके अर्थ समजून घेतांना नागरिक म्हणून कर्तव्यांची माहिती जाणून घेण्याचे भान मात्र सुटून गेले. आमच्या

डोक्यात एकच समीकरण पक्के झाले. शासन हा 'देता' आणि नागरिक हा 'घेता'. जे संघटित झाले त्यांनी घेराव, मोर्चे, हल्लाबोल, उपोषण वगैरेंच्या मार्गांनी शासनाकडून जमेल तितके मिळवायचे! सामान्य माणूस मात्र आहे तिथेच. आशाळलेला आणि ओशाळलेला.

निसर्ग आणि नियतीच्या धक्क्यांनी माणसे आतून हलतात. डोकी धावू लागतात. विशेषत: तरूणांच्या मनातली उर्जा जागी होते. फुलत जाते. आणि तसेच झाले. काही हातात हात घालून फिरणाऱ्या तरूणांना स्वप्ने पडू लागली. दगडातून झिरपणाऱ्या झुळझुळत्या पाण्याची. स्वप्ने. पण ती मृगजळ होती?

...एक दिवस तिघे चौघे तरूण डोंगरावरच्या एका उमाठ्यावर उभे होते. थांबत थांबत उतरत जाणारा डोंगर उतार. आणि थेट खाली पूर्व पश्चिम पसरलेली वाळूची रूंद नदी. म्हणजे पट्टा. मैलोनमैल पसरत गेलेला. तिचे नाव नीलगंगा

मग त्या तरूणांपैकी एकाने विचारले. ''भाऊ, हितं पाण्याचा थेंब नाही नि नीलगंगा कसं हो नाव या वाळूच्या पट्ट्यांचं?''

'अवं दादा आमची आजीमाय न्हान व्हती तवा लई मोट्ठं जंगल व्हतं म्हन हितं. ही निळाई बारमास वहायची. रातच्याला बिबठे, कोल्हे फिरायचे. बाया पहाटे पानी भराया, धुनं धुवाया जायच्या तवा दिसायचे. हरेक खेड्यातलं एखांद दुसरं जनावर, कंदीतरी सुगी राखणाऱ्या गड्याला ओढून न्यायचे. या डोंगराळ भागात पीक पिवळ्या जवारीचं आन् जवसाचं. मोठ्या जवारीची भाकर सणासुदीलाच. दुभत्या गायी म्हशी, मेंढरं लई होती. पाटील देसमुखाची घरं हाताच्या बोटावर मोजावी इतकी. एखादं बामणाचं. पुजेला तो नि मर्तिकेला तोच. एखादं मारवाड्याचं दुकान. दुकानदार नि सावकार तोच. या भागात वस्ती धनगर, हटकर, वंजारी, आन् शिवे भाईर त्यांची.' गावात राहणारा एखादा काटक म्हातारा अशी माहिती देई. मग ही तरूण पोरं त्या शब्दांमागचा शोध घेत.

दिवस उलटतच असतात. तसे ते उलटत होते. पाऊस बऱ्यापैकी पडू लागला. पोरं उत्साहानं डोंगरात गेली. पण काय? पाणी सगळं वाहून गेलेलं. नाही म्हणायला खुरट्या गवताचे गालिचे. झाडे टवटवून जीव वाचवून उभी. निळाई कोरडाईच!

मग दुप्पट वेगाने डोकी चालायला लागली. नवेनवे प्लॅन्स् घेऊन पुण्यामुंबईकडे धाव. डोक्यातली स्वप्ने जमिनीवर उतरवायची झाली तर तल्लख, अनुभवी साथ हवी आणि पैसाही. एका ज्येष्ठ निनावी व्यक्तीने दहाएकर नाठाळ डोंगर खरेदी करायला, पैसे

दिले. पाठीवर दिलाशाची थाप दिली. आणि एक नवी प्रयोगशाळा सुरू झाली. दर शनिवारी, रविवारी ही तरूण मंडळी डोंगरात जात. दगड गोटे घेऊन उतारावरच्या अरूंद घळी भक्कमपणे बंद करून टाकत. उतारावर एकाखाली एक बंद केलेल्या घळी तग धरलेल्या वाळक्या बाभळी पिंपळा भोवती खंदून आळी केलेली. चाराचे दहा, वीस...पंचवीस. पोरं आणि पोरी. गावातल्यांनाही उत्सुकता. मग तेही सामील. मग यायचा तेव्हा पाऊस आला. नि काय? ... त्या घळीतलं पाणी क्षणभर थांबत थांबत इकडे तिकडे पाहू लागलं. बाभळ पिंपळाखालची आळी टचाटच भरली. गेल्या सालपेक्षा त्या डोंगरातली हिरवळ जावळासारखी झुलु लागली. तरूणांच्या मनातले बळ दुप्पट झाले. ही आगळी वेगळी बिनभिंतीची प्रयोगशाळा चहुअंगांनी बहरू लागली. गावातला माणूस गावात राहू लागला. झाडे लावू लागला. बरबडा खाण्याऐवजी पिवळी ज्वारी, जवस, उडिद अशी आगाताची पिके घेऊ लागला. पाणी मातीत जिरू लागले. मग सामुदायिक विहिरीची कल्पना. हा प्रयोग वंसतराव नाईकांनी शासनाच्या वतीने राबवला. शेवटी चांगल्या शासकीय योजनांचं झालं तेच या प्रयोगाचे झाले. पण मुख्यमंत्र्यांच्या या योजनेने त्या धडपडणाऱ्या तरूणांच्या मनात घर केले. मग या प्रयोगशाळेची रोजगार हमी शंभर दिवस काम देणारी. मग त्यात नवी भर. ती अशी. बायांना एक तास लिहायला वाचायला शिकवायचे. अन् तो तास कामाचा धरायचा काही दिवसात म्हाताऱ्या, तरूण सगळ्या बाया अंगठा उमटवून नव्हे तर सही करून मजूरी उचलू लागल्या. जुन्या विहिरींचे झरे जिवंत होऊन झिरपू लागले. मग प्रत्येक खेड्यात धावणारी एस. टी., १० वी पर्यंत शाळा, शिकणाऱ्या.. खेळणाऱ्या मुली.. आणि २५ वर्षानंतर आज?

**भिरभिरणाऱ्या पायांना**
**मिळालाय विसावा**
**उजाडणारा प्रत्येक दिवस**
**वाटतोय नवा**
**दांडातून खेळतयं झुळझुळतं पाणी**
**दीड दोन एकराची मालकीण**
**गातेय सुगीची गाणी.**

ही अशी गोष्ट. सुफळ होऊन संपूर्ण होण्याच्या दिशेचा शोध घेणारी. ती वाचणाऱ्यालाही सुफळ होवो.

❐

८

# महाराष्ट्र दर्शन आणि १ मे १९६०

०१ मे १९६१ ची संध्याकाळ राष्ट्र सेवा दल कलापथकाचा महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा नृत्यनाट्य संगीतावर आधारित कार्यक्रम हैद्राबादला खुल्या रंगमंचावर सादर होत होता. प्रमुख अतिथी मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे सेनानी स्वामी रामानंद तीर्थ समोर बसलेले. अर्धुक्या उजेडात संत तुकाराम टाळ चिपळ्यांवर अभंग आळवताहेत.

**कन्या सासुरासी जाये, मागे परतोनी पाहे**
**तैसे झाले माझ्या जीवा, केव्हा भेटसी केशवा**

मागे पांढराशुभ्र छाया नाट्याचा... शॅडोप्लेचा पडदा. त्यावर छाया दिसताहेत. अंगावर शेला, मुडांवळ्या, नऊवारी लुगड्यातली नववधू. मागे वळून पहातेय. तिचा शेला पांघरलेला हात आर्ततेने आईकडे ओढ घेतोय. आईचा एक हात, सोडून जाणाऱ्या लेकीची समजावणी करतोय. तिच्या दिशेने दिलासा देत झेपावतोय. मंदिल बांधलेला पुढे ओढ घेणारा ताठ नवरदेव. त्याच्या उपरण्याला शेल्याची बांधलेली गाठ. ओढली जाणारी. छाया नाट्यातल्या सावल्यांचा खेळही विलक्षण बोलका. स्नेहल भाटकर किंवा शरद जांभेकरांचा भावगर्भ स्वर. शिवाशी एकरूप व्हायला आतुरलेल्या जीवाच्या मनाची तगमग.

स्वामीजींच्या डोळ्यातून घळघळा पाणी ओघळत होते.

६ मे ला कलकत्याला प्रयोग होता. हैद्राबाद ते कलकत्ता सुमारे दीड हजारापेक्षा जास्त किलोमीटर्स चे अतंर. राजमुंडीच्या अलिकडे गोदावरी अनेक हातांनी बंगालच्या उपसागराला भेटायला धावू लागते. या प्रवाहांवर ॲनिकट नावाचा सात किलामीटर्सचा पाणरस्ता आहे. हे प्रवाह खोल नसतात. तिथे कमी उंचीचे पूल. जमिनीवर किंचित उंच पक्का रस्ता. सायंकाळी हे रस्ते बंद केले जातात. आम्ही तिथे पोचलो तर अनेक वाहने आमच्यापुढे. संध्याकाळ झाली. आपण राजमहेन्द्रीला पोचू या हिशेबाने. जवळ खाण्यासाठी फक्त चुरमुरे अलिकडच्या लहान गावातल्या डाक बंगल्यात आमचा मुक्काम. रात्री अचानक अवकाळी पाऊस आभाळ कवेत घेऊन कोसळू लागला. सकाळी नवे संकट समोर. ॲनिकट पार उध्वस्त झालेला. ०३ मे ची सकाळ. ०६ मे ला कलकत्ता गाठायचे. कवी वसंत बापट, लिलाधर हेगडे, वर्देकाका सगळेच अस्वस्थ. इतक्यात समोरून एक माणूस तराफ्यावरून नदी पार करून आला. लगेच बापटकाका धावले. तो अधिकारी होता. त्याच्याशी विनवणीवजा चर्चा. यशवंतरावजी, काकासाहेब गाडगीळ यांची ओळख वगैरे. मग त्याने एक प्रचंड मोठा तराफा मागवला. तो तराफा. त्यावर आमची साठ माणसांची बस. त्यात आम्ही. हलायचे नाही. बोलायचे नाही या सूचना. एकदाचे आम्ही पल्याड पोचलो. राजमहेन्द्रीत उपाशी पोटांनी भरगच्च जेवून पुन्हा प्रवास सुरू. घनदाट जंगलातून. वाटेत एक भलामोठा जाडजूड पिवळा अजगर उजवीकडून डावीकडे गेला. बस बऱ्यापैकी वेगात. ब्रेक मारला तरी तो जखमी झाला. गाडीच्या ड्रायव्हरनी गाडी थांबवली. जखमी अजगर दूर जाऊ शकत नाही तो मरतोच. आणि तसेच झाले. एवढा प्रचंड अजगर पुन्हा कधी पाहणार? राणीची बाग नाहीतर सर्पसंग्रहालयात. पण ते पिंजऱ्यातले. ओरिसात महाकाय महानदीने अडवले. तिथेही तराफा नाट्य. सततचा प्रवास. पोटात न मावणारी भूक. असनसोल जवळच्या पेट्रोलपंपावर प्रत्येकी अर्धा पराठा, एक लोणच्याची फोड नि बटाट्याच्या भाजीचे दोन तुकडे यावर भूक भागवली. कलकत्ता गाठेस्तो संध्याकाळचे चार वाजलेले. पूर्वेकडे पाचलाच अंधारते. महाराष्ट्र मंडळाने सगळ्या खोल्या उघडून दिल्या. मग आंघोळी. थोडेफार खाणे. आणि ठीक ०६ ला पडदा वर गेला. त्या दौऱ्यातला तो सर्वोत्कृष्ट कार्यक्रम...

४७ वर्षापूर्वी ०१ मे १९६० ला महाराष्ट्र दर्शनचे पहिले सादरीकरण दिल्लीत झाले. सुरूवात पहाटे येणाऱ्या जागल्या... मागत्यांपासून होई. मग त्यात वासुदेव, वाघ्यामुरळी, जोगी असत. २ तास ५० मिनिटांचा बांधीव, आखीव, रेखीव कार्यक्रम. रचना कविवर्य वसंत बापट यांची. संगीत दिग्दर्शन वसंत देसाईंचे. महाराष्ट्राच्या संस्कृती दर्शनात मंगळागौरीच्या निमित्ताने रात्रीच्या जागरणात खेळले जाणारे विविध खेळ.

फुगड्यांचे प्रकार... पिंगा... खुर्ची का मिरची हा नववधूला फेरात अडकवून, तिला बाहेर न जाऊ देण्याची कसरत, सासुरवाशिणी, लेकी, वयस्क सासवा... काक्या, माम्या अशा समस्त महिलांना अंतर्बाह्य मोकळे करणाऱ्या खेळांचा समावेश असे. नाव घेण्याचा (अर्थात पतीचे) कार्यक्रम असेच. आज ते खेळ उखाणे पार अंधारात पुरले गेले आहेत.

मग एकनाथांचे भारूड, ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, नामदेवांच्या अभंगाची, स्वामी समर्थांच्या दासबोध यांची चित्रमय, संवादमय दखल. पंतांच्या कवितेतील हंसांच्या क्रिडेचे नृत्यमय दर्शन. सुटुनि खग पळाला, बैसला शाल शाखे... हे नृत्य सुधाताईची चिंटुकली झेलम नि आवाबेनची माणिक करत असत. आज झेलम ओडिसी नृत्याची प्रख्यात जाणकार, अदाकार आहे. रामजोशीच्या वेशातले उमदे बापटकाका. 'सांग सखे सुंदरी कुण्या ग सुभगाची मदन-मंजिरी' या लावणीच्या ठेक्यावर नाचणारी आमची सुधाताई (वर्दे) ती नाचू लागली की लय अक्षरश: तिच्या नृत्याविष्कारातून लवलवू लागे. शाहीर लिलाधर हेगडे पट्ठे बापुरावांचा पोवाडा सादर करीत. बैठकीची लावणी ही महाराष्ट्राची खासियत.

**पाऊस वर पडतो, सख्या रे रात्र अशी अंधारी**
**भिजत मजसाठी तू उभा केव्हाचा दारी...**

अत्यन्त करूणार्त स्वरात गाणारी लीला. अनुताई किंवा मी. महाराष्ट्रातल्या लोकनृत्यांची अधून मधून पेरणी. देव पावला देव माझा मल्हारी हे कोळीगीत. नाचणाऱ्यात रामनगरकर.

महाराष्ट्राला सुफलित करणाऱ्या नद्या. कृष्णा तापी, गोदावरी, प्रवरा, भीमा... त्यांची वैशिष्ट्ये अवघ्या दोन ओळीत रेखाटनारे भरतनाट्यम शैलीवर वर आधारित अतिशय देखणे नृत्य. तारपा या वाद्यावरचे आदिवासी नृत्य.

महाराष्ट्राला अस्मिता देणारे म. फुले, आगरकर, टिळक आदींची त्यांच्या विशिष्ट वाक्यांच्या अभिव्यक्तीतून झलक. केशवसुतांच्या नव्या मनूचा शिपाई' या कवितेचे समुहाने सादरीकरण. बालकवींची 'कुणी नाही ग कुणी नाही आम्हाला पाहत बाई.' ही चांदण कविता नृत्यातून सादर.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मिती झाली. कोकणातली अनेक कुणबी समाजाची मुले 'रामागडी' होऊन मुंबईत येतात. इथेच संसार थाटतात. होळी... रंगपंचमीच्या काळात ते महाभारतातली सोंगे घेऊन घरोघर फिरतात. त्यांचे बालीनृत्य सादर केले जाई. अर्धी विजार, वर चटेपटेरी बनियन, गळ्यात रंगीबेरंगी रूमाल, पायात घुगरु. हे

नृत्य एकमेकांच्या हातात हात घालून गोलाकारात असते. मध्येच गोलांची दिशा बदलते. त्याची लयच अन् कोकणी गीत ही त्यांची खासियत. 'गणराया पडतो पाया पडतो पाया धावत येरे मती मला देरे. येऊन सभेच्या ठाया...' हे नृत्य महाराष्ट्र दर्शनमध्ये होते आणि शेवटी गणेशोत्सव आणि लेझिम. मराठी संस्कृतीचा गाभा.

महाराष्ट्र दर्शनची सुरवात कवी वसंत बापटांच्या 'गर्जा जयजयकार, जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र हा गर्जा जयजयकार' या गीताने होई.

**जय वऱ्हाडचे आजोळ, जय अजंठानि वेरूळ**
**जय बारा मावळ बाई जावळ खानदेश सातार...**

संपूर्ण महाराष्ट्राचा सांस्कृतिक आलेख संयत शब्दांतून त्यात रेखाटला होता. तर शेवटी त्यांचेच गीत.

**जय हिंद हिंद, आनंदभुवन, जय भारतवर्ष महान ।। धृ ।।**
**हा रजत शिखरधर गिरिवर सुंदर उत्तरेस हिमवान**
**हे नील गगन गत चक्र सुदर्शन तळपत वरि भास्वान्**
**हे चन्द्रचलित जल उर्मिल सागर मंद्रगाती मधुगान...**

हे गीत होई व २ तास ५० मिनिटांची सांस्कृतिक झलक संपे...

गेली अनेकवर्षे प्रत्येक महाराष्ट्र दिनी अनेक सेवादल सैनिकांच्या कलाकार... गायक... तंत्रज्ञ... यांच्या मनात 'महाराष्ट्र दर्शन' जागे होते. साठी ओलांडली तरी जुन्या आठवणींनी मन शहारून जाते आणि बहारून जाते.

❑

९

# विधीव्रतांतली सामूहिकता: गणगौर, चैत्रगौर

उमलत्या वयात 'का' हा प्रश्न मेंदूत उगवला की मनाच्या क्षितिजात नवनव्या चांदण्या चमकू लागतात. त्या मिणमिणत्या प्रकाशामागच्या शोधाचा ध्यास लागतो. ..माझे आजोबा असेपर्यन्त सण-वार माहेरच्या समाजवादी घरात खाण्यापुरते साजरे होत. नागपंचमीला तांदुळाच्या रव्याची खमंग खांडवी होत. कोकणात व देशावरही या दिवशी चुलीवर तवा चढवत नाहीत. पंचमीच्या आधीपासून रात्री गल्लीतल्या महिला एकत्र जमत. फेर धरून गाणी म्हणत. मराठा, माळी, साळी, ब्राह्मण.. सर्व जातीच्या बाया हातात हात घालून फेर धरीत. नंतर आमची लाडकी भुलाबाई भाद्रपद पौर्णिमेला घरी येई. कोनाड्याला मखर लावून, तोरण बांधून तिला, तिच्या भुलाजीला आणि त्यांच्या गणेश बाळाला, त्यात 'बसवले जाई' मग सर्व जातीजमातीच्या मुली सायंकाळी शाळा सुटल्यावर एकीमेकींच्या घरी टिपऱ्या घेऊन फेरधरून गाणी म्हणायला जात. चारपाच गाणी म्हटली की खाऊ मिळे. अर्थात् आधी तो ओळखण्याचा विधी असे. सात आठ घरचे नवनवे खाऊ खाऊन घरी येई पर्यन्त रात्रीचे आठ वाजून जात. मंगळागौरीची पूजा. मैत्रिणीच्या घरी नव्या नवलाईच्या भावजयीची नाही तर काकूची मंगळागौर असे. मग फुलं, दुर्वापत्री गोळा करून सुंदर सजावट करण्याची, संध्याकाळच्या फराळाची, रात्रीच्या जागरणाची नि सूप नाच, फुगड्या झिम्मा, 'खुर्ची का मिर्ची' खेळत नवविवाहितेला फेरात अडकवून नाचण्यात व तिला फेरा बाहेर पळू न देता नाव घ्यायला (अर्थात नवऱ्याचे) लावण्यात वेगळीच धमाल असे. या फेरात सत्तरी गाठलेल्या आज्या, पणज्याही सामील होत. ही सर्वच व्रते, त्यातील खेळ, जागरण

यातही एकत्र येऊन खेळण्यावर भर असे. तेव्हापासून स्त्रियांच्या व्रतांतली, विधींमधली सामूहिकता मनाला आगळी वेगळी वाटत असे.

विवाहानंतर आंब्याला आले. माहेश्वरी... राजस्थानी घरातील सून म्हणून. तिथेही स्त्रियांच्या नव्या विधी, व्रतांचा अनुभव सहभागी होऊन घेतला. महाराष्ट्रपासून दक्षिणेकडे सर्वसाधारणपणे अमावस्येनंतर नवा महिना सुरू होतो. तर उत्तरेकडे पौर्णिमेनंतर सुरू होतो. फाल्गुनी पौर्णिमेनंतर चैत्र सुरू होतो. तर महाराष्ट्रात फाल्गुनी अमावस्येनंतर.

...होळीच्या दुसऱ्या दिवशी स्वयंपाक करणाऱ्या दादीजी घरातली मोठ्ठी कढई डोक्यावर पालथी घालून लगबगा मोठ्या घरी आल्या.

'बाई' सुवारं गौर बेठवाळी हं. थाकी नई देवरानी पूजा करी कांई?'

'न कराया काय झालं? आता आपली झालीये ना? सगळं करील.' भाभीजींचे उत्तर. मग बड्डी तीज.. हरियाली तीज, शिळा सात, गणगौर यांत मीही उत्सुकतेने सामील झाले.

वर्षे भरारा भरारत होती. लोकसाहित्य, त्यातील स्त्रियांची व्रते, विधी, गाणी यांत मन गुंतले आणि विशेष अभ्यासाचे शोधनाचे क्षेत्र म्हणून 'स्त्रियांची विधी, व्रते, उत्सव यातील सामूहिकता' हा विषय निश्चित केला.

फाल्गुन उजाडला की घरादारातील पोरीसोरींना आणि नव्यानवेल्या 'बिनणीनां' गोर पूजण्याचे ...त्यासाठी माहेरी जाण्याचे वेध लागत. सुहासिनीही गणगोरीची आतुरतेने वाट पहात. होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे उत्तरेतल्या.. राजस्थानातल्या चैत्र प्रतिपदेच्या दिवशी गोर (गौर) माहेरपणाला येते. होळीची राख सुफलनासाठी अत्यन्त चांगली. या राखेचे १६ मुटके, शेणाचे १६ मुटके करतात. भिंतीवर ओल्या हळदी कुंकवाचे १६/१६ ठिपके रेखाटतात. त्या खाली ते मुटके मांडतात. ते गौरीचे प्रतिक. पहिल्या दिवशी गव्हाच्या नव्या ओंब्यांनी, दुसऱ्या दिवशी हळदीने पूजा करतात. सातव्या दिवशीं भिंतीवर काजळाचे १६ ठिपके मांडून खाली दोन कुंड्या वा मडकी काव, चुना यांनी सुंदर रंगवून त्यात होळीची राख शेण, माती घालून, त्यांत गहू, साळ, सरकी, ज्वारी, तूर, हरभरा अशी सात प्रकारची धान्य पेरतात, आणि गौरीच्या मुटक्यांजवळ ज्वारीचे कणिस त्याला पांढरा दोरा बांधून उभे करतात. तो 'ईसर' म्हणजे ईश्वर.. शंकर. त्याच्या जवळ दुसरे कणिस. त्या कणसाला केसाचा गुंता आणि लाल पिवळा शुभकारक दोरा बांधतात. त्याला मोळी म्हणतात. ते कणिस..ती गौर... गौरी.

या दिवशी पाटावर नवे गहू पसरून त्यावर या कुंड्या ठेवतात. रोज पूजेनंतर जवळच्या विहिरीवर वा तळ्यावर सगळ्या जणी मिरवत गाणी गात जातात. दोन कळशात पाणी घेऊन येतात. एक शिव तर दुसरी पार्वती. ते कुंडीत टाकतात. दुसऱ्या दिवशी त्यांचे लग्न. अगदी सात फेऱ्यांसह. ज्या दिवशी महाराष्ट्रात चैत्रगौर मांडली जाते त्या दिवशी.. चैत्र शुक्ल तृतियेला, राजस्थानी गणगौर विसर्जित केली जाते. तिचे माहेरपण संपते. जातांना गव्हाच्या पिठात गूळ तूप घालून त्रिकोणी मुटके तळतात. त्याला फळ म्हणतात. गव्हाच्या पिठाच्या तळलेल्या डबीच्या आकारात सात फळे ठेवतात. त्यात फणी, काजळ कुंकवाच्या डब्या तळून ठेवतात. त्या दिवशी चंदनबटव्याची, (तो थंड असतो) भाजी करतात. न मिळाल्यास मेथी.. हरभरा.. पालक अशी हिरवी भाजी करतात. मुलीच्या विवाहानंतर या व्रताचे माहेरी उद्यापन होते. म्हणजे हे व्रत कुमारिकांचे नंतर सुवासिनींचे असते. घराला सुखसमृद्धीचा आशीर्वाद देऊन गौर परत जाते...

थंडीच्या काट्याने मोहरलेली आंब्याची राने फाल्गुनच्या अखेरीस बाळ कैऱ्यांचे झुलते डूल कानात घालून वहात्या वाऱ्यासोबत ठुमकू लागतात. चैत्राचे.. चैत्री पाडव्याचे, झोक्यावर  बसून हिंदाळणाऱ्या गौरीचे, त्या निमित्ताने केल्या जाणाऱ्या महिलांना एकत्र आणणाऱ्या हळदी कुंकवाचे वेध मराठी घरातल्या नववयसा लेकी बाळींना लागतात. एकत्र येऊन फराळाचे पदार्थ, गौरीची सजावट, अंगणात रांगोळ्या घालून चैत्रांगण सजवायचे...

आम्ही भारतीय सण, उत्सव, विधींवर स्वत:पेक्षा जास्त प्रेम करतो. काही महिने तर सण उत्सवांनी बहरलेले. श्रावण, भाद्रपद, मार्गशीर्ष, पौष, चैत्र.. यादी वाढतच चाललीय. चैत्र आला की गवरण्यांची सजावट, ओल्या हरबऱ्याची उसळ, कैरीची सणसणित फोडणीची खमंग वाटलेली डाळ, मस्त मधुर कैरीचं पन्हं. सुटलं ना तोंडाला पाणी? चैत्र म्हणजे नव्या वर्षाचं स्वागत. ते संपूर्ण भारतात विविध रितीनी होते. कश्मिरात चैत्राला चिथुर म्हणतात. पाडव्याला नवरोज किंवा नवरेह. या दिवशी सरस्वतीची पूजा करतात. आदल्या रात्री एका थाळीत तांदूळ, बदाम, दही, फुले, रूपया, आरसा, नवे पंचांग आणि मीठ ठेवतात. नवरेह रोजी घरातली सून पहाटे सर्वांना उठवते. प्रत्येकजण अन्नदेवतेला प्रणाम करतो. आरशात पाहून हसतो. वर्ष हसतमुखाने जाते. धान्यलक्ष्मीचेच नाही तर गृहलक्ष्मीचे.. घरातल्या अन्नपूर्णेचे दर्शन घेऊन नव्या वर्षाची सुरवात करावी हा हेतू.

तर केरळमध्ये या दिवसाला 'विषु' म्हणतात. उठल्यावर अन्नाचे.. शुभ आणि जीवन देणाऱ्या वस्तूंचे दर्शन व्हावे म्हणून रात्रीच. काशाच्या भांड्यात तांदूळ पसरून

त्यावर कोन्ना नावाच्या झाडाच्या फुलांची आरास मांडतात. त्यात सोन्याचे दागिने, रुपये, मोठी पिवळी काकडी, नारळ, शुभ्र वस्त्र ठेवून दोनही बाजूंनी समया चेतवून ठेवतात. या सजावटीला 'विषुकणि' म्हणतात. सकाळी उठल्यावर पहिले दर्शन विषुकणीचे.

आसाम तर नृत्यसंगीताने नटलेला. पण तिथे वैशाख प्रतिपदेस नवे वर्ष सुरू होते. या दिवसाला 'रंगाली बिहू' किंवा 'बहाग बिहू' म्हणतात. कडू लिंबाची डहाळी घराघरात बांधतात. महिनाभर त्याच्या कोवळ्या पानांची गूळ घालून चटणी हवीच. बंगालमध्येही हाच दिवस नव्या वर्षाचा. वहीची पूजा करतात.

महाराष्ट्रातही चैत्री पाडव्याला वहीची, पाटीवर काढलेल्या शारदेची... १ हा आकडा एकापुढे एक असा, पांच..सात वेळा मांडायचा आणि वर रफार..आकृतीमय सरस्वतीची पूजा करतात.

'गौर' म्हणजे पार्वती. चैत्र तृतियेला ती माहेरपणाला येते. ती थेट अक्षय्य तृतियेपर्यन्त माहेरी राहून घराला अक्षय्य धान्यसमृद्धीच्या शुभेच्छा, आशीर्वाद देऊन सासरी जाते.

हे महिने उन्हाचे. ओरिसात तर तीन आठवडे चंदनोत्सव करतात. चंदनाचे तेल, पंखे एकमेकांना देतात. उन्हाची तलखी सुद्धा सुसह्य करण्याची रीत.

भारतीय सण खानपानाच्या रितीभातीतून सामाजिक आरोग्याची, ऋतूमधील बदलत्या निसर्गाच्या स्वागतास, धान्यलक्ष्मीशी जोडलेले आहेत. कडुलिंब आरोग्यदायी, गूळ थंड. कैरी चवदार.. भूक वाढवणारी. या सुमारास गहू, मोठी ज्वारी यांची खळी होऊन गेलेली. म्हणून पूजेत त्यांना स्थान.

भाद्रपद अश्विनात पावसावर पोसली जाणारी पिके तरारतात. त्या काळात हादगा, बदकम्मा, भुलाबाई, सांझी, नवरात्र यासारखे समूहाने साजरे करायचे सण, व्रते येतात. जमिनीची उर्वराशक्ती वाढून धान्यलक्ष्मी घरी यावी, ती वाढावी म्हणून हे सामूहिक विधी. मार्गेसरी पासून वैषाखापर्यन्तचे सण सूर्याच्या पूजेचे. सूर्याला 'अपागर्भ' ...गर्भात पाण्याचा साठी असणारा म्हटले आहे. सूर्य प्रखरपणे तळपावा, भूमीची पाणी रिचवण्याची शक्ती वाढावी, ज्यामुळे तिची सर्जन शक्ती वाढेल या शुभेच्छेने पौषातले रविवार, सक्रान्त, चैत्र पाडवा, गणगौर.. चैत्रगौर, अक्षय्य तृतीया यासारखे सण साजरे करण्याची लोकपरंपरा, तीही समूहाने. एकत्र येऊन गाणी गात.

रविन्द्रनाथांचे बंधू अवनीन्द्रनाथ यांनी बंगाली स्त्री-व्रतांचा अभ्यास केला. त्यात ते नोंदवतात.

A Vrata is a just desire. We see it represented in the pictures, listen to its echo in the songs and rhymes, witness its reactions in the dramas and dances...

...यात्वात्मक सामर्थ्याने कामनापूर्ती करण्याचे माध्यम म्हणजे व्रत. यातील प्रार्थनांत ईश्वरीकृपेचा संबंध नसतो. व्रताचरण-हे सामूहिक कर्म असते. व्रतांचे सामर्थ्य यात्वात्मक असते. 'धर्म' ही संकल्पना दृढ होऊन जनमानसात रूजण्यापूर्वीचे, जेव्हा स्त्रिया शेती.. अन्न.. वस्त्र निर्मितीचे उत्पादनाचे काम करीत, त्यांना समाजात मध्यवर्ती... संवादिनीचे स्थान होते तेव्हा पासून ही व्रते स्त्रियांनी भूमीच्या सुफलीकरणारसाठी निर्मिली. असे 'लोकायत' या ग्रंथाचे निर्माते देवीप्रसाद चटर्जी यांनी नमूद केले आहे.

राजस्थान, हरियाणा, मध्यप्रदेशातील निमाड इत्यादी भागातली गणगौर आणि महाराष्ट्र कर्नाटकातली चैत्र तृतीयेला बसवली जाणारी गौर. या दोनही स्त्री व्रतोत्सवातली सामूहिकता त्यातील विधी. गाणी, पाणी, माती, सप्तधान्याची पेरणी, उगवणाऱ्या अंकुरांची पूजा. स्त्रीला व भूमीला निसर्गाने दिलेले सृजनात्मकता यातील नेमके नाते? आणि अनुबंध कोणता?

ही मनात उगवणारी नवी चांदणी आणि मग शोध... पुढे जाण्याची नवी दिशा...

❑

## १०

# भादवा : कृषि समृद्धीचा

**अंगणात माझ्या**
**भदव्याचा मोर**
**आभाळी विहरे**
**सावळा चकोर..**

घनघोर काळ्याभोर ढगाची गर्दी दक्षिणेकडून घोंगावत येई. आणि अचानक त्यांनी वाट पाहणाऱ्या माझ्या तनामनातून या ओळी उमटल्या. त्यालाही आता ४०/४२ वर्षे उलटून गेली आहेत. तरी ते अंगण, हिरवे..निळे..सोनसळी पंख पसरून, नाचणारा मोर, सावळ्या मेघांनी गर्द झाकलेले आभाळ अगदी तस्सेच ताजे टवटवित आहे.

खानदेश उन्हात भाजणारा असला तरी अर्धा भाग सातपुड्याच्या डोंगरमाळा आणि तापी... तप्ती सारखी प्रसन्नपणे धावणारी नदी यांमुळे दुष्काळाचा फेरा सतत घिरट्या मारीत नसे. पण मराठवाड्यात, त्यातूनही बीड जिल्ह्यात आल्यावर जाणवले की दुष्काळ जणू बाहेरच्या ओसरीच्या कोपऱ्यात कायम टेकलेला असतो. त्यामुळे श्रावणभादव्याचे अप्रूप मनात अधिकच रूजले.

१९७० चा काळ. पोळा आला तरी पेरण्या नव्हत्या. पण गणराया नाचत आले नि त्यांच्या तालावर पोरंसोरंही नाचली. एक दिवस खरात भाऊ सकाळीच आले. चहा घेतांना काहीशा घुटमळत्या आवाजात खाली मान घालून म्हणाले. ''ताई जरा पन्नास रुपये मिळतील. लक्ष्म्या उद्याच घरला येतील त्यांच्यापुरता तरी साजाबाजा करायला

हवा. ताई लक्ष्म्यांचा सण बामण, माळी, कोष्टी.. समदे अगदी आमी मांग... चांभार सुद्धा साजरा करतो. मालकीणीने सारखा तगादा लावलाय. ताईला नौकरी हाये. त्या नक्की देतील पैशे.. तुमी हे असलं काईपन करीत न्हाई पण आमाला लक्ष्मीला सजिवलं न्हाईतर अपसकुन वाटतो. मन धास्तावतं.''

...ते शब्द मनात कायमचे रूजले. भारतीय सण, उत्सव, विधी आणि त्यांतील स्त्री प्रधानता यांचा शोध घेतांना फारपूर्वी मनात उगवलेल्या ओळी पुन्हा उलगडू लागल्या. कोकणात भाद्रपद शुद्ध षष्ठीला गौरींना आवाहन केले जाते. तर देशांवर लक्ष्म्या घरी येतात. कोकणात गौरी नदीतल्या खड्यांच्या असतात. काहींच्यात तेरड्याच्या झाडांच्या. देशावरच्या लक्ष्म्या मात्र अनेक घरी मुखवट्यांच्या.. तांब्याच्या लोट्याच्या वगैरे असतात पण लक्ष्म्या घरी येतातच. आणि तो 'कुळाचार' म्हणून श्रद्धेने साजरा होतो. बाहेरगावी असलेले मुलगे, सुना घरी येतात.

भारतीय जीवन परंपरेने स्त्रीला सुपीकतेचे प्रतीक मानले आहे. जमीन आणि स्त्रीमधील जनन क्षमता मानवाला गूढ वाटली. स्त्रिया या क्षमतेमुळे समाजात सन्माननीय आणि स्थिर झाल्या. अन्नाचा शोध, कंदमुळे शोधणे, पालेभाजी शिजवणे... याचा त्यांनीच शोध लावला. आणि ती सुपीकतेचे प्रतीक बनली. या काळात घरातल्या लक्ष्म्या, सुना माहेरी जात नाहीत. कर्नाटक आणि महाराष्ट्रात विधीपूर्वक हा सण आचरतात. मराठी माणूस परप्रान्तात असला तरी धान्याच्या राशी मांडून पूजा केली जातेच. या संदर्भात स्टारबक हा समाजशास्त्रज्ञ म्हणतो हा सन्मान स्त्रीला शेतीप्रधान अर्थव्यवस्था व समाजव्यवस्थेतून मिळाला आहे. बैलांचा नांगर वापरात येईपर्यन्त स्त्री समाजाच्या केन्द्रस्थानी होते. मुदगलानी ही स्वत: नांगर चालवणारी, शेती करणारी स्त्री होती. अगस्ती ऋषीची पत्नी लोपामुद्रा हिने आपल्या बुद्धिवान परंतु आळशी पतीच्या हातात फावडे देऊन शेतीकामाला स्वत:बरोबर घेतले.

लक्ष्म्या हा सण शेतीच्या समृद्धीसाठी असतो. सप्तमीला त्या बसवतात अष्टमीला जेवतात. नवमीला परततात. या उत्सवावर स्त्रियांनी रचलेल्या शेकडो ओव्या परंपरेने गायल्या जातात.

**लक्ष्मी आली सोन्याच्या पावलांनी**
**ज्येष्ठेच्या घरी कनिष्ठा आली**
**धन्याच्या घरी लक्ष्मी आली.**

सोन्याची पावले ज्येष्ठेची की कनिष्ठेची? ज्येष्ठा कोण? अमृतप्राप्तीसाठी समुद्रमंथन केले तेव्हा लक्ष्मीच्या आधी अलक्ष्मी, साक्षात् दारिद्रय... अशुभ...

अनिष्टदायिनी बाहेर आली. नंतर लक्ष्मी. तिच्यावर नारायणराव भाळले. पण मोठीच्या आधी धाकटीचा विवाह कसा होणार? मग अलक्ष्मीचा विवाह उद्दालक मुनींशी लावला. तर तिथे आश्रमातले सात्विक वातावरण तिला सोसेना. तिने तिच्या अनिष्ट आवडी निवडी सांगितल्या. मुनी अस्वस्थ झाले. तिला एका अश्वत्थ वृक्षाखाली बसवून ते परतले. ज्येष्ठा अलक्ष्मी पतीची वाटच पहात राहिली. शेवटी आक्रोश करू लागली. तो ऐकून लक्ष्मीनारायण तिथे आले. त्यांनी तिला सांगितले तू इथेच स्थिर हो. दर शनिवारी लक्ष्मी तुला भेटायला येईल. हा वृक्ष पूज्य मानला जाईल. दूर्जनं प्रथमं वन्दे' ही मानवी प्रवृत्ती आहे. दैवत शास्त्रांचे मान्यवर अभ्यासक रा. चिं. ढेरे लिहितात, श्री सूक्तानुसार लक्ष्मी हस्तिनाद प्रबोधिनी, गजलक्ष्मीच्या रूपात आहे. गज हे पुरूषत्वाचे प्रतीक. पाऊस पाडणाऱ्या आभाळाचे प्रतीक. या काळात ज्येष्ठ आषाढात पेरलेली पिके भरात येतात. कणसात येतात. सृष्टीच्या सुफळसंपूर्णतेचे हे दिवस. गौरी बोळवतांना कोकणातली स्त्री विचारते.

**आज गौरी जाशील ती कधी गौरी येशील?**
**पाऊस पडे, गंगा भरे येईन मी भादव्यात**
**पडवळीच्या फुलांवरनं येईन मी तळपत**
**पाच पडवळं काढा माझ्या हौशा करवी...**

देशावरची स्त्री म्हणते,

**सरिला सरावन भादवा आनंदाचा**
**आशा पाठमोरी मुऱ्हाळी सुखाचा**
**पाऊस पडला चिकूल झाला**
**वहात आली गंगा...**
**पेरिला मका, धान्य लाल तुरी**
**पावनीला वाढा भाजी ठेचा आणि भाकरी...**

या पाहुणीला आल्या दिवशी रानातली हिरवी भाजी, ठेचा आणि ज्वारीची भाकरी करतात. दुसऱ्या दिवशी खास जेवण. १६ भाज्या, १६ चटण्या, १६ पक्वान्ने. जणू हा समृद्धीचा, कृषिलक्ष्मीचा सत्कार. अन्न देणारी अन्नदा म्हणून भरपूर पदार्थ करतात. दिवे सुद्धा ज्वारीची... मुख्य धान्याची उकड काढून करतात.

अलक्ष्मीचे शोभन नाव शुभा आहे. 'शुभा' चा अर्थ शेण असा आहे. शेण... विशेषत: गायीचे शेण जंतुनाशक असते. भारतीय जीवनात मडके, सूप, शेणाचे सारवण, शेणाची गोवरी यांना विशेष महत्व आहे. गोवरीच्या धुराने घर शुद्ध होते.

रा. चिं. ढेरे यांच्या मते ज्येष्ठा अलक्ष्मी आणि कनिष्ठा लक्ष्मी एकाच देवी संकल्पनेची द्वंवात्मक रूपे आहेत. त्यातून दैवत कल्पनांचा विकासक्रम जाणवतो. लक्ष्मीच्या पावलांच्या रेखाकृती प्रत्येक खोलीत, गाईच्या गोठ्यात फिरतात. ही रेखाकृती धान्याचे भरलेले मापटे, दिवा यांचे संकेत देणारी असते.

पाणी असेल तरच जमिनीची उर्वराशक्ती सुफलित होणार म्हणून सर्वसाधारणपणे गौर पाण्याजवळ नदी वा तळ्यावर नेऊन विसर्जित करतात. मराठवाडा निजामाच्या सुलतानी सत्तेखाली होता. त्यामुळे असेल कदाचित् पण आपल्याकडे गौरीचे मुखवटे सन्मानाने उतरवून तुळशीपर्यन्त नेतात. निजामाच्या अमलाखाली असलेल्या मराठवाड्यात स्त्रिया रस्त्यावर फिरू शकत नव्हत्या. या दिवशी घरातील स्त्रियांना, सुनांना सन्मानाने प्रथम जेवायला बसवतात. आमच्या आदीम परंपरांनी स्त्री पुरूष यांच्या समान, परस्पर पूरक अस्तित्वाचा सत्कार केला होता. तिला दूय्यम मानले नव्हते.

❑

## ११

# आषाढाचा पहिला दिवस

दक्षिण आफ्रिकेजवळच्या मादागास्कार बेटांतून मान्सून वारे हिंदी महासागरावर हिंदोळत गिरक्या घेत. तरंगत थेट केरळात येतात. ज्येष्ठाचं बोट धरून उत्तरेची वाट धरतात. पहिल्या पावसाच्या स्पर्शाने वृद्ध वडाच्या अंगावरही तृप्तीचे शहारे लहरतात. कर्नाटकात जेष्ठी पोर्णिमेला पेरणीचा मुहूर्त करतात. झाडांची पूजा म्हणजे वर्षाऋतूचे स्वागतच. ज्येष्ठी पोर्णिमेस वडाची पूजा केली जाते. त्यात पती सहवासाची शुभकामना असते.

ज्येष्ठा पाठोपाठ आषाढ आभाळात दाटून येतो. घनगर्द सावळे मेघ ओथंबून येतात. आणि ओठावर कालिदास तरळू लागतो.

**आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाषलिष्ट सानु:**
**वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श**

डोंगर शिखराला ढुशा देण्यासाठी वाकलेल्या उत्तर दिशेने जाणाऱ्या मेघराजा बरोबर, हिमालयातील कैलास पर्वतावरील अलकानगरीत रहाणाऱ्या आपल्या प्रिय पत्नीस... सखीस रामगिरीवरच्या यक्षाने आपल्या विरहार्त मनाचा संदेश... निरोप पाठवला. ते काव्य म्हणजे कवी कालिदासाचे काव्य 'मेघदूत'. आता हा यक्ष नागपूरजवळच्या रामगिरी पर्वतावर का रहात होता?

**जे न देखे रवी ते देखे कवी...**

कवी कल्पनेच्या क्षितीजावर सतत नवनवे अंकुर फुटत असतात. कालिदास हा 'कवि कुलगुरू'. श्रेष्ठ भारतीय कवींची मोजदाद करावी म्हणून कालिदासाच्या नावाने करंगळी मोजली. आता दुसरे नाव? त्याच्या इतक्या योग्यतेचा दुसऱ्या कवीचे नाव सुचेना आणि करंगळीच्या शेजारच्या बोटाचे नाव पडले अनामिका.

**अनामिका सार्थवती बभूव**

अनामिका हे नाव सार्थच ठरले.

कालिदास हा नाटककार होता. 'शाकुन्तलम्' या नाटकाचा अनेक परदेशी भाषात अनुवाद झाला. कालिदासाच्या जन्ममृत्यू बद्दल अनेक लोककथा प्रसिद्ध आहेत. त्यातली एक अशी. कालिदास जन्मला ब्राह्मण कुटुंबात. परंतु लहानपणी आईवडिल मरण पावल्याने एका गवळ्याने त्याला वाढवले. तो देखणा, सुदृढ व बुद्धिमान होता. मात्र गुरूकुलात शिक्षण घेऊ शकला नाही. शेजारच्या राज्याच्या राजकन्येचा विवाह तेथील कपटी प्रधानाने या देखण्या मुलाशी लावला. आपला पती विद्या विभूषित नाही हे लक्षात येताच तिने त्याला हाकलून दिले. नंतर त्याने कालीमातेची उपासना केली वगैरे वगैरे... असला दैवी जोड देऊन कथा पूर्ण करण्यात आपली ख्याती आहेच. त्याने एखाद्या गुरूकुलात जाऊन विद्या ग्रहण केली असावी. असे म्हणूया. नंतर तो राजकन्येकडे आला. तिने त्याला प्रश्न केला ''अस्तिकश्चिद् वाग्विशष:? तुझ्या वाणीत काही विशेष गुण आले का?

कालिदासाने या प्रश्नातील प्रत्येक शब्दांपासून सुरूवात होणारे तीन काव्यग्रंथ निर्माण केले. 'अस्त्युत्तरस्यां दिशी देवात्मा' ही शिवपार्वतीपुत्र कार्तिकेयाच्या जन्माची कथा आहे. ही कुमारसंभवम् या काव्याची सुरूवात आहे. 'कश्चित्कान्ता विरह गुरूणा' ही मेघदूत या जगद्विख्यात रचनेची सुरूवात. तर, 'वागर्थाविवसंपृक्तौ' ही रघुवंश या काव्याची सुरूवात.

कालिदास हा गुप्त घराण्यातील दुसरा चन्द्रगुप्त विक्रमादित्य याच्या दरबारात राजकवी होता. त्याचे वास्तव्य उज्जैनीत होते असे मानले जाते. त्याला हिमालयाचे विशेष आकर्षण होते.

...मेघदूत हे कवि प्रतिभेतून साकारलेले काव्य. त्याला पुराण वा देवकथेचा आधार नाही. त्याचे कथानक असे... एका यक्षाकडे ड्यूटी होती इन्द्रदेवाच्या पूजेसाठी १०८ कमळे आणून त्यातील भुंगे काढून टाकण्याची. हे काम करतांना यक्षाला सतत आठवण येत होती पत्नीशी केलेल्या शृंगार क्रीडांची. त्या व्यवधानात एका कमल कलिकेतला भुंगा आत तसाच राहिला. तो देवन्द्र इन्द्राला चावला. मग अर्थातच शाप.

'तू जिचा विचार करीत होतास तिचा आणि तुझा एक वर्ष विरह होईल,' लगेच यक्षाची पाठवणी नागपूर जवळच्या रामगिरी पर्वतावर झाली. आषाढाच्या पहिल्या दिवशी काळ्याभोर मेघरूपी बलदंड हत्तींचे थवे उत्तरेकडे जातांना पाहून यक्षाने त्या मेघांनाच दूत करून आपल्या पत्नीला आपली हृदय व्यथा व निरोप कळविला. तिचे निवासस्थान हिमालयातील कैलास शिखरावरील अलकानगरीत होते. तिथे जाण्याचा भौगोलिक मार्गही त्याने मेघाला सांगितला.

काश्मिर, ओरिसा, बंगाल, मध्यप्रदेश येथील लोक त्याला आपला रहिवासी मानतात. पण तो भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारा भारतीय महाकवी होता आणि आहे. त्याला हिमालयाचे, तेथील निसर्गाचे आकर्षण होते. कुमारसंभव, मेघदूत या काव्यात हिमालयाचे देखणे वर्णन त्याने केले आहे. 'उपमा' हे तर त्याचे वैशिष्ट्य राजकवी म्हणून निवड करण्यापूर्वी राजाने त्याला प्रश्न विचारला

**कमले कमलोत्पत्ती श्रूयते न तु दृष्यते**

(कमलावर दुसरी दोन कमळे आहेत असे म्हणतात, पण ती दिसत नाहीत. तर कशी?)

या श्लोकाची परिपूर्ती करतांना त्याने उत्तर दिले,

**'बाले तव मुखाम्भोजात् कथमिन्द्रीवरद्वयम्**

बाले तुझ्या मुखकमलावर तुझे दोन निळे निरागस डोळे, ती जणु दोन कमळेच!

असा हा कवी कुलगुरू. प्रत्येक भारतीयाने याच्या काव्याबद्दल, नाटकांबद्दल, त्याच्याबद्दल वाचले पाहिजे. तरच आपले 'भारतीयत्व' चहुअंगांनी बहरून जाईल. संपृक्त होईल.

❑

१२

# हिंदू जीवन दृष्टी:
# तिच्यात उमललेले चार्वाकाचे लोकायत तत्वज्ञान

चार्वाकाचे नाव नववीत असतांना जोशी सरांकडून ऐकले. ते आम्हाला संस्कृत शिकवीत. रोज एक नवा श्लोक म्हणवून घेत आणि त्यावर त्यांची मल्लीनाथी. संस्कृत श्लोक घटवून घेतल्यामुळे वर्गातील सर्व मुलींची वाणी मात्र शुद्ध झाली.

'ज्ञान प्राप्त करून घेणे हा सर्वांचा हक्क आहे. मात्र तो अधिकार कष्ट साध्य असतो. केवळ ब्राह्मणाच्या घरात जन्माला येऊन तो मिळत नाही. फार तर पूजाअर्चा सांगता येते. ती सांगणे म्हणजे ज्ञान नाही. ती एक दुय्यम दर्जाची कारागिरी आहे.' असे ते म्हणत आणि 'बेकंबे'चा पाढा पूजा सांगण्याच्या अविर्भावात आणि स्वरात म्हणून दाखवित. अख्खा वर्ग पोट धरून हसे.

'हं आता दक्षणा द्या' असे म्हणत मोठ्यांदा खोऽ खोऽ हसत. नंतर डोक्यावरची काळी टोपी काढून धोतराच्या सोग्याने शेंडी राखलेल्या टकलावरचा घाम पुशित. तो एक मोहक संस्कार होता हे आज जाणवते.

ज्ञान म्हणजे परमेश्वराचा घेतलेला शोध. जीवाशिवाचा सिद्धान्त. तो त्यांचा लाडका. रिकाम्या मडक्यातही हवा असते आणि बाहेर सर्वत्र हवा असते. मडके फुटले की त्यातील हवा बाहेरच्या हवेत मिसळून जाते. तसेच शरीर मृत होणे म्हणजे जीव ...

आत्मा, परमात्म्याशी एकरुप होणे वगैरे. ते रंगून सांगत. काही नास्तिकांनी मात्र परमेश्वरच नाकारला असे सांगत त्यांनी चार्वाकाचा श्लोक तेव्हा सांगितला होता.

**यावज्जीवेत् सुखं जीवेत् ऋणंकृत्वा धृतं पिबेत् ।**
**भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनो कृत: ।।**

जीव आहे तोवर मौज मजा करा. भस्म झालेला देह पुन्हा येत नसतो. म्हणून खा ..प्या. रिण काढून सण साजरा करा. हा श्लोक सांगतांना चार्वाक् कसा अनीतीमान होता. नास्तिक होता हे भरभरून सांगत.

चार्वाकाच्या तत्वज्ञानाचे नेमकेपण लोकसाहित्याचा शोध घेतांना हाती आले. चार्वाक दर्शनाला 'लोकायत' म्हणतात. 'लोक' म्हणजे इहलोक. पंचेन्द्रियांनी जे प्रत्यक्ष अनुभवतो ते सत्य. 'आयात' म्हणजे आधारित. इहलोकावर आधारलेली, सर्व सामान्यांना मान्य असणारी विचारधारा. एक इहवादी, जीवनवादी तत्वज्ञान. मानवाला स्वत:च्या माणूसपणाची, निसर्गाने त्याला दिलेल्या दोन शक्तींची, ... कार्यकारण भावाचा शोध घेण्याची (विचार करण्याची), तो वाचे द्वारे व्यक्त करण्याची... जाणीव झाली आणि तो स्वत:ला 'मी कोण? मला कोणी निर्माण केले? मृत्यू म्हणजे काय? मृत्यूनंतर काय?' असे प्रश्न विचारू लागला. त्यातून तत्वज्ञानाच्या अनेक विचार धारा निर्माण झाल्या. त्यालाच आपण 'दर्शने' असे म्हणतो. एकूण नऊ दर्शने आहेत. सहा आस्तिक दर्शने आहेत. तर तीन नास्तिक दर्शने आहेत. ईश्वराचे अस्तित्व, परलोक, पापपुण्य, वेदांचे प्रामाण्य नाकारणारे नास्तिक.

हा नास्तिक शब्दही लहानपणीच भेटला. नास्तिक म्हणजे दुराचारी, परमेश्वर न मानणारा, वागण्यात ताळतंत्र नसलेला, नीतीहीन, जेजे चांगले ते नाकारणारा समाजद्रोही माणूस ...व्यक्ती. हा अर्थ मनात स्थिर झाला.

माझी आजी म्हणायची. "बेबीचा नवरा पक्का नास्तिक आहे. घरात देव नाहीत. पण वागायला किती चांगला. बेबीला फुलासारखा सांभाळतो. नाहीतर प्रेमाचा. विंजिनेर आहे. पण किती धाक. मोटार चालवायला शिकलीच पाहिजे म्हणून धाक आणि कोणाकडे हळदीकुंकवाला जायचं तरी धाक. जळला मेला तो धाक ...पण बेबीच्या नवऱ्यानं मला आंब्याच्या योगेश्वरीचं दर्शन मोटारीतून नेऊन घडिवलं. पण जावईबापू मंदिरात मात्र आले नाहीत हो." आणि 'नास्तिक' हा शब्द फारसा वाईट नसतो असा बारिकसा बिंदूही मेंदूत नोंदला गेला.

लोकसाहित्याच्या शोधात देवीप्रसाद चटोपाध्याय यांचे 'लोकायत', स. रा. गाडगिळांचे मराठी भाषेतून सुलभपणे अंतरंगात पोचलेले 'लोकायत' हे महत्वाचे थांबे,

टप्पे होते. शोधन कधी पूर्ण होत नाही. चिमुटभर ओंजळीत येते असे वाटते तोवर नवी दिशा खुणावू लागते. आणि तसेच झाले. दिशा उजळत गेल्या. 'हिंदु' ही जीवनदृष्टी आहे. गुरूवर्य मांडेसरांची लाडकी भूमिका. त्यादृष्टीने विविध विचारधारांना या नऊ दर्शनांना विकसित होण्यास अवकाश दिला. इरावतीबाई कर्व्यांनी Theory of Agglomeration मांडली. स्वीकार आणि समन्वयाचा सिद्धांत मांडला. आणि ती भूमिका हिंदू जीवनदृष्टीचा मध्यबिंदु आहे. या दृष्टीने चार्वाक दर्शनालाही अवकाश प्राप्त करून दिला. परंतु नंतरच्या वैदिक हिंदू धर्माची मांडणी करणाऱ्यांनी चार्वाक दर्शन नष्ट केले. चार्वाकास जाळून टाकले.

**चार्वाक दर्शनाने सांगितले–**
**स्वातंत्र्यं मोक्षः, पारतंत्र्यं बन्धः**

सर्वश्रेष्ठ ईप्सित म्हणजे मोक्ष असेल तर स्वातंत्र्य हा मोक्ष आहे. आणि पारतंत्र्य हे बंधन आहे.

**कृषिगोरक्ष्यवणिज्यदण्डनित्यादिभिर्बुधैः ।**
**एवैरेव सदोपार्येर्भोगान् अनुभवेद् भुविः ।।**

शेती, गोपालन, व्यापार, नोकरी इत्यादी सदुपायांनी अर्थार्जन करून शहाण्यांनी सुख उपभोगावे.

मुख आदि अवयवांचेक शरीरात सारखेच महत्व असते. मग वर्णभेद मानणे अयोग्यच.

**वर्णक्रमः कीदृशः ।**
**इतकेच नाही तर,**
**पतिव्रत्यादिसङ्केतः बुद्धिद्दुबलैः कृतः ।।**

पतिव्रत्यादि संकेत हे अत्यंत बुद्धिहीन पुरूषांनी निर्माण केले आहेत.

मानवी मूल्यांची कदर, सामाजिक न्यायावरचा विश्वास चार्वाकांनी आम्हाला दिला.

डेल रीप या अभ्यासकाने 'द नॅचरॅलिस्टिक ट्रॅडिशन इन इंडिया' या ग्रंथात म्हटले आहे.

'It may be said from the available material that Charvaka holds truth, integrity, consistency and freedom of thought in the highest esteem.'

उपलब्ध झालेल्या पुराव्यांवरून असे म्हणता येते की चार्वाकांना सत्य, एकता, सुसूत्रता आणि वैचारिक स्वातंत्र्य या तत्वांबद्दल पराकोटीचा आदर होता.

आ. ह. साळुंखेंनी चार्वाकाला 'आस्तिक शिरोमणी' असे का म्हटले तेही पटते; नव्हे तर 'आस्तिक' या शब्दाचे नेमकेपणही लक्षात येते.

❑

# १३

# गौतम बुद्धाचा धम्म आणि धम्मावर नवा प्रकाश

'धर्म या शब्दाचा पगडा आणि धास्ती सर्वसामान्य माणसाच्या मनावर असतेच. अगदी आजही. मग तो धर्म कोणताही असो. परंपरागत धर्म अपरिवर्तनीय नियमांनी बांधलेला असतो. या अपरिवर्तनीय नियमांचा ऐहिक जगण्याच्या संदर्भात सखोल शोध घेऊन, आजवर काही शोधकांनी धाडसाने नव्या दिशा शोधल्या. त्यांना मानणारे, त्या दिशांनी जाणारे अनुसरक मिळाले.

इ.स. पूर्व सुमारे ६०० ते ५५० वर्षापूर्वी हिंदुधर्मातील चातुर्वर्ण्य आणि धर्मसुत्रे यांनी सर्वसामान्य माणसाचे जगणे कंटकमय केलेले होते. जखडून टाकले होते. धर्माच्या नावाने मुली देवाला अर्पण केल्या जातात, विधवा स्त्रीस जाळले जाते. हिंदू धर्माने तर स्त्री ही सर्वार्थाने दुय्यम, दासीसमान मानली होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य जातीत जन्मलेल्या स्त्रियांनाही ज्ञानाचा अधिकार नव्हता. चातुर्वर्ण्याची नियमांनी बांधलेली धर्मव्यवस्था आणि निसर्गाने माणसाला बहाल केलेल्या चार गरजा - आहार, निद्रा, भय, मैथुन! त्यांच्या झटापटीतून जातींची भेंडोळी निर्माण झाली. दलितांप्रमाणे शूद्रत्वाचा शिक्का स्त्रियांच्या कपाळावर मारला. त्यांच्या ताटातही दारिद्रय, शिवाशीव टाकलेलीच होती. स्त्रियांच्या अब्रूला सतत धोका होता. ८००-१००० वर्षापूर्वी त्यांचा महत्वाचा भाकरीसाठीचा व्यवसाय 'दासी' होणे हाच होता. रूपवती स्त्रिया संगीत, नृत्य, मनोरंजन करणारे संवाद याचे शिक्षण घेऊन वारयोशिता... स्वतःच्या इच्छेनुरूप प्रियकर निवडून त्याच्याकडून धन गोळा करणाऱ्या स्त्रिया... होत. काही नर्तिका, काही

गायिका वगैरे. लाखात एखादीच बुद्धीमत्तेच्या बळावर विद्यावाचस्पती, योगिनी होत असे. कुंठित झालेल्या सर्वसामान्य विशाल बहुजनांना, गौतमबुद्धाच्या 'धम्मा' ने जगण्याची नवी दिशा दाखवली. 'धम्म' सामाजिक आहे. धम्म म्हणजे सदाचरण. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत माणसामाणसांतील व्यवहार उचित ठेवावेत. असावेत. ते एकमेकांवर कुरघोडी वा अन्याय करणार नसावेत. असा 'धम्म' शासनाने साधन म्हणून स्वीकारला तर समाजात अराजक, स्वैराचार, हुकूमशाही माजणार नाही. एखाद्याने धम्माचे उल्लंघन केले तर त्याला शासन देणारा हुकूमशहा नसेल तर न्यायाधीश असेल. आणि अशा समाजात सर्वच स्वातंत्र्याचा आनंद घेऊ शकतील. बुद्धाच्या धम्माच्या दोन कोनशिला आहेत. प्रज्ञा म्हणजे निर्मळ बुद्धी. खुळया, अंधश्रद्धांना तेथे थारा नाही. आणि करूणा म्हणजे प्रेम, करूणेशिवाय माणूस जगू शकणार नाही. स्वत:ची उन्नतीही करू शकणार नाही. आणि म्हणूनच या धम्माने सामान्य माणूस उपेक्षित, निराधार, एकाकी स्त्रिया, चुका उमजलेले पश्चातापदग्ध स्त्री पुरूष यांच्या जगण्याला आधार दिला. जगण्याची... धम्मानुसार जीवन उज्ज्वल करण्याचीच ऊर्जा दिली.

नेपाळ, थायलंड, चीन येथे मला जाण्याचा योग आला. तेथे आजही बौद्ध धर्माची पूजास्थाने... पॅगोडे... विशिष्ट शैलीत बांधलेली, आढळतात. बोधिसत्वाचे विविध आकाराचे पुतळे आहेत. ओठावरचे एक निरंकारी स्मित, जे पूर्ण चेहेरा शून्यात्मक तृप्तीने उजळून टाकते, ते पहाणाऱ्यालाही धम्माचे वेगळेपण सांगून जाते.

गौतमाने त्याला पडणाऱ्या दोन प्रश्नांनी सतत सतावले. त्यांचा शोध घेण्यास उद्युक्त केले. व्यक्तीला होणाऱ्या दु:खाची कारणे कोणती? आणि हे दु:ख नाहीसे कसे होईल? हा शोध घेतांना स्वत:तले दोष काढण्यासाठी त्यावर लक्ष केन्द्रित केले. सोनार चांदीतले कीटण काढून ती शुद्ध करतो तसे मनातील अशुद्ध विचार, वासना, द्वेष, खुशामत करण्याची वृत्ती यांचा त्याग केला. दहा स्थित्यंतरे झाल्यावर तो 'स्व' पासूनही दूर गेला. अनंतस्वरूप झाला. बोधिसत्व न रहाता बुद्ध झाला. 'धम्म'चे आगळेवेगळेपण शब्दांतून व्यक्त करण्याचे सामर्थ्य आले. लाखोंची जीवने उजळून गेली.

गेल्या तीन/चारशे वर्षात दलितांवर होणाऱ्या अत्याचारांनी परिसीमा गाठली होती. गळ्यात थुंकण्यासाठी मडके, रस्त्याच्या कडेने काट्याकुट्यातून चालण्याची जबरदस्ती, स्त्रियांनी पोटऱ्या उघड्याटाकून लुगडे नेसणे... शिक्षण नाही. एक अंधार यात्राच. या अंधारयात्रेत ज्ञान आणि करूणेचा प्रकाश निर्माण करणारे महापुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी हा नवा प्रकाश अंधारयात्रींच्या जीवनात निर्माण

करण्यासाठी बौद्ध धम्माचा स्वीकार करून 'धम्म'वरही नवा प्रकाश टाकला. त्यांना या निमित्ताने प्रमाण करण्याऐवजी त्यांनी सांगितलेल्या धम्माचा शोध घेणे प्रकाश देणारे आहे.

## धम्मावर नवा प्रकाश

६ डिसेंबर १९५६ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन. महात्मा गौतम बुद्धांचा 'धम्म' १४ ऑक्टोबर १९५६ दसऱ्याच्या दिवशी स्वीकारल्यानंतर अवघ्या ४३ दिवसांनी त्यांचे परिनिर्वाण झाले. अर्थात त्या आधी अनेकवर्षे त्यांचे चिंतन सुरू होते. बाबासाहेबांनी दलित समाजातल्या सामान्य व्यक्तीला माणूस म्हणून जगण्याचे धाडस दिले. निसर्गाने वर्ण व्यवस्था निर्माण केली नाही. ती आपमतलबी माणसाने स्वार्थासाठी निर्माण केली असल्याचा एहेसास... ठाम विश्वास त्यांनी दिला. परंतु त्याही पूर्वी सवर्ण मानल्या जाणाऱ्या अनेकांना ही समज महात्मा गांधीजींनी दिली. त्यांनी दलितांना परमेश्वराला प्रिय असणारी माणसे ...'हरिजन' असे संबोधले. अर्थात ज्यांना परमेश्वर वा ईश्वर ही संकल्पनाच मान्य नाही अशांना ..नव बौद्धांना ते आवडले नाही. पण अनेक कुटुंबे गांधीजींच्या विचारांनी भारावलेली होती. मला पहाटे चरख्याच्या लयबद्ध आवाजाने जाग येई. आई पप्पा चरख्यावर सूत कातीत असत. त्याच सुताने विणलेल्या खादीचे ते कपडे वापरीत. वयोमान व कामाच्या व्यापामुळे चरखा खुंटीला टांगला गेला. पण अखेरपर्यन्त त्यांच्या अंगावर खादीच होती. आईला जुन्या रीती नुसार अहेवमरण आले. एका गृहस्थांनी हिरवी साडी त्या सामानात आणली. ती पाहून पपांनी मला खूण केली. मी तात्काळ विनंती करून ती साडी परत केली. केवळ त्यांच्या समाधानासाठी हिरव्या काठांची शुभ्रसाडी आणली. तिच्या इच्छेनुसार मंत्रविधी न करता भडाग्नी दिला.

राष्ट्र सेवा दल, पू. सानेगुरूजी, एस.एम.जोशी, डॉ. राम मनोहर लोहिया, बॅ. नाथ पै, जयप्रकाशजी अशा अनेकांचा प्रत्यक्ष सहवास ही माझी माहेरची मिळकत... समृद्धी. घरच अ किंवा न जातीय होते. आई हरिजन सेवा संघाची २५ वर्षे अध्यक्षा होती. मुलींच्या वसतीगृहातील होतकरू मुलींना पपा कोर्टातून आल्यावर इंग्रजी व गणित शिकवीत. पाण्यापर्यन्त सर्वांचा वावर. पण 'बाईंच्या' म्हणजे आईच्या घरात 'हात स्वच्छ धुणे' हेच सोवळे.

त्यावेळी अनेक सवर्ण... ब्राह्मण घरांतील धुरिणांनी जातीयता नाकारली होती. हरिजन सेवा संघाचे संस्थापक काकासाहेब बर्वे हे त्यापैकी एक. त्यावेळच्या धुळे जिल्ह्यात राष्ट्र सेवा दलाच्या अनेक शाखा, जातपात न माननारी... खुले, समतोल

जीवन जगणारी अनेक तरुण मंडळी होती. त्यात कोणताही अभिनिवेष नव्हता किंवा 'दलित सेवक' अशी शासकीय 'डिग्री' ... पदवी मिळवण्याचा अट्टहास नव्हता.

डॉ. बाबासाहेब एका जातीचे नव्हे तर सर्वांचेच आधारस्तंभ होते. भारतीय घटना समितीचे अध्यक्ष, ... सर्वधर्म, सर्वजाती, सर्व वर्ग समभाव हा घटनेचा 'प्राणबिंदू' ठेवणारे महात्मा. पाश्चात्य देशातील स्त्रियांना समतेच्या निकषावर मतदानाचा अधिकार मागण्यासाठी चळवळ करावी लागली. बाबांनी तो अधिकार आम्हाला स्त्रियांना घटनेद्वारा दिला. हिंदू कोड बिलात योग्य ते बदल होत नाहीत हे पाहून घटना समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

धर्म मग कोणताही असो त्याच्या चौकटी दुधारी... न तोडता येण्यासारख्या कठोर बनवण्याचे काम धर्मातले धुरिणच करतात. मुळात सर्व सामान्य माणसांना संघटितपणे सुखकर, एकमेकांसह जगता यावे म्हणून 'धर्म' निर्माण झाले. सर्वांना सोयीस्कर असे नियम केले गेले. मूलत: धर्म माणसाने माणसांच्या सोयीसाठी निर्माण केला. माणुसकी, परस्पर प्रेम त्याचा पाया होता.

हिंदू धर्मात चातुर्वर्ण्य आला त्या आधारे शेकडो जातींचे जाळे निर्माण झाले. कठोरता आली.

''सं गच्छंध्वं, संवदध्वं, संवो मनासि जानताम्...'' एकमेकांची मने जाणून घेऊ आणि सामूहिकपणे उजेडाच्या... सुखसमृद्धीच्या दिशेने सुसह्य जीवन जगू अशी प्रार्थना वेदात होती. वेद अपौरूषेय म्हणजे ईश्वर निर्मित नाहीत असे सांख्य, वैशेषिक मानीत. आद्य शंकराचार्यांनी हिंदू धर्माचा सखोल अभ्यास करून सामान्य माणसाला काचणारे नियम काढून नवीन रचना केली. 'ब्रहम सत्य जगन् मिथ्या' अशी मांडणी केली ती गौतम बुद्धाच्या 'जगत् शून्यं' च्या जवळ जाणारी आहे. ती करतांना त्यांनी तत्कालीन सर्वच धर्मांचा अभ्यास केला. नव्या रचनेवर बौद्धाच्या 'धम्माचा' प्रभाव होता. म्हणूनच त्यांना 'प्रच्छन्न बौद्ध' असे म्हणत.

❑

# १४

# पापड कुर्डयांचे दिवस आणि नवी दिशा

"खारोड्या, पापड्या कांही आहे का घरात? या तापलेल्या दुपारी भाजलेले शेंगदाणे, गूळ नि खारोड्या हव्याच!" मराठवाडा नाहीतर खानदेश वा कोल्हापूरचे मुंबईत स्थायिक झालेले पुरूष पावसाने जोरदार हजेरी दिली की हा प्रश्न विचारणारच!

ग्रामीण भागातून शहरात गेलेल्या कुटुंबातील पुरूषांना हा खास मेवा हवाच असतो. भलेही मग ते मुंबई पुण्यात स्थायिक झालेले असोत. राजस्थानी घरातून जेवणाच्या शेवटी पापड हवाच. त्याशिवाय जेवण झालंय, पोट भरलंय असं वाटतच नाही. तर कोकणात ज्यांच्या पूर्वजांची नाळ पुरली होती ते देशावर येऊन राहिल्याला शंभरवर्षे झाली तरी जेवणाच्या शेवटी सुपारी एवढा का होईना दही, दूधभात खाल्ल्याशिवाय मन तृप्त होत नाही.

फेब्रुवारीच्या मध्यातच ऊन चढू लागते. उन्हाळ्याची चाहूल लागते. लहानपणी पपांचे पक्षकार मोराण्याचे जिभाऊ, भलामोठ्ठा कोहळा घरात आणून देत. नि सांगत 'बाई, आबईनं कोहळा दिलाय' पापडासाठी. कोहळ्याच्या पाण्यात केलेले पापाड निके म्हणजे पवित्र असतात. वैधव्य आलेल्या, पूर्वी लाल लुगड्यात असणाऱ्या बायांनी लाटले तरी सोवळ्यातल्या स्वयंपाकासाठी ते चालंत. मरेस्तो कष्टाशिवाय त्यांच्या जगण्यात होते काय? ज्या शेतकऱ्याच्या शेतात कोहळ्याचा वेल असे तो आवर्जुन कोहळा ओळखीच्या घरांतून देई. कोहळा विकत नसत. आमच्या घरात

सोवळ्याओवळ्याची भानगड नव्हती. उलट कोहळा आला की पापडापेक्षा आग्र्याचा पारदर्शी पेठा तयार करण्यासाठी मी नि पपा आईजवळ भुणभुण लावीत असू.

त्या काळात शेजारपाजारच्या मैतरणी दुपारच्या चहाला एकीच्या घरी जमत. नि मग हातावरच्या शेवया कधी आणि कुणाकडे करायला जमायचे याची आखणी होई. घाणेकरकाकूंना प्रचंड डिमांड असे. गहू ओलवून त्याचे मऊसुत पीठ काढून वळलेल्या, मुठीच्या अंदाजाने त्यात मीठ घालून शेवयांचे पीठ भिजवण्यात त्यांच्याइतके तज्ज्ञ कोणीच नसे. नऊलाच काकू हजर होत पीठ भिजवून, पांढरीशुभ्र फडकी तयार ठेवून एका फडक्यात ती भिजवलेली कणिक गुंडाळून डब्यात ठेवून काकू जाई. पुन्हा बारा वाजता नऊवारीतली, रूंद हाडाबांध्याची, कोसांच्या वेण्यांचे रेखीव चक्कर बांधून, त्यावर गजरा माळून काकू हजर.

तो कृती–व्यवहाराच देखणा. पहाण्या सारखा. आधी जाड दोरा काढून त्याची वेटोळी केळीच्या पानावर ठेवून त्यावर शुभ्र ओला मलमली कपडा घालायचा. थोड्या वेळाने ते दोरे लांबवत जायचे. आम्हा पोरासोरांचे काम काठ्या स्वच्छ धुवून आणायच्या आणि उंच डबे एकावर एक ठेवून त्यावर आडव्या ठेवायच्या. खाली धुतलेली पातळ साडी. त्यावर त्या सुतासारख्या बारिक शेवया बायका टाकत. त्या लांबत जात. अचानक घड्याळाकडे पहात काकू फर्मान सोडत. बाई चहा करा लवकर. स्वयंपाक उरकून सहा वाजता नाटकाची तालीम सुरू होणारेय. पन्नाशी ओलांडलेली ही बाई धुळ्याच्या मनोरंजन संस्थेच्या 'देवाच्या काठीला आवाज नाही' या नाटकात ठसक्यात काम करी.

उन्हाळ्याची चाहूल लागताच घराघरातून पापड लाटणाऱ्यांचे अड्डे जमत. एकीकडे हात सरासरा चालत तर दुसरीकडे उखाळ्यापाखाळ्यांसह गप्पांना ऊत येई. गटातली प्रत्येकजण हजर राहीच; न गेलो तर आजचा नारळ आपल्याच नावाने फुटणार या भितीने!

मी या घरी आले. पापडांची रित बदलली. तरी अड्डे नि गप्पा त्याच. मूग उडदाचे पीठ एकत्र करून, हिंग, मिरी घालून पीठ भिजवायचे. पापड पोळपाट भरून मोठ्ठा आणि पातळ लाटायचा. लाटणे रेघाळ असते. प्रत्येक महिला आपले लाटणे घेऊन येई.

कुर्डया पापड्यांची धांदलही याच काळातली. गहू सुद्धा ठराविक प्रतीचे हवेत. मग ते चार दिवस पाण्यात घालून भिजवा. पाचव्या दिवशी गहू दळून चिक काढा. दुसऱ्या दिवशी तो शिजवायचा. नि सोऱ्याने स्वच्छ धुतलेल्या लुगड्यावर गोल आकाराच्या सुरेख कुर्डया घालायच्या.

ज्वारी, तांदुळ, गव्हाच्या पापड्या मिश्र डाळींचे सांडगे, पोह्याचे, तांदुळाचे, नागलीचे पापड, राजस्थानी पापंडं चर्वीचे अनेक प्रकार. खायला चटकदार. पण करण्यासाठी लागणारे श्रम, मनाची एकाग्रता याचे मोजमाप कोणी काढलेय का? अन्न निर्मितीसाठी स्त्रीला घ्यावे लागणारे कष्ट, श्रम हे नेहमीच अदृष्य राहिले आहेत. त्यांची दखलही आजवर घेतली गेली नाही. तिला 'अन्नपूर्णा' म्हटले की संपले.

पुणे तेथे काय उणे? असा वाक्प्रचार आहे. तो खराच आहे. मी फर्ग्यूसनच्या होस्टेलला असतांना एक मावशी सायकलवरून गरम साबुदाणा वडा, बटाटेवडा विकायला येई. हा हा म्हणता डबा संपे. तीन रूपयाला मोठे दोन वडे नि चटणी मिळे. त्याच पुण्यात गेल्या ३०/३५ वर्षापासून पापड कुर्डयांची पॅकबंद पाकिटे मिळू लागली. पण अजून छोट्या गावात हे लोण पोचलेले नाही. उलट औरंगाबाद, अकोला सारख्या शहरातल्या काही स्वयंसेवी संस्था गरजू महिलांना कच्चा माल पुरवून हे उन्हाळी पदार्थ करवून घेतात. स्वत:चे नाव देऊन पॅकींग करून त्यांना मार्केट मिळवून देतात. महिलांना चांगला रोजगार मिळतो. आमच्या सावित्री महिला उद्योगाने हे काम सुरू केले. मी कुठेही गेले तरी दोन मोठ्या पिशव्यात पापड, शेवया, बोटवे, खारोड्या, मसाला यांची पाकिटे असत. माझी मुंबईची मैत्रिण त्यावरून मला छेडत असे.

'काय ग शेवटी बायकांना मसाले पापडांत बुडवून हातावर दोन टिकल्या देणार तू?'

'बाई ग बिन शिकलेल्या बाईला परंपरेने, आई सासूकडून मिळालेले कौशल्य तिला दोन दिडक्या नाही, स्वत:ची कमाई देते. ती नवऱ्याच्या नजरेपासून बिन मिळवती बेकार बाई या टोमण्यापासून झाकली रहाते. पण तिला आम्ही जरूर सांगतो. बाई ग पोरीला मात्र शिक्षण दे. काहीतरी नवे कौशल्य शिकव.'

स्त्रीला आर्थिक सबलते सोबतच स्वत:चे निर्णय घेण्याचे धाडसही यायला हवे. अलिकडे काही बचत गट पापड मसाल्याच्या उद्योगातून महिलांना आर्थिक सबळते बरोबरच निर्भयही बनवतात. काळ बदलला तरी जिभेची चटक तीच रहाते. शेवटी पिझ्झाला खमंग थालीपीठाची चव कशी येणार?

❑

# १८

# जखती झाडांच्या साक्षी ऐकतांना (२८-२९ जानेवारी १९९५)

...२८ जानेवारी १९९५ च्या सकाळी बंगलोर येथील टाटा विज्ञान भवनात 'जनसुनवाई'ला, ...लोकन्यायसभेला सुरवात झाली. आशिया पॅसिफिक परिसरातील स्त्रियांचे ज्वलंत प्रश्न त्यात मांडले गेले. उद्घाटनासाठी ना मंत्र्यांचा सुळसुळाट ना त्यांच्या आगेमागे फिरणाऱ्या पुढारी अधिकाऱ्यांची पळापळ, स्त्रीप्रश्नांवर कृतीशील कार्यक्रम राबवणाऱ्या संघटनांच्या प्रतिनिधींनी, मध्यात ठेवलेल्या समयीची एकेक वात पेटवली. ती पेटवतांना एका वाक्यात त्या त्या देशातल्या महत्वाच्या स्त्री प्रश्नांनी ओळख करून दिली. सर्व प्रश्न एकत्र येऊन सोडविण्याचा सांघिक-निर्णय. एकीमेकींनी हातात हात घेऊन, हातांची पकड घट्ट करून निश्चय केला.

व्यक्त होणाऱ्या व्यथा वेदनांची गाथा सुजाणपणे ऐकून, त्यांना न्याय व लढण्याचे बळ देण्यासाठी पंच म्हणून, विविध देशातील मान्यवर कृतीशील व्यक्ती 'हाजीर' होत्या. सामाजिक न्यायाची बांधिलकी ज्यांच्या कृतीतून सतत जाणवली ते भारताच्या उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री. कृष्णा अय्यर, स्त्रियांच्याच नव्हे तर सामान्यांच्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका घेणाऱ्या झुंजार वकील ॲड. इंदिरा जयसिंग, दिल्लीचे प्रा. आशिष नंदी, या भारतीयांसोबत फिलिपिनच्या सुप्रसिद्ध ग्रॅब्रियेला स्त्री संघटनेच्या रचनाकार निलिआ सॅचो, चीनच्या महिला संघटनेच्या प्रमुख बाई विलान होत्या. व्यवसायाने

इंजिनिअर पण आफ्रिकन नॅशनल कॉन्फरन्सच्या महिला विभागाच्या संघटक थेंबोसिली माजीला, आणि इंडोनेशियातील न्यू साऊथ वॅर्लस विद्यापीठात काम करणाऱ्या डॉ. ऐलिन पिहावे आणि अरबस्तानातील स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या, ट्यूनिस विद्यापीठातील खादिजा शेरिफ याही ज्यूरी म्हणून रंगमंचावर होत्या.

लोकसाक्षीचा कार्यक्रम ५ सत्रांतून झाला. स्त्री ही निसर्गाचे रूप आहे. निर्मितीसाठी लागणारा काळ... वेदना... भावबंध यांचा प्रत्यक्ष अनुभव ती घेत असते. म्हणूनच स्त्री आई असते. अग्नीत जणू ती उभी. म्हणून ती अग्निघटिका. ते पचवून ती सर्वांना फुलवणारी चैतन्यमयी 'आई' होते. आपण नदीला लोकमाता म्हणतो म्हणून ती जलघटिका... पाण वेळ माती, दशदिशा यांतील सुगंध जगभर पसरवणारी लोकमातात नदी असते. जगभर सुगंध पसरवणारी वाऱ्याची लहर असते. सुख... दुःख, चांगले वाईट, जे जे कवेत येईल ते ते उरात सामावून घेणारी, सारे भलेबुरे हिरव्या अंकुरातून जन्माला घालणारी 'भूमाता' असते. दहा दिशातून येणाऱ्या अनुभवांना पचवून ठामपणे उभी राहणारी साक्षात् 'ज्ञानदा' असते. तिच्या या पंचरूपाचे प्रतीक जणू ही पाच सत्रे होती. प्रत्येक सत्रापूर्वी २ ते ४ मिनिटांच्या संगीतबद्ध चित्रफितींच्या दृश्यसाक्षी झाल्या. भोपाळ गॅसपीडित, पुरांत वाहणारी गांवे, दुष्काळाने दुभंगलेली घरे... निसर्गाचे सौंदर्य, त्याचा सुखद आस्वाद घेणाऱ्या जमाती... अशा हजारो संदर्भ देणाऱ्या चलचित्रांचे ते 'कॉकटेल', पाहणाऱ्याला अस्वस्थ करणारे होते.

पहिल्या सत्राचे नाव होते अग्निघटिका. त्यांत हुंडाबळी, परित्यक्ता बुद्धिमान स्त्रिया, चेटकिणी ठरवून मारण्याची प्रथा, देवदासी प्रथा, मुली जन्मतःच मारण्याची प्रथा आणि पर्यटन व्यवसायातून वाढलेला वेशाव्यवसाय या प्रश्नांवर, त्या प्रश्नांना प्रत्यक्ष तोंड देणाऱ्या... त्या आगीत होरपळणाऱ्या, महिलांनी साक्षी दिल्या.

तामिळनाडूच्या उसलामपट्टी जिल्ह्यात आजही, मुलगी जन्मताच तिला मारून टाकण्याची रित आहे. या भागातील काही जमातीतील आयांना फक्त एकच मुलगी जिवंत ठेवता येते. तिने विरोध केला तर नवरा बायकोला टाकून देतो. मुलगा व्हावा म्हणून नाजूक अंगाला सुई टोचण्याचा विधीं बायकांना करवून घ्यावा लागतो. या भयानक परंपरेला इंडियाटुडेने १९८६ साली वाचा फोडली. परंतु कल्लार समाजातील ही विषारी प्रथा केवळ शासकीय प्रयत्नांनी कशी जाईल. त्यासाठी शासनाने गेल्या १३ वर्षांत काही केलेय का? काय केले? आणि परिणाम?

स्त्रियांना चेटकी ठरवून मारण्याची प्रथा युरोपातही होती. या प्रथेचा धागा 'स्त्री' च्या बुद्धिमत्तेशी जोडलेला आहे. झारखंडात अशा अनेक स्त्रिया मारल्या गेल्या.

अजूनही कधीतरी असे घडू शकते. समाजाला नको असलेल्या अडचणीच्या वाटणाऱ्या स्त्रियांना 'चेटकीण' ठरविले जाते. प्रश्न विचारणाऱ्या वा प्रश्न निर्माण करणाऱ्या स्त्रिया समाजाला कुठे परवडतात? हल्यानी ही महिला चेटकीण नव्हती. नवऱ्याचाही तिच्यावर विश्वास होता. पण शेजाऱ्यांपासून ते गावातल्या ओझापर्यंत सर्वांनी तिला चेटकीण ठरवले. महिला संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे ती वाचली.

बेकारीचे संकट स्त्रियांवर अधिक. मग नोकरीकरता पर्यटन व्यवसायात शिरकाव झाला पण तिथे वेगळेच वाढून ठेवलेले होते आणि आहे. आशियायी देशातील थोडेफार शिकलेल्या मुलींना 'मदतनीस' म्हणून अरबदेशात पाठवले जाते. भरपूर पगार आणि परदेशगमनाचे आकर्षण. मुली या जाळ्यांत सहजपणे अडकतात. तिथे गेल्यावर एकाकी होतात. ना भाषा येत ना जनसंपर्क. त्यामुळे लैंगिक शोषण होते. विकसनशील आशियायी देशांतील वाढते दारिद्र्य, वाढती लोकसंख्या, कुटुंबात व समाजात स्त्रियांना नसलेली किंमत, यांचा फायदा उठवला जातो. दहा बारा वर्षांच्या कोवळ्या कळ्या लैंगिक व्यवसायात गुंतवून अकाली खुरडल्या जातात. या प्रश्नावर अनेक संघटना आशियायी देशांत काम करीत आहेत. नेपाळच्या संध्या श्रेष्ठ व मीना या दोघींनी हे प्रश्न मांडले.

देवदासींच्या व्यथा मीना सेशूने दुर्गाच्या रूपाने मांडल्या. सांगली परिसरात मीना, उज्ज्वला या स्त्रियांच्या प्रश्नांवर अत्यंत धडाडीने काम करतात.

''ताई, तुमच्यापाशी बुद्धी आहे. डोकं आहे ते इकून तुमी चार पैशे कमावता. आमाला शिक्षन मिळालं न्हाई. हयेच शिक्षन मिळालं. माज्यापाशी... सुंदर... डौलदार शरीर हाये. पुरुषांना आवडतं तसं वागण्याची कला आहे. ते इकून मी चार पैशे कमावते. मग तुमच्या माझ्यात फरक का?'' दुर्गाने समोर टाकलेला प्रश्न. सर्वांना अस्वस्थ करणारा अंगावरचे संस्कृती... रित... शक्ती वगैरेचे रेशमी, बांधीव कपडे झरकन फेडणारा प्रश्न. अगीनवेळ असे कपडे सोलणारी आणि ऐकणाऱ्यालाही होरपळवणारी. माझ्या मनात मात्र प्रश्नांचे शोभादर्शक गरगरत होते.

शरीर विकण्यातून शरीराच्या आरोग्यावर, नैसर्गिक सुदृढतेवर होणाऱ्या परिणामांचे काय? दुर्गाला श्रम करून चार पैसे सन्मानाने मिळाले असते. तर तिने हा 'व्यवसाय' स्वीकारला असता का? की शॉर्टकट मनीला महत्त्व? इंग्रजी कवितेतील गवळण म्हणायची की, 'माय फेस इज माय फॉरच्यून ... माझं भाग्य म्हणजे माझा चेहरा. तो सुंदर तर माझं नशीब सुंदर!'' हे खरंच का? या व्यवसायातील स्त्रियांत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण केली पाहिजे. त्यांना समाजात मोकळेपणाने जगता

आले पाहिजे. परंतु हाही एक व्यवसाय आहे. त्यांत आरोग्य सांभाळून पारंगतता मिळवायला काय हरकत आहे? तो व्यवसाय का निवडू नये?'' अशी भूमिका विशाल मानवतेच्या दृष्टीतून योग्य होईल? एका परिषदेत एका कार्यकर्तीने अशी भूमिका मांडली. खेड्यातील महिला तिथे होत्या. त्यातील एकीने प्रश्न विचारला, ''ताई, तुमची लेक ह्यो वेवसाय मला करायचा असं म्हनली तर तुमी काय सांगाल तिला?''

डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी बहिष्कृत भारतात नोंदवले आहे की, 'जेथे स्त्रीला पोटाची खळगी भरण्यासाठी स्वत:चे शरीर... शील विकावे लागते, तिथे लोकशाही निर्माणच होऊ शकत नाही.

दुसऱ्या सत्राचे नांव होते 'पाण-वेळ' नर्मदा विस्थापितांचे दु:ख बुडीबेन आणि लताने मांडले. मोठ्या शहरातील झोपडपट्ट्यात राहणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न आणि फुटपाथवर राहणाऱ्या कुटुंबातील स्त्रियांच्या भयानक जिण्याचे वास्तव चित्र मांडले कौसल्या आणि नसरीनने. तसेच चन्द्रा आणि रूथ मनोरमा या कर्नाटकातल्या झुंजार महिला कार्यकर्तीने, परदेशी नोकरीच्या लोभाने स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील स्त्रियांचे प्रश्न मांडले. जकार्ताच्या सुप्रहातीन आणि ताती कृष्णवती यांनी सांगितले की, स्थलांतराचा लोभ दाखवून तरूण मुलींना, स्त्रियांना फसवणाऱ्या अनेक एजन्सीज आशियाई देशात वाढत आहेत. आपल्या घराला पैसा पुरविण्यासाठी देहाचे हाल सोसणारी स्त्री स्वत:च्या शब्दात दु:ख सांगू लागते तेव्हा क्षणभर काळाचा प्रवाहसुद्धा गोठून जातो. ती मैत्रिण सांगत होती. ज्या काम करणाऱ्या स्त्रिया निर्घृण प्रकारांना विरोध करतात. अशांची नांवे काळ्या यादीत जमा होतात. काम करणाऱ्या स्त्रियांची काळीयादी हाँगकाँगमध्ये तयार होते पण वाईट वागवणाऱ्या, लैंगिक शोषण करणाऱ्या, कामासाठी मारहाण करणाऱ्या मालकांची काळीयादी का केली जात नाही?

अलिकडे सर्वच देशांत विविध प्रकारच्या अणुसाधनांचा, शस्त्रांचा वापर होतो. त्यासाठी सतत प्रयोग सुरू असतात. अतिरिक्त रसायनांचा वापर सुरू आहे. या साऱ्यामुळे 'बंजरभूमी'चे वेगवेगळे प्रकार वाढू लागले आहेत. केरळमध्ये दक्षिण भागात युरेनियम खूप सापडते. १९५७ साली 'युनो'ने या भागात लोकवस्ती करू नये असे बजावले होते. पण... वाढती लोकसंख्या वगैरे. या सर्वांचा परिणाम तेथील लोकांच्या जननशक्तीवर झाला आहे. चल्लम्माला ९ मुले झाली पण एकही सर्वसामान्य (नॉर्मल) नव्हते. आज एकही जिवंत नाही. अमेरिकेने केलेल्या संशोधनातून लक्षात येत आहे की याचा वाईट परिणाम पुरूषांच्या स्पर्मवर... वीर्यावर झाला आहे.

भोपाळची शोकान्तिका तर आजही अस्वस्थ करते. गॅस घटनेत मृत्यू पावलेल्या २००० विधवा, एकाकी महिलांना शिलाईकाम पुरवणारे केंद्र शासनाने अशात बंद केले. रझियांबीचा सांगताना गळा दाटतो पण डोळ्यातून संघर्षाच्या ठिणग्या चेतत असतात. या कहाण्या होत्या, 'कातरवाऱ्याची वेळ' या सत्रातल्या.

चौथे सत्र 'भूमी'चे. 'सीतावेळ' म्हणायचे का? झारखंडातल्या आदिवासी स्त्रियांचे प्रश्न म्हणजे 'विकासा'च्या कृतीतून निर्माण झालेल्या समस्या. बिहार म्हणजे दारिद्र्याचे भयानक दर्शन. बिहारमधून अनेक कार्यकर्त्या आल्या होत्या. विकासाची मांडणी करताना त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा विचार केलाच गेला नाही. त्यातून भरडले गेले दोन गट. स्त्रिया आणि मूले त्यांचे माणूस म्हणून स्वतंत्र अस्तित्व लक्षात घेतले नाही. ऑस्ट्रेलियातील मूळ रहिवाशांचे प्रश्न मांडले गेले.

दुपारी विविध क्षेत्रात झोकून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडले. या सत्राचे नाव होते 'ज्ञानवेळ' गडवालच्या चिपको आंदोलनाच्या वंदना शिवांनी स्त्री आणि पर्यावरण यांतील घट्ट अनुबंध उकलून दाखवला. हाँगकाँगच्या मायाम बिलेवानी आशियातील स्थलांतरित महिलांचे प्रश्न मांडले. मलेशियाच्या इव्लेलिन हॉगने, मोठमोठी धरणे बांधल्यामुळे आदिवासी, परिसरातील लोक, जंगल, प्राणी यांच्या जीवनावर होणाऱ्या आघातांचे चित्र रेखाटले. शेवटी हे सारे ऐकताना काष्ठवत् झालेल्या ज्यूरींच्या प्रतिक्रिया. कृष्णा अय्यरांनी बजावले, ''पुरुषी आश्वासनांवर कणभरही विश्वास ठेवू नका. संघटित व्हा (हुंडाबंदी कायदा मृत झाला आहे. पण हुंडा मात्र जिवंत आहे. हुंडाबळींची संख्या वाढते आहे.) स्त्रियांनो, समाजाला हलवा... थोड्या अतिरेकी झालात तरी चालेल. ही प्रचंड धरणे कोणासाठी बांधायची? कंत्राटदारांसाठी? न्याय म्हणजे काय? अन्यायाला कायदेशीर करणे म्हणजे न्याय? आम्ही पुरुषांनी आता स्त्रियांच्यासाठी उभे राहिले पाहिजे. त्यांच्यासाठी... त्यांच्या प्रश्नासाठी बरोबरीने लढले पाहिजे त्या पुढ्यात रहातील आम्ही त्यांना अनुसरु. संपूर्ण आशियाने एकत्र येऊन आपल्या विकासाची विनाशकारी दिशा बदलण्यासाठी संघर्ष दिला पाहिजे.

ट्यूनिशियाच्या खालिदा शेरीफ आपल्या कणखर आवाजात बजावत होत्या. विकास केवळ आर्थिक बाबींशी निगडित नसतो. विकासाच्या कल्पनेतून आम्हा स्त्रियांना आणि आमच्या भावी पिढीला... मुलांना वगळले आहे. मुलांच्या विकासाच्या कल्पनेचे स्वप्न पाहणारे... त्यासाठी कष्टणारे 'बाप' आज हरवले आहेत. आपण 'विकासा'च्या कल्पनेला माणूस केंद्री बनवूया. इंदिरा जयसिंगाकडून भोपाळ गॅस प्रकरणातील निवेदन ऐकण्याची इच्छा सर्वांनी प्रदर्शित केली. त्या त्यावर बोलल्या.

जनसुनवाईचा कार्यक्रम संपला होता. आता प्रत्येकींच्या देहात 'मनसुनवाई' सुरू होती.

२७,२८,२९ जानेवारी १९९५ विमोचना... आशिया महिला मानवी हक्क अभियान. बंगलोर. आयुष्यभर चेतवीत राहणारे दिवस, मैत्रिणी, संस्था आणि आठवणी...

आज १३ वर्षांनी मनात येतेय. आज ती चेतना, प्रेरणा देणारी माध्यमे, घनतमात क्षितीजावर तळपणारी शुक्राची चांदणी जपण्यासाठी किमान महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील स्वयंसेवी संघटना एकत्र येणार ना? हा निश्चय निर्धार करूया.

❑

## १६

# आई म्हणोनी कोणी..

आईचा 'अवकाश... स्पॅन इतका विशाल असतो की शब्दांचे घुमारे नेहमीच नव्या उन्मेषाने मोहरत जातात. तरी परिपूर्ती होत नाही. अधुरेपणा सलत रहातो. त्या दोघींना जाणवले की आई विषयी विविध क्षेत्रातील नामवंतांना बोलते करायचे. त्यातून 'आई' या पुस्तिकेची निर्मिती. जणू या आजच्या आयांनी त्यांच्याच नव्हे तर प्रत्येकाच्या आईला वाहिलेली ती स्मरणांजली.

इवल्या डोळ्यांना अवघा निसर्ग, गंध... रंग... स्पर्श यांतून उलगडून दाखवणारी आई. संकटांना सामोरे जाण्याची शक्ती देणारी, निर्भय रहा असे स्पर्शातून सांगत धाडस देणारी आई वात्सल्याचा निरंतर झरा, संकटांना झेलतांना 'आधारवड' होऊन पाठीशी राहणारी, बुद्धी एवढेच गुणार्जनाला महत्व देणारी, दारिद्र्य... विषम परिस्थिती या सर्वांशी हसत जुळवून घेणारी महामना आईच!

तिचा स्पर्श विलक्षण गारवा आणि ताजवा देणार. म्हणूनच कांदिवलीच्या अनघा धाडी म्हणतात,

**...पहिल्या पावसात भिजतांना, माय तुझी आठवण येते किंवा**
**जेव्हा आला पाऊस पहिला**
**भिजतांना जाणवली तुझ्या हातांची ऊब.**

ती साक्षर नसली तर निरक्षर कसे म्हणावे तिला? कारण त्याही पलिकडचे शहाणपण... सुजाणत्व तिच्यात असतेच. चैत्रगौरीचं भिंतीवरचं 'लिवणं', अंगणात

शेणसडा घालून त्यावर रांगोळी रेखणं, गवरण्यांचा देखणा मांड मांडण हे जमणार तिलाच. भलेही तिने कलेचा... सौंदर्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला नसेल. वयाच्या सुरकुत्यांना निसर्गाची देणगी म्हणून स्विकारत. मनातली उत्सुकता सुकू न देता कंम्प्युटरवर काम करणाऱ्या मुलाशेजारी बसून जिज्ञासेने प्रश्न विचारणारीही आईच. आई म्हणजे साक्षात् उर्जेचा चिरंतन झरा.

**दासू वैद्य यांचे शब्द. त्यांचे असले तरी प्रत्येकाच्या तनामनातले.**

**प्रत्येक आईचा मुलगा**
**कवी असूच शकत नाही**
**पण प्रत्येक मुलाची आई**
**त्यांच्यासाठी एक कविता असते**
**न विसरणारी...**

प्रत्येक स्त्री जेव्हा 'आई' होते किंवा निर्मितीच्या प्रलयंकारी वेदना जवळून अनुभवते तेव्हा 'आई' झाल्यावर तिलाही आईवर कविता लिहाविशी वाटतेच. भलेही ती कवी नसेल. अशीच एक कविता अनामिकेची

**...अंधाराला हिरमसून पाने मिटून घ्यावीशी वाटतात**
**तेव्हा...?**
**क्षणात**
**काही क्षण असे येतात**
**पूर्वी इतकेच सजून धजून**
**विझू विझू पहाणाऱ्या**
**आठवणींना**
**नवी पावले**
**जोडून.**
**आई तुझ्या आठवणींना**
**लगटून...**

'आई' ही पुस्तिका चाळतांना मलाही माझी आई आठवली. कणखर मनाची, आतल्या आत अश्रूंना बांध घालणारी. १९५५ चा प्रसंग. माझे पपा... शंकररावांनी गोवामुक्ती संग्रामात जाण्याचे ठरवले होते.त्यांना निरोप देण्यासाठी धुळ्याच्या स्टेशनवर गर्दी लोटली होती. माझ्या डोळ्यांचा बांध फुटला होता. मी असेन १४/१५ ची. ''शैला, तुझे एकटीचेच पपा सत्याग्रहात चालले नाहीत. अनेकांचे आईवडिल सामिल झाले आहेत. अभिमानाने हसत निरोप दे''. आईने कडक शब्दात मऊपणे डोक्यावरून हात फिरवत बजावले.

आईला लिव्हरचा कॅन्सर झाल्याचे निदान झाले होते. तिचे श्रद्धास्थान असलेली तिची ज्येष्ठ भगिनीसमान असलेली मैत्रिण, ती व इतर काही मैत्रिणींनी महिलांचे आरोग्य व शिक्षणासाठी एक संस्था काढली होती. त्या संस्थेनेही पंचविशी पार केली होती. तेथे काम करणारा सहाय्यक, हिशेब तपासनीस व मैत्रिण यांनी संगनमताने एका महत्वाच्या निर्णयात्मक बैठकीस आई हजर नसतांना तिची 'सही' कुणाकडून तरी करवून घेतली. शासकीय ऑडीट तपासणीत ते उघडकीस आले. मृत्यूशय्येवर दिवस मोजणाऱ्या कनिष्ठेला 'तू लेखी खोटी साक्ष दे' असे सांगायला ज्येष्ठा आली. पण कनिष्ठा ठाम होती. अवघ्या पाच दिवसानंतर आईने चिरविश्रांती घेतली.

शेवटच्या क्षणी तिच्या ओठावर सून, कन्या आणि तिला संकटातून बाहेर काढून तिचे जाज्वल्य व्यक्तिमत्व फुलवले अशा मानसकन्यचे नाव होते. आई, संध्याकाळी नातवंडांची दृष्ट काढत असे. 'इडापिडा टळो, आल्यागेल्यांच्या मनात चांगले विचार येवोत आणि सगळ्यांच्या लेकराबाळांचे आयुष्य शतायुषी होवो' ही तिची प्रार्थना असे.

**'ती आई होती म्हणूनी**
**घन व्याकूळ मीही रडलो...'**

या कवी ग्रेसच्या शब्दातली 'व्याकुळता', घन शब्दातले 'चिरंतन भारलेपण' आणि नसण्याच्या वेदनेची लय मला आजही अस्वस्थ करते.

आई अवघ्या अवकाशाला व्यापून उरत असते. ती शब्दात न मावणारी असते. कशी असते ती?

**शिकेकाईचा सुगंध**
**भरून राहिलाय आसमंतात**
**तिने केव्हाच मोकळा**
**सोडलाय गैरसमजांचा आंबाडा**
**फिरतोय तिच्या मुक्त केसांतून**
**समजुतदार वारा**
**आणि त्याला सापडलेत**
**आईचे हरवलेले डोळे**
**तिच्याच पापणीत**
**(दासू वैद्य)**

❑

## १७

# प्रेम, धर्म, बांधिलकी...

'प्रेम' म्हणजे नेमके काय? या विचारावर गेली हजारो, शेकडोवर्षे कवींनी कथा, कविता, नाटके लिहिली. आपापले विचार... मते मांडली. तरीही ते कधीच शिळे झालेले नाही. प्रेमात पडायला वय, धर्म, जात काहीही आडवे येत नाही. प्रेम सततच्या सहवासामुळे निर्माण होते की 'प्रथम तुज पाहता जीव वेडावला' या प्रकारचे असते? ती ओढ दोन मनांच्यात असते की तनांच्यात? ती दोन भिन्नलिंगी जीवांची संवेदनशील बांधिलकी असते असे आजवर ठामपणे सांगितले जाई. पण गेल्या पंचवीस वर्षात समलिंगी आकर्षणालाही समाज सामावून घेऊ लागला आहे. १९८७ मध्ये तेव्हाच्या पश्चिम जर्मनीत मौलोफला आंतरराष्ट्रीय महिला परिषदेस जाण्याची संधी मिळाली. परिषदेनंतर दोन दिवस ब्रेमनला तिथल्या महिला विभागाची कार्यकर्ता ख्रिस्ता डुरकडे रहाण्याचा योग आला. तिथे 'लेस्बियन' या शब्दाची ओळख झाली. जर्मनीतील शेतकरीण, आठवडे बाजार, संकटग्रस्त स्त्रियांचे दिलासाघर यांना भेट द्यायचे ठरले होते. खिस्टा आणि ऊलाने एका कॉफी हाऊसमध्ये नेले. आणि सांगितले ते एका समलिंगी जोडप्याने सुरू केले आहे. तिथे अशी जोडपी दिसतील. 'डोन्ट गेट ऐक्साइटेड' असेही बजावून सांगितले. एका वेगळ्या प्रेमाची ओळख झाली. अशा व्यक्तींना लेस्बियन म्हणतात.

मुळात प्रश्न पडतो प्रेम दोन जीवांचे, मनांचे की त्या जीवांनी धारण केलेल्या देहांचे. म्हणूनच प्रेमाच्या आड धर्म, जात येत नाही. पण परंपरेने देहाला मात्र धर्म दिला

आहे आणि जातही चिटकवली आहे. आणि मग समस्या... अडचणी सुरू होतात. मग तो दोन जीवांच्या... मनांच्या बांधिलकीचा मुद्दा रहात नाही! कुठे नि कुणाच्या घरी... पोटी जन्माला यायचे ते जन्मणाऱ्या व्यक्तीच्या हाती कुठे असते? त्यांत जीव... मन हे पिकातलं ढोर.

**किती हाकला हाकला**
**फिरी येतं पिकावर...**

दोन मनाजीवांची ओढ धर्म, जातीला गिनत ...मोजत नाही. मग वर्तमानपत्रांतून बातम्या... 'आंतरजातीय विवाहीत जोडप्याला जाळून टाकले.' 'भिन्न धर्मीय प्रेमी युगुलाची आत्महत्या' वगैरे वगैरे.

परदेशात तर सत्तरीचा 'तरूण' तिशी पंचविशीच्या पोरीच्या प्रेमात पडून विवाह करतो. आपल्याकडे असे पूर्वी होई. तो 'प्रेमात' पडून नसे तर जबरदस्तीने केलेला जरठकुमारी विवाह असे. अलिकडे मात्र असे क्वचित् होते. पण त्यामागे बापाची लालसा असते. प्रितीची फलश्रुती विवाहात होण्याचा संकेत आहे. पुढच्या पिढीला ... त्यांच्या पोटी जन्मणाऱ्या लेकरांना समाजमान्यता मिळणाच्या दृष्टीने ते सोयीचे असते. हा संकेत काहीजण पाळत नाहीत. विवाहाचा उपचार बाजूला ठेवून बांधिलकी मानून एकत्र राहतात.

मग पुन्हा प्रश्न. प्रेमात देहाची एकरूपता हवीच का? त्याशिवाय प्रेमाला परिपूर्णता येतच नाही का? अशारितीने प्रेम हे अधिक सकस ...श्रेष्ठ म्हणायचे का?

मध्यंतरी अगदी जवळचे स्नेही घरी आले. त्यांना कन्येने परधर्मीय मुलाशी लग्न ठरवले. ते दोघे उच्चशिक्षित. दोघांच्या व्यावसायिक पदव्या पूरक. एक ॲनेस्थेटिक मधली उच्च पदवी धारक तर दुसरी व्यक्ती निष्णात शल्य चिकित्सक. लेकीने सांगितले मी लग्न याच्याशीच करणार. तुमचे आशिर्वादही हवेत. ते मिळणार नसतील तर विवाहाचा उपचार करणार नाही. पण बांधिलकी रहाणारच. मायबाप दोघही उच्चशिक्षित. वडिलांची भूमिका, धर्म कोणीच बदलू नये. आणि ही कोंडी भारतीय संविधानाचे रचनाकार ज्ञानतपस्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सोडवली आहे. नोंदणीकृत विवाहात जात धर्म काहीच आडवे येत नाही.

प्रेम हे दोन जीवांचे... मनांचे असते. ते डोळ्यातून वाचता येते. बांधिलकी या शब्दातच दृढता असते. माया, ममता, करूणा या शब्दांतून वात्सल्य प्रतीत होते. प्रेम त्या वेगळे असते. प्रेमात 'दर्द' ... 'आर्तता' असते. ज्ञानदेवांनाही विठ्ठलाच्या सायुज्यतेची ओढ विराणीतून व्यक्त करावी लागली.

**दर्पणी पाहता रूप न दिसे वो आपुले**
**बाप रखुमादेवीवरे मज ऐसे केले**

श्रीकृष्णा बद्दलची एक कथा सांगितली जाते. विवाहानंतर सत्यभामा रूक्मिणीला वाटते एकदा बघावे तरी त्या राधेला. तिचेच नाव श्रीकृष्णाशी अजूनही का जोडले जाते? राधेला त्या सन्मानाने बोलावतात. सन्मानपूर्वक वागवतात. निघतांना तिचे पाय धुवून, त्यावर चंदन कुंकुम रेखून, वस्त्र देऊन पाठवायचे. दासीळा पाणी आणायला सांगतात. पाणी इतके गरम की पाय बुडवताच पाय पोळतात. पायाला फोड येतात. राधा आनंदाने तृप्त होऊन गोकुळात परतते.

...रात्री श्रीकृष्ण घरी येतो. सत्यभामेच्या महालात प्रवेश करतो ते लंगडत. भामा पाय चेपायला जाते तर तळपायावर मोठे फोड आलेले...

सायुज्यत्व सर्वात्मक आणि शब्दांत न मावणारे असते.

❑

१८

# आपणच लिहूया नवी कहाणी !

"शरे, वादविवाद स्पर्धेत एकत्र कुटुंब पद्धतीच कशी श्रेष्ठ आहे. वृद्ध आणि लहान मुलांना सुरक्षितता दिलासा देणारी आहे हे विविध दाखले देऊन पटवून देणारी तू. वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेत सतत जिंकणारी तू. आणि आता. अरूण सत्तरीला टेकलाय. तू पासष्टी पार केलीस. आपल्या काळात 'हम दो हमारे दा' चा नारा नव्हता. त्रिकोणाची रित होती. तू तर दोन मुलानंतरच पूर्ण विरामाची इंच्छा व्यक्त केलीस अरूणने मात्र लेकीशिवाय पूर्णत्व नाही हा हट्ट धरला. तो पूर्ण झाला. तुझी धाकटी नीरासुद्धा पस्तिशीची आहे. शैलेश, नवीन गावातच रहातात. पण तरीही तू नि अरूण एवढ्या मोठ्या घरात दोघेच का रहाता?"

नीलाने आपल्या मनातली खळखळ शरयुजवळ भडाभडा मोकळी केली. शरयूला ही गोष्ट तशी नवी नव्हती. तिच्या आणि अरूणच्या अनेक मित्र मैत्रिणींना हा प्रश्न सलत असे.

"नीले, चार दिवसांपूर्वी तुझा फोन आला. की तुझ्या मनात खूप... खूप साठलंय. ते मोकळं करायला आलीस ना? मग आधी तू बोलती हो. तुला आवडणारी हळद मिठाची मऊ खिचडी कुकरमध्ये लावते. मधला नवीन माडीवर रहातो. तिला बाजरीच्या तीन भाकरी, वरून तीळ लावलेल्या... आणि वांग्याचं भरित आणायला सांगितलंय, शैलेशचा दवाखाना जवळच आहे. त्याने गेल्यावर्षी घर बांधलय त्याची पत्नी अनिता फिजिओथेरपिस्ट आहे. तिने कालच लोणचं पाठवलंय. आणि ती

फ्रुटसॅलड पाठवणारेय. आज आपणं गप्पा मारत जेवू. उद्या माझी स्वयंपाक करणारी आशा येईल. त्या सगळ्यांना उद्या इथेच जेवायला बोलावलय. आणि नीरा, रमाकान्तही येतील. नीरा सिडकोतल्या गृहविज्ञान महाविद्यालयात शिकवते. तर चल व्हरांड्यात बसू. मस्त गप्पा मारत. बराच ताण देऊन तो बाबाही... पाऊस चार दिवसांपासून रोज हजेरी लावतोय. जाई आकंठ झुंबरलीय. तिचा मंद मधुर सुवास घेत गप्पा नक्कीच रंगतील.''

शरयू नि नीला पाच सहा वर्षानंतर भेटत होत्या. नीलाने लातूर सारख्या तेव्हाच्या छोट्या गावात मांड मांडलाय. आता मात्र ते वाकडं तिकडं वाढतंय. अर्थात सगळीच शहर वाकडी तिकडी ऑक्टोपस सारखी वाढत असतात. नीला मोहनने ऐसपैस मोठ्ठं घर बांधलय. तीनही मुलांना तीन मोठ्या खोल्या. त्या खोल्यात, त्यांच्या मुलांना लागेल म्हणून अजून एक खोली. प्रत्येकीत अत्याधुनिक संडास, न्हाणीघर वगैरे. मुलांच्या खोल्या मजल्यावर. आणि नीला मोहनची खोली, अभ्यासाची खोली, स्वयंपाक घर वगैरे तळमजल्यावर. कसं छान. आदर्श. पण तरीही मनात काय साचलयं...?

''शरे, आपण दोघींनीही एकत्र कुटुंबाचा आग्रह धरला. मी नि मोहनने त्या दृष्टीकोनातून तीस वर्षापूर्वी घर बांधलं. तिघी सुना शिकलेल्या आहेत. धाकटी बारावी झालेली. सचिनचा प्रेमविवाह. ती चांभार समाजातली आहे. देखणी आहे. सुस्वभावी आहे. मधल्या सौरभची पत्नी अस्मिता संस्कृतचीं अध्यापक. गावातल्या महाविद्यालयात नोकरी करते. ती दशग्रंथी ब्राह्मण घरातून आमच्या सारख्या मराठीने केला गुजराथी भ्रतार अशा घरात आलीय. माझ्या घरात देव नाही. निसर्ग हाच ईश्वर, मानणारी मी. पण तिने हौशीने देवघर मांडले. त्यात देवी. लंगडा बाळकृष्ण यांच्या मूर्ती ठेवल्या. मी विरोध अर्थातच कशाला करू. ती तिची इच्छा. ती घरातली सदस्या. पण एक मात्र सांगितले. मी अंधश्रद्धा निर्मूलनाची पाईक आहे. तू मला पूजा करण्याचा आग्रह करू नकोस. मोठ्या सुधीरने एम्आयडीसीत लोखंडाच्या कॉटस्, कपाटे वगैरेचा छोटा कारखाना टाकलाय. त्याची पत्नी वसू बी. एड. आहे. तीही नोकरी करते. पोळ्यांना दोन्ही वेळेला बाई आहेत. मोठी सकाळचा स्वयंपाक भाजी... वरणभात वगैरे पाहते. धाकटी सकाळचा नाष्टा आणि कोरडया चटण्या वगैरे पाहते. मधली संध्याकाळचे पाहते. पहिली पाच सहा वर्षे गाडी कशी डौलात नि रूळावर चालत होती. मग नातवंडांच आगमन. मोठीला एकच मुलगा. मधलीला दोन मुलगे. धाकटीला दोन्ही मुली. मुलं वाढू लागली. त्यांच्या मनात प्रश्नांची बेटं उगवायला लागली. ...''दादी, दादू गुजराथी आहेत. आपलं आडनाव शहा आहे आणि तुझी आई माझी पंजीमा देशपांडे कशी ग?''

''दादी, मंगेशच्या आजी आल्या होत्या ना? त्या काकीला म्हणत होत्या. तुझ्या धाकट्या जावेच्या मुली चित्रासारख्या देखण्या आहेत. पण शेवटी चांभारणीच्या पोरी. लग्न कशी व्हायची. तू आपली वेगळी रहा. पोरं मोठी व्हायच्या आत काय ते ठरवा.''

शरू हे माझ्या वाढणाऱ्या नातवंडांचे प्रश्न. घरात कुरबुरींचा पाढा. आपण चाळिसबेचाळिस वर्षापूर्वी 'जातपातके बंधन तोडो' चा नारा देत विवाह केला. अरूणचे 'माळीपण' तुला कधी बोचलं नाही. तुझ्या मुलांना बोचलं नसेल; पण नातवंड?''

''नीलू, घरात देवघर नसलं तरी सकाळी अंघोळ केल्यावर मी समई लावून मुलांना श्लोक म्हणायला शिकवी. अगदी 'सं गच्छध्वं संवदध्वं' सर्व जण एकमेकांची मनं जाणून घेऊ, एका विचाराने राहूया ही वेदातली प्रार्थना ते 'असतो मा सद्गमय... पासून ते मृत्योर्मा अमृत गमय' पर्यन्त ! 'अमृत' चा अर्थ सांगतांना अरूण मुलांना सांगे की असे काम करा जे अनेकांना उपयोगी होईल. सानेगुरूजी, रविन्द्रनाथ टागोर आपल्यात नसले तरी त्यांचे विचार अमर म्हणजेच चिरंतन आहेत ना? म्हणजेच ते मृत नाहीत 'अमृत' आहेत. संध्याकाळी 'शुभंकरोती' होई. तीच सवय नातवंडांनाही दिली. एकदा शैलूचा मोठा विचारत होता 'आजी आपण माळी आहोत का? गुरूजी म्हाणाले माळी जात ओबीसीत येते. त्यांना सरकारकडून फी व कपडे पुस्तकांसाठी पैसे मिळतात. आम्ही अर्ज करू?' प्रश्न मला अस्वस्थ करून गेला. शरू सांगू लागली. पण लगेच उत्तर सुचले. ''साहिल तुझा बाबा डॉक्टर आहे. आई त्याला मदत करते. तुम्हाला पुस्तके छान कपडे, खेळणी सगळं मिळतं ना? मग कशाला आपण अर्ज करायचा ? आणि हे बघ बाळ जन्माला येतं तेव्हा त्याची जात हाता कपाळावर लिहिलेली असते का? बेटा आपण माणूस आहोत. माणसाचे रंग वेगळे असले तरी ती माणसंच असतात ना? आपण प्राणी नाही. हजारो वर्षापूर्वी माणसांनी माणसांच्या उद्योग... व्यवसायावरून जाती तयार केल्या. पण आपण माणसंच. महाराष्ट्रात राहतो म्हणून मराठी. मोहन दादूचे वडील गुजराथ प्रान्तात होते म्हणून गुजराथी, कळले? असे सांगताच त्याला पटले नि पळाला खेळायला'' शरयू सांगत होती.

''नीलू तुझ्या मुलांचे व्यवसाय वेगळे. मुलासुनांनाही त्यांची स्वप्नं असतात. घराच्या, दैनंदिन जगण्याच्या त्यांच्या म्हणून कल्पना असतात. कळत नकळत मोठ्यांचं त्यांना दडपण वाटतं. मुलांना सुनांना एकत्र बोलाव. नाहीतरी प्रत्येकाच्या वेगळ्या मोठ्या खोल्या आहेत. मुलांची स्टडी-अभ्यासाची खोली गच्चीत तुम्हीच बांधून द्या. मुलांना प्रेमाने वेगळे राहू द्या. उद्या ती घरंही बांधतील.'' शरू सांगू लागली.

''अग शरीराने एकत्र राहणं म्हणजे 'संयुक्त कुटुंब' नाही ग. मनात संवाद.. आपुलकी हवी. एका गावात राहून एकमेकांना मदत करणे, वेळप्रसंगी आपण त्यांच्याकडे राहायला जाऊन नातवंडांना सांभाळणे, सून मुलांना त्यांच्या कामात सहकार्य करणे, एखादा वार ठरवून एकत्र जेवणे, एकत्र प्रवासाला जाणे... यातून मनं नेहमीच जवळ राहातात गं. आस्था वाढते. एकविसाव्या शतकातल्या 'संयुक्त कुटुंबाची' नवी कहाणी आपण नाही तर कोणी लिहायची?''

❑

## १९

# हे रचनात्मक वादळ जागवायला हवे...

सर्वांनी आचारावयाच्या, जीवनाला सकारात्मक आकार देणाऱ्या कृतींचा आलेख म्हणजे संस्कार. असे म्हणणे फारसे वावगे होऊ नये. 'सं' या शब्दातच समूहभावना आहे. समूहाने करावयाच्या कृती सर्वांना सुखाच्या, भाग्याच्या, प्रकाशाच्या दिशेने नेणाऱ्या असाव्यात. समाज ही संकल्पना समूहात्मक आहे. समूहात राहणाऱ्यांनी असे वागावे की एकाच्या कृतीचा इतरांना उपद्रव होऊ नये. संघटनात शक्ती असते. ती नेहमी संतुलित रहावी. संपूर्ण समाजात शांती आणि समृद्धी नांदावी अशा तऱ्हेचे व्यक्तीने करावयाचे आचरण आणि अशा आचरणाचे धडे देणे म्हणजे संस्कार. असे संस्कार करणारी तीन महत्त्वाची माध्यमे म्हणजे आई, शिक्षक आणि कुटुंब. व्यक्तीची पहिली शिक्षिका आईच असते. भवतालच्या निसर्गाची ओळख करून देणारी, काऊ, चिऊ, उंदिरमामा आदींच्या गोष्टीतून समाजात कसे वागावे, कसे वावरावे याची ओळख करून देणारी असते आई. कुटुंबातील व्यक्ती म्हणजे आजी, आजोबा, काक, काकू, वडील, आत्या, भावंडे वगैरे. त्यांची एकमेकांशी वागण्याची पद्धत यांतून घरातील मुलांवर समाजात कसे वागावे, कुटुंगात कसे वागावे याबाबत अलिखित नियमांचे संस्कार होत असतात. शाळेतील शिक्षकाची भूमिका अत्यन्त महत्त्वाची असते. माणूस आणि निसर्ग यांच्यातील नेमके नाते कोणते, मुलांसमोर उलगडून ठेवण्याचे, कोणत्याही घटनेमागील कारण शोधण्यासाठी विद्यार्थ्याला प्रवृत्त

करण्याचे कार्य शिक्षकाने करायचे असते. त्यातून मुलांवर विज्ञाननिष्ठा आणि तर्कशुद्ध विचारसरणीचे संस्कार होतात.

पूर्वी संस्कार केवळ धर्माशी... धार्मिक आचारांशी निगडित असत. धर्माने सांगितलेल्या मूल्यांशी त्या त्या धर्माचे गट धर्मातील मुलांवर, धर्मगुरूंद्वारे धार्मिक आचार, विचारांचे संस्कार करण्यावरच भर देत. परंतु गेल्या शंभर दिडशे वर्षात धर्माची, त्याद्वारे केल्या जाणाऱ्या संस्काराची चिकित्सा करण्याची परंपरा निर्माण झाली. तशी ती पूर्वी पासूनच आहे. चार्वाकाचे लोकायतिक विचार, जैन–बौद्ध धर्म विचार धर्म चिकित्सेतूनच निर्माण झाले.

१९४७ साली भारतीय गणराज्याची घोषणा करतांना आपण सर्वधर्मसमभाव, विज्ञान निष्ठा, आर्थिक–सामाजिक–स्त्रीपुरूष समतेचा विचार स्वीकारला. परंतु जी मूल्ये आम्ही घटनेद्वारे अंगिकारली त्यांचे संस्कार करण्याची क्षमता शिक्षक, पालक, माता या महत्वाच्या माध्यमांत निर्माण करण्याची बांधिलकी मात्र स्वीकारली नाही.

काळाच्या ओघात संपर्काची अनेक माध्यमे निर्माण झाली. वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन यासारख्या माध्यमांचा मुलांवर संस्कार करण्यात लक्षणीय प्रभाव वाढला. किंबहुना आई, कुटुंब आणि शिक्षक या तीनही माध्यमांवर दूरदर्शनसारख्या दृकश्राव्य माध्यमाने कुरघोडी केली. ह्या नवलनयनोत्सवी माध्यमाने भारतीयांना पुरते भारून टाकले आहे. लहानशा खेड्यात जा, शहरातील झोपडपट्टीत जा तिथेही टी.व्ही. च्या ॲन्टेनाची शिंगे घराघरावर खोचलेली दिसतील. घरात धड नहाणी नसेल, संडास तर नसेलच. घरातील स्त्रिया मात्र गाऊन घालून हातात डबा घेऊन झाडाझुडपांचा आडोसा शोधतांना दिसतील.

शामची आई फारशी शिकलेली नव्हती. परंतु माणूस म्हणून जगतांना पाळावयाची धर्मापलिकडची मूल्ये तिला परंपरेने माहित होती. त्या काळात अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातीची म्हातारी रस्त्यात पडली. शामच्या आईने शामला तिला आधार देऊन उठविण्यास सांगितले. तिच्या भुकेल्या पोटात दोन घास प्रेमाने घातले. आणि शामला मोळी नीट बांधून देण्यास सांगितले. धर्माच्या धाकामुळे कदाचित् शामला आंघोळही करावी लागली असेल. परंतु माणुसकीचा संस्कार धर्मातील नियमांना बाजूला ठेवून केला गेला. देशप्रेम, अहिंसा, सत्य, दया, क्षमा, शान्ती, नम्रता यांसारखी मूल्ये गैरसोयीची ठरतात. काळानुरूप संस्काराचे रूप बदलतेच अशी भलावण केली जाते. 'राखील तो चाखील' 'सहकारात थोडा स्वाहाकार होणारच' अशा नव्या म्हणीही तोंडावर फेकल्या जातात. पण तो स्वार्थाला वैध रूप देण्याचा

कांगावा असतो. काही मूल्ये, जी धार्मिक रूढी, परंपरा यांवर बेतलेली असतात ती मात्र काळानुरूप बदलणे आवश्यकच असते. एकेकाळी 'जात', 'धर्म' यांचे कठोर पालन हे अपरिवर्तनीय मूल्य होते. त्यानुरूप संस्कार केले जात. आज ते बदलत आहेत. संस्कार हे अगदी बालपणापासून होतात. त्यामुळे ते अगदी हाडीमाशी भिनतात. ते खरवडून काढणे अवघड जाते. मी महाविद्यालयात होते तेव्हाची गोष्ट. वक्तृत्व स्पर्धेसाठी वर्गातील दोन विद्यार्थी व एका सहअध्यापका सोबत आम्ही डबे घेऊन परगावी गेलो. तिथे तीन वर्षांनी आमच्या पुढे असलेला प्राध्यापक म्हणून महाविद्यालयात रूजू झालेला एक कॉलेजमेट भेटला. त्याने आग्रहाने घरी नेले. पत्नीस शिरापुरीचे जेवण बनवायला लावले. पण वर्गातील मित्राने उपवास असल्याचा बहाणा करून जेवण घेतले नाही. कारण प्राध्यापक मित्र दलित होता. खरे तर बुधवारी सहसा उपवास नसतो.

मनाला, बुद्धीला पटले तरी प्रत्यक्ष कृती करतांना मन कचरते. संस्कार पाटीवरच्या अक्षरांसारखे पुसता येत नाहीत. परतीच्या प्रवासात स्वत:चा डबा खातांना त्याने कबूली दिली.

संस्कार देणारे पहिले माध्यम आई. तीच अडाणी, अंधश्रद्ध, वस्तूंचा हव्यासांना विशेष प्राधान्य देणारी असेल तर मुलावर कोणते संस्कार होणार?

आज भारतातील सुमारे ५२ टक्के स्त्रिया निरक्षर आहेत. ४८ टक्के साक्षरांपैकी ८० टक्के स्त्रियांना सही येते वा थोडेफार लिहिता वाचता येते. दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येत ७० टक्के स्त्रिया आहेत. अजूनही ३२ टक्के लोकांना दोन वेळचे जेवण मिळत नाही. संस्काराची बात मध्यमवर्गीयांतच छेडली जाते. आर्थिक दृष्ट्या निम्नवर्गात दोन वेळची भाकरी शोधण्यात घरदार भोवंडत असते. प्रत्येक घरातल्या मुलांना संस्काराचे लेणे मिळायलाच हवे हे खरे. पण ती जबाबदारी सरकार इतकीच प्रत्येक सुजाण नागरिकांची नाही?

सत्य-पावित्र्य-सौंदर्य यांबद्दल आस्था, वडीलधाऱ्यांबद्दल आदर, संकटग्रस्तांना मदत करण्याची वृत्ती... सामाजिक न्याय, पारदर्शी आर्थिक व्यवहार, स्त्री पुरूष समभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन, परस्परांचा आदर ठेवून वैचारिक विरोध दृढपणे मांडण्याची स्पष्टता, कठीण प्रसंगाला सामोरे जाण्याचे धाडस, व्यक्तिगत स्वार्थापेक्षा देश!प्रेम मोठे, एक नाही तर हजारो संस्कार. हे संस्कार देणारी आई, कुटुंब, शिक्षक ही माध्यमे सुजाण, सकस केली पाहिजेत. त्या साठी इतर माध्यमांचा वापर अत्यन्त कुशलतेने, मनस्वीपणे आणि कठोरपणे केला पाहिजे. आज टी. व्ही. वरची शेकडो चॅनेलस् तसेच चित्रपट अत्यन्त विकृत असे संस्कार समाजावर, अल्पवयीन मुलांवर

करीत असतात. आमचे सेन्सॉर बोर्ड अत्यन्त विकलांग आणि विकृत मनोवृत्तीचे तर नाही ना अशी शंका येते. या सर्वांवर मात करायची तर मुलांमध्ये वाचनाची आवड वाढवायला हवी. चित्र काढणे... गोष्टी ऐकणे... पुस्तके वाचणे, गाणी गाणे, सहलीला नेणे यांची 'झुंबड' निर्माण करून सुसंस्कारांची पेरणी फवारणी करण्याचे आव्हान शिक्षक पालक पेलू शकतात. पालक शिक्षक यांच्यातील संवाद, अनुबंध अधिक प्रभावी व्हायला हवा. तसेच घर फक्त आई वा बाईचे किंवा दोन वेळच्या जेवणासाठीचे, ही संकल्पना बदलायला हवी. घरातील कामात पुरूषांचाही सहयोग हवा. कुटुंबाचा सांगाडा न राहता ते ज्येष्ठांना लहानांना आधार नि संस्कार देणारे 'धर' व्हावे. ज्येष्ठ नागरिकांनी या कामात विशेष रस घ्यायला हवा. हे रचनात्मक वादळ जागवले तरच आजचे २१ वे शतक प्रकाशमय शांतीचे जाईल.

❑

१०

# स्वप्नातून खुणावणारं मधाळ आजोळ....

उन्हाळ्याच्या सुट्टया जवळ येऊ लागत. आजीच्या सुरकुतल्या हातांनी हातावर ठेवलेला लोण्याचा गोळा नि खडीसाखर पहाटेच्या स्वप्नात येऊ लागे. आणि त्याचवेळी साखर झोपेत आई अंगावर पाणी टाकून उठवत असे.

'उठा ताईबाई आज 'विंग्रजीचा प्येपर हाये.' तुमचा अवघड विषय. उद्या गण्या गण्या गणोबा. नि परवा. पहाटे मामाबरोबर पारल्याला निघायचंय.'

...उन्हाळ्याच्या सुट्या म्हणजे चहुअंगांनी भाजून टाकणारं बाभळीच्या काट्यासारखं ऊन, रोजन् रोज वाढणारं. खानदेश म्हणजे जणू कोळशाची भट्टी. त्या उन्हाची तलखी कमी व्हावी, तोंडाला चव यावी म्हणून निसर्गानेच कैऱ्या आंब्याचे दिवस या काळात नेमले असावेत. विलेपार्ले माझे आजोळ. आमच्या धुळ्याला चटकगोड रायवळ आंब्याच्या पाट्या खेड्यातून भरभरून बाजारात येत. आग्रारोडवरच्या कोपऱ्यावर बाया आंबे विकायला बसत. रुपया, आठ आणे डझनाचा आंबा घरात येई. रस रोजच लागे. पारल्याला गेल्यावर एक मामा पायरीच्या करंड्या घरात आणून टाकी. अकरा भावंडांची लेकरं त्या अवाढव्य सरस्वती बंगल्यात जमली की जणू त्या बंगल्याची लांबी रूंदी कमी होई. लपायला शेजारच्या बंगल्याच्या मागे शेताडीत उड्या मारून जावे लागे.

सकाळी आठ वाजता गुरगुट्या भात, मेतकुटाची पंगत बसे. त्या आधी मोठ्या मामीने भल्यामोठ्या रवीने डेऱ्यात ताक घुसळुन लोण्याचा दगडी भला मोठा सट माई... आजीजवळ ठेवलेला असे. माई तो बाळकृष्णाच्या चिमुकल्या मूर्ती समोर ठेवी.

आचमन करून भोवती पाणी फिरवून देवाला नमस्कार करी. डोळे उघडून आमच्याकडे पहात 'या रे पोरांनो' म्हणे. प्रसादाची खडी साखर नि लोण्याचा चिमुकला मोठ्या सुपारी एवढा गोळा हातावर पडला की देवाला नि आजीला नमस्कार करून आम्ही गुरगुट्या भाताची वाट पहात असू. मागच्या शेताडीतल्या केळीच्या चतकोर पानावर गुरगुट्या तुपाळ भात, वर मेतकुट, डाव्या बाजूला मिठाची चिमूट नि त्या खाली लिंबाच्या खमंग गोड लोणच्याची फोड...

दुपारी हुंदडतांना रात्री डोक्यावर पाटी घेऊन येणारा 'कुलपिऽ मल्ला ऽऽ ई' वाला आठवे. माठातून काढलेल्या पांढऱ्या पत्र्याच्या त्रिकोणी कुप्या असत. बदामाच्या पानावर आपली कुलपी तो काढून ठेवी नि धारदार चाकूने त्याच्या गोल गोल चकत्या करी. तेव्हाच बहुदा तोंडातले पाणी आवरण्याचा संस्कार आम्ही करून घेतला असावा. तरीही त्या पाण्याचा फुरका मारून अरूदादा म्हणेच 'भैय्या फालुदा...'. मग त्या बारक्या मटक्यातल्या उकडलेल्या लांबच लांब शेवया तो कुल्पीवर घाली.

...आज अठ्ठावन्न...साठ वर्षे उलटून गेलीत. आज आमची नातवंडं जेंव्हा त्यांच्या लाडक्या मॅगी नुडल्सचे निसटते रेशमी दोरे तोंडात घालतांनाची धावपळ एन्जॉय करतात तेंव्हा ते पाहून दूर दूर गेलेले दिवस मनात मिणमिणू लागतात..

एक मामा मंगळदास मार्केटमधून येतांना हापुसच्या पेट्या घेऊन येई. मग रात्री जेवण झाल्यावर एक मामी आंब्याच्या फोडी करायला विळी घेऊन बसे. कितीही फोडी खाल्ल्या तरी बाठींसाठी भांडण लागेच.

सुपर सॉनेट विमानासारखे दिवस पळत असत. मग विमानतळ दाखवायला एक मामा घेऊन जाई. माझ्या पपांची धुळ्याहून एखादी फेरी मुंबईला होईच. जुहूला घेऊन जाण्याचे लाड ते करीत. आमची दीड क्रिकेट टीम जुहूला जायला निघे. जातांना पपा बजावत. पाणीपुरीचा हट्ट करायचा नाही. कोरडी भेळ खायची. आणि नारळपाणी प्यायचं. पोचे पर्यन्त हो...हो... जुहू गाठल्यावर मात्र ओली भेळ, पाणीपुरी, नव्याने आलेले रगडापॅटीस सारे वसूल होई. नारळपाणी पोटात गेले तरी मार्केट मधून येतांनाच्या रस्त्यावरचा उसाचा रस प्यायची हुक्की पपांनाच येई. मग काय आमचीही मज्जा..

माझी मुलंही गावाकडच्या दादाजी, दादीजींची वाट पहात. ते दोघे मोठ्या घरी उतरले तरी हर्बऱ्याच्या पेंढ्या, ऊस, भाजलेला हुळा, खमंग दाणे, हुर्ड्याची कणसं, चवदार वाळकं, ओल्या गव्हाच्या ओंब्या. शिवाय भाजलेल्या ओंब्या. आणि गुळाची ढेप घेऊन येत. सुगीची धमाल लुटायला दादाजींकडे जाण्याची ओढ त्यांनाही लागे.

शेतात आठदहा बोरी. प्रत्येकाच्या बोरांची चव वेगळी. शेंगड्या बोरीची बोरं वाळली तरी चवदार लागत. गर कितीही चोखला तरी बोरीची गोडी संपतच नसे. एका बोरीची बोरं टप्पोरी आणि देखणी पण चवीला मात्र कडवट आणि आंबटढुस्स ! ... दादाजी दादीजींची वाट पहाणारे डोळे ...मन. एक दिवस माझ्या शब्दातून फुलून डोलू लागले.

**गावाकडच्या आजोबांची**
**पहातेय मी वाट**
**हिरव्या कंच हर्बऱ्याच्या**
**पेंढ्या आणतील साठ... गावाकडच्या दादाजींची पहातेय मी वाट**
**मऊ मऊ सुरकुत्यांची**
**गावाकडची आजी**
**घेऊन येईल कर्डईची**
**मेथीची भाजी**
**गावकडच्या दादीजी**
**कधी येतील आई**
**घेऊन मऊचा हुर्डा**
**अन् सायीचं दही...?**

...आणि आता आमच्या नातवंडांचं आजोळ? रिती, कृती बदलल्या तरी रेशमी मधाळ स्पर्श तोच. आता अत्यन्त स्वच्छ पाण्याच्या टँकमध्ये, डोक्याला प्लास्टिकची रंगित टोपी घालून पोहोण्याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण, कंम्प्युटरचे तऱ्हेतऱ्हेचे क्लासेस, वेगाने गणिताची सोडवणूक करणारी ॲबॅकस पद्धती, आपल्या नातवंडांना हसत खेळत... धाका शिवाय हे सारं शिकता यावे म्हणून आजोबा आजी नातवंडांना आजोळी आणतातच.

'आजोळ' ही लहान लेकरांच्या मनातली चिमुकली, गोंडस स्वप्नभूमी आहे. १९९३ च्या किल्लारीच्या भूकंपात हजारो मुले अनाथ झाली. त्या चिमुकल्यांसाठी काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेने प्रकल्पाचे नांव 'आजोळ' असे ठेवले होते.

...पिढ्या बदलल्या तरी सगळ्यांच्याच मनातले. आजोळ, रसाळ, मधाळ असते. सत्तरी उलटली तरी पहाटच्या स्वप्नातून ते येतच राहते आणि पिढ्यान् पिढ्या अव्याहत येतच राहणार!

❑

२१

# दिपोत्सव...

शेतीतून निघणारे धान्य आणि पशुधन हा दोहोंच्या एकात्म समृद्धीचे प्रतीक म्हणजे दिवाळी.

इ.स. १ ते ४०० या काळात हा सण यक्षरात्री म्हणून रूढ होता. वात्स्यायनाने कामसूत्रात या सणासाठी हे नाव वापरले आहे. कनोजचा राजा हर्षवर्धनाने नागानंद नाटकात या सणाला 'दीपप्रतिपदुत्सव' असे नाव दिले आहे. हा काळ इ.स. ६०० चा. नीलमत पुराणात या सणास दीपमाला असे संबोधले असून त्याचे विस्तृत वर्णन आहे. या पुराणाचा प्रचार काश्मिरमध्ये होता. नवी वस्त्रे परिधान करणे. घर स्वच्छ आणि सुशोभित करणे, देवळे... घरे दिव्यांनी सजवणे, द्यूत खेळणे आणि भाईबंदांनी एकत्र येऊन मिष्टान्न सेवन करणे ही या सणाची वैशिष्टये वर्णिली आहेत. अल्बेरूनीने प्रवासवर्णनात या सणाचा उल्लेख केला आहे. कन्नड शिलालेखातही या सणाचा उल्लेख आहे. महमद गझनी व अफगाण राजेही हा लोकात्सव साजरा करीत असा उल्लेख आहे.

अबुल फजल याच्या 'ऐने अकबरी' या इतिहास ग्रंथात लिहिले आहे की दिवाळी हा देशातील सर्वात मोठा सण, वैश्य समाज हा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करी. घरोघरी दिवे लावीत. दिवाळीचे महत्वाचे सहा दिवस असतात. वसुबारस, धनतेरस, नरकचतुदर्शी, अमावस्या-दीपपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज, वसुबारसेला गाईची पूजा करतात. गायवासरांना स्वच्छ करतात. गोठा स्वच्छ करतात. गुरांना पंचारतीने ओवाळतात. पुरणावरणाचा नैवेद्य करतात. गोठ्यातील मोकळ्या जागेत

शेणाचा सडा घालून त्यावर शेणाचे गोकुळ उभारतात. गवळणी तयार करून त्यांना सजवून मांडतात. या गोकुळाला वेस असते. शेतात जाणारी, पाणी भरणारी, स्वयंपाक करणारी, बाजार मांडून बसणारी अशा गवळणी त्यात असतात. त्यांत पेंद्या असतो आणि शेणाचा बळिराजा असतो. खेड्यातील शेतकऱ्यांच्या घरात शेणाचे गोकुळ मांडून त्यात पेंद्या व बळिराजा मांडणे शुभ मानले जाते. मराठवाड्यात हे गोकुळ विधिपूर्वक मांडले जाते. पूजा करून घरदार घोषणा देते. अवकाशात आवाज उमटतात.

**गाई म्हशीने भरले वाडे**
**दहिया दुधानं भरले डेरे**

बळीचं राज्ये येवो.–बळी म्हणजे शेतकरी,

स्त्रियांच्या सणांत शेणाचे महत्त्व आढळून येते. शेण हे सुफलनासाठी अत्यन्त प्रभावी खत होते. याची जाण स्त्रीला अनुभवातून आली होती. खेड्यातल्या शेणाच्या गोकुळाची जागा शहरात किल्ल्याने घेतली आहे.

धनत्रयोदशीला स्त्रियांची न्हाणी असतात. शेताशी, सर्जनाशी जोडलेल्या सर्व सणांत स्त्रियांचा सहभाग विशेषत्वाने असतो. त्या निमित्ताने घरातील सगेसोयरे एकत्र येतात. स्त्रिया आपले मन दगडी जात्याजवळ ओवीरूपाने मोकळे करतात. दिवाळीचे पदार्थ बनवायचे म्हणजे जात्याशी पहाटेपासून बसावे लागते. लेकीची वाट पाहणारी आई म्हणते–

**जवारीपरीस तुरीचं पीक भारी**
**लेकापरीस लेक प्यारी...**

पहाटेच्या वेळी पहिला दिवा लावून लेकीसुनांना तेल उटण्याने न्हाऊ घालताना घरातील वडीलधारी स्त्री म्हणते–

**दिवाळीचा दिवा, दिवा ठिवा दिवठणी**
**हिरवी नेसली पैठणी माय माझ्या लक्ष्मीनं..**

ही माय म्हणजे धरित्री. तिच्यातून निर्माण होणाऱ्या धनाचा सन्मान स्त्रीला नहाण्याचा पहिला मान देण्यातून व्यक्त होत असेल का? नक्कीच होत असेल!

धनत्रयोदशीचा दिवा नरकचतुर्दशीला घरातून फिरतो या दिवशी पुरूषांच्या आंघोळी असतात. त्यांना तेल चोळून, उटणं लावून, सुगंधी आंघोळ घालून ओवाळतात. या दिवशी घरातील घाण, दुर्गंधी दूर होवो अशी प्रार्थना करतात.

लक्ष्मी पूजनाचा दिवस सर्वात महत्वाचा या दिवशी खरी दिवाळी. लक्ष्मीचे... सुबत्तेचे पूजन. पण ही सुबत्ता येते कुठून?

**शालू भिजला दवरांन माय माझ्या लक्ष्मीचा...**
**माज्या बाळाला बोलते अवंदा माल झाला किती?**
**वाडा चढे डौलानं, माझ्या राजसाचा...**

अमावास्येला लक्ष्मीपूजन असते. घर पणत्यांनी सजवतात. रांगोळ्यांनी अंगण सजते. या दिवशी सायंकाळी दिव्यांची पूजा असते. ताट भरून मातीच्या पणत्या चेतवतात देवासमोर वा बैठकीत लक्ष्मीची प्रतिमा ठेवून तिच्यासमोर खाली तांदूळ गहू ठेवून त्यावर पणत्यांचे ताट ठेवतात. पणत्यांची पूजा फक्त स्त्रियाच करतात. तसेच दौत, वही यांची पूजा करतात. वहीवर 'श्री' लिहून नव्या वर्षाचे हिशेब लिहिण्यास प्रारंभ करतात. वैश्य... व्यापारी समाजाचे वर्ष कार्तिक प्रतिपदेपासून सुरू होते. प्रसाद म्हणून साळीच्या लाह्या, बत्तासे, खडीसाखर वाटतात. पूजेत धने, मूग, गूळ यांचा समावेश असतो.

बळी हा भक्त प्रल्हादाचा नातू. तो सत्तेने माजला त्याने देवांना जिंकून लक्ष्मीला दासी केले. तेव्हा विष्णूने वामनाचा अवतार घेऊन त्याचा नाश केला. बळीकडे तो यज्ञात याचक म्हणून गेला व तीन पावले जमीन मागितली. एक पाऊल स्वर्गात दुसरे मृत्यूलोकात तर तिसरे बळीच्या डोक्यावर ठेवले. त्याला पाताळात पाठवले. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला समाज तुझे स्मरण करील असा वर दिला. परंतु बळीचे राज्ये येवो अशी शुभेच्छा शेतकरी समाज विविध विधींतून सतत करत असतो. कारण बळी हा शेतकरी होता. आपल्याकडे शेतकऱ्याला बळीराजा म्हणत. केरळात श्रावणात ओणम् हा सण दिवाळी इतक्या थाटात साजरा होतो. अंगणात बळीचे प्रतीक म्हणून मातीचा ओटा तयार करतात. त्याभोवती रांगोळी घालतात. फुलांनी सजवतात. रात्री फेर धरून कैकद्विकळी हे नृत्य करतात. घरापर्यंत मातीची फुलांची पावले काढतात. या दिवशी पाताळात ढकलला गेलेला बळिराजा भेटायला येतो अशी समजूत आहे. पूर्वी बाली बेट भारताला लागून होते. त्याला पाताळ म्हणत. बाहेरून आलेल्या टोळ्यांनी बळिराजाला रेटत रेटत बाली बेटांत नेले. थर्स्टन नावाच्या शास्त्रज्ञाने तर ऑस्ट्रेलियातील लोकांचे व वनस्पतीचे दक्षिण भारतातील लोकांशी साम्य असल्याचे दाखवून दिले आहे.

बळिराजा शेणाचा करतात. शेणाला शुभा म्हणतात. शेण हे सर्वात उत्तम खत. या सर्व बाबींचा अनुबंध महत्वाचा आहे.

जी स्त्री भूमीस्वरूपा सर्जनतेचे प्रतीक मानली गेली. सन्माननीय मानली गेली. ती काळाच्या प्रवासात दुय्यम दासीसमान झाली. तिचे जगणे अत्यन्त दुःखमय झाले. रात्रंदिवस कष्ट करणे आणि खाली मान घालून समाजात व कुटुंबात दुय्यम दर्जाचे जिणे

जगणे एवढाच तिच्या जीवनाला अर्थ उरला. तिने आपले दुःख दगडी जात्याजवळ मोकळे केले. तेवढाच तिला आधार होता.

**ती स्त्रीचा जन्म दिल्याबद्दल परमेश्वराला म्हणते–**
**बैल राबतो भाड्यानं, परक्याचे दारी...**

पण माहेर म्हटले की तिचा जीव गलबलून जातो. भाऊबीज आली की तिचे डोळे भावाच्या वाटेकडे लागतात.

भाऊबीज महाराष्ट्रात अत्यन्त भावुकतेने साजरी होते. राजस्थान, उत्तर, मध्य प्रदेशात राखी पौर्णिमेचे वा भाई पांचचे महत्त्व ते महाराष्ट्रात भाऊबीजेचे. धावतपळत भाऊ भाऊबीजेला बहिणीचे घर गाठतोच. न आला तरी ती रागवत नाही. चंद्राला ओवाळते व भावाला आयुष्य चिंतिते. बहिण भावाचे नाते नितान्त निरामय आणि आंतरिक नात्याने ओलावलेले असते.

**पुनवेच्या दिशी चंद्र मोहरला**
**चंद्र आग का ओकेल काही केल्या..**

भाऊ बहिणीच्या नात्यांचा ओलावा सांगणाऱ्या हजारो ओव्या महाराष्ट्रातील स्त्रियांनी रचल्या आहेत.

स्त्री घर सोडून पतीच्या घरी कायमची आली. पण त्या घरी तिला तिचे अवकाश मिळाले नाही. त्यामुळे तिच्या ओव्यात माती आणि माहेर सतत डोकावते. सासरी डोक्यावरचा पदर कपाळ झाकेपर्यंत घ्यायला हवा. ती तिची मर्यादा पण माहेर म्हणजे मोकळपणा. भाऊबीजेसाठी येणारा भाऊ पाहून ती म्हणते

खांद्यावरचा पदर डोकीवर मी झोकीला

शेताच्या बांधाला बंधुराजा मी देखिला....

❑

११

# राखी : एक बंधन

भारतीय लोकसंस्कृतीत इतके वैविध्य आणि वैचित्र्य आहे, इतक्या जटिल गुंतागुंती आहेत की त्यांचे चिकित्सक विश्लेषण करून त्याचा मूळ गाभा शोधणे कठीण जावे. जे विधी, ज्या गाण्यांतील शब्द अर्थहीन वाटतात त्यांत एकेकाळी जीवनाचे चैतन्य एकवटलेले होते. परंतु कालौघात विधींमागील संदर्भ सुटून गेले. शब्दांचे उच्चार... शब्द बदलत गेले. त्यात नवे संदर्भ घुसले. शब्दही घुसले. त्यामुळे त्यांचे स्वरूप व्याप्ती गुंतागुंतीचे होत गेले.

द्रविड, दस्यू, आर्य, असुरांपासून ते मुघल, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्लिश दर्यावर्दी आणि धाडसी परदेशी लोकांनी, या नैसर्गिक दृष्ट्या समृद्ध भूमीवर संपत्तीच्या आशेने हल्ले केले. तीन बाजूंनी–पूर्वेकडे बंगालचा उपसागर, दक्षिणेकडे हिंदीमहासागर आणि पश्चिमेकडे अरबी समुद्र अशा सागर सीमा आणि उत्तरेकडे पसरलेल्या उत्तुंग हिमालयाची सीमा. अशा नैसर्गिकरित्या एकात्म भूमीवर धनलोभाने स्वारी करणे जेवढे सोपे होते त्याहून येथून परत जाणे अवघड होते. त्यामुळे ज्या परदेशींसोबत विविध रिती... परंपरा या भूमीत आल्या त्या परदेशींसह इथे स्थिरावल्या. येथील मूलवासींसोबत त्यांचा संघर्ष झाला. नंतर मूलवासींनी त्यांना आपल्यात सामावून घेतले. समन्वयाच्या प्रक्रियेतून समरसता निर्माण होत गेली. केळीचे छोटे रोप वाढते. त्याच्या वरच्या आवरणावर अनेक आवरणे चढत जातात. ती एकजीव होऊन जातात. मूळ गाभा शोधायचा तर ही आवरणे सोलून वेगवेगळी करणे कठीण! तसेच भारतीय–

संस्कृतीचे, जीवनरितीचे आहे. वर्षापासून ही समन्वय समरसतेची प्रक्रिया सतत सुरू आहे. त्यातून एकमेकांच्या श्रद्धा, परंपरा, देवता यांचा स्वीकार केला. या संदर्भात इरावतीबाई कर्वेंनी 'हिंदू समाजः एक अन्वयार्थ' या ग्रंथात 'नवस्वीकृतींचा अॅग्लोमेरॅशन सिद्धान्त मांडला. त्या लिहितात 'ही ऐतिहासिक घटना म्हणजे सतत स्वीकारची प्रक्रिया आहे. कोणत्याच दोन पर्यायी गोष्टींमध्ये एकीचा स्वीकार व दुसरीचा कायम त्याग असा प्रकार दिसून येत नाही.'' या नवस्वीकृतीमुळे भारतीय संस्कृतीची अभिजातता अधिक समृद्ध झाली आहे. आज २१ व्या शतकात प्रवेश करून सात वर्षे पूर्ण झालीयेत. या सांस्कृतिक एकात्मतेचा प्रत्यय कन्याकुमारी ते काश्मीर आणि जगन्नाथपुरी ते द्वारकेपर्यन्त येतो. विविध विधी, सण, उत्सवांतून येतो.

अगदी जवळ आलेला सण म्हणजे रक्षाबंधन. राखी पौर्णिमा. नारळी पौर्णिमा. इतिहास काळात उदयपूरची राणी कर्मवती हिने गुजराथच्या बहादुरशहापासून रक्षण व्हावे म्हणून हुमायूनला भाऊ मानून राखी पाठवली. अशी अनेक उदाहरणे. पूर्वी ही प्रथा उत्तर प्रदेशात रूढ होती. आता ती महाराष्ट्रानेही स्वीकारली आहे. भावाने बहिणीला केवळ आर्थिक वा कौटुंबिक नाहीतर मानसिक आधार द्यावा ही या 'राखी' मागची भूमिका. पुराण काळात श्रावण पौर्णिमेला रक्षाबंधनाचा विधी करत. पहाटे उठून शुचिर्भूत होऊन तांदुळ, सोने आणि पांढरी मोहरी थोडेथोडे घेऊन त्याची पुरचुंडी करावी. ती 'रक्षा' उर्फ राखी. तिची पूजा करून मंत्र म्हणून मंत्र्याने राजाच्या मनगटावर बांधावी. मंत्र असा

**येन बद्धो बलिराजा, दानवेन्द्र महाबलः।**
**तेन त्वामपि बध्नामि, रक्षे मा चल मा चल।।**

महाबली बळिराजा जिने बांधला गेला ती रक्षा मी आपल्याला बांधत आहे. हे रक्षे तू चलित होऊ नकोस. कुठेही जाऊ नकोस. या पुरचुंडीला लालपिवळाशुभ्र असा दोरा बांधून राखी तयार करतात. आपण शेतकऱ्याला बळीराजा म्हणतो, राख तथा रक्षा जमिनीच्या सुफलनासाठी. तिच्यातील उर्जाशक्ती वाढण्यासाठी उत्तम असते. हे इथे लक्षात घ्यावे.

महाराष्ट्रात या पौर्णिमेला नारळी पौर्णिमाही म्हणतात. कोकण किनारपट्टीवर हा दिवस थाटात साजरा होतो. ज्येष्ठ आषाढात दक्षिणेकडून धावत येऊन वेगाने धुमाकुळ घालणारी वादळे शांत होतात. या दिवशी समुद्राची पूजा करून, नारळ फोडून समुद्र किनाऱ्यावरचे कोळी लोक मासेमारीसाठी बोटी समुद्रात सोडतात. पूर्वी प्रवासी बोटीही हा मुहूर्त साधून सागरातून प्रयाण करीत. गेल्या ५० वर्षात तांत्रिक प्रगती शिगेला पोचली

आहे. परंतु हे सांस्कृतिक दिवस त्यांचे महत्त्व मात्र भारतीयांच्या भावजीवनात अजूनही ताजे आहे. नारळी पौर्णिमेला नारळीभात कोकणात होणारच. आणि देशावरचे रक्षाबंधन बासुंदी श्रीखंडाने मधुर होणारच. महाराष्ट्र उत्तर दक्षिण भारताच्या मध्यावर आहे. कोल्हापून पासून गोवा जवळ. तर जळगाव धुळ्यापासून गुजराथ जवळ. उदगीर निलंग्यापासून कर्नाटक हातावर. हिंगोली नांदेडपासून तेलंगण, आंध्र जवळ. याचा परिणाम असा की महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीवर या सर्व प्रांतातील विविध रितीपरंपरांच्या इन्द्रधनुषी छटा विविध विधी, उत्सव सणांमधून सतत जाणवतात. त्यांचा अभ्यास हा सुंदर ध्यास असतो.

❑

२३

# भूमीकन्या

लोकपरंपरेतील सीता नम्र आहे. तेजस्विनी आहे. स्वातंत्र्य आणि स्वाभिमान जपण्यासाठी भुईत नाहीशी होणारी सीता ही अग्निपरिक्षा देणाऱ्या पतिव्रता सीतेपेक्षा वेगळी आहे. स्वाभिमानी भूमिकन्या सीता लोकगीतांतून समोर येते. राम मात्र पुरूषप्रधान जीवन व्यवस्थेचा प्रतिनिधी म्हणून समोर येतो. तो सीतेला विचारतो,

**अंकुश पोटीचा, लहू कोनाचा सांग ।**
**धरनी झाली दोन भाग, तिच्या सत्वासाठी ।।**
**लहू न माझा, कूस कोनाचा सांग ।**
**सीतामाई साठी, धरनी झाली दोन भाग ।।**

सीता शरणांगता होऊन रामाकडे परत जात नाही. तर, स्वाभिमानाने मातृगृही भूमीत विलीन होते.

गर्भवती शकुन्तलेस राजा दुष्यन्त, होणारे मूल माझे नाही असे म्हणत तिला स्विकारत नाही. दुष्यन्ताने नाकारल्यावर माता उर्वशी... देवांचे मन रिझवणारी नृत्यांगना उर्वशी, शकुन्तलेस स्वगृही घेऊन जाते. सर्जन उर्जेत संवेदनशीलता असतेच. भूमी आणि स्त्री हे आदिमिथक त्यांच्यातील सर्जन उर्जेवर आधारलेले आहे. अनेक कवींच्या कवितांतील प्रतिमांतून ते व्यक्त होत असते. धरती आणि पाऊस, त्यातून बहरणारी हिरवी किमया रेखाटतांना बहिणाबाई लिहितात.

**आला पहयला पाऊस**
**शिपडली भुई सारी**

**धरित्रीचा परिमय**
**माझं मन गेलं भरी–**
**धरित्रीच्या कुशीमंदी**
**बीया बियानं निजली**
**वऱ्हे पसरली माटी**
**जशी शाल पांघरली–**
**बीय टरारे भुईत**
**सर्वे कोंभ आले वऱ्हे**
**गहयरलं शेत जसं**
**अंगावरती शहारे–**

आपले मातीपण, सर्जनचा कोवळा आनंद जपण्याचा स्त्री आटोकाट प्रयत्न करते. 'आत्मदेह समुद्‌भव' असे म्हणत मानवाला स्वत:हून निर्माण केलेल्या अन्नावर जगवणारी, अन्नदा शाकंभरी देवीप्रमाणे कुटुंबासाठी ती अन्नपूर्णा होते. शेतीचा शोध स्त्रीने लावला हे जगन्मान्य सत्य आहे. आजही सर्वसामान्य कष्टकरी स्त्री तशीच शेतीत रमणारी आहे. पितृत्व आकाशाला वा सूर्याला दिले आहे. चैतन्याचे हिरवे... सुगंधी गाणी गाणारी मात्र धरित्री असते.

कवी ना. धा. महानोर लिहितात,

**या नभाने या भुईला दान द्यावे**
**आणि या मातीतुनी चैतन्य गावे**
**कोणती पुण्ये अशी येती फळाला**
**जोंधळ्याला चांदणे लखडून जावे**

सर्वसामान्य स्त्रीला क्षणोक्षणी अत्याचार, संकटे, अडचणींना तोंड द्यावे लागते. परंतु हे सहन करत ती कुटुंबाचे घरपण सांभाळते. सुंदर घर ...खोपा हे तिचे जीवन स्वप्न असते. पण...

कवी महानोर 'तिची कहाणी' त नोंदवतात.

**ती रोज ओवी गाते सूर्यासाठी**
**संसारातल्या सुखदु:खासाठी**
**पण**
**खोपा खोपा जपतांना**
**कंठ भरून गातांना**
**झिम झिम पाऊस बरसल्यानं**

**डोळे ओले होतांना**
**खोप्यासाठी तरण्यापोरी काकुळतीला येतांना...**
**पाऊस आला अवकाळी**
**भिर भिर डोळे आभाळी...**

स्त्रीच्या मनातला सृजनाचा आनंद सांगतांना त्यांच्या हृदयातून शब्द अंकुरतात

**निस्सीम आनंदाने**
**मृगाचं पेरतांना**
**काळ्या माऊलीची शपथ घेतांना**
**तिला भरून आलं रानभर...**
**माणसाच्या जगण्याचं**
**सगळं काही साठलंय**
**ह्या माऊलीच्या पोटात...**
**तिनं पेर सुरू केली.**
**आणि हे सारं किती सहज...हसत**
**कुठे शिकलीस ग माये, दु:ख सोसण्याचा वेणा?**
**साऱ्यांसाठी हसण्याचा पुन्हा खोटाच बहाणा...**

गेल्या दोन दशकात स्त्रीची कविताही आत्मभान घेऊन येते आहे. १९६० नंतर स्त्री आपल्या व्यथा निर्भयपणे व्यक्त करू लागली.

इंदिरा संत 'कुणी न पुरते आधाराला' या कवितेत लिहितात,

**खोटी माती नभही खोटे**
**कुणी न पुरते आधाराला**
**दुभंगते ना माती अजुनी,**
**गगन उघडिना तिसरा डोळा.**

आसावरी काकडेंच्या कवितेतली भूमी दान मागणारी नाही. दान देणारी आहे.

**पाऊस धारांचे हात पसरून**
**गंध मागतसे आकाश वरून**
**असे मागणे ऐकून माती सुखावते आणि**
**मातीच्या तृप्तीचे बोभाट जाहले**
**तृप्तीच्या गंधाने आकाश भरले...**

आजच्या महिला कवींच्या कवितेतून भेटणारी भूमी स्वरूपा स्त्री स्वत:च्या माणुसपणाचे, सर्जनाच्या उर्जेचे, अस्मितेचे भान असणारी आहे. ललिता गादगे म्हणतात,

**इथल्या मनस्विनीला मात्र आता**
**कळून चुकलंय**
**व्हावं लागणारय तिला स्वत:ला**
**तिला सोडवणारा कृष्ण.**

ती स्वत:तून नव्याने उगवते आहे.

**अरूणा ढेरे लिहितात,**
**माझे पाणी बदलले आहे**
**माझे जगणे आणि गाणेही बदलले आहे.**

भूमी आणि स्त्री हे मिथक भारतीय मनातला सदाहरित आदिबंध आहे. सर्जनातील मधुर, नवनवोन्तेषी चैतन्य.. अनुभवणारी भूमीस्वरूपा स्त्री, प्रत्यक्ष अंकुरतांना वेदनांची ओंजळ सहजपणे कुरवाळते. वास्तवाला सामोरी जाते. सोशिकपणा, खंबिरपणा ही तिची उर्जा आहे. आज ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ आदि कवी तिच्या सोसण्याची कीव वा दया व्यक्त करत नाही. तर ते विद्ध होतात.

**तुझे दु:ख भोगण्याचे माझ्या अंगी येवा बळ**
**तुझ्या अथांग गंगेचे पाणी वाहू दे निर्मळ...**
**तुझ्या घळघळ घामाचा आला गहिवर आभाळा**
**वसां पाठोपाठ वसं बरसला पाणकळा**

❑

१४

# भरदुपारी घनगर्द रानात...

भर दुपारीची वेळ. भवताली सागाच्या झाडांची दाट गर्दी. माथ्यावर पानपिसाऱ्याचे घनगर्द छप्पर. भवताली मंदमधुर तरंगती हवा हेलकावे घेत अंगाअंगाला गुदगुल्या करीत फिरणारी. जणू आपण पानेरी हिरव्या सागराच्या तळाशी हिरव्या गर्दीत, झुळझुळत्या लाटांचे रेशमी झेलित उभे आहोत. चार दिवसांपूर्वी इथे आलो तेव्हा आमच्या स्वागतासाठी उभा होता सागवृक्षांचा दाटीवाटीने उभा राहिलेला परिवार. डोंगराला पाठ देऊन प्रौढ, ज्येष्ठ झाडे रूंदबंद पानांवर खानदानी नर्म हासू घेऊन उभी होते. त्यांच्या पुढ्यात प्रौढ... तरूण झाडे, अदबीने उभी. साऱ्यांचेच माथे चांदण फुलांनी मोहरलेले. पायाशी उभी असलेली चिमण्या झाडांची पिलावळ.

आम्ही दहा दिवस सेमाडोह मधल्या सिपना नदीकाठच्या सरकारी तंबुमध्ये रहाणार होतो. तंबू म्हणण्यापेक्षा सिमेंट, विटांचा वापर करून उभ्या केलेल्या शासकीय गोलाकार राहुट्याच. या हऱ्याबऱ्या संकुलात येतांना सिपना नदी पार करावी लागते. सिपना म्हणजे साग. साग बनातून सिपना चन्द्राकार वळण घेऊन पुढे जाते. त्या चन्द्राकारावर या राहुट्या उभ्या आहेत.

महाराष्ट्रातील लेखकांकडून कांही नवे ललित म्हणजे कथा कादंबरी कविता इत्यादी लेखन करून घ्यावे या हेतूने शासनाने या परिसरात कार्यशाळा घेतली होती. म्हणून ही निसर्गाची जवळीक डोळाभरून अनुभवता आली.

खरं तर अशा वेळी फक्त डोळेच सजीव असतात. काही लिहावं म्हटलं तर बोटं पेन हातात घेत नाहीत. तऱ्हेतऱ्हेच्या पानांचा मलमली तर कधी मखमली स्पर्श साठवण्यात मग्न होतात. खोडांचे स्पर्श कधी खरबरित तर कधी नितळ. चार दिवसानंतरच्या एका थंडगार दुपारच्या वेळी छोट्याशा चौकोनी व्हरांड्यात आले... आद्रक आणि गवती चहाची पानं घातलेल्या चहाच्या घोटांचा आस्वाद घेत काय लिहावं, असा विचार करतेच तोच भर थंडीत पाऊस सुरू झाला. पहाता पहाता पावसाचा जोर एवढा वाढला की वाटावे आभाळच दहा ठिकाणी फुटलेय. तिकडच्या लोकांना याची सवय असावी. मेस मधला एक नोकर दोन छत्र्या आम्हा देऊन गेला. येतांना न विसरता वाफाळलेला चहा आणला होता. या राहुट्यांवर उतरती छपरे आहेत. आता मात्र त्यांची टिपूटिप् ऐकत गेल्या चार दिवसातले सुंदर क्षण आठवण्या पलिकडे हातात काहीच उरले नव्हते!!

...इथे आल्यावर पहिले दोन दिवस सिपनाच्या प्रवाहाचा घुमता नाद ऐकत, भवतालचे नीरव हिरवे निवांतपण मनात... तनात रूजवण्यातच गेले. लेखणीतले प्राण जागेनात. मग डोंगरातल्या कोरकू जमातीच्या आदिवासींच्यात फिरायचे ठरवले. मेळघाटातल्या घटांग डोंगरावर अगदी उंच टोकावर माखला नावाचे खेडे आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पासाठी प्रसिद्ध आहे. म्हटलं माखल्याचा डोंगर जीपमधून चढतांना वाघोबा दर्शन देतील. पण छे!! या परिसरात पावसाळा दरवर्षीच मुक्तपणे बरसत असतो. साग, आवळा, मोह या झाडांची गर्दी असलेले भवतालचे डोंगर. पानांचे दाट झुलते पिसारे ऐल पैल पसरून एकमेकांच्या गळ्यात गळे घालून उभे आहेत. दूरचे डोंगर भर दुपारी थेंब धुक्याची तलम ओढणी माथ्यावर ओढून नजरेवर चेटुक घालताहेत. पंचवीस तीस अंशाचा कोनात वळणार डोंगरातला रस्ता. तोही अरूंद. एका बाजूला डोळे फिरवणारी दरी तर दुसऱ्या बाजूला हिरवी भिंत. पायाशी निळ्या, पिवळ्या, पांढऱ्या, गुलाबी रानफुलांची गालातल्या गालात खुदुखुदु हसणारी गर्दी. मध्येच रानकपाशीची प्रौढ पिवळी फुलं. आमच्यातला एक जण जीप थांबवून फोटो काढी. फिल्मचे रीळ संपले तरी तृप्ती नाही. शेवटी एक जण म्हणालाच. बेट्या आपण लेखक. नजरेचा कॅमेरा कधी थकतो का? आणि संपतो का? डोळ्यातला कॉम्प्युटरवर साठवून ठेव फोटो. आठवण आली की डोळे करायचे बंद आणि चालू करायची मनातली चिरंजीव चित्रफित !!

तर माखल्यात पोचलो. ज्वारी, मक्याची छोटी छोटी शेते दिसू लागली. हे गांव मुलांच्या कुपोषणामुळे विधानसभेत गाजलेले आहे. या वस्तीत दोन घरे गवलांची... गवळ्यांची, एक घर गोंडाचे तर बाकीची घरे कोरकूंची गावात सातवी पर्यन्त शाळा आहे. सहा शिक्षक रोज येत. इथे सकाळी नऊ वाजता एक बस येई. ती सायंकाळी

मुक्कामाला सेमाडोहात जाई. शाळेत मुले भरपूर. मुली त्याहून जास्त. शाळेत मिळणारी खिचडी, मुलीला रोज मिळणारा रुपया यामुळे शाळेत भरपूर मुले होती.

कोरकूंचे घर अक्षरश: देखणे, उंचावरून सूर मारावातशी उतरती, गवताची छपरे. आतले घर शेणाने भिंतीसकट सुरेख सपोत सारवलेले. वर चुन्याने काढलेली चित्रे. आणि अगदी बुटके, अडीच तीन फूट उंचीचे दार. तीन बायकांना आम्ही नाव विचारले. त्यानुसत्याच हसत होत्या. आमच्या सोबत एक आदिवासी शिक्षक होता. त्याने विचारले 'विहीइमाकृविहील्या' मग उत्तर आले.

''सुमुरती, मीरा, सांती जी''

चाळिशी ओलांडलेली स्मृती आणि तिशीतल्या मीरा व शांती. जंगलात वेगवेगळ्या मधमाशांचा मध मिळतो. परतवाडा, धारणी, अमरावतीकडचे व्यापारी येतात आणि शेरभर मधासाठी शेरभर खडेमीठ देवून जातात. जंगलात मीठ अगदी दूर्मिळ... गावचा सरपंच सोमा सांगत होता.

... आम्ही वाघाच्या डरकाळ्या ऐकायला उत्सुकलो होतो. पण ना त्याने दर्शन दिले ना जीव थिजवणारी डरकाळी मारली. मात्र दोन दिवसांपूर्वी मोरपिसांची सळसळ आणि पिसारा फुलवू नाचणारे मोर मात्र मनाला... डोळ्यांना सुखावून गेले. माकडे मात्र दोस्त बनली होती. हे सगळे आठवत असतांना पाऊस मात्र धुवांधार कोसळत होता. रात्रभर पाऊस. सागाच्या रूंद, दडस पानांवर लयीत कोसळणारा पाऊस, त्याचा घनगंभीर नाद. भवताली सुम्म शांतता. तो घुमणारा आवाज ऐकतांना मला आठवला लहानपणी ऐकलेला मंत्रजागर. शेजारच्या घरी नवरात्रात मंत्रजागर असे. सोळा वेदशास्त्री ब्राह्मण दोन गटात समोरासमोर बसत आणि वेदातील मंत्र विशिष्ट लयीत, स्वरात अगदी एकात्मपणे गात. त्या रात्री तो पाऊस माझ्या मनात मंत्रजागराची सय जागवून गेला.

... दुसऱ्या दिवशी जाग आली ती सिपनेच्या वेगवान आवाजाने. सिपनेच्या पात्राजवळ रूंद डेऱ्याचे अर्जुन वृक्ष, साग आहेत. त्यांना कवेत घेऊन उफाणत, फणफणत, फेसाळत, उंचउंच उड्या घेत ती धावत होती. चहा घेण्यासाठी वनसंकुलाच्या उपहारगृहात आलो तर कळले की पुलावरुन पुरूषभर पाणी वाहतेय. पुलापाशी जाऊन सिपनेचे उरात धडकी भरविणारे रूप पाहिले. समोरच्या तीरावर अनेकजण थांबलेले. अलिकडच्या तीरावर दूध भाजीपाला घेऊन विकायला जाणारे आदिवासी थांबलेले. हो, एक आदिवासी सांगू लागला की पाच वर्षांपूर्वी असाच पूर आला होता. तो सहा दिवस ओसरला नव्हता. हे ऐकून मात्र मन बेचैन झाले. दुसऱ्या

दिवशी सुरेख ऊन पडले. वाटले आता ओसरेल पूर. बासुंदी सारखा चहा पितांना छान वाटले. पण दुपारी उपहारगृहाच्या मालकाने विनंती केली. दोनच फलके मिळतील. खडी बासुंदी भरपूर घ्या. पूर यायच्या आदल्या दिवशी त्याने गव्हाच्या दळणाचे पोते सिपने पलिकडच्या सेमाडोह गावच्या गिरणीत पाठवले होते ते पलिकडे अडकले होते. प्रत्येक कोरकू... गोडाच्या घरात जाते असते. चार पैसे जास्त देऊन गहू जात्यावर दळून जाणावे तर त्याच्या जवळचे ते शेवटचे पोते होते संध्याकाळी खिचडी नि ताकाचा वरवा सुरू झाला.

सिपना डोंगरातून उड्या घेत येते. या परिसरातला पाऊस शांतवला तरी पल्याडच्या भागात धो धो पाऊस असणार. पेपर्स नाहीत. फोन बंद. मोबाईलची रेंज नाही. रात्री कंदिलांचा प्रकाश. मी ठरवून टाकलं. मिळेल ते खायचं. पानाफुलांत हिंडायचं. भवतालची नीरव हिरवाई शब्दांतून वेचायची. आमच्यात एक बॉटनीवाले मग सगळे त्यांना सतावणार! कवितांना ऊत. प्रत्येकाच्या लेखणीतले प्राण जागे झाले. आणि भरदुपारी अनुभवलेली घनगर्द रात प्रत्येकाच्या मनात, शब्दांत, डोळ्यात नोंदली नाही तर गोंदली गेली. पाचव्या दिवशी सिपनादेवी शांत झाल्या. पुलावरचे पाणी ओसरले... पण त्या वेळी मनात भरदुपारी गोंदले गेलेले घनगर्द रान आजही हिरवेगार आहे.

❑

# २५

# सुगंधी वादळे : शुभ्रांकित निरामयता

प्रत्येक लिंबोणीच्या झाडाचा रंग असा कोवळा का दिसतोय? काल परवापर्यंत ही झाडं हिरव्यागार रंगात तांबुस अंजिरी छटा लेवून बसली होती. आणि आज चक्क चांदणरंगी झिरझिरीत अवगुंठणाने चेहेरा झाकुन घेतलेल्या स्वप्नमोहिनी सारखी का दिसत आहेत? ...त्या मागे पळणाऱ्या झाडांच्या फुलांचा किंचीत कडवट मधूर गंध. निंबवृक्षाकडे पहातांना मनात शब्दचित्रे उमटत होती. निंबाची कोवळी केशरी पाने, गूळ, बत्तासे, गोमुत्र यांच्या मिश्रण।चं तीर्थ नाही का घेतलं पाडव्याला? अर्थात गोमुत्रा ऐवजी आता पाणी घालतो आपण.

दोहोबाजूंची चांदणस्वप्नांची मोहरलेली झाडं निरखण्यात दंग असतांनाच एक विलक्षण मधूर गंध अंगाअंगाला छेडून गेला. मी दचकून भवताली पाहिले. अधमुऱ्या हिरवट रंगाच्या फुलांचे शिरिषाचे ते झाड. बिस्किटी पिवळ्या रंगाच्या रूंद लांबोड्या शेंगाचे खुळखुळे वाजवीत जणू माझीच वाट पहात उभे आहे. कॉलेजच्या रस्त्यावरच्या या झाडांवर फुले कधी थव्या थव्यांनी येऊन उतरतात नि विलक्षण मत्तमंद सुगंधाची वादळे भवताली पेरीत रहातात ते कळत नाही. आणि मी भानावर येऊन हळहळत रहाते. मला फुलत जाणारे झाड पहायचे असते. खरं तर झाडाच्या पानात लपलेल्या हिरव्या रूंदबंद शेंगा पिवळ्या होतानाचा बदल मला निरखायचा असतो. आणि झाडावरच्या कळ्यांची कुलपे उघडून त्यातील रेशमी चवऱ्यांनी झुलती फुले कधी उमलतात हेही मला अगदी एकटक निरखायचे असते. गेली तीस पस्तीस वर्षे हे वेळापत्रक साधण्याचा मी

मन:पूर्वक प्रयत्न करते. पण ते चुकतेच. जेंव्हा आत्मभान येते तेंव्हा झाडावर झुलत्या रेशमी चिमुकल्या चवऱ्यांचे थवे झुलायला लागलेले असतात. आणि त्या जादुई सुगंधाची भुलई अवघे अस्तित्व अदृश्य करून टाकते.

शिरिष वृक्षाच्या ओढीने मी त्याला त्याचे रोप आणायला सांगते. त्यानेही अगदी आज्ञाधारकपणे आणले. मग मृग बरसल्यावर अगदी स्वत: खणून खड्डा आम्ही ते रोवले. झाड पानांनी मोहरू लागले. झुलू लागले. पहाता पहाता सात वर्षे निघून गेली. त्या नववयसा झाडावर कळ्यांचे घोस लखडू लागले. आणि एक दिवस काही कळ्यांनी साई सुटयो म्हणत डोळे उघडले. पिस्ता रंगाच्या चवऱ्याऐवजी फिकट गुलाबी रंगाच्या चवऱ्या झुलू लागल्या. पण सुंगधी लहरींची वलये? ते मात्र 'नस्से'. निर्गंधी फुले. मग माझा वैताग. तोही हिरमुरलेला. मग जिथून ते रोप आणले ते गृहस्थ घरी भेटायला.

'मॅडम या झाडाला रेनबो फ्लॉवर म्हणतात. हे झाड चोहोबाजूंनी बहरते. वाऱ्याची लयलूट. डोळे सुखावणारा रंग बहार...

'रंग मात्र फारच मधुर राणी रंगातली अगदी हलकी छटा. असू दे असू दे' निराशा लपवी माझे आभार.

अशी ही वसंती चाहूल भवतालच्या पक्षापानांना किती सहजपणे लागत असते ना. एका संध्याकाळी तीन वर्षांपूर्वीची माझी लाडकी विद्यार्थिनी आशा वेलीमोगरीच्या फुलांचा गजरा घेऊन येते. ती पायऱ्या चढत असतांनाचा मोगरीचा घनदाट दरवळ घरभर पसरतो.

'बाई , हा गजरा, तुमच्या लाडक्या फुलांचा आणि अंधार झाला की हे सुंगधी चांदणं पहाया या' असे सांगून जाते. मला रात्रीचे वेध लागतात. वेली मोगरा क्वचितच आढळतो. हे दोन वेल थेट वरच्या मजल्या पर्यंत पोचले आहेत. एकात एक गुंतलेली हिरव्या पानाची वलयदार नक्षी. फेब्रुवारीच्या मध्यातच लक्षलक्ष कळ्यांनी लखलखून जाते. चंद्र चढणीला लागला की अक्षरश: फुलांची झुलती झुंबरे लटकू लागतात. मनाच्या कोपऱ्यातून साठलेले सारे मळ नाहीसे करून निरामयतेच्या वाटेने नेणाऱ्या निर्मल मधुर गंधाच्या पुरात आपण बुडून जातो नव्हे वाहून जातो. आणि कवितेच्या ओळी आठवतात.

**मज नकळत कळते कळते**
**गंधातून गूढ उकलते.**

त्याच्या सर्वात्मक अस्तित्वाची साक्ष आपल्या तनामनामधून पसरते. दगडातील सगुण देव न दिसणाऱ्या माझ्या सारख्या अनेकांनाही...

कधी वेळेवर कधी उशिरा, पण लहरी पाऊस येतो. आणि कडक उन्हाने उदासलेल्या जुईच्या... सायलीच्या वेलींवरही पहाटेचा ताजवा खेळू लागतो. सायली जुईच्या वेलीवरही कोवळ्या उन्हात न्हाऊन आलेल्या सायीच्या पांढुरक्या रंगाच्या कळ्या रूमझुमू लागतात. घनघोर पावसात...उधाणत्या वाऱ्यात चिंब भिजत, झुलमझुलत हसत रहातात. जुईची पाने नाजुक, कळ्या... फुलेही नाजुक, इतकी की, श्वासभरून गंध घेतला तर कोमेजून जावीत अशी. दिवस उतरणीला लागला की ह्या वेलीच्या कळ्यांचे डोळे उमलू लागतात.

...आठवते ३८ वर्षापूर्वीची संध्याकाळ. फर्ग्यूसन महाविद्यालयाच्या आसपास राहणाऱ्या वसतीगृहातील आम्ही मुली लकडी पुलापर्यंत फिरायला म्हणून निघायचो भांडारकर रोडकडे जाणारा रस्ता सोडून पुढे आलो की जुईचे दुहेरी वळेसर विकणारी लहान मुले समोर गजरे नाचवीत चार आण्याला एक – रुपयाला पाच, ओरडू लागत. पण तेव्हां महिन्याला तीस रुपये जेवणाचे नि वीस रुपये वर खर्चाला अशी पन्नास रुपयांच्या मनीऑर्डरची वाट पहाणाऱ्या आम्हाला 'चार आणे' देणेही जड जाई.

थंडीचा काटा हवेतून बोचू लागला की वसतीगृहाच्या आवारातली बुचाची उंच उंच झाडे, लांब पुंगळीच्या दांडीवर चांदणी निवाऱ्याला यावी अशी पांढऱ्या रंगाच्या असंख्य फुला-कळ्यांच्या घोसांनी फुलून जात. पांनाचे पिसारे जणू मिटवून घेतलेले, या फुलांचा धुंद करणारा मधुरगंध, झाडांचा आभाळाला भिडायला धावणारा शेलाटा बांधा आणि चांदणी रूप पाहूनच की काय कविवर्य बा. भ. बोरकरांनी त्यांना आकाशमोगरी म्हटले असावे. या फुलांचा घनदाट सडा पडतो. तो वेचायला भवतालच्या मुली आणि आम्ही सकाळीच झाडाखाली गर्दी करत असू.

दसरा दिवाळीचे दिवस येत आणि चमेलीच्या मांडवावर फुलांचे थेंब उतरून बसू लागत. टपोरे फुल. पाकळीच्या पाठीवर लालम छटा, शारीरिक प्रेमाची धुंदी आठवून देणारा त्यांचा उन्मादक गंध तरूणाईला छेडणारा. तर याच काळात कुंद कळ्यांची गर्दी होई. मंद पवित्र गंधाने आसमंताला निरामयतेचा स्पर्श देणारी कुंदाची शुभ्र फुले.

मला तेव्हाही आणि आजही एक प्रश्न सतावतो. जाईजुई, मोगरा, चमेली, निशिगंध, कुंद ही सारीच सुगंधी फुले शुभ्रांकित का? पांढरा चाफा सुगंधी, अपवाद फक्त चांदणी फुलांचा. शुभ्रांकित निरामयता आणि ही सुगंधी फुले यांच्यात काही आंतरिक नाते असेल का?

आज माझ्या अंगणात आकाश मोगरीचा शेलाटा वृक्ष उभा आहे. चमेली, कुंद, निशिगंध सारीच झाडे वेली आहेत. दारात 'सायलीची वेलण' नखऱ्यात उभी आहे.

जुईलीची तर दोन झुडपे... बैठ्या पसरट वेली अंगणात आहेत. वेली फुलायला लागल्या की माझ्या नाती, लेकी, सुना गजरे गुंफतात. माझ्या समोर गजरा ठेवतात. तो माळायला आज डोक्यावर केस नाही पण त्या सुगंधाने पुन्हा माझ्या डोक्यावर कुरळ्या केसांची झालर झूलू लागते... आणि सुगंधाच्या वादळांत मी हरवून जाते.

❑

२६

# जणू देखणी कविताच ती...
# नेहमी मनात फिरणारी!!

चीनच्या जमिनीवर पाय ठेवले नि आमच्या आवाजातला जोश वाढला. घोषणांची नारेबाजी घुमवीत आम्ही चीनच्या शिस्तीत वाढलेल्या चौकटबंद विमानतळालाही गोड धक्का दिला. पिवळट गोऱ्या, मुखवटेवजा चेहऱ्यांच्या डोळ्यातून उत्सुकता... हसरेपणा... डोकावू लागला.

'इंडो?...इंडू? तुम्ही भारतातल्या का? ते हसरे डोळे विचारीत. चीनमधली जणू अखखी तरूणाई आमचं स्वागत करायला सज्ज झाली होते. दीड तासाचा बसप्रवास करून आम्ही हुअॅरोच्या स्वागतकक्षाजवळ उतरलो. संध्याकाळची वेळ. भव्य रस्ते. हिरव्यागार उंचच उंच झाडांनी आणि मंदप्रकाशी दिव्यांनी स्वागत करणारे. जिकडे तिकडे रंगी बेरंगी झुळझुळते थवे. गोरे... पिवळे... सावळे... काळे गुलाबी रंग एकमेकात मिसळणारे. अप्रतिम निवासव्यवस्थेची सुनिश्चिंती यांची कागदपत्रे होतीच. नोंदणी क्रमांकाचा शेवटचा आकडा पाहून त्या त्या नोंदणी कक्षापुढच्या ओळीत उभे राहण्याची सूचना दिली जात होते. आणि अक्षरश: अवघ्या काही मिनिटात आमची व्यवस्था केलेल्या ठिकाणचा पत्ता, आमचे नोंदणी 'मंगळसूत्र' जे आम्ही लगेच गळ्यात अडकवले आणि मार्गदर्शक सूचना पत्रके इत्यादींनी भरलेली सुरेख पिशवी घेऊन इमारतीच्या बाहेर पडलो. खिशाला परवडेल अशा सर्वात स्वस्तातल्या जागेत राहण्याचे आम्ही ठरवले होते. तिथेही आश्चर्याचा सुखद धक्का. तिथे डॉ. रूपा शहा आधीच

पोचली होती. चक्क तळमजल्यावरचा ब्लॉक हातात घेऊन टाकला होता. मी आपली सहामजले चढण्याची तयारी पूर्णपणे करून आल्याने टुणकन उडीच मारली. प्रत्येकीला नेमकेपणाने तयार केलेली साधी कॉट, स्वच्छ अंथरूण, पांघरूण. एक टॉवेल, सपाता टुथब्रश... छोटा टॉवेल यांची सुरेखशी भेट. चार खोल्यात आम्ही पाचजणी. चोवीस तास गरम नि गार पाण्याचा फवारा. सर्वात स्वस्तातली म्हणजे बारा दिवसांचे ८५० युआन... सुमारे साडेतीनहजार रुपये... अशी 'पंचतारांकित' सोय झाली होती. आमचं रहाण्याचे ठिकाण परिषदेच्या इमारतीपासून सुमारे मैलभर दूर असेल. ३० ऑगस्टला बीजिंगच्या अवाढव्य क्रीडासंकुलात परिषदेचा उद्‌घाटन समारंभ होता. २९ चा दिवस इकडे तिकडे भटकण्यासाठी आमच्या हातात होता.

२९ च्या सकाळी रात्री बसमधून अंदाजलेल्या रस्त्यावरून मुख्य स्थळाकडे चालत निघालो. मध्यात मोटारींचा रस्ता. दोन-तीन गाड्या समोरासमोरून ऐसपैस जाऊ शकतील एवढा. कॅनडा, अमेरिका किंवा जर्मनीमधले मोटारीचे रस्ते प्रचंड. एका दिशेने चार नि उलट्या दिशेने चार अशा मोटारी ऐसपैस धावतील तेवढेच मोठे रस्ते सायकलवाल्यांसाठी होते. त्यांच्या पलीकडे चालणाऱ्यांसाठीचा निरूंद रस्ता. हे सगळे रस्ते गुलाब फुलांच्या झुडपांनी आणि सूचिपर्णी जातीच्या वृक्षांनी आखलेले. आम्ही चौघी सायकलरस्ता अडवून गप्पाटप्पा मारीत चाललेलो. समोरून येणाऱ्या सायकलवाल्यांची काहीशी रूखी...रूखी नजर आधी लक्षात नाही आली नि मग एकदम दिवा लागला की आम्ही सायकलरस्त्यावर आक्रमण केलंय. दुसऱ्याक्षणी चीनच्या शिस्तीत फुटपाथवरून जायला लागलो. रस्त्याचे अंदाज बऱ्याचदा हुकतात. आम्ही पण चुकलो. नको तिथे वळलो. मग विचारणं...अजिजीकरणं आलं. पण इथे तीही पंचाईत. भाषा हे संवादाचं माध्यम असते. ते हरवले तर आपण चक्क हरवतो. याचा पहिला अनुभव. सामान्य चिनी माणूस इंग्रजीतला अ की ठ जाणत नाही. मग उपयोगी पडते ती खुणेची भाषा. पण तीही कुणाला समजेना. गळ्यातले परिषदेचे मंगळसुत्र काढून दाखवले तेही कोणाला समजेना. मग मात्र वैतागलो. इथल्या सुटाबुटातल्या दुकानातल्या माणसालाही या परिषदेचा पत्ता असू नये? आता मात्र चीनची भिंत दिसायला लागली. इतक्यात एका हॉस्पिटल सारख्या इमारतीच्या दरवाजातून बाहेर पडलेल्या काही विशिष्ट पोषाखातल्या स्त्रिया दिसल्या. मग तिथे धावलो. त्यातल्या एकीला चुटपुटू इंग्रजी येत होते. चायनी इंग्रजीच्या जंगलातून वाट काढीत चार पावले पुढे जाता आले. पण पुन्हा तिथंही अडकलो. तेवढयात दोन साऊथ अफ्रिकेच्या चुकलेल्या अवाढव्य बायका आम्हाला पाहून धावत आल्या. चारच्या आम्ही सहा झालो. मग पुन्हा पुढे पुढे चालत राहणे आणि अचानक समोरच्या दिशेने बायकांची धावती गर्दी दिसली. कळशी काखेतच होती. आम्ही स्वागत कक्षाच्या अंगणात पोहचलो होतो.

३० तारखेपासून प्रत्येक निवास्थानापासून दर दहा मिनिटांनी येण्या-जाण्यासाठी बसची सोय केली होती. ह्युअॅरो ते बीजिंगपर्यंत १५ दिवस येण्याजाण्यासाठी एक खास सवलत देणारे १० डॉलरचे तिकीट आम्ही खरीदले होते.

या चौथ्या जागतिक महिला परिषदेसाठी १९० देशातून तेहतीस हजार बायका, मोजके पुरूष प्रतिनिधी म्हणून आले होते. नैराबी परिषदेपेक्षा सहा पटीनं मोठा समुदाय जमला होता. ३० तारखेच्या सायंकाळी बीजिंगच्या अवाढव्य क्रीडा संकुलाच्या प्रांगणात उद्‌घाटन समारंभ होता. प्रत्येकीच्या नावाची वेगळी निमंत्रण पत्रिका. तिच्यावर तुम्ही कोणत्या दरवाज्यातून आत जायचे त्याचीही सूचना दिलेली. कोणत्या क्रमांकाच्या बसने जायचे नि यायचे त्याची खास सूचना दिलेली. १५ क्रमांकाच्या दरवाजातून मला आत जायचे होते. त्यापूर्वी क्ष-किरणांकीत तपासणी झालीच. साठ हजार प्रेक्षक बसण्याची सोय असलेले ते लंबगोलाकृती सभागृह विविध राष्ट्रीय पोषाखातील स्त्रियांनी आकंठ भरले होते. मणिपूरच्या छोबीदेवीनं प्रेमानं गळ्यात घातलेल्या मणीपुरी पोषाखात मीही कधीतरी अनुभवता येणार आगळा अनुभव घ्यायला उत्सुक होते.

...सारे नजरेचे आणि कानांचे पांग फेडणारे. आयरिन सॅटिअॅगो यांनी उद्‌घाटन समारोहाची सुरूवात स्वागताने केली. त्या चौथ्या महिला परिषद : बीजिंग ९५ एन.जी.ओ. फोरमच्या कार्यकारी व्यवस्थापिका होत्या. स्वागत गीत शेकडो जणींच्या सुरील्या आवाजात... शेकडो वाद्यांच्या स्वरसंगमात न्हाऊन निघाले-

Godess of joy is holy and pure
And the good earth is bathed
In the brilliance of sun

**हे देवी आनंदिनी,**
**असती निरंतर**
**पवित्र आणि केवळ निर्मल**
**निष्कलंकिनी**
**धरा नाहते**
**रविकिरणांच्या प्रज्ञाकिरणी...**
**आज या क्षणी!!**
**हात उभारून दोन्ही**
**आम्ही स्वागत करतो**
**भावस्वरांनी**
**कुंभ घेऊनी**

**दहा दिशातुन आल्या येथे**
**संवादी मैत्रिणी...**

स्वागताचे गीत, मग समूह नृत्य. त्यानंतर पीपल्स रिपब्लिक ऑफ चीनच्या स्टॅंडींग कमिटी व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा आणि चीनच्या महिला फेडरेशनच्या अध्यक्षा चेन महुआ हिने सर्व महिलांचे स्वागत केले. त्यानंतर या परिषदेची सचिव गुर्टुड मोंगेला, दुसऱ्या परिषदेची सचिव ल्यूसी मेऊर, ८५ नैराबी परिषदेची संयोजिका डेमनिता बॅरो या पूर्व परिषदांच्या संयोजकांनी या परिषदेला हार्दिक शुभेच्छा दिल्या. बीजिंग, ९५ च्या कनव्हेनर... संयोजिका खोनसिंग सुपात्रा मसदिन हिंने सर्वांचे स्वागत करून या परिषदेची भूमिका सांगून नांदीभाष्य केले आणि शांतीज्योत स्विकारली. त्यानंतर पॅट हॅम्फ्रीजने रचलेले

**पुढे चला पुढे चला**
**न थांबता**
**न हुमसता**
**शांतीच्या दिशेने**
**चालत रहा चालत रहा...**

किप ऑन मुव्हिंग फॉरवर्ड हे गीत गायले गेले. हजारोंनी आपला स्वर त्यात मिसळला. एक प्रचंड फुगा...हेलीकॉप्टर, ज्यावर समता...प्रगती...शांती हे घोषशब्द झगमगत होते, अवकाशात फिरू लागले. विविध देशांतल्या...विविध धर्मांच्या...विविध रंगांच्या...विविध वंशाच्या स्त्रिया. पण साऱ्याच स्त्रीत्वाने जोडलेल्या, साऱ्या जणींचे पाय जमिनीवर पण झेप मात्र मुक्त अवकाशाकडे. जागतिक समा... समृद्धी आणि शांतीकडे. याचं प्रतीक असलेली खूण जणू एक उत्फुल्ल विश्वकुसुम. प्रत्येकी पाकळी म्हणजे आकाशदिशेने झेपावणारी स्त्री. पण प्रत्येकीचा केन्द्रबिंदू स्त्रीत्वाचा. या प्रतीकाचा प्रचंड पडदा अनेकींनी नृत्य करीत प्रांगणात आणला आणि क्षणार्धात तो अवकाशात झेपावू लागला. टाळ्याच्या कडकडात उद्घाटन झालं. हजारो चिनी कलाकारांनी...तरूण, बाल, स्त्री, पुरूष कलाकारांनी, चिनी लोककलेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाचे नाव होते 'एनजीओज इन बीजिंग : ए चायनीज कल्चरल एक्स्ट्रॉ व्हॅगंझा' एनजीओ परिषदेला समर्पित केलेली डोळ्यांना विलक्षण आनंद देणारी, कल्पनारम्य, देखणी कविताच ती जणू! नेहमीच आठवणारी.

❑

२९

# बीजिंगने दिलेला मंत्र रूजतोय का समाजात?

२७ ऑगस्ट १९९५ ची संध्याकाळ. अगदी बावरलेली गोंधळलेली. भारतातील चारशे-साडेचारशे महिला कार्यकर्त्या बीजिंगच्या दिशेचा ध्यास घेऊन, गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीच्या रस्त्याने रिक्षा वा टॅक्सीतून धावताहेत. मर्क्युरी ट्रॅव्हल्सची वीणा विश्वानाथन् अनेकींच्या ओठांवर नाचतेय नि साऱ्याजणी कॅनॉटप्लेस परिसरातील त्यांच्या कार्यालयाभोवती अक्षरश: भिरभिरताहेत. त्यात मीही आहे.

'म्हारो तो थई गयो... दो बेननो होटल कन्फर्मेशन आव्यो नथी अे...' 'कस्तुरीका पासपोर्ट आज मिलेगा शायद...'

'हेमा तर वैतागलीय. धावाधाव तरी किती करावी? तरी तिचा नवरा खूप मदत करतोय...'

अशा अनेकविध उद्‌गारांचे थवे भवताली. महाराष्ट्रातल्या विद्या, हेमा, आशाअपराद, ज्येष्ठ भगिनी मेहरून्निसा दलवाई यांचा रजिस्ट्रेशन नंबर मिळाला. पण चीनमध्ये राहण्याच्या जागेची निश्चिती कळलेली नाही. हॉटेल कन्फर्मेशनं पत्र मिळालेलं नाही त्यात २६ ला शनिवार नि २७ ला रविवार. दोन दिवस चायना एम्बसी बंद. मग वावड्यांची वावटळ.

छत्तीसगडमधील खेड्यात काम करणारी, सुरेख ढोलक वाजवणारी विशीतली कस्तुरी आशेनं प्रश्न विचारते.

''दिदी, चायनीज एम्बसीत फॅक्स येऊन पडलेत म्हणे. माझं नाव त्यात असेलच नाही का?''

या प्रश्नानेही डोळे भरून येतात माझे. वाटतं बीजिंगला जाण्यातला उन्मुक्त आनंद कुठेतरी दुखावलाय.

शब्दांचा पोकळपणा... वाळलेपण अगदी आतून जाणवतो. बीजिंगच्या दिशेनं जाण्याची ओतप्रोत तयारी करून आलेल्या, परदेशवारीचा आगळा आनंद, ऊर भरून घेण्याच्या उत्सुकतेनं बहरलेल्या या मैत्रिणींना, आम्ही आमची सहानभूती शब्दातून... डोळ्यातून...हात दाबून दिली, तर त्याच्या उरातलं वादळ शांत का होणार होतं?

...तर या मैत्रिणींना दिल्लीत ठेवून २७ च्या रात्री आम्ही अनेकजणींनी दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळ अक्षरश: ताब्यात घेतला. ओढणी...घागरा नि चांदीचे दागिने घातलेल्या राजस्थानी मैत्रिणी. भवरीबाई...नोरती. शरारा घातलेली अहमदबादची राबिया. शेकडोजणी. त्यातील दोन पाच अनुभवी बाकीच्या आम्ही 'नवशा'च. ते दृश्य पाहत असतांना मला मीराबाईचं भजन आठवलं. युनिफेम इंडियाने २६-२७ ला बीजिंग तयारीची कार्यशाळा घेतली होती. त्याची सुरूवात विद्या राव यांनी त्या भजनाने केली होती. विद्या रावचा सूर... साक्षात मीरा गातेय असा भास. ऐकतांना आपणही 'मीरा'! मीरा म्हणते... मी त्या न पाहिलेल्या देशाला चाललेय. अंगात 'धीरज का गागरा' पहेनलाय आणि अंगभर 'सच की ओढनी' पांघरलीय. तो न पाहिलेला देश. मला नक्कीच गवसेल. या भजनाचा अर्थ सांगत होती कमला भसीन.

**तू खुदको बदल... तू खुदको बदल**
**तबही जो जमाना बदलेगा...**

असे अगदी खेड्यातल्या बाईच्या कानात विश्वासाने सांगणारी कमला.

''...गेल्या काही वर्षात आपण खूप काही शिकलो आहोत. रडणं फेकून दिलंय आपण. तरीही एकत्र येऊन 'बीजिंग' च्या न पाहिलेल्या रस्त्याने आपल्याला जायचं आहे. समता-प्रगती-शांतीचा नवा प्रदेश शोधायला आहे...''

आणि याच वेळी माझ्या पलीकडे काही तामिळी नि केरळी भगिनी एकीमेकींशी तामिळ व इंग्रजीत बोलत होत्या. आमच्या कन्नड मैत्रिणींना ते सारं समजत होतं. त्यात त्याही सामील झाल्या. पण आम्ही मराठी. गुजराथी मैत्रिणी मात्र निर्विकार नजरेनी ते दुरून न्याहाळत होतो...

तर दिल्ली विमानतळ भारतीय भगिनींच्या ताब्यात. अरूणाचलची जाजो... मणिपूरची छोबीदेवी... हरियाणाची शशी. तामिळनाडूची अमल. अवघा भारत भाषा वेशभूषेसह विमानतळावर उसळलेला. अचानक चिपको चंपाबेन आवाज देते.

हम सब एक है।

दुसऱ्या क्षणी 'हम होंगे कामयाब' नि We shall over come चे सूर घुमायला लागतात.

...२८ ची पहाट, रात्रीचाच एक वाजलेला. थायी विमानाने भारताची जमीन सोडली. एकशे पासष्ट जणी बँकॉकच्या दिशेने उडू लागल्या. बँकॉकच्या घड्याळ भारताच्या दीड तास पुढे आहे. तिथल्या वेळेनुसार आम्ही सकाळी पाच वाजता तिथे पोचणार होतो.

बँकॉकचा आंतरराष्ट्रीय विमानतळ जणु दहा हजार वस्तीचं गावच. एवढा प्रचंड मोठा. त्या झकपक विमानतळाला आम्ही चक्क 'यस्टी स्टॅन्ड' बनवला. करणार काय? दुपारी दोन वाजता पुढचं विमान सुटणार होतं. ऐवढा वेळ हाताची घडी आणि तोंडावर बोट अशी गुप्पचळी कशी जमणार? शिवाय पाय पसरल्याशिवाय थकवा कसा जावा? मग काय भिंतीच्या कडेकडेनी कितीतरी जणी बॅगा उशाशी घेऊन सुस्तावल्या. मग कुणीतरी चिवड्याचा पुडा मोकळा केला. गप्पांना रंग चढला. मग पुन्हा एकदा क्ष-किरणांकित दरवाजातून जाणे, पोटाशी बांधलेल्या चंचीतला पासपोर्ट चाचपडत विमानात चढणे वगैरे.

...आता मात्र बीजिंग जवळ आले होते. माझ्या अल्याड राजस्थानची नोरती. नवरात्रीचं हे बोलीभाषी रूप... बसलेली. मागे जिनी श्रीवास्तव या भारतात स्थायिक झालेल्या ग्रामीण परिसरात महिला संघटन करणाऱ्या कार्यकर्तीसोबत आलेल्या चौघी खेड्यात काम करणाऱ्या, इंग्रजीचा ठसका न लागलेल्या साध्यासुध्या 'लुगाया'-बायका. मला मनोमन हळहळ वाटली, की आमची एखादी सखूमाय न्हाईतर हमिदाक्का का नाही या जमावात? एकतर सगळी घोडी पाण्यापाशी म्हणजे. पैशापाशी अडणार. स्वत:साठी मदत गोळा करण्यात आमच्यासारखे हौशे... नवशे बेज़ार. मग अशा तळागाळातल्या मैतरणीची आठवण कशी व्हावी? एक मात्र वाटलं की, कोऑर्डिनेशन युनिट... मध्यवर्ती समन्वय समितीने प्रतिनिधी निवडीची आखणी करतांना किमान २/३ अशा कार्यकर्त्यांची निवड करण्याची भूमिका घ्यायला हवी होती. निदान पुढच्या वेळी तरी..!!

विद्याताई बाळ, छाया दातार यांच्या लेखांतून 'डॉन डॉक्युमेंट'... नैरोबीच्या जागतिक महिला परिषदेत उगवलेली, स्त्रीच्या माणूसपणाचे नैसर्गिक सत्य जगाला ठणकावून सांगणारी पहाट आमच्यापर्यंत पोचली होती. हे जरी खरे असले तरी ती जागतिक महिला परिषद गावातील गल्लीबोळात वा खेड्यापांड्यात पोचली नव्हती. स्त्रीच्या माणूसपणाचा एहसास... विश्वास शेवटच्या स्त्रीपर्यंत पोहचलेला नव्हता. पण बीजिंग परिषद मात्र गेल्या दोन वर्षापासून गाजतेय. जाणीवपूर्वक ती खेड्यातील, तळागाळातील सामान्य स्त्रीच्या प्रश्नांपर्यंत भिडवण्याचा प्रयत्न अनेक महिला संघटनांनी केला. जिल्हावार... विभागवार नियोजन केले गेले शेती आणि स्त्रिया, स्त्रीया आणि उद्योजकता, स्त्रिया आणि माध्यमे, स्त्रियांचे आरोग्य, स्त्रीचा निर्णय प्रक्रियेत सहभाग इत्यादी अनेक विषयांवर परिसंवाद आयोजित केले गेले. सामान्य स्त्रिला बोलते करून, तिला नेमके काय हवं आहे त्याची दिशाही शोधली गेली. हे केवळ महाराष्ट्रात नाही तर संपूर्ण भारतभर घडत होते.

ते बीजिंगमय दिवस आज १२ वर्षांनी विचारताहेत. स्त्रियांच्या नैसर्गिक माणूसपणाचा विश्वास, आपण कृती, कायदेबद्दल यांच्या द्वारे रूजवतोय ना समाजात? हो नक्कीच करतोय. लैंगिक शोषणा विरूद्धचा 'विशाखा' कायदा २००५ चा स्त्रियांवर कुटुंबांतर्गत होणाऱ्या अन्यायाची दखल घेणारा कायदा शिवाय स्त्रियांना विविध कायद्यांची माहिती देणारी खेड्यातून होणारी शिबीरे तसेच मेळावे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर घेणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्था...

होय बीजिंगमध्ये अवकाशात अवघ्या जगातील महिलांनी उंचावलेला स्त्रीच्या माणूसपणांचा विश्वास जमिनीत रूजतोय साध्यासुध्या स्त्रीच्या मनांतून अंकुरतोय...

❑

## १८

# सूर्यकिरण पहिले पाऊल टेकते ते अरूणाचल

घनदाट हिरव्याकंच झाडांच्या मध्यातून आमच्या चार सुमो आणि एक मिनीबस सुसाट वेगाने धावत होत्या. खरे तर घड्याळाच्या काट्याने नुकतीच साडेचारची रेषा ओलांडलीय. पण भवतालच्या झाडांच्या सावल्या गर्द होत जाणाऱ्या. पहाता पहाता झाडं आणि सावल्या अंधारात बुडून गेल्या. मधूनच एखादे गाव... खेडेच म्हणाना पार होई. पाऊस झेलणाऱ्या उतरत्या झोपड्या. आत एखादाच मिणमिणता दिवा. गोहाटी सोडून दोन तास उलटून गेले होते. काकडवणारी थंडी गाडीच्या काचेला न जुमानता आत येत होती. आता बहुदा डोंगरपहाडातून आमचा प्रवास सुरू झाला असावा. मधूनच धडडम्... खडड्म असा आवाज येई, पत्र्यावरून दणाणा पळत जावे तसा. कर्कश... काटेरी. मग मनात भीती. उल्फा, नागा वगैरेंची.

पंधरा दिवसांपूर्वी शारदाचा मुंबईहून फोन आला होता. की नावो-नॅशनल अलायन्स ऑफ विमेन्स ऑर्गनायझेशनची बैठक अरूणाचलला आहे. परवापर्यन्त माझे तिकिट काढण्याबद्दल कळवायचे होते. बैठक इटानगरला होती. फोन ऐकताच मी मनातल्या मनात टुण्कन उडी मारली. हो, पासष्टी पार केली तरी! माझी आजी मला "हिंडणभंवरी" म्हणायची तर, "पायाला चाकं बांधून घे" असे आई म्हणे. प्रवासाची हौस माझ्या रक्तात भिनलीये!

...सकाळी सातला इमायनातला पट्टा कमरेभोवती आवळला. तो सोडत, पुन्हा बांधत दुपारी दोन वाजता कलकत्ता मार्गे गोहाटीला सुखरूपपणी उतरलो. चेन्नई,

हैद्राबाद, राजस्थान, नागपूर, गुजराथ, अमृतसर इत्यादी प्रान्तातून... शहरातून वीस जणी आल्या होत्याच. त्यात आमची भर.

गोहाटीतून सुमोतून चढता प्रवास. भारताच्या ईशान्येकडे... अति पूर्वोत्तरेकडे जिथे उगवत्या अरूणाची पहिली किरणे झेलली जातात त्या हिमालयाच्या पठारावरच्या प्रदेशाकडे...अरूणाचलकडे आम्ही सुसाटलो होतो. गच्चकन् सुमो थांबली. रात्रीचे बारा वाजून गेले होते. आम्ही इटानगरमध्ये होतो.

खोलीत हीटर होते. अंगात गरम कपडे. तरीही दुलई, ब्लँकेटमधून बाहेर येण्यास मन धजावत नव्हते. पण साडेनऊला विवेकानंद केन्द्रात बैठक सुरू होणार होती. सकाळी नऊ वाजता रस्त्यावर उतरलो. भवताली निरभ्र प्रकाश. रस्त्यावरून येणारी जाणारी चपट्या नाकाची. चिमण्या डोळ्यांची पिवळसर गोऱ्या रंगाची हसरी माणसे वावरत होती. आसाममध्ये स्त्रिया कमरेला लुंगीसारखे वस्त्र गुंडाळतात. त्याला मेखला म्हणतात. येथील महिलांच्या अंगावर मेखलाच होत्या. त्या सुतीच होत्या. परंतु त्यांची वीण अधिक घट्ट, दुहेरी होती. अरूणाचल जंगलांनी विविध प्रकारच्या वनस्पतींनी समृद्ध असलेला, हजारो वर्षांपासून विविध भाषा बोलणाऱ्या सुमारे २९ अदिवासी जमातींचा, ३१ हजार चौरस मैलांचा हिमालयातला डोंगराळ प्रदेश आहे. पूर्वी काही आदिवासी जमाती 'हेड हंटर्स' होत्या असे म्हटले जाते. परंतु अदिवासी नसलेल्या, शिक्षित... अभ्यास करणाऱ्या व त्यांच्याशी मित्रत्व, भारतीयत्वाचे नाते जोडण्यास गेलेल्या लोकांनी त्यांच्याशी प्रेमाचे नाते बांधले. मग कळले की या जमातींवर आक्रमणे सतत होत असत. युद्ध हे नित्याचे बनले. शत्रूला मारणे म्हणजे विजय. स्वतःच्या विजयाची गाथा, मारलेल्यांची मुंडकी, कवट्या ओळीने लावून, जमवून निरक्षर आदिवासींचे पूर्वज लिहित. आज ते इतिहासात जमा झाले आहे.

...तर काय या आदिवासींचे वनस्पतीबद्दलचे अनुभवाधारित ज्ञान विपुल, विशाल आहे. वनस्पतींपासून तयार केलेल्या रंगांनी रंगलेले यांचे कपडे. फाटले तरी रंगांची चमक जिवंत ठेवणारे असतात.

...भाकरी हाच भुकेल्यांचा परमेश्वर असतो हे सांगणाऱ्या स्वामी विवेकानंदांच्या 'हिंदू' या शब्दातील विशाल आणि सखोल व माननीय भूमिकेवर नितान्त निष्ठा असणाऱ्यांनी पस्तिस वर्षांपूर्वी या प्रदेशात शिक्षणाच्या माध्यमातून सांस्कृतिक एकात्मतेचा ध्यास... अभ्यासाची भूमिका घेऊन पाय रोवले. एकनाथजी रानडेंनी विवेकानंदांचे कन्याकुमारीतील स्मारक ज्या ठिकाणी त्यांना एकात्म भारतीयत्वाची मनोभूत... अंगभूत जाणीव झाली तेथे उभारले आहे. भारताचे उत्तरेचे टोक, पहिली

सूर्यकिरणे ज्या पर्वतराजीवर पावले टेकतात तो अरूणाचल. म्हणून येथे काम सुरू केले. आज संपूर्ण अरूणाचल विवेकानंद केन्द्रे, रामकृष्ण मिशन, माँ शारदा मिशनच्या मुलामुलींच्या शाळांनी व्यापलेला आहे.

...तर त्या मेखलेवर येथील महिला पाठपोट झाकणारे लांब रंगीत पोलके घालतात. त्यावर सुरेख जॅकेट असते. केसांचा अंबाडा आणि त्यावर डोके झाकणारा रेशमी रूमाल बांधलेला. पुरूषांच्या पोषाखात विजार आली. पण भारतातील स्त्रियांच्या पोषाखातील विविधता अजूनही जोपासलेली आहे. तिचे नाते त्या परिसरातल्या निसर्गाशी आहे.

या वेशातली जॉर्जुम एत्ते गेल्या १५/२० वर्षांपासून आम्हाला भेटते. स्त्रियांचे 'माणूसपण' समाजाने समजून घेऊन मान्य करावे, यासाठी नम्रपणे संघर्ष करणाऱ्या संघटनांच्या राष्ट्रीय बैठकींत ती असतेच. यावेळी 'नावो' ची बैठक तिने आयोजित केली. म्हणून ही संधी.

भारताचे रक्षण करणाऱ्या ईशान्य सीमेवरच्या सप्तभगिनी –सेव्हन सिस्टर्स पैकी एक अरुणाचल. याच्या चार सीमा चीन, भूतान, तिबेट, म्यानमार ऊर्फ ब्रम्हदेशाशी जोडलेल्या. तर दक्षिणेकडे आसाम, नागालँड हे भारतीय प्रदेश. इथे पावसाची सरासरी चाळिस ते दोनशे इंच. उंचावरून उड्या घेत थरार धावणाऱ्या नद्या, घनदाट जांभुळ हिरवी अरण्ये. अरुणाचल चे देखणे निसर्ग सौंदर्य डोळ्यांना तहानलेले ठेवणारे. दुसऱ्या दिवशीची बैठक 'झिरो' नावाच्या दक्षिण सुबनसरी जिल्ह्यातील आपातानी पठारावर वसलेल्या अगदी गोंडस, चिमुकल्या गावात होती. तिथे अरुणाचलमधील महिला येणार होत्या. त्यांचे प्रश्न मांडणार होत्या. पहाटे सहाला निघायचे होते. खरा अरुणाचल येत्या दोन दिवसांत डोळे भरून पहायचा होता. दोन दिवस कमीच होते.

❑

२९

# सात बहिणींच्या तनामनापर्यन्त...

आता आम्ही 'झीरो' या शहरवजा गावाकडे निघालो होतो. झीरोला जातांनाही आसामला जावेच लागते. नॉर्थ ईस्ट म्हणजे नैऋत्य दिशेच्या भारतीय सीमांचे रक्षण करणाऱ्या सातबहिणी-सेव्हन सिस्टर्स फार मोलाच्या आहेत. अरुणाचल, मिझोरम, नागालँड, मेघालय, मणीपूर, त्रिपुरा आणि आसाम या त्या बहिणी, आसामला तर 'पाम ऑफ द नॉर्थ ईस्ट' नैऋत्यचा तळवा असे म्हणतात. अरुणाचल हे सर्वात वरचे...नैऋत्येचे टोक. सीमे पल्याड महाकाय चायना... चीन आहे. पश्चिम टोकाकडे तिबेट आहे. कामेंग, तावांग जिल्ह्यांना जोडून भूतान आहे. आणि पश्चिमेकडच्या तिरप, चँगलँग जिल्ह्यांना म्यानमार उर्फ ब्रह्मदेशाची सीमा जुळलेली आहे. म्हणजे अरुणाचलच्या सीमा चार परकीय राष्ट्रांशी लगटून आहेत. सततची आक्रमणे, लढाया हा हजारोवर्षांचा परिपाठ अरुणाचलातील विविध भाषी आदिवासी जमातींनी सोसला आहे. त्यांना 'हेड हंटर्स' म्हणणे हा त्यांनी शौर्याने केलेल्या सीमारक्षणाचा अधिक्षेपच होईल.

अरुणाचलचे जिल्हे म्हणजे हाताची बोटे. कोणत्याही एका बोटाकडून दुसऱ्याकडे जायचे तर तळ्यावर उतरावेच लागते. पूर्वी पाच जिल्हे होते. आता ती संख्या तेरावर पोचली आहे. या सात बहिणींच्या जीवनरीतीतही खूप सारखेपणा आहे. प्रत्येक घरात वजनाने हलका हातमाग असणारच. प्रत्येकाला वस्त्र विणता येते. त्यातही स्त्रिया विशेष निपुण. पाऊस चाळीस ते अडिचशे इंचापर्यन्त कोसळणारा. त्यामुळे घनदाट जंगलांचा प्रदेश. तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पतींनी आंगोपांगी बहरलेले डोंगर. नजर टाकावी तिथे झरे, पाणी...वेगाने धावत, उड्या घेत उताराकडे झेपावणारे.

आदिवासींच्या जमाती गटागटाने राहणाऱ्या. मग त्यांची भाषा, जमातीचे नांव वेगळे. पण घरे, पोषाख यांत नितान्त सारखेपणा.

झीरो हे आपातनी पठारावरचे, लोअर सुबनसरी जिल्ह्याचे महत्त्वाचे गाव. इटानगर ही राजधानी नेहरलॅगून या जिल्ह्यात येते. झीरोला जातांना जंगलांच्या मध्यात, डोंगर माथ्यावर, उतारावर रहाणाऱ्या आदिवासींची घरे दिसली, लाकूड आणि बांबूचा, झुलती घरे बांधण्यासाठी खूप छान उपयोग करून घेतला आहे. झाडांचे बुंधे, दणकट बांबूचे पुंजके जमिनीत रोवून, त्यांच्या आधाराने जमिनीपासून आठ दहा फूट उंचावर, उतरत्या छपरांच्या झोपड्या बांधून लोक रहातात. जंगलाच्या मध्यात चिखल, वाहणारे पाणी, सरपटणारे प्राणी या पासून रक्षण करणारी ही चिमुकली घरे. वर जायला शिडी. अर्थात अशी घरे शहरात नाहीत.

चढणीचा पहाडी रस्ता, भवताली अगदी... अगदी घनगर्द झाडी. गहूभर पुढे आणि तिळभर मागे असे करीत डोंगर चढायचा. आलो एकदांचे माथ्यावर असे म्हणून निःश्वास टाकावा तर पुढे अधिक उंच डोंगर दत्त म्हणून पुढे उभा ठाकलेला. उंच उंच कडे एकापुढे एक उभे. दुसऱ्या कड्यावर जायचे तर डोंगर उतरून परत चढणे अशक्यच. अनेक ठिकाणी दोन कड्यांमध्ये लोखंडाच्या जाड, रूंद, भक्कम पत्र्यांचे पूल टाकलेले आहेत. सतत पस्तीस... पंचवीस अंशाच्या कोनातून वळणाऱ्या अरूंद रस्त्यांवरून आणि लोखंडी पत्र्यांच्या पुलावरून मोठ्या बसेस जाणे अशक्यच. अरुणाचलमध्ये सुमो, ट्रॅक्स अशा गाड्या प्रवाशांसाठी असतात. पुलावरून जातांना येणारा कर्कश असा खड्डम आवाज. कालच्या झोपेत ऐकलेल्या आवाजाचे रहस्य झीरोकडे जातांना उलगडले. आणि खोल खोल दरीतून दगड गोट्यांतून फेसाळत वाहणाऱ्या बेधुंद झऱ्यांनाही अनुभवले. ते रस्ते, ते पूल, पर्वतरांगाची डोळे फिरवणारी उंची, हिरवाईच्या लाखो छटा, फुलांचे तऱ्हेतऱ्हेचे रंग, कुठे हिरव्यात जांभुळी नाहीतर उगवतीची लाल रेशमी छटा. तर कुठे पिवळ्यावर हिरवा मुलामा द्यावा अशा रंगाची, दुरूनही जाड आणि घट्ट पोत जाणवावा, अशा पानांची झाडे. उत्तुंग वृक्षांचे गगनभेदी जंगल एका कडेला आणि दुसऱ्याकडे पिवळ्या.. निळ्या.. लालगुलाबी रेशीम फुलांची बेटे. वसती आली की बांबूच्या झोपड्या लागत. पाठीवरचे ओझे सहजपणे वागवीत चढ उतारावरून वावरणाऱ्या स्त्रिया, भाताच्या शेतीचे उतरते तुकडे, दिसू लागले की समजावे गांव आले. सततच्या साडेतीन चार तासांच्या चढणीच्या प्रवासानंतर 'झीरो' आले. थंडी आणखीनच वाढली. अरुणाचलमध्ये प्रत्येक जिल्ह्यात विवेकानंद केन्द्र आहेच. रामकृष्ण मिशनच्या मुलांच्या आणि माँ शारदा मिशनच्या मुलींच्या शाळा, इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. केन्द्राच्या विशाल हॉलमध्ये बैठक होती.

आसपासच्या वस्त्यांमधून सुमारे साठसत्तर महिला आल्या होत्या. पंजाबी ड्रेस, साडीत फक्त आम्हीच होतो. या भागात मातृसत्ता अजूनही आहे. अनेक एकाकी महिला मुलांसह आल्या होत्या. नागा बंडखोर, उल्फा, बॉर्डर सिक्युरिटीचे जवान यांच्याशी झालेल्या चकमकींमध्ये पुष्कळदा पुरूष मारले जातात. परंतु स्त्रिया कष्ट करून मुलांना वाढवतात. असे चौकशीअंती कळले. परित्यक्तांचा प्रश्न इथे नसावा. कारण वयात आलेली स्त्री घरावर बोझ.. बोजा बनत नाही. शेती, बांबूपासून बनवलेल्या कलात्मक वस्तू, वस्त्र विणणे यांत ती वाकूबगार बनते. या प्रदेशात हिंडतांना मला दोन गोष्टींची आठवण आली.

अंबाजोगाईचे ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले होते. त्रिपुरा, नागालँड, अंदमान निकोबार वगैरे भारतीय प्रदेशातील विद्यार्थ्यांसाठी काही जागा राखीव असत. माझ्या मुलांबरोबर ही मुले घरी येत. नवरात्रात एक दिवस आमच्या छोट्याशा गावातील परप्रान्तीय मुलांना अल्पोहारासाठी मी बोलावत असे. तो होतकरू डॉक्टर नागालँडचा होता. आपले भारतीयत्व यावर गप्पा सुरू होत्या. या भावी डॉक्टरने, आपल्या पाणीदार चिमुकल्या डोळ्यात गंभीर भाव आणीत सांगितले होते. "माफ करा. मी प्रथम ख्रिश्चन आणि मग भारतीय आहे. माझे पणजोबांचे आजोबा माणसाची शिकार करून, भाजून मांस खात...ख्रिश्चन मिशनरीजनी स्वत:च्या प्राणांची पर्वा न करता, अनेकांनी मरण स्वीकारून आम्हाला माणसांत आणले. हे सारे भलेही धर्मप्रचारासाठी असेल!! पण आज आम्ही त्यांच्यामुळेच माणूस म्हणून जगत आहोत."

...दुसरी आठवण मणिपूरच्या छोबी देवीची. १९९५ च्या आंतरराष्ट्रीय बीजिंग महिला परिषदेत सादर करावयाच्या संगीतिकेची तालिम दिल्लीत सुरू होती. प्रत्येक प्रांतातल्या एकदोन अशा कार्यकर्त्या त्यासाठी दिल्लीत जमल्या होत्या. त्यात मणिपूरची छोबी देवी होती. ती नुपी समाज महिला पाईपीची अध्यक्षा होती. ती इम्फाळहून आली होती. त्यांची समस्या अशीच. नक्षलवादी, समजून अनेक तरूणांना बॉर्डर सिक्युरिटीचे पोलिस घरात येऊन पकडून नेतात. गोळ्या घालून ठार मारतात. त्या विरूद्ध या महिला पाइपी लढत होत्या. मणिपुरी नृत्याची आगळी परंपरा आहे. महाभारतातील अर्जुनाची पत्नी चित्रांगदा मणिपूरची राजकन्या होती...भारतीयत्वाच्या अतिप्राचीन खूणा आजही नैऋत्येत जाणवतात.

भारतीय स्वातंत्र्य साठवर्षाचे होते आहे. त्या सात चिमण्या बहिणींच्या हृदय मनापर्यन्त पोचण्याचे प्रयत्न केवळ शासकीय पातळीवरून करून चालणार आहे?असा प्रश्न मनात येतच राहतो...

❑

३०

# समुद्र आणि समुद्र...

सेंट जॉनचा किनारा. दिवसभलेही मे महिन्यातले असले तरी संध्याकाळीही काकडवणारी थंडी होती. न्यू फाऊंडलंड हा उत्तर कॅनडातला चिमुकला प्रांत. अटलांटिक महासागरातील भरतीच्या लाटांत अंग भिजवून नव्या समुद्राचे वेगळेपण अनुभवीत होते. इतक्यात 'मावशी शार्क..' अशी मधुश्रीने साद घातली. प्रचंड आवाढव्य असे माशाच्या आकारचे धूड वेलांटी उडी घेत क्षणभर पाण्याबाहेर हवेत उडून परत समुद्रात गडप झाले. सात वर्षात मधुश्रीला सेंटजॉनमध्ये राहून शार्कचे दर्शन झाले नव्हते. मला ते अनोखे अभूतपूर्व दर्शन पहिल्या दिवशीच झाले. अटलांटिक महासागराची ओळख पक्की झाली.

सेंटजॉन हे मासेमारीचा व्यवसाय करणारे शहर, अटलांटिक महासागरात पाय सोडून निवान्तपणे बसले आहे. इंग्लंडच्या मार्कोनीने पहिला ट्रान्सअॅटलांटिक संदेश इथेच पाठविला होता. या देखण्या शहराच्या किनाऱ्यावर कॉड माशांची भरपूर पैदास होत असे. या शहराजवळच पेटी हर्बर नावाचे चिमुकले खेडे आहे. गेली तीन साडेतीनशे वर्षे हे खेडे याच व्यवसायावर जगते. प्रत्येक घरासमोर रंगीतबोट बांधलेली असते. पुरूष ऊफाळत्या सागरात बोटी फेकून चंदेरी माशांची दौलत घरी आणतात. त्यांची साफसफाई, काटे काढून, त्यावर प्रक्रिया करण्याचे काम त्यांच्या घरधनिणी करतात. उधाणलेल्या सागरातून घरधनी सुखरूपणे परत येण्याची वाट पहाणाऱ्या त्यांच्या राण्यांनी एक उमाठ्याची जागा निवडली होती. तिला 'सी लुक आऊट'... दूरवरचा

समुद्र न्याहाळता येतो असे ठिकाण म्हणतात. आम्ही ते आवर्जुन पाहिले. चढती संध्याकाळी. मला त्या कोळिर्णींचे आतुर डोळे, कातर मन दिसलेच. अन् लता दिर्दीचे सूर आठवले–

**माझ्या सारंगा.. राजा सारंगा**
**डोलकरा रं.. धाकल्या दिरा रं**
**चल जाऊया घरा...**

व्यवसायाशी जोडलेल्या वेदना.. भावना कुठेही गेलात तरी सारख्याच ना?

...१९९३ च्या भूकंपात सकाळी नऊलाच मानवलोकचे कार्यकर्ते मूव्ही कॅमेरा घेऊन किल्लारीत पोचले. पहिला फोन डॉ. जगन्नाथ वार्णीचा कॅलगरी – कॅनडातून आला. मग फोनच फोन. मानवलोकच्या माध्यमातून जो निधी जमा झाला त्याचा दरमहा अहवाल, हिशेब पाठवला जाई. प्रत्येक दिवस नवे प्रश्न.. नवे आव्हान उभे करणारा. आमची दोन केन्द्रे पारधेवाडी (लातूर) व सालेगाव (उस्मानाबाद) इथे तंबू ठोकून उभी राहीली. फेब्रुवारी १९९४ मध्ये आम्हा दोघांना कॅनडा व अमेरिकेतील मित्रांनी आम्ही तयार केलेल्या माहितीच्या चित्रफितीसह तिथे येण्याचे निमंत्रण दिले. अर्थातच आम्ही गेलो. उभय देशांतल्या २३ गावांना भेटी दिल्या. तिथल्या भारतीयांशी संवाद केला. आणि अटलांटिक महासागराप्रमाणे पॅसिफिक महासागराचेही प्रत्यक्ष दर्शन घडले.

व्हँकुव्हर हे पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरचे गाव. अशोक कोतवाल त्यांची पत्नी ट्रुस यांच्यासह त्या किनाऱ्यावर गेलो. भरतीची वेळ. समोर भरतीच्या लाटांनी उधाणलेला समुद्र आणि नव्या सागर स्पर्श–दर्शनाच्या ओढीने उफाणलेला आमचा उत्साह. गाडी पार्क करतांना मशिनमध्ये नाणे टाकून नोंदवायला अशोक विसरले. जेमतेम पंचवीस पावले पुढे गेलो असू. लक्षात आले आणि ते गाडीकडे धावले. पण नियमाचे उल्लंघन केल्याबद्दलच्या दंडाची रक्कम नोंद करून उद्या सकाळी १० पर्यंत रक्कम जमा करण्याची सूचना गाडीला चिटकवलेली होती. अशोक दोन मिनिटात येतो सांगून गेले आणि दंड भरून हुश्श करीत आमच्यात सामिल झाले आणि पॅसिफिक सागरही मनात नोंदवला गेला.

१९९५ मध्य बीजिंगच्या जागतिक महिला परिषदेला जाण्याचा योग आला. येतांना बँकॉक आणि स्त्री देहाचा बाजार मांडून बसणारी, पटाया नगरी यांनाही भेट दिली. पटायाच्या बीचवरची संध्याकाळ प्रत्यक्ष पाहिली. मेणबत्ती सारखे मिणमिणते दिवे. अंधारलेली कॉफी, दारूची दुकाने. टेबला शेजारी नटूनथटून बसलेल्या. खुणा

करीत.. अंगप्रदर्शन करणाऱ्या सर्व वयाच्या स्त्रिया. बीचवरून हिंडणारे गोरे.. परदेशी म्हातारे. लगटून चालणारी १२/१४ ची उमलती कळी. म्हातारे हात तिच्या अंगाशी खेळणारे आजही आठवण झाली तरी तो किनारा 'बाई' असण्याचे दु:ख जागे करून अशांत... अस्वस्थ करतो आणि करीत राहील. थायलंडमध्ये जागोजागी मर्दन केन्द्रे (मसाज सेंटर्स) आहेत. आणि ही कला शिकवणारी 'विद्यापीठे' आहेत. 'विद्यापीठे' या शब्दाचा वेगळा अर्थ कळला. हा स्त्रियांचा महत्वाचा व्यवसाय आहे. तीन शिफ्टमध्ये.. एकावेळी ६० ते ८० महिला हा व्यवसाय करतात. या चिमुकल्या, तीनही बाजूंनी सागराने वेढलेल्या देशातील जमीन परदेशी लोकांनी विकत घेतली. पुरूष मजूरी करतात. बस चालवण्यापासून ते क्रेन ओढण्यापर्यन्त सर्वत्र स्त्रियाच पुढे असतात. भाषेवर संस्कृत.. भारतीय भाषांचा प्रभाव जाणवतो. तर मर्दन केन्द्रातील स्त्रियांशी संवाद साधतांना कळले की त्या हा घरंदाज मानला जाणारा व्यवसाय मुलांचे शिक्षण, चरितार्थासाठी आणि 'डॉवरी' ची .. हुंड्याची रक्कम जमा करण्यासाठी करतात. मर्दन करून घेणारे मात्र पुरूषच असतात. पण तेथे अश्लिलता कुठेही न येऊ देण्याचे बंधन पाळले जाते. तेलाचा वापर न करता मर्दन केले जाते. या कलेला दूषित वा अप्रतिष्ठित मानले जात नाही. म्हणून ही 'कला' नव्हे तर 'विद्या' मानली जाते.

...पटाया किनाऱ्यावर गेलो. लांबच लांब किनारा. कडेला बैठी.. दारे नसलेली हॉटेल्स. तरूणाईत पाऊल टाकणाऱ्या ॲडोलसन्ट.. अधमुऱ्या दह्यासारख्या गोंडसमुली. पण डोळे निष्णात. चेहेरे रंगवलेले. मंद दिव्यांच्या उजेडात एकेक टेबल पकडून हवे असलेले भरघोस खिसा भरलेले भक्ष धांडोळणाऱ्या त्या मुली. लोभस भक्ष शोधणारे प्रौढ.. वृद्ध आंबटशौकीन परदेशी पुरूष...

लहानपणी वाचलेल्या कवितेतली गौळण म्हणाली होती

माय फेस इज माय फॉरच्यून... अगदी २१ व्या शतकात प्रवेश करतांनाही आमच्या देहाला, चेहऱ्यालाच महत्व? आम्हाला भवितव्य नाहीच? आमच्या उज्वल भवितव्याला शक्ती देणारा आमचा चेहेराच? आता अगदी चित्रातला समुद्र पाहिला तरी मनात येते पटायाचा किनारा २१ वे शतक सुरू होऊन सातवर्षे झाली तरी तसाच असेल का? उमलत्या कलिकांच्या मनातले स्वप्नांचे गर्भ खुडून त्यांच्या देहांचा मांडलेला बाजार रात्रंदिवस पाहणारा हा समुद्र आतल्या आत गुदमरत नसेल ?..?

❑

## ३१

# साद हिमशिखरांची... उंच उंच चढताना

मेहमुद रफी आणि त्यांची हिंदू पत्नी मीना उर्फ अमीना यांच्या कुटुंबात जोपासलेल्या मराठी माणसांविषयीच्या तुडुंब आपुलकीने भरलेला पाहुणचार घेऊन रात्री साडेबारा नंतर आम्ही पंचफुला हे हरियाना... पंजाबच्या सीमेवरचे गाव सोडले. रफीजी महाडचे तर अमीना नागपूरची. त्यांना एक गोड मुलगी आहे. शबाना नावाची. रफीजींनीच आम्हाला एक टेम्पो ट्रॅव्हलर आणि एक इंडिका अशा दोन गाड्या ठरवून दिल्या होत्या. कुलू खोरे इथून सुमारे २८३ किलोमीटर्स होते. रात्रीच्या झोपेचा झपका डोळ्यावरून दूर झाला तेव्हा बाहेर चांगलेच उजाडले होते. घड्याळात पाहिले तर लहान काटा पाचावर नि मोठा बारावर. अत्यंत निरूंद रस्त्यावरून आमच्या गाड्या वेगाने धावत होत्या. आपण किती उंच चढून आलो आहोत हे जाणवून क्षणभर हृदयात लक्लक्लेच आणि आमचे निष्णात चक्रधर राजेश आणि हरिओम् यांना थ्री हॅटस् ऑफ म्हणत सलामी द्यावीशी वाटली. मनात आले. त्यांची नजर क्षणभरही विचलित होऊन ढळली असती तर?

रस्त्याच्या एका बाजूला खोल...खोल...खोल... दरी. हिरवाईने बहरलेली. तर दुसऱ्या बाजूला चढता डोंगर चिनार, सुरू, देवदार या उंचउंच निमुळत्या वृक्षांनी वेढलेला. अधून-मधून सफरचंद, लिची, चेरी, स्ट्रॉबेरी या फळांच्या बागा. पाठीला निमुळत्या आकाराच्या बांबूच्या टोपल्या बांधून, माथावर कपाळावर येणारी, टिकल्यांची... माळांची झालर लावलेली ओढणी बांधून मागे तिचा शेव... पदर

सोडलेला, अशा वेशातल्या महिला गटागटाने फळबागांमध्ये फळे गोळा करायला जाताना दिसल्या. सगळ्यांचे चेहेरे तरतरीत. ताजेतवाने. गोरी झळझळीत कान्ती. त्यांची घरे डोंगरातच. घरापासून मुख्य रस्त्यावर यायला चिमुरड्या उतरत्या पायवाटा आणि आमच्या गाड्या थांबल्या. "कुल्लू प्रदेशमें हम आपका स्वागत करते है" असा बोर्ड होता आणि लगेच बोगदा.

**कशासाठी पोटासाठी**
**खंडाळ्याच्या घाटासाठी**

असे म्हणत लहानपणी आम्ही मुंबई पुणे प्रवासातले बोगदे पार करीत असू. त्याची आठवण झाली पण हा बोगदा खूपच लांबलचक... चक्क तीन किलोमीटर्स लांबीचा होता.

...अचानक रेशमी उन्हाच्या कवडशांनी आमचे सुनहरी स्वागत केले. आम्ही कुलू खोऱ्यात होतो. चमचमणारी शुभ्रांकित हिमशिखरे आम्हाला खुणावत होती.

बोगदा येण्याआधी एक सुंदर चिमुकले धरण लागले. ते पंच नद्यांपैकी बियास या अवखळ नदीचे होते. आमचा पुढचा प्रवास तिच्या साथीने सुरू झाला. कुल्लू ते मनाली हे एकावन्न किलोमीटर्सचे अंतर. पण ते कापायला तीन तास लागले. चढणीचा निरूंद रस्ता. एका खालचे एक असे दहा बारा रस्ते सहजपणे दिसत होते. एकामागे एक उभ्या असलेल्या डोंगर रांगा. त्या पार करीत हिमशिखरांचा पल्ला आम्हाला गाठायचा होता. इतक्यात एक गौरांगना चेरी आणि स्ट्रॅाबेरीचे द्रोण घेऊन उभी होती. अर्थात सगळ्यांनीच ते द्रोण विकत घेतले. लिची हे, बोर आणि करवंद यांच्या मध्यातले देखण्या लाल... पिवळट रंगाचे चकचकित फळ. चव अत्यंत मधुर. आंबट आणि गोड यांच्यातले माधुर्य त्यात साठलेले असते. बीजही मऊ. स्ट्रॅाबेरीचे आवरण काहीसे खडबडीत फणसाची बाळआवृत्ती. वरचे आवरण काढले की आतला मगज कोकणातल्या ताडगोळ्यासारखा आरस्पानी. चव मात्र गोड... मधुर.

एका बाजूने सतत खोल दरी असणारा घाट तो पाहून मला धुळ्याला जाताना लागणारा कन्नडचा औट्रमचा घाट आठवला. त्यांची लांबी ७ किलोमीटर्स आहे. तो पार करतानाही छातीचा ठोका चुकतो. चक्रधराची (ड्रायव्हरची) हात चलाखी महत्त्वाची ठरते. पण हा तर औट्रम पेक्षा पन्नास पटीने मोठा घाट आणि त्याहून अवघड आणि दुपारी एक वाजून गेल्यावर आम्ही एकदाचे मनालीत पोचलो. भलीमोठ्ठी ताजी जांभळी वांगी, दीडदोन फूट लांबीचे रसदार शुभ्र मुळे, तोंडात पाणी आणणारी लांब सडक केशरी रंगाकडे झुकणारी गाजरे, लालबुंद टोमॅटो, काकड्या, हिरवाकंच पालक, कोथिंबीर,

ढब्बू मिरच्या यांनी सजलेली भाजीची दुकाने दिसू लागली. मनात खूणगाठ बांधली. आज दालफ्राय आणि छोले सोडून चमचमीत भाजीही खायला मिळणार.

...आमची गाडी दुपारी दीड वाजता मनालीच्या हॉटेल विंटेज कॉटेज समोर थांबली. खोलीत प्रवेश केला आणि डोळ्यांचे पारणे फिटले. खोलीच्या काचेरी खिडकीतून बर्फाने व्यापलेली शुभ्रांकित हिमशिखरे. त्यांना वेढून असलेले हिरवेजर्द उंच डोंगर, त्यातून वेगाने धावत खाली येणारे फेसाळ... खळाळते पांढरे शुभ्र झरे साद घालत होते. मी चित्रातल्या नव्हे तर खऱ्याखुऱ्या हिमालयाला नजरेत साठवीत होते. उद्या तर हिमालयाच्या कुशीत खेळायला जायचे होते...

❑

३१

# रोहतांगच्या खिंडीत...

४० वर्षांपूर्वी आम्ही जोशात दिलेल्या 'हिंदी चिनी भाई भाई' या घोषणा हवेत विरताहेत तोच चिन्यांनी आमचा हिमालय बळकावण्याचा घाट घातला. हिमालयात घुसखोरी केली. पुन्हा आम्ही बुलंद आवाजात सांगू लागलो... गाऊ लागलो... म्हणू लागलो,

उत्तुंग आमुची उत्तर सीमा, इंच इंच लढवू!

पण आमच्या शासनाजवळ ना बर्फ तुडवू शकणारे उत्तम बूट होते, ना आवश्यक ती शस्त्रे, स्वेटर्स. तरीही जीवाची बाजी लावून आमचे जवान लढले. आजही,

ऐ मेरे वतन के लोगो, जरा आँखमें भरलो पानी

जो शहीद हुवे है उनकी, जरा याद करो कुर्बानी –

ह्या लतादिदींनी गायलेल्या प्रदीपजींच्या गीताचे स्वर ऐकले की मन गलबलतं. डोळे वाहू लागतात. तो हिमालय प्रत्यक्ष अनुभवण्याची लालसा गेली पन्नास वर्षे मनात जपून ठेवली होती आणि वयाची सत्तरी जवळ आल्यावर तो योग अंगणात आला. ही उत्सुकता अधिक ताणली गेली, नेपाळला गेलो तेव्हा. हिंदू धर्म: त्यातील स्त्रिया व मुलांचे स्थान या विषयावर मी टिपण वाचणार होते. पाकिस्तान सिलोन, बांगलादेश, दक्षिण आफ्रिकेतील काही देश सहभागी होणार होते. ख्रिस्तवासी डॉ. मेबल आरोळे व डॉ. रजनीकांत आरोळेंमुळे ही संधी मला मिळाली होती. काठमांडू ते दिल्ली हा संपूर्ण

प्रवास हिमालयाच्या काठाने होता. उंच उंच बर्फाळ हिमशिखरे, त्यावर पडणारे ऊन, त्या शुभ्रतेवर सोनसळी झळाळी. डोळे तृप्तीने तहानले होते. तेव्हाच ठरवलं या जन्मी हिमालयाच्या कुशीत एकदातरी विसावयाचेच!...

मनालीला पोचलो आणि दुसऱ्याच दिवशी सकाळी साडेसात वाजता रोहतांग पासला निघालो. पुन्हा निरूंद रस्ते. डोंगर फोडून जेमतेम एक गाडी येऊ जाऊ शकेल असे. हा रस्ता बॉर्डर सिक्युरिटी फोर्स – सीमा सुरक्षा दलाच्या सैनिकांनी... जवानांनी तयार केला आहे. त्याची निगा तेच राखतात ठराविक अंतरावर रायफलधारी जवान येणाऱ्यां जाणाऱ्या गाड्यांचे बारकाईने निरीक्षण करीत असतात. शंका येताच गाडी थांबवतात. गाडीची कागदपत्रे, परवाना इत्यादीची कसून पाहणी करतात. कोठीपासून जेमतेम २७/२८ किलोमीटर्स अंतर. पण पंधरा ते वीस अंशाच्या कोनात वळणारे रस्ते... हेअरपिन ड्राइव्हज्. चढणीचा रस्ता. ज्या रस्त्यावरून आपण आलो ते रस्ते खेळातल्या नागमोडी रेषांसारखे नि त्या वरून धावणाऱ्या गाड्या आगपेट्यांच्या. आकाराच्या, दिसत होत्या. आम्ही हिमगिरी बर्फाच्छादित रांगांमधून प्रवास करीत होतो.

रोहतांग पासला बर्फात खेळण्यासाठी जाड वुलनचे... फरचे कोट, बुट घ्यावे लागतात. ते ७० ते १०० रुपये भाड्याने मिळतात. त्या दुकानांना नंबर्स असतात. आम्ही पंधराजण होतो ७० व १७१ या दुकानांतून कोट घेतले. दुकानातील सर्व व्यवहार महिलाच पाहतात. यांचे पती सफरचंद, लिचीच्या बागांतून मजुरी करतात. ते स्वतःला राजपूत मानतात. कोठी हे रोहतांगच्या अलिकडचे गाव. तिथेच ही दुकाने आहेत.

पाहता पाहता आम्ही इतके उंचावर आलो नि लक्षात आले की काही बर्फाळ शिखरांपेक्षाही आम्ही उंचावर होतो. गोठलेले झऱ्यांचे प्रवाह ऊन पडल्यामुळे मधूनच वितळून झुळझुळती बारीकशी पाणरेषा उड्या घेत वाहात होती. इतक्यात एक विलक्षण दृष्य दिसले भला मोठा प्रवाह गोठून बर्फाचा पांढरा रूंदबंद दगड पायथ्याशी येऊन थांबला होता आणि त्या दगडाच्या खालून वितळलेले पाणी झुळझुळत होते. डोंगराच्या बाजूने खणून प्रवाहाला वाट करून दिलेली आहे. त्यामुळे पाणी रस्त्यावर येत नाही आणि एका अतिउंच टप्प्यावर गाडी थांबली.

आता आम्ही समुद्र किनाऱ्यापासून सुमारे १३५०० फूट (३९३४ मीटर) उंचीवरच्या भारताच्या शेवटच्या बिंदूवर रोहतांग पासवर पोचलो होतो. समोर दाट बर्फाच्या चुऱ्याचे लांब रूंद मैदान. किंचित चढणीचे. रोहतांगचा अर्थ मुडद्यांचे गाव. इथून लेहकडे जाता येते. इथले हवामान नेहमी बदलत असते. हिमवृष्टी, वादळे यांनी

वेढलेले. त्यामुळे इथून सीमा ओलांडताना अनेकदा जीव गमवावा लागे. आता शासनाने खूप सुधारणा, सोयी केल्या आहेत. मनालीच्या दिशेने नजर टाकली की घनघोर जर्द, गर्द हिरवाई दिसते आणि दुसरीकडे वनस्पती विहीन हिमपहाड. इथे झीरोपॉईंटवर व्यास नदीचा उगम आहे. लोकभाषेत तिलाच बियास म्हणतात. इथून तिबेट व चीनमध्ये घुसता येते.

...आणि मला वयाची मर्यादा इथे जाणवली. भरपूर चालण्याची. धावण्याची शारीरिक क्षमता असेपर्यंत इथे यायला हवे. बर्फावरून ढकलत नेणाऱ्या लाकडी गाड्या होत्या. झिरो पॉईंटपर्यंत, व्यास नदीच्या उगमापर्यंत नेऊन आणायचे पाचशे रुपये. थोडी घासाघीस केली. त्या ढकलगाडीत दोन जण बसू शकतात. मी आणि माझा मुलगा अभिजीत आम्ही दोघे बसलो. चढावावर तीन जण ढकलत होते. भवताली मुले, नातवंडे बर्फातून उंडारत होती. एकमेकांच्या अंगावर गोळे करून फेकत होती. मी तो आनंद तीसवर्षे मागे जाऊन मनानेच झेलत होते. पण नंतर खाली उतरलेच. बर्फाचे गोळे फेकण्याचा, बर्फाच्या चुऱ्यावर जाड कोट, लोकरी टोपी घालून फतकल मारून बसण्याची धम्माल अनुभवली. अशा वेळी 'त्या'ची याद आलीच. मी हिंडण भवरी तव हा मातीत पाय घट्टपणे रोवून समर्थपणे उभा असलेला स्वयंसेवी सैनिक. पण त्याने माझ्या हिंडण्याला कधीही अडसर घातला नाही. शेवटी साथ त्याचीच!

❑

३३

# कुल्लई खोरे : देवभूमी

रोहतांगच्या खिंडीतून मन खाली उतरायला तयार नव्हतं. हवामान चांगले असल्याने श्वास घेण्यास त्रास झाला नाही. बाकी सगळे बर्फात खेळण्ग़ात धुंद होते. आमच्या छोट्या इंडिकाने लवकर काढता पाय घेतला. कोठीहून ज्या महिलांकडून फरचे कोट व बूट घेतले, त्यांच्याशी गप्पा मारायच्या होत्या. आईचे नाव होते माधुरी. ती असेल चाळिशी ओलांडलेली आणि तिची मुलगी इंद्रावती. ती बाविशीची. तिचा पती बॉर्डरवर खबरेगिरी करी. अतिरेक्यांच्या हल्ल्यात तो ठार झाला. दोन मुलांना घेऊन इंद्रावती आईच्या आधाराने वेगळे घर करून राहते. माधुरीचा नवरा सफरचंदाच्या बागेत काम करतो.

सोलांग व्हॅली हा एक देखणा परिसर. याची उंची दोन हजार चारशे ऐंशी मीटर आहे. येथे गाड्या ठेवण्यासाठी मोकळी जागा आहे. तिथे गाडी थांबवली आणि एका विशाल वृक्षाखाली बांधलेल्या चौथऱ्यावर आम्ही थोडे विसावलो. आम्हाला पाहून दोन कुलूस्त्रिया आमच्याजवळ आल्या. येताना एका मैदानात स्त्री पुरुष पारंपारिक गीतावर नृत्य करीत होते. आम्ही तिथे पोचण्या आधीच कार्यक्रम संपला. मनाला रूखरूख लागली. या महिला आम्हाला गाणी आणि नृत्य शिकवायला तयार झाल्या आणि आम्हीही त्यांच्या सोबत नाचू लागलो. अनुष्का आणि रेवती दोघी भरतनाट्यम् शिकतात. त्यांना पावली (स्टेपिंग) लक्षात ठेवायला सांगितले. कुल्लुई भाषेतले गीत गात त्या नृत्य करू लागल्या.

**कुल्लूरिये पठवाडी ये, नामा शिमले जाना**
**जेची संग नही तोलना, जेचिये इलायची दाना**

कुलूहून मला शिमल्याला घेऊन जा. मी जणू तुझ्या जीवनातला वेलचीचा दाणा आहे. मला छान पट्टू...शाल आण. ही शाल सुंदर फुलांनी विणलेली आणि लांब रूंद असते. महिला ती विशिष्ट पद्धतीने पांघरतात. माथ्यावरच्या रूमालाला टिकल्या लावलेल्या असतात. त्या कपाळावर येतील असा रूमाल महिला बांधतात. दागिनेही खूप घालतात. मंगळसूत्राला 'काच' म्हणतात. काळ्या रंगाच्या मण्यांचे १५/२० सर एकत्र गुंफतात. मध्यात रिठ्याच्या बीजाच्या आकाराचे तीन सोन्यांचे मणी असतात. सवाष्णीच्या मृत्यूपर्यंत ती ते गळ्यात घालते.

आम्हाला नृत्य शिकविणाऱ्या महिलांनी त्यांचे पोषाख व दागिने आणले होते. ते घालून आम्ही फोटो काढले.

**डोलमा मॅडमा चाल घरपे, झांजकी बेला (सांज की) चाल घरपे**
**डोलमा शोरी शोरे सजधजके निकले, बेटी का बापूनी लागी डरे**
**झांज की बेला चाल घरपे...**
**(शोरा म्हणजे छोरा. शोरी म्हणजे छोरी.)**

या गीताची चाल पहाडी धुनमध्ये होती. भारतीय संगीतात 'पहाडी' ही स्वतंत्र, अनवट अंगाने गायली जाणारी मधुर रागिणी आहे. नृत्याची लय आणि पावले लोकनृत्याची होती. आम्ही सगळ्याजणी वय विसरून मुक्तपणे नाचलो.

कुलूच्या टोप्या आणि शाली ही त्यांची खासियत. मण्यांची कशिदाकारी केलेल्या सुंदर पर्सेस, लिची, चेरी... ही खरेदी हवीच. कुलू परिसरातील सुमारे तीस हजार महिला या कामातून रोजीरोटी मिळवतात. त्रिशला या विणकर केंद्रातून जाकिटे व शालींची खरेदी केली. मणीकर्णला भेट दिल्याशिवाय कुलू मनाली प्रवासाची सांगता होत नाही. मणिकर्ण कुलूहून ४५ किलोमीटर्स दूर आहे. पार्वती नदीच्या तीरावर मणीकर्ण आहे. एक दिवस जगन्माता पार्वती जलक्रीडा करीत होती. तिच्या कानातला मणी पडला. तो मणी काय साधा सुधा? साक्षात् रत्नमणी. तो तेजाच्या प्रभावाने थेट शेषनाग. जो रत्नांचा स्वामी त्याच्याकडे जाऊन पोचला. शंकररावांनी आपल्या गणांना तो मणी शोधण्याचा आदेश दिला होता. पण त्यांना तो कसा सापडणार? शिवजी चिडले आणि तिसरा डोळा उघडला. मग काय? प्रलय सुरू झाला. नागराजांनी घाबरून तो मणी फुत्कार टाकून पृथ्वीवर फेकला. त्या फुत्कारामुळे गरम पाण्याचे झरे मणीकर्णमध्ये वाहू लागले. या गरम पाण्यात न्हाले तर सांधेदुखी, पोटाचे आजार कमी होतात असे

म्हणतात. मात्र तांदुळ कापडात गुंडाळून २० मिनिटे पाण्यात ठेवले तर त्याचा भात तयार होतो. पाण्यात डाळभात, पातेल्यात टाकून ठेवतात. झाकण लावून तर दगड ठेवतात. अर्ध्या तासात डाळभात तयार होतो. येथे एक राममंदीर आहे. कुलूचा राजा जगत्सिंह याने सतराव्या शतकात ते बांधले.

इथून जवळच हडिंबाचे मंदिर आहे. हडिंबा म्हणजे पंडुपुत्रापैकी महाकाय भीमाची प्रेयसी हिडिंबा. वनवासात असताना पांडव हिमालयातही गेले होते. तेथील आदिवासी राजाची कन्या हिडिंबा त्याच्या प्रेमात पडली. तिने भीमाजवळ बलवान् पुत्र मागितला. ही जमात मातृसत्ताक असल्याने ती भीमाबरोबर गेली नाही. तिने भीमाला वचन दिले की त्याला गरज पडेल तेव्हा त्याने पुत्र घेऊन जावा. तो पुत्र म्हणजे घटोत्कच. येथे आईमुलाच्या नावाचे मंदिर आहे. त्याला ढुंगरी मंदिर म्हणतात. जवळच एक गुंफा आहे. तेथे लामांना धर्मप्रचाराचे प्रशिक्षण दिले जाते. मनाली जवळच मनुचे मंदिर आहे. सामाजिक आचरणाचे नियम सांगणारी मनुस्मृती इथे लिहिली. आज मनुस्मृती सर्वसामान्य समाजाला न्याय न देणारी म्हणून आपण ती नाकारतो. पण समाजाच्या शिस्तशीर चलनासाठी नियम बनवले पाहिजेत. ह्या जाणीवेने टाकलेले हे पहिले पाऊल. इतकेच त्याचे ऐतिहासिक महत्त्व आज उरले आहे. वसिष्ठमुनींनी तपाचरण केले ते मंदिर इथे आहे. राजा जनमेजयाने पिता परिक्षितच्या स्मृती प्रित्यर्थ ४००० वर्षांपूर्वी ते बनवले असे मानले जाते. गंधक व सिल्का मिश्रित गरम पाण्याचे झरे तिथे आहेत.

वेदपूर्वकालीन, वेदकालीन काळाचे अवशेष स्मृती रूपाने विखुरले आहेत. भारतात आर्य नैऋत्यकडून आले असे काही प्रागूइतिहास तज्ज्ञांचे मत आहे.

...त्या खोलात फारसे न शिरता या भूमीला देवभूमी म्हटले जाते हे महत्त्वाचे. कारण इथली भूमी अत्यंत सुपीक. पेराल त्याला भरभरून उगवण शक्ती देणारी. अथक श्रम करून डोंगरात मक्याची कणसे, गहू, तांदुळ, तऱ्हेतऱ्हेची कडधान्ये, भाजीपाला पिकवून समृद्ध जीवन जगणाऱ्या कष्टकऱ्यांची भूमी आहे. म्हणून देवभूमी आहे.

❑

३४

# दशम्या धपाट्याच्या चवीची वेळा आवस

थंडीचा काटा अंगावर फुलत जातो. दोन दोन दुलया पांघरून गुडुप्प झोपून जावंसं वाटतं. त्यातूनही ती दुलई आईच्या नाहीतर आजीच्या तलम सुती लुगड्याची असावी. बिच्चारा सूर्य, त्याला कुठली अशी मायेची दुलई? सकाळी सहा वाजताच कुडकुडत तो क्षितीजावर गुलाबी किरणांचा शेला पसरू लागतो. त्या गंधगार थंडीला गंध असतो पिकलेल्या बोरांचा. गाभुळलेल्या चिंचेचा. पाणी गोड गोड करणाऱ्या टप्पोर आवळ्यांचा. पिवळ्या तजेलदार पेरूंचा. अमृततुल्य सीताफळांचा.

मार्गेसरी संपत येते. मार्गशीर्ष अमावस्येचे... वेळा आवसेचे वेध मराठवाड्यातील विशेष करून बीड, उस्मानाबाद, लातूर परिसरातील सर्वांना लागतात. सर्व जातीचे सर्व धर्माचे सामान्य लोक या दिवसाची आतुरतेने वाट पाहतात. चार दिवसांपासून धपाटे, चटण्या भाज्यांची चव घरादाराच्या जिभेवर हुळहुळायला लागते. शेतकऱ्याचे संपूर्ण कुटुंब दशम्या, धपाटे, तऱ्हेतऱ्हेच्या चटण्या, दही घेऊन शेतात जाते. एखाद्याला जेमतेम एकर दीड एकर शेत असो वा एखादा पंचवीस एकर पाणभरत शेतीचा बागाईतदार मालक असो. किंवा तो नामदार खासदार असो. वा एखादा साधा शिपाई असो. तो शेतात जाऊन, आंब्याच्या सावलीला बसून घरच्यांच्या, मित्रांच्या सोबत दशम्या, धपाटे, मिरचीच्या खुड्यासोबत खाणारच! अनेकजण शेतात जाऊन अन्न शिजवतात. ज्यांना शेत नाही त्यांना शेजारपाजारच्या कुटुंबांना शेतात जेवायला येण्याचे आमंत्रण दिले जाते आणि हे आवतन चुलीला असते. या जेवणात दशम्या आणि धपाटे

'अस्से'च. धपाटे मराठवाड्याची खासियत. दूध, किंचित साखर आणि तुपाचे मोहन घालून गव्हाच्या पिठाच्या किंचित जाडसर. वरून तूप लावून केलेल्या पोळ्या म्हणजे दशम्या आणि ज्वारीच्या पिठात थोडे गव्हाचे, डाळीचे पीठ, लसूण, मीठ, मिरची, पालेभाज्या घालून पोळीसारखे लाटल्यावर अधूनमधून भोकं पाडून, वरून तेल सोडून खरपूस भाजून केलेले धपाटे. सुटलं ना तोंडाला पाणी?

वेळा हा 'ईला' या शब्दाचा अपभ्रंश असावा. मराठीत 'व' चा 'अ' किंवा 'अ' चा 'व' होण्याची प्रवृत्ती आहे. ओटी हा शब्द ग्रामीण भाषेत वंटी होतो. या आवसेला ईला आवस असेही म्हणतात. 'इला' म्हणजे धरती, अन्नधान्य, भाजीपाला निर्माण करून माणसाचे भरणपोषण करणाऱ्या, नवनिर्मितीची उर्जा अंगप्रत्यंगात लहरणाऱ्या धरित्रीच्या सन्मानाचा, पूजनाचा हा दिवस. या दिवशी मान आंबिलीचा असतो. थोड्या ज्वारीच्या पिठात लसूण, आद्रक, जिरे, मीठ तिखट घालून ती शिजवतात. त्यात ताक घालून ती घुसळतात. शेतीशी निगडित सर्व विधी आणि सणांमध्ये आंबिल हवीच. पोळा असो वा लक्ष्म्या. आंबिल असतेच. ज्वारी हे मराठवाड्यातील पूर्णान्न आहे.

इला आवसेला, मातीच्या गाडग्याला चुना आणि काव लावून रंगवतात. त्यात पाच पाच सुपाऱ्या, हळकुंड, खारका, खोबऱ्याचे तुकडे घालून मडक्याच्या तोंडावर नागवेलीचे पान ठेवतात. खरिपाची सुगी नुकतीच संपलेली. गहू, हरभरा, करडईची लावणी होऊन महिना उलटलेला असतो. कापलेल्या धान्याच्या कणसांची, तुरकांड्या गुंफून कोप तयार करतात. त्या कोपीत पाच दगडांना चुना लावून त्यांचे पांच पांडव करतात आणि कोपीच्या बाहेर कुंती आणि द्रौपदीचे दगड मांडतात. त्यांच्या मध्यात कोपीसमोर ते रंगवलेले गाडगे. नैवेद्य म्हणून उकडलेले लहान लहान मुटके आणि ज्वारी बाजरीचा खिचडा ठेवतात. दिवा, नैवेद्य कोपीतल्या पांडवांच्या समोरच. या दिवशी मांग समाजाच्या पतीपत्नींना बोलावून सन्मानाने जेवू घालण्याचा रिवाज होता. असे केले तर भूमीत भरपूर धान्य येते. बरकत येते. परभणी भागात हिला इरवण आवस म्हणतात. इरवण म्हणजे विळा. शेतीच्या अवजारांची व धरित्रीची पूजा करतात. कर्नाटकात मार्गशीर्ष पुनवेला धरणी विधवा होते. अशी कल्पना रूढ आहे. तिला 'हौर्त्सुल हुन्नवे' म्हणजे विधवापौर्णिमा म्हणतात. मग इळा अवसेला सौभाग्य-अवस म्हणायचे का?

...आता द्रौपदी कुंती समोर नैवेद्य का नाही? त्या कोपी बाहेरच का? मांग समाजाच्या जोडप्याला सन्मानाने जेवण इळा अवसेलाच का? अमावस्या आणि ती भाग्यदायिनी? अशा अनेक प्रश्नांचे अंकुर विधीव्रते साजरी करताना आमच्या

संवेदनशील मनात उगवतात. त्यांची उत्तरे शोधकांनी शोधावीतच. खूप काही हाती येईल.

पण आपण मात्र दशम्या, धपाटे, चटण्यांची चव तनामनात गोंदवून घेत महिनाभरात येणाऱ्या लुसलुसीत हुर्ड्याची, गवऱ्यांच्या आगटीची, लसणीच्या मीठ चटणीची, शेकलेल्या हुळा ओंब्याची नि नव्या गुळाची वाट पाहायची!!

❑

३५

# हरवलेला वसंत...

एक दिवस अचानक तो मर्मभेदक मधुर गंध श्वासातून थेट मनाच्या गाभाऱ्यात भिनला. रस्त्यातून मी घरी येत होते. मी चमकून भवताली नजर टाकली. सुशी नाल्याच्या अल्याडच्या शिरिष-वृक्ष, फिक्कटपोपटी हिरव्या, चवरीच्या आकाराच्या गोंडेफुलांनी बहरलाय. दुरून पाहिलं तर पिवळ्या रंगाच्या वाळक्या पट्टाड्या शेंगा अंगावर खुळखुळतांना दिसतात. जवळ जावं तर नाजुक चवऱ्या झुलवीत सुगंधाची पखरण करणारे फुलते झाड. ही चैत्र पाडवा जवळ आल्याची नांदी. घरी आल्यावर पहिल्यांदा आईने कुंडीत लावलेल्या मोगरीच्या वेलीकडे मी धावते. तिथेही टप्पोऱ्या कळ्यांनी वेल लगडली आहे. वसंतातली प्रत्येक सांजवेळ विविध सुगंधी लहरलेली.

**मंद मंद मंद वात**
**मधुर गंध ने जगात**
**हा वसंत रंग भरित**
**जगती येतसे पहा**
**बहरल्या दिशा पहा....**

वसंत बापटांच्या 'अन्नदाता' या शेतकरी जीवनावरच्या नृत्य संगितीकेवर, सेवादल कला पथकात नाचतांना कवितेचा अर्थ वयाच्या दहाव्या वर्षी कळला नव्हता. पण तरुणाईची चाहूल लागताच निसर्गातल्या आणि जीवनातल्या वसंतऋतूचे वेगळेपण जाणवू लागले... अंगणात गुलमोहर बहरु लागला.

असे आठवणारे अनेक वसंत. पण गेल्या २५/३० वर्षांत हे सुरंगी.. सुगंधी वसंत जणू आयुष्यातून हरवले आहेत. मार्च महिना बसंती रंगाचा. मार्च आला की गेल्या तीस वर्षांपासून आठवतो '०८ मार्च, महिला दिवस.' महिलांनी आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक क्षेत्रातील दुय्यम स्थानाला आव्हान देऊन 'बाई' म्हणून त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांविरूद्ध संघटितपणे लढा द्यायला सुरवात केली त्याची 'नांदी' ठरणारा दिवस. अमेरिकेतील, युरोपातील कष्टकरी स्त्रियांनी बाई म्हणून अधिक तास श्रम, पण वेतन मात्र कमी; या वास्तवाला संघटितपणे टक्कर दिली.

०८ मार्च १८५७ रोज न्यूयॉर्कच्या कापड गिरण्यांत काम करणाऱ्या महिलांनी गिरणी मालकांकडून होणारी पिळवणुक, श्रम जास्त पण मोबदला कमी या विरुद्ध निदर्शने केली. पोलिसांच्या हल्ल्याला तोंड दिले. नंतर दोन वर्षांनी मार्च मध्ये महिला कामगारांची संघटना बांधली. १९०८ साली पंधरा हजार महिलांनी कामाच्या तासात कपात व्हावी म्हणून मोर्चा काढला.

१९०८ पासून ०८ मार्च हा दिवस 'महिला दिन' म्हणून पाळला जाऊ लागला. जगातील स्त्रियांच्या समाजातील स्थानाचा, त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास करणारे व्यासपीठ निर्माण झाले. १९१० साली पहिली आंतरराष्ट्रीय महिला परिषद कोपन हेगेन येथे पार पडली. गेल्या काही वर्षांपासून भारतातही हा दिवस विविध सामाजिक संस्था, संघटना, स्त्रीच्या समाजातील स्थानाचा गांर्भियाने विचार करण्याचा विशेष दिवस म्हणून पाळतात. स्त्रियांच्यात, एकूण समाजात जाणीव जागृती व्हावी यासाठी योजनांची कार्यक्रमांची आखणी करतात. परंतु अलिकडे हा दिवस खेड्यांपासून ते थेट तालुका - जिल्हा - राज्य स्तरावर, शाळा... महाविद्यालये... संस्था आणि शासन यांच्या द्वारे 'साजरा' केला जातो. त्यामागे 'एक विधी पार पाडला' अशी उपरी भावना असण्याचीही शक्यता असते. ही तांत्रिकता येऊ नये याची खबरदारी मात्र जाणीवपूर्वक आपण सर्वांनी घ्यायला हवी.

गेल्या काही वर्षात महिला सबलीकरणाचा नारा सर्वत्र दिला जातो. या दिवसाच्या निमित्ताने का होईना, समाजातील 'बाई' च्या दर्जाचा विचार वास्तवाचे भान ठेवून आपण शोधतो. का? या 'आपण' मध्ये सुजाण, शिक्षित, राजकीय-आर्थिक-सामाजिक क्षेत्रात काम करणारे स्त्री पुरूष आले. स्त्रीचे सबलीकरण हे समाजाच्या सबलीकरणाचा एक भाग आहे. गेल्या दोन हजार वर्षे बाईचा सामाजिक दर्जा तळातला होता. याला जबाबदार सामाजिक... धार्मिक परंपरा, जगण्याचे रीतीरिवाज आहेत. ते कोण्या एका व्यक्तीने वा धर्माने लादलेले नाहीत. समूहाच्या जगण्याच्या चालीरितीतून ते

आले आहेत. समाजाने पुरूष हाच ‘पूर्ण माणूस’ मानल्याने या परंपरा, रीतीरिवाजांची निर्मिती समाजातील पुरूषवर्गाने केली. परंतु आज विज्ञान, सामाजिक न्याय यांमुळे समाजधुरिणांना पटले आहे. की स्त्री ही टाकण्याभोगण्याची ‘वस्तू’ नाही. ती एक परिपूर्ण व्यक्ती आहे. ‘माणूस’ आहे. हा विचार शिक्षण... राजकारण... समाजकारण आदि विविध माध्यमांतून समाजात पेरणाऱ्यांची एक साखळी निर्माण व्हायला हवी. आणि हे आव्हान पेलण्यासाठी सुजाण, शिक्षित स्त्रियांनी दोन पावले पुढे रहायला हवे. पुरूषांचे हात हातात हवेतच. तेही परिपूर्ण माणुस आहेत. तरच अनेकींचे हरवलेले, अनेकींच्या जीवनात नव्याने येणारे वसंतऋतू पुन्हा अंगणात बहरतील, आणि खुल्या आवाजात गाता येईल.

**हम चलेंगे साथ साथ**
**डाले हाथो में हाथ**
**हम होंगे कामयाब एक दिन.**

हरवलेला वसंत पुढील पिढ्यातील लेकीसुनांच्या अंगणात नक्कीच येईल.

❑

## ३८

# त्र्याण्णव वर्षाच्या तरुणाकडून उर्जा चेतवून घेतांना...

तो परिसर बहुदा तरूणाईने भारलेला असावा. सगळेच तरूण. नजरेत नवनव्या कृतिशील स्वप्नांचे उंचवटे. हात सतत काही नवे करण्यात गुंतलेले. टमाटे, वांगी, मिरच्या, काकड्या, मुळे, गाजरे, पालक, मेथी, कोबी.. अशा तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या हळुवार हातांनी खुडून बांबूच्या टोपल्यात टाकणारे उत्फुल्ल हात. दुसऱ्या परिसरात बाया.. पुरूषांचे. काही जण चिंध्यांचे रंगानुसार ढीग घालणारे तर काही जण यंत्रावर त्यांना पिंजणारे, त्यांची पोती भरणारे. परिसरातील प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर निरोगी.. निरामय हास्य. आणि स्वागतशील हात. जवळजवळ पाचसाडेपाचशे एकरांच्या परिसरात पडणाऱ्या पावसाचा एक एक थेंब साठवून तयार केलेले पाण्याचे साठे. त्यावर पिकणारे गहू, ज्वारी, हरबरा, भुईमूग, सूर्यफूल, करडई, साळ, सोयाबिन.. यांची लहरती शेते. भाताची कापणी, मळणी झालेली. तरूणाईचे हात जेव्हा श्रममग्न असतात तेव्हा समृद्धी शेजारी येऊन उभी रहातेच. ही सारी त्या हातांची किमया.

त्या परिसरातील हजारो हातांना उर्जा देणारा ब्याण्णव संपून त्र्याण्णवात पदार्पण करणारा हा तरूण गेली अनेकवर्षे आडवाच... झोपूनच आहे. पाठीला पट्टा बांधून तासूनतास उभे राहून अनेकांना उभे करण्यास उद्युक्त करणारा. जीवनरस गेली अनेकवर्षे देणारे बाबा आता मात्र आडवे झोपून तेच काम करीत आहेत. पहाटे पाचला तयार होऊन एका हातगाडीवर झोपून तो युवा अडिच तीन किलोमिटर्स परिसराला वळसा

घालतो. सारेजण कसे नव्या दमाने, उत्साहाने उभे आहेत ते डोळाभरून पहातो. सारेजण त्याची वाट पहात असतात. त्याची ढकलगाडी पुन्हा त्याच्या घरी पोचते तेव्हा तृप्तीने त्याचे डोळे मिटलेले असतात.

त्याची परमप्रिया सखी, साक्षात् साधना. या विद्यालंकृत भणंग फकीरासोबत प्रवास करतांना ती 'समिधा' झाली. कुसुमाग्रजांच्या ओळी मला आठवल्या –

**समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा**

**तव अंतर अग्नी, क्षणभर तरी फुलवावा...**

पण साधनारूपी समिधांनी या तपस्व्याचा अंतरअग्नी गेल्या पाच तपांहुन अधिकवर्षे फुलवत ठेवला आहे.

बाबा आमटे गेल्या सव्वीस डिसेंबरला ब्याण्णव वर्षांचे झाले. २५ डिसेंबरला त्यांना शुभेच्छा देणारे आम्हीच खुळे ठरलो. ते हसून म्हणाले 'एक वर्ष जवळ गेलो. कबीराचा दोहा आठवा.

**पशुपक्षी भोजन करे, देह बने भांडार...**

बाबांनी निर्माण केलेल्या आनंदवनातले 'स्मृतीवन' पशु पक्षांना आहार पुरवणारे विविध झाडांचे 'भांडार' बनले आहे. या रोगांने त्रस्त रोग्यांच्या जखमा धुतल्याने किंवा त्यांच्या जवळ गेल्याने हा रोग होत नाही हे समाजाच्या मनात ठसवले. नवनिर्मितीत मग्न असणाऱ्या श्रमस्वी समुदायापैकी अनेकांच्या हातापायांची बोटे झडलेली आहेत. पायांनी धड चालणे जमत नाही. कोणाचे नाक झडलेले. कोणाचे कान म्हणजे भोकच. कोणी अपंग झालेले. पण सर्वांचे हसरे आणि स्वागतशील डोळे.

गेली शेकडोवर्षे 'महारोगा' बद्दलची घृणा समाजमनात अदिबंधा सारखी पेरली गेली आहे. विज्ञानाच्या भक्कम पुराव्यांना सिद्ध करण्यासाठी बाबांनी आपले शरीर वापरण्यास दिले. आनंदवनात असलेल्या व्यक्तींना स्मृतीवनातील मातीत खोल पुरून निरोप दिला जातो. त्यांच्या भक्तियुक्त प्रेम करणाऱ्या सर्वांनाच माहित आहे की बाबाही आपल्या देहाचे दान पशु पक्षांसाठीच करणार आहेत. बाबांनी या रोगाचे जंतू स्वतःच्या शरीरात टोचून घेतले. मात्र त्यांना रोगाची बाधा झाली नाही. मग नवनव्या प्रयोगांना सुरूवात. या रोगाने ग्रस्त झालेले चार रोगी, स्वतःची पत्नी, दोन छोटे मुलगे, यांच्यासह भर जंगलात त्यांनी तळ ठोकला. झोपडी बांधून वाघ, अस्वल, साप यांच्याशी दोस्ती करत तर कधी सामना देत आनंदवनात स्थिर झाले.

या भुवनतळी फुललेले हे आनंदवन गेली अनेक वर्षे सतत फुलते आहे. स्वप्नांची बीजे मातीत पेरून त्यांची दिगंताला भिडणारी झाड निर्माण करणाऱ्या त्या त्र्याण्णव वर्षांच्या तरूणाच्या हाताला स्पर्शकरून मीही माझ्या तनामनात उर्जा चेतवून घेतली आहे. अशीच नवनवी स्वप्ने मातीत पेरण्यासाठी.. त्यांचे अंकुर सबल करण्यासाठी...

❑

२७

# आमच्यातलं माणूसपण कमी होतेय का?

१०/१२ वर्षांपूर्वीचा प्रसंग. व्याख्यानाच्या निमित्ताने गोव्याला जाण्याचा योग आला. गोव्यातील छोट्या गावांतून फिरतांना लक्षात आले एखाद्या विशाल झाडाच्या तळाशी मारूतीचे चिमुकले अर्धगोलाकार देऊळ असावे तशी अनेक अर्धगोलाकृती देवळे दिसली. संध्याकाळी तिथे कोणीतरी दिवा चेतवून जाई. माझी उत्सुकता उंचावली. जवळ जाऊन पाहिले तर तिथे शेंदूर फासलेल्या दगडा ऐवजी चिमुकला क्रूस होता...

दुर्गेच्या मंदिरातला पुजारी समाजवादी विचारांचा युवा कार्यकर्ता. आम्ही त्याला भेटायला गेलो तेंव्हा जांभळ्या रंगाचा रेशमी कद नेसून तो देवळात पूजा करायला निघाला होता. "बसा. नारळाच्या दुधातले पोहे चाखून पहा. आय म्हाका फ्रेंड आयला गो.. पाहुणचार करां. मी येतोच. ताई बसा" असे म्हणत तो गेलाही. माझी उत्सुकता पार शिगेला पोचली.

"...ताई, गेल्या कित्येक पिढ्यांपासून आमच्या घराण्यातल्या मोठ्या मुलाकडे या दुर्गेचे पुजारीपण आमच्या घरात चालत आले आहे. या आवारात रहायला साधेसे घर आहे. ते तुम्ही पहातच आहात. मी मोठा मुलगा म्हणून मजकडे आलेला हा व्यवसाय आणि जबाबदारी आहे. ती मी इमाने इतबारे करतोय. मी देवीकडे काय मागत नाय. देवी माझ्याकडे काय मागत नाय. माजा बापुस दहावी झाला होता. मी बी.ए. झालो. कॉलेजमध्ये असतांनाच युवक क्रान्ती दलात गेलो. मला तिथं कोनी सांगितलं नाय की

तुंजा व्यवसाय खोटा आहे. देवीची पूजा करू नाय. एकच सांगितलं जात पात मानू नका. जन्माला येतांना धर्माचा शिक्का कपाळावर ठोकलेला नसतो. आपण फक्त माणूस असतो. बाई पुरूष सगळे सारखे.. आन् मला ते पटलं.''

''ताई आज इथंच या दुपारच्याला. जेवायला नक्की या.'' असे म्हणत त्याने समोरची केळीची पानं उचलली. नारळाच्या दुधात भिजवलेले पोहे. लिंबाचं लोणचं. नारळाच्या वड्या. असा रूचकर नाश्ता. तोही केळीच्या ताज्या पानावर. दुर्गेचे दर्शन झाले होतेच. तिच्यातली तृप्त शांती आत अंगभर पसरली होती. शांतादुर्गेच्या मंदिरातून बाहेर पडतांना मला जोगाईचे, योगेश्वरीचे मंदिर आठवले. माझे नातलग योगेश्वरीच्या निमित्ताने माझ्याकडे नेहमी येत. त्यांना मंदिरात नेणे, माझ्या लाडक्या विद्यार्थ्याला, अरूणला माझ्या पाहुण्यांना यथासांग दर्शन घडव हे सांगणे होईच. मी मात्र आत जाण्याऐवजी बाहेरच्या विशाल, उंचचउंच, लाकडी खांबावर लाकडी फळ्यांनी तक्तपोशी जोडलेल्या भक्कमपणे बांधलेल्या मंडपातल्या दगडी ओवरीवर बसे.

'शैला, अग ये ना आत देवीला काय फक्त काही मागायलाच येतो का आम्ही? किती सुरेख हेमाडपंथी बांधणी आहे या मंदिराची. चपटे दगडी चिरे एकमेंकावर विशिष्ट कोनात बसवले आहेत. ते वर चढतांना आपोआप निमुळते होत वर जातात. तिथे सुंदर कलशाकार घुमट बांधलाय ये. बघ तरी.' माझी मावशी आवर्जून म्हणाली. मी आत गेले. देवीचा लांब रूंद तांदळा होता. माथ्यावर चांदीचा इथून तिथवर मोगरीच्या कळ्यांचा आकाराचा चांदीचा गजरा माळलेला होता. कपाळावर चांदीची रेखीव चन्द्रकोर होती. तांदळा असला की ती देवी खूप आदिम... शेकडो वर्षांपूर्वीची आहे असा संकेत असतो. मी हात जोडले. त्या कोंदटलेल्या गाभाऱ्यात – गर्भगृहात क्षणभर श्वास घुसमटले. बाहेरची हवाच यायला जागा नाही. मग असे होणारच. माझ्या नास्तिक मनाला आपण काही गैर केलेय असे मात्र क्षणभरही जाणवले नाही. एकदा अशीच मी गेले असता दोन तीन मुस्लिम स्त्रिया पलिकडच्या दुकानात बुरखे ठेवून आत जातांना दिसल्या पुन्हा मनात उत्सुकता. मग प्रश्न विचारणे आलेच.

''भाभी, अरूणभैय्या हमारे वॉर्डमेसेही चुनके आये है. उनकी बहोत मदद होती है. हम हमेशा आते है. यहाँ आते तो अम्माको देवी माँ को नमस्कार करके जाते है..'' तिचे उत्तर.

...दुपार होऊन गेलेली. मला दुर्गेच्या सुरेश पुजाऱ्याचे निमंत्रण आठवले. आम्ही तिकडे गेलो. वाटेत ताशा वाजंत्रीच्या तालावर नाचत येणारा, ख्रिस्ती गोंअेकर मंडळीचा स्त्री पुरूषांचा जत्था दिसला. सुरेश सांगत होता दरवर्षी ही मंडळी एक दिवस

फुलांचा झेला... शेला घेऊन दुर्गादेवीला अर्पण करण्यासाठी वाजत गाजत येतात. एका नाचणाऱ्या मध्यमवयीन पुरंध्रीला मी विचारलेच.

'ताई आमी मुळची याच मातीतून जन्मलेली आणि याच मातीत मिसळून जाणारी माणसे. शेकडों वर्षांखालील काही पोर्तुगीज.. फ्रेंचांनी इथे तळ ठोकला. राज्य केले. लोकांना किरिस्ताव करण्यासाठी विहिरीत पाव टाकला, त्याचं पाणी जो पी तो झाला किरिस्ताव. त्यांच्या पुढच्या पिढ्यांतली माणसं आमी पन किरिस्ताव. पन ही दुर्गामायच आमची आई. माज्या आज्या पंजापासून आमी किरिस्ताव गाववाले हिला शेला चढीवतो...

माझ्या सासूजी सांगायच्या. ममदापूर पाटोद्यात मुस्लिमांचे डोले बसवण्यात, ते तयार करण्यात, त्या समोर धुंद होऊन नाचण्यात हिंदूंचा सहजपणे सहभाग असायचा. तर होळी धुळवडीत मुस्लिम सामिल व्हायचे. रझाकारांचा बिमोड झाला तेंव्हा काही संतापलेले हिंदू आमच्या गावात लपलेल्या मुस्लिमांना मारायला धावून आले. पाटोद्यातल्या सर्व हिंदुंनी त्यांना अडवले. आणि ताठपणे सांगितले ''आमच्या गावची माणसं आमची आहेत ही. आम्ही त्यांना हात लावू देणार नाही. आधी आम्हाला हात लावा... हिंमत असेल तर.' असे ठणकावून सांगितले. त्या काळात हे असे मराठवाड्यात जागोजागी घडत होते. असे जुनी माणसे सांगतात. मराठवाड्यात स्वातंत्र्य थोडे उशीरा मिळाले. निजामाच्या दडपणाखाली त्यावेळचे पाच जिल्हे असल्याने हा भाग सर्वार्थाने मागासलेलाच होता.

आज आम्ही आझाद होऊन साठ वर्षे होताहेत. क्षणाक्षणाला आमची वैज्ञानिक, शैक्षणिक, कृषीसंबंधीत झेप उंचावतेय. सामाजिक जाणीवा मात्र बोथटताहेत. धर्मजातीच्या अंध अहंगंडातून दंगे, धोपे, शिरकाण घेत होत आहे. हे असे का? आमचे 'माणूसपण' कमी होतेय का?

❑

३८

# माहेरचा खोपा

अण्णांचे शेवटचे आजारणपण जीवघेणे होते. मुळातच झुंजार पिंड असल्याने ते आजाराची फिकीर करीत नसत. डॉक्टरांनी सांगितलेले पथ्य... विशेषत: माणसांना न भेटण्याचे, न बोलण्याचे पथ्य ते पाळत नसत. आयुष्यात येऊन गेलेले अनेक उन्हाळे, हे विचित्र आजारपण, औषधांचे परिणाम, यामुळे अण्णाची प्रतिकार शक्ती क्षीण झाली होती.

अण्णा. संपूर्ण मराठवाड्यात वेढून राहिलेल्या बालाघाटाच्या डोंगरासारखा मजबूत सावळा बांधा. त्याहीपेक्षा कणखर आणि टणक मन. लेखणीही तशीच लखलखित. पण आतला गाभा मात्र गाभुळा. रसदार. अण्णांची तब्बेत विचारण्यासाठी स्वैपाकघरात काकू नाहीतर सुषमाकडे जायचे. पण जरा आवाजाची चाहूल लागली की, ‘ काय ग, शैला आलीये का?’ अशी विचारणा होई. अपराध्यासारखी उंबरठ्याजवळ जाऊन मी म्हणे.

‘अण्णा, काकूंकडे आले होते, तुम्ही विश्रांती घ्या.’ ‘अग ये, डॉक्टरनी पार पंचाईत केलीय माझी. काही होत नाही. बस’ अण्णांचे बोलणे सुरू.

‘‘द्वारकादास कसा आहे? त्याची मान कशी आहे? आमचा सबनिस काय म्हणतो? भिकाभाऊ कसे आहेत?’ माझा गोंधळलेला चेहेरा पाहून, ‘अग तुमचे राखे गुरूजी.’ मग योगेश्वरी शाळेतील जुनी मंडळी, मानवलोकचे काम, अशा वळणांनी

गाडी जाई नि शेवटी काय वाचतेच? काय लिहिते आहेस अलिकडे?'' इथे येऊन थांबे. आणि माझ्याजवळ उत्तर नसे.

गप्पांच्या ओघात स्वत: वहाणे, इतरांना वाहत नेणे, अशा ऐसपैस अण्णांना केवढी दुष्ट शिक्षा. माझ्या मनात येई पंढरपूरच्या पांडुरंगाला एकान्तवासाची शिक्षा दिली तर काय अवस्था होईल? जसा तो लेकुरवाळा तसेच अण्णाही लेकुरवाळे. मराठवाड्यातील, उभ्या महाराष्ट्रातील हजारो जणांना इथून अव्याहत पसायदान मिळे. आणि या पांडुरंगाची रखुमाईही कायम द्रोपदीची थाळी घेऊन उभी असे.

मी अण्णांच्या मायेच्या खोप्यात प्रवेश केला १९६० साली. वक्तृत्व स्पर्धा औरंगाबादेत होत्या. मी नि अशोक मोडक यांची निवड झालेली. पण बरोबर प्राध्यापक पाठवणे न परवडणारे. मग माझे वडिल म्हणाले, तू अनंतराव भालेरावांकडे जा. मी चिठ्ठी देतो. आणि मी गेले.

'अरे तू आमच्या शंकररावांची मुलगी का? वा वा बस. अग सविता...' अण्णांनी चिठ्ठी वाचून सविताला बोलावले. ती असेल दहावीत. तिला हाक मारण्यातून, तिची ओळख करून देण्यातून लेकीविषयीची अपार माया आणि अभिमान मला जाणवला होता. बाप आणि लेकीचे गहिरे नाते असते. ते शब्दांपल्याडचे असते. ते लेकींनाच उमगते.

तेव्हाचे ते मिणमिणते औरंगाबाद. डोंगरदऱ्या पार करत पोचावे तशी गाठलेली सन्मित्र कॉलनी. तिथे अण्णा भेटले. कुटुंब वत्सल. अतीव आपुलकीने भरलेला, खास मराठवाडी वळणाचा सरळसोट आवाज. ऋणानुबंध जुळला. लोहियाशी लग्न करून मी मराठवाड्यात आले. त्याचे 'गॉडफादर' बापू काळदाते पण अण्णा मात्र माझे माहेर होऊन भेटले. त्यांचे पितृवात्सल्य माझ्याही वाट्याला आले. लग्नापूर्वीच मी माहेरचा खोपा शोधून ठेवला होता.

मराठवाड्यातील पुरोगामी व्यक्तींना, चळवळींना दैनिक मराठवाडा आणि अण्णा यांचा हक्काचा आधार होता. धुळे, जळगाव, नासिक हे जिल्हे लागूनच. प्रत्येक जिल्ह्याचे घर, चूल, अंगण वेगळे. पण आमच्या मराठवाड्यात मात्र तसे नाही. परभणीकरांना लातूर, बीड आपले वाटणार तर नांदेड, उस्मानाबाद, औरंगाबादकरांना लातूर, बीड, परभणी, हिंगोली आपले वाटणार. भलेही चुली वेगळ्या असोत. पण घर आणि अंगण एकच. या परिसरात एक 'मिळालेपण' आहे. ही मानसिक एकात्मता रझाकार विरोधी चळवळीने पक्की केली असावी. स्वातंत्र्योत्तर काळात ती टिकवून धरण्याचे काम मराठवाडा दैनिकाने, अनंतराव... गोविंदभाई, बाबासाहेब परांजपे

आर्दीनी केली. नामान्तर चळवळीतली गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव या पुरोगामी जीवन जगणाऱ्यांनी घेतलेली भूमिका म्हणजे 'मराठवाडा' म्हणून एकमनाने लढलेल्या मनाचा प्रामाणिक कौल होता.

कितीही घाई असली तरी आंब्याला आल्यावर ते घरी येत. लिहित जा. असे सांगत. बेशरमाची झाडे, वाहत्या वाऱ्यासंगे ही सदरे लिहून मी सुरूवार केली. ह्याला ते 'द्वारकादास' म्हणत. आणीबाणीत नासिक जेलमध्ये १५०० राजकैदी होते. तिथे अण्णांची भर पडली नि अनेकांना दिलासा मिळाला. अण्णा कॅरम अप्रतीम खेळत. गोटीवरची नजर दृढ करीत. स्ट्रायकर मारता मारता ते तऱ्हेतऱ्हेचे चुटके सांगत. उर्दू शेर सांगत. अण्णा म्हणजे चालता बोलता संदर्भकोष होता. उर्दू जणू मातृभाषाच. आणि इंग्रजीवर प्रभुत्व. अण्णांच्या लेखणीला रझाकार चळवळीत धुमसणाऱ्या वादळाची धार होती. तिची अनेक रूपे. अन्यायाविरूद्ध आगीची बरसात करणारी तर कधी खाजकुयरीच्या बियांसारखी गुदगुल्या करत बेजार करणारी. कधी इतकी ऋजू की येशूख्रिस्ता समोरची मेणबत्ती उग्र वाटावी. या लेखणीवर मराठवाड्यातील लोकांनी नेहमीच प्रेम केले. 'मराठवाडा' आणि अण्णा जणू एकच.

अण्णा 'स्वातंत्र्यातल्या तुरूंगवासा'वरही दिलखुलासपणे बोलत. होमीजी तल्यारखान प्रकरणातल्या तुरूंगवासाबद्दल बोलतांना आत्मप्रौढी नसे.

'आणीबाणी' पूर्वीच आम्ही नवा रस्ता शोधला होता. रचनात्मक संघर्षाच्या भूमिकेतून धडपडणाऱ्या मानवलोकबद्दल त्यांना आस्था होती. त्यांच्या उबदार घरट्यात मलाही जागा होती. आज अण्णा नाहीत. सोबतीला आहेत त्यांच्या आठवणी. सदैव ताजी अशी ग्रंथ संपदा. आणि त्यांच्या गोतावळ्यात आपणही एक आहोत याची सुखद जाणीव.

❑

३१

# जून महिना आला की...

जून महिना आला की गुरूजींची आठवण येते. त्यांच्या सहवासात घालवलेले काही क्षण पुन: पुन्हा आठवतात. त्या वेळी त्या सहवासाचे मोल कळण्याचे वय नव्हते. दहा वर्षाची होते मी. माझे वडिल स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेसमधील समाजवादी गटाचे अनुयायी. डॉ. राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण, युसुफ मेहरअली, एस्.एम्. जोशी यांच्या विचारावर त्यांची विशेष श्रद्धा. पू. सानेगुरूजींची समाजवादावर निष्ठा. ही सर्व मंडळी व्याख्याने, बैठकीच्या निमित्ताने पश्चिम खानदेशात,...धुळे जिल्ह्यात आली की घरी येत. आमचे घर खानदेशातील समाजवादी विचारांचा दिलखुलास थांबा... अड्डा होता.

...गुरूजींची संध्याकाळी सभा होती. हॉलमधल्या खिडकीजवळच्या लाकडी कॉटवर ते विश्रांती घेत आडवे झाले होते. डोळा लागला होता. कॉटशेजारच्या पाळण्यात माझा सहा महिन्यांचा भाऊ झोपला होता. तो उठलाय का ते पाहण्यासाठी आईने मला पाठवले. तो उठला होता. हात पाय हालवून छान खेळत होता. त्याला उचलायला गेले तर त्याने घाण केली होती. मी दहा वर्षांची. माझ्यापाठी सोडे नऊ वर्षांनी झालेला भाऊ. मला ती घाण काढून साफ करायची किळस वाटली. मी पाळण्याजवळ गेले. घाण वास येत होता. मी जवळ ठेवलेल्या पिशवीतील जाडसर पांघरूण काढले नि त्याच्या अंगभरून टाकले. परत मधली गच्ची ओलांडून स्वैपाकघरात येऊन खेळत बसले. पण माझे मन मला खात होते. आई गुरूजींच्या

सभेची तयारी कुठवर आली हे पहाण्यासाठी गेली होती. मला चैन पडेना मी पण हॉलमध्ये गेले. तर काय...

...गुरूर्जीनी छोट्या भावाला कॉटवर ठेवले होते. जवळच्या थर्मासमधले गरमपाणी घेऊन मऊ कापडाने त्याची शी पुसून, त्याला छान पावडर लावून, लंगोट घालीत होते. त्या क्षणी मला स्वत:ची लाज वाटली. दुसऱ्या दिवशी सार्वजनिक संडास सफाईचा कार्यक्रम नागरिकांच्या सहकार्याने करण्याचे राष्ट्र सेवा दलाने ठरविले होते. त्यात मीही हिरीरीने सामील झाले. मी दहा वर्षांची होते. पण एक नवे शहाणपण मनाने गोंदवून घेतले. साने गुरूजी, राष्ट्र सेवा दल हा माझा 'प्राण' आहे असे म्हणत. त्याचे मर्म मात्र आज जाणवते.

त्याच वर्षीची जून मधली दुसरी घटना. आम्ही मुंबईला माझ्या आजोळी आलो होतो. माझे पिताश्री मला साधना साप्ताहिकाच्या ऑफिसमध्ये घेऊन गेले होते. साने गुरूजी तिथे होतेच. त्यांनी लहानमुलांसाठी लिहिलेल्या गांधीजींच्या गोड गोष्टींचे सापडले ते सहा भाग मला दिले. सगळ्यांशी गप्पा मारून माझे वडिल मला घेऊन परत विलेपारल्याला आले. नंतर दोनच दिवसांनी सकाळच्या दैनिकात ती दु:खद बातमी आली. पू. साने गुरूर्जीनी आपली जीवनयात्रा आपणहून संपवली होती.

आई, श्यामच्या आईच्या गोष्ट आम्हाला सांगायची. नंतर मी ते पुस्तक स्वत: वाचले. वाचता वाचता अनेकदा डोळे भरून आले. नंतर १४/१५ च्या किशोरवयात गुरूर्जीनी लिहिलेले साहित्य,.. यती की पती, दु:खी, पत्री हा काव्यसंग्रह, सुधा या पुतणीस लिहिलेली सुंदर पत्रे... हाती येईल तसे वाचून काढले. पुढे मराठी वाङमयाचा अभ्यास करतांना त्यांच्या साहित्या बद्दलची समीक्षाही वाचली. साने गुरूजी हे रडके, कल्पनेच्या आधाराने 'स्यूडो' उसनी भावनात्मकता निर्माण करणारे, आभासात्मक संवेदनशील साहित्य 'पाडणारे' लेखक होते वगैरे. पण मी नेहमीच वैचारिक पातळीवर, तर्कांच्या आधारे त्या समीक्षेला विरोध केला.

'आदर्शवाद' ही स्वातंत्र्यपूर्व काळातील सद्भावी समाजमनाची श्रद्धा होती. १९६० नंतर प्रखर वास्तवाचे भान समाजाला आले. ते विविध कलांच्या माध्यमातून प्रकटू लागले

...आज गुरूर्जीना आपल्यातून जाऊन साठ वर्षे होत आली आहेत. परंतु 'श्यामच्या आईचा' ताजेपणा, त्यातल्या शब्दाशब्दांतून कुमारमनावर पडणारे संस्काराचे कवडसे आजही खूप चेतना व प्रेरणा देणारे आहेत. आणि भविष्य काळातही देत रहाणार आहेत...

❑

४०

# हे विठूराया

'सूनबाई, हाईस का घरात' अशी हाक घालीत यमुना मावशी  फाटक उघडून ओंट्यावर येऊन बसल्या. यमुना मावशी ही गावकडच्या वाड्या शेजारी खोपटात रहाणाऱ्या सुभान वारकाची माय.

''बरं झालं माय. घरी सापडलीस. ममदापुरातून फाटेच निघाले. इथवर येईतो सूर्व्य डोंगर चढून वर आला. तुजी साळा असंल नव्हं? आता सहा कोस चालाया दोन चार घंटे हवेच. आंदी पानी आन. मगं माजं काम सांगते.''

यमुना मावशी समोर पाण्याचा तांब्या आणि चहाचा कप ठेवला.

'माय, काचेच्या कोपात नको पितळी नायतर इस्टिलच्या ताटलीत दे. माजी मैतरिण – तुझी सासू खर्चली तवा पासून तिची आठवण म्हणून पितळीतच चा पिते. तू दे आता इस्टिलची ताटली. तिला जाऊन बी झाली चार वरसं. दोघींचा नाद होता. पंढरपुराची वारी बरूबर करायची... ती तर गेली.' असे म्हणत मावशी तांब्या घेऊन ओट्यावर आल्या नि एका हाताची ओंजळ करून तांब्यातलं. पाणी पिऊ लागल्या.

'मावशी पेला दिलाय. तोंड लावून आरामात पाणी प्या.'

''खरंय ग. पन आमी वारिक. तुज्या सासूची आन् माझी लई दोस्ती. पांदीला जाऊन आलो की कंदीकंदी माज्या खोपटा समूर ती बी टाकायची. तिथंच हातपाय धुवायची. माज्याकडे शेळ्या होत्या. निक्या दुदूचा चा दिला की पितळीतून प्यायची. मी बी तुमच्या वाड्यात चा पियाची. पन कप मातुर येगळा असे. थोरली काकी घरात होती.

तिला नाय चालायचं. न्हाणीत जाऊन पानी मातुर असंच प्यावं लागे. तीच सवय लागली. देसमुखाची हरणाबाई, बामणाची शकाबाई.. आमी समद्या मैतरणी.. लई याद येते. ते जाऊंदे माज काम ऐक.'' असे म्हणत त्या सांगू लागल्या. त्यांना पंढरीच्या वारीला जायचे होते. वाघोळ्याची बायामाणसं वेगळा गट करून वारीला निघणार होती. आसपासच्या खेड्यातले स्त्री पुरूष त्यांच्या गटात सामील होणार होते.

'सूनबाई, लई दिसांपासून घोकतीय. पन सुभान्या नि त्याची कारभारिण मनावर घेईनात. माजे बी किती दिस ऱ्हाईले ग? म्हनून या सुनेकडे आले. बरा आहे शिरीहरी? मला पन्नासशंभर रुप्ये देशील? वाटेत दानापान्याला लागतील. अग तुमा वाण्याबामणाच्या देवा परिस आमचा काळा इठूबा समद्या गोरगरिबांचा हाय ग. त्यो काई मागत नाही. ही बघ तुळसीची माळ. नि यकादस. हितून हात जोडले तरी त्याला आपलं मन कळतं. पन यंदा लईच जाऊ वाटतंय गं. बघ बाई... असं म्हणत यमनामावशी गप्प बसल्या.

त्यांचा विश्वास मी कसा फुकट जाऊ देईन? आज यमनामावशी नाहीत. आषाढातल्या दिंड्या बघितल्या. हजारो स्त्री पुरुष न थकता, जे मिळेल ते खाऊन, ऊन, धो धो पाऊस झेलत चालतांना पाहिले की मनातले श्रद्धा अंधश्रद्धांचे वाद... गोंधळ शांत होतात आणि यमना मावशींची आठवण येते. शाळेत शिकताना एक वाक्य मनात ठसले होते. We walk by faith not by sight. श्रद्धेने जगी चालतो न बहुधा, दृष्टीमुळे मानव.

आध्यात्मिक समतेचा विचार सामान्य माणसांच्या मनात पेरणारा, अंकुरवणारा सावळा विठोबा गेल्या शेकडो वर्षांपासून सामान्यांना, ...आर्थिक, जातीय धार्मिक भेदाभेदांच्या भिंती फोडून जगण्याचं बळ देतो आहे. त्याची उत्पत्ती, त्याचा इतिहास, तो नेमका कुठून इथे आला वगैरेवर संशोधक अभ्यासक करत आहेत. करत राहतील. पण गेली शेकडो वर्षे अव्याहतपणे चालणाऱ्या दिंड्या, वाऱ्या, वारकरी संप्रदाय यांच्यातील ऊर्जा, ताजेपणा कणभरही विटलेला नाही आणि उणावेल असे ठामपणे वाटत नाही.

परवा औरंगाबादहून येताना एक दिंडी दिसली. बरीच मोठी होती. इथे तीस टक्क्यांची अट नसल्याने निम्म्याहून जास्त महिला होत्या. सगळे सकाळच्या नाश्त्यासाठी त्या लहानशा गावात थांबले असावेत. त्या गावाने ती सोय केली होती. बायांना पुढे बसवले होते. गळ्यात टाळ अडकवलेला पँटविजारीतला एक तरुण बोलत होता. उत्सुकतेने गाडी बाजूला उभी केली.

'हये बगा, आया बहिर्णींना आधी खाऊ द्या. मायबहिर्णींनो उस्ट टाकू नका. अन्न हे पूर्ण ब्रह्म असतं. पलिकडे एक टोपलं ठेवलंय. त्यात कागदाचा बोळा टाका. हितं तिथं टाकू नका. गाव वाल्यांनी आपल्या दिंडीला नाश्ता दिलाय. आपल्या भागातल्या पंचायत समितीत निवडून आलेल्या शमावैनी चार दिवस आपल्या बरोबर दिंडीत चालनार आहेत. त्या गावाच्या वतीने तुमचे आभार मानतील. आन् मग दिंडी पुढे सरकेल. पान्याची टिपं ठेवलीत. न सांडता आपआपल्या तांब्यात पाणी घ्या. चला...'

मी ते पाहिले आणि २१व्या शतकातल्या काळा सोबत चालणाऱ्या दिंडीचे दर्शन घेतले. न कळत त्या दिंडीला हात जोडले.

या दिंड्या, वारकरी संप्रदाय, त्यातील विचार म्हणजे चालत्या बोलत्या, बिनभिंतीच्या पाठशाळा आहेत. सावळा विठ्ठल, त्याच्या भोवती सतत भिरभिरणारी समता विचाराची, सांस्कृतिक एकात्मतेची वलये. काल होती. आज आहेत आणि उद्याही राहतील. विठूराया ही सामान्य माणसाची 'स्वप्नभूमी' आहे. तिने चोखामेळा, जनाबाई, सावतामाळी, संन्यास त्यागून संसार करणाऱ्या विठ्ठलपंतांच्या... समाजाने टाकलेल्या त्यांच्या चार मुलांना, तुकोबाला... अनेकांना समर्थपणे निरभ्र जीवन जगण्याचे बळ दिले. एकनाथांसारखा ब्राह्मण कुळात जन्मून 'संस्कृत देवें केली प्राकृत काय चोरापासौनि आली?' असा खडा सवाल ब्राह्मण पंडितांना विचारणारा व 'भागवत' मराठीतून लिहिणारा लोककवी महाराष्ट्राला दिला.

...हे विठूराया तुला सर्वांचे, आमच्यासारख्या नास्तिकांचे दंडवत.

❑

४१

# फुलता मळा सतत बहरत राहो.

१९६८-७२ च्या काळातले दिवस. स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात मी नव्यानेच रुजू झाले होते. मी मराठी वाङ्मयाचे समीक्षक आणि चिकित्सक समीक्षेचे अभ्यासक वा. ल. कुलकर्णी, डॉ. सुधीर रसाळ, डॉ. प्रभाकर मांडे, प्रा. पानतावणेसर यांचे तास... प्रत्यक्ष अनुभवण्याचे भाग्य, वा. ल. कुलकर्णींच्या सहृदयतेमुळे अडीच तीन महिने मला लाभले. लेखनाची आवड शाळेपासून होतीच. पण अर्थशास्त्र हा विषय इंग्रजीमधून घेऊन बहिस्थ विद्यार्थी म्हणून मार्गदर्शन मिळणे अंबाजोगाईच्या योगेश्वरी महाविद्यालयात शक्य नव्हते. अशावेळी माहेरी गेले असतांना माझ्या लेखनावर प्रेम करणारे प्रा. म. वि. फाटक यांनी मला बजावले "चुकलेलं कोकरु परत कळपात येऊ दे. मराठी विषयात एम. ए. कर. वा. लं. ना माझे नाव सांग." मग गाडी वळणावर आली १९६६ ला प्रथमवर्गात उत्तीर्ण झालेलो आम्ही तिघेच. आणि मी एकटी बहिस्थ. १९६८ च्या दिवाळी नंतर महाविद्यालयात शिकविण्याची संधी मिळाली. भरून आणलेले आषाढ धन. वर्षावायला आसुसलेले. तशीच मी. अवघे ज्ञान, अनुभवांना सोप्या शब्दात विद्यार्थ्यांवर बरसण्याची उमेद. वयही तरुणाईचं. आणि समोर अत्यन्त उत्सुक विद्यार्थी. भास्कर चंदनशिव, रामा मुळे सारखे. तेव्हा मराठी घेणारे विद्यार्थी बरेच असत. व्यावसायिक दृष्टिकोनातून भाषा विषयांकडे पाहण्याची नजर विद्यार्थ्यांच्यात आली नव्हती. हिंदी, मराठी आणि इंग्रजी या विषयांना अनेक विद्यार्थी असत ते नियमित आणि मनाची ओंजळ जुळवून येत.

...भास्कर. वयाच्या मानाने काहीसा पौढ घनगंभीर चेहेरा. तीक्ष्ण, खोलात शोध घेणारे, विचार मग्न डोळे. जे मला ऊर्जा देत. मला जे जे ज़ाणवलं, मी अनुभवलं ते साहित्यविषयक सारं या सर्वांना सांगावं असं मला वाटे. प्रत्येक तास जणू सामूहिक नव निर्मितीचा असे..भास्कर, रामा, त्यांचे बंधू, इतरांची नावे स्मरणात नाहीत; पण ते प्रश्न विचारीत. हे असे कां, या मागे मानसिकता कोणती असे प्रश्न असत. ते दिवस सुरंगीच्या सुगंधी फुलांसारखे. गजरा सुकला तरी सुगंध देणारे. नेहमीच आठवणारे.

भास्करचा हात त्याच काळात लिहिता झाला. 'जांभुळडोह' हा त्यांचा पहिला कथा संग्रह. भास्कर कळंब जवळच्या लहान खेड्यातला. अल्पभूधारकाचा मुलगा. भवतालचा परिसर, माणसे, त्यांचे दैनंदिन जगणे यांचे केवळ उत्सुकतेपोटी नव्हे तर 'त्यांच्यातलाच एक' या नात्याने चिकित्सकपणे न्याहाळणे. मनाच्या संवेदनक्षम टीपकागदावर टिपून घेणे. हा त्यांचा स्थायीभाव झाला. केवळ ग्रामीण भाषा, परिसर, त्यांचे प्रश्न... असा वरवरचा बुरखा न पांघरता त्यांची कथा जणू त्या जीवनाचा जिवन्त, झळझळीत तुकडा तळहातावर मांडावा इतक्या प्रत्यकारीपणे समोर येई. आकाराने लहान पण अंधारातल्या जगण्याचा वेध घेणारी, ठाव घेणारी कथा अशावेळी भाषेचा शोध घ्यावा लागत नाही. ती स्वतःच्या अनुभवाचे रूप घेऊन साकारते. साक्षात् होते.

'वाळवी' ही कथा 'प्रतिष्ठान' या मराठवाडा साहित्य परिषदेच्या मुखपत्रात १९७१ साली प्रकाशित झाली. महाविद्यालयीन जीवनापासून ग्रामीण जीवनाचा अस्सल बाज त्याच्या कथांतून जाणवू लागला. मराठवाड्याच्या कपाळावर लिहिलेला, सातत्याने दर चार पाच वर्षांनी येणारा दुष्काळ. ओस पडत जाणारी खेडी, या परिसरातल्या अस्सल शिव्या, या भागातील स्त्री पुरुष... त्यांचे प्रश्न जनावरे... जमीन... शेती या साऱ्यांचे प्रखर चित्र त्यांच्या कथांतून जाणवते. 'मरणकळा' हा त्यांचा दुसरा कथा संग्रह. मृत्यूची कळा, केवळ व्यक्तींच्या नाही परिसरावरच घारीगत घिरट्या घालणारी. इथल्या शेतकऱ्यांचे, विशेषतः कोरडवाहू अल्पभूधारकांचे प्रश्न घेऊन 'अंगार माती' हा कथा संग्रह समोर येतो...

प्रा. भास्कर चंदनशिव. मराठवाडी मातीचे अस्सल रंग, गंध, स्पर्श, रूप, अवकाश ज्यांच्या कथेतून साकारते असे समर्थ लेखक. माझे विद्यार्थी. त्यांनीही आज साठीचा उंबरठा ओलांडला आहे. पुण्या मुंबई, औरंगाबादच्या 'लेखकु मांदियाळीत' सामील न होता कळमला घर बांधले आहे. आपल्या मायबाप वडीलधाऱ्यांचा सन्मान ठेवा. आपण त्यांच्या खांद्यावर उभे आहोत. ही जाणीव ते आपल्या व्याख्यानांतूनही देत असतात. माझी आणि त्यांची गेल्या कित्येक वर्षात भेटही नाही. पण बातम्या, कथा

यांतून भेट होतेच. आणि आपले विद्यार्थी ही आपली अनमोल ठेव. बँक बॅलन्स असते. ते नाते निरामय असते. त्यांना चिरंतन शुभेच्छा. हा फुलता मळा सतत बहरत राहो त्यांना चिरंतन शुभेच्छा.

❑

# ४२

## धोबीका कुत्ता...

''ताई मला कामच द्या. माझ्या दोन मोठ्या... वयात असलेल्या लेकी घेऊन दिलासाघरात राहायला संकोच वाटतो. जवळच एखादी पत्र्याची खोली घेऊन राहते. मोठी दाहावीत आहे. धाकटी आठवीत. दोघी जवळच्या झेड्पीच्या शाळेत जातात... सांगाल ते काम करत.'' सुमन सांगत होती. तिचा नवरा दुसऱ्या बाईच्या आणि बाटलीच्या नादी लागला आहे. तो परळीच्या डाळीच्या कारखान्यात काम करतो. डाळी तयार करण्यात प्रवीण असल्याने मालक सोडत नाही. पगारही बऱ्यापैकी आहे. तिथे हाताखाली काम करणाऱ्या, नवरा नसलेल्या एका बाईच्या नादी लागलाय. अलीकडे सुमनला, दोन्ही लेकींना सतत मारहाण करी. सुमन तेथेही धुणीभांडी करीत असे. तिला मिळणाऱ्या पैशांवरही नवऱ्याचा डोळा असे. शेवटी हताश होऊन ती इथे आली. संस्थेच्या मेसमध्ये काम करू लागली. भावांना वाटे सुमनने त्यांच्याजवळ रहावे. जे मिळेल त्यात सर्वांनी भागवावे. पण सुमाला ते पटले नाही.

'ताई, कायम माघारी आलेली नणंद भावजयांना बोचणारच की. त्यांची वानीकिनीची दोन लेकरं, उद्या ती मोठी व्हायची. त्यांच्या शिक्षण, कपड्यालत्त्याचा खर्चा. त्यात आमची तिघांची भर कशाला? दोघं भाऊ वाड्यातच वेगळे रहातात. मोठ्याकडे माय रहाते. वडील मागेच खर्चले. ते एक परीन बरंच झालं म्हणायचं. आमी रहावं तरी कोणाकडं? गांजव्याचा अर्धावाडा वडलांनी विकला, धा एकर जमीन बी विकली तवा कुठे आम्हा तीन बहिर्णींना घराबाहेर काढता आलं. सोभाव चांगलाय. दोन पोरी झाल्यावर पोरासाठी हट्ट धरला नाही. माजं आपरीसन करुन घेण्यासाठी माझं

मन तयार क्येलं. पन या डाळीच्या कारखान्यात आल्यापासून बाबाचं मन चळलं. बिथरलं. त्या इधवाबाईच्या नादी लागल्यात. अशात लईच माराया लागलेत. पोरींनाबी मारत्यात. पोरी हुशार हाईत. दिसाया चांगल्या हाईत. म्हणून तुमच्यापासी आले... आता भावाच्या दारात जायाला नको आन् त्यांचं मार खाणं बी नग. काम केल्यानं शरीर कमी होत नाही. दोन गोष्टी सोडून काय बी केलेलं वाईट नसतं.

...हितं तुमच्या छायेखाली इज्जतीने राहू. पोरी साळा शिकल्यात. मशीनवर कपडे शिवाया बी शिकत्याल. मंग कसं?

आणि सुमन इथेच राहिली. महिना हजार रुपये स्वयंपाकाचे. मुली धुणंभांडी करून मग शाळेत जातात. त्या चारशे रुपये कमवून आणतात. आणि सुमन संस्थेच्या मेसमध्ये काम करू लागली. दुपारच्या विश्रांतीच्या वेळी ती पेपर वाची. तिचे ते नियमित पेपर वाचणे पाहून मी एकदा विचारलेच. तिचे शिक्षण किती झालेय.

'ताई मी नववी पास आहे हो. पन शाणी झाले म्हणून बापाने त्याच्या मामे बहिणीच्या मुलाशीच माझं लगीन लावून दिलं. अनिताचा बाप पहिले चांगला वागायचा. आमाला शेतीवाडी न्हाई. पन लोकाच्या शेतात काम करी. मी पन काम करीन. अनिता जलमली. दोन वर्षांनी सुनिता झाली. दोन मुलीवर आपरीसन केलं की सात हजार रुपये मिळतात म्हणून ते केलं. म्हणत आपल्याला काळीत रान नाही. पांढरीत... गावात आहे ते पडकं मोडकं घर. लातुरात जाऊन डाळीच्या कारखान्यात काम पाहिलं. मालकाकडे मी काम करी. बरं चाललं होतं. मालकाच्या मेहुण्यानं परळीत डाळमिल काढली. मालकांनी थोडा पगार वाढवून तिथं पाठिवलं. तिथ पन चार पाच वरिसं बरी गेली. पन हाताखाली काम करणाऱ्या त्या ढालगज बाईनं काय जादू क्येली की. मला कळलं तवा लई दुक झालं. पन वाटलं पोरी मोठ्या झालेल्या. नवरा सोडून जानार तरी कुठे? पन दारुचाबी नाद लागला. पैसे त्यातच जाऊ लागले. मग मला मारहाण कधी पैशासाठी तर कधी तिखट... मटन खाऊ घाल म्हणून. अनिताच्या मैत्रिणीच्या आईनं सवस्थेचा पत्ता दिला हिते आले.

...ताई, हितं कित्येक वरिसांनी निवान्तपना मिळतोय आता जुनी वाचण्याची हौस भागवतेय. दुसरं काय...! ...हितं माज्यासारख्या अनेक बाया येतात. त्याच्या कथा माज्या सारख्याच. ताई, बापानं पैसा खर्च करून लगीन लावून दिलं. पन पैसा कुनाला मिळाला तर सासऱ्याला. तो चार दिवसात संपला. सिकले असत्ये तर मास्तरीण तरी झाले असते. लगीन झालेल्या आडाणी बाईची गत धोब्याच्या कुत्र्यासारखी. धोबी का कुत्ता न घरका ना घाटका...!

❑

# ४३

# संक्रांत... प्रकाशपर्व

जानेवारीत थंडीचा काटा अंगावर मोहरत जातो. संध्याकाळच्या सावल्या गडद होऊ लागल्या की, जागोजागी शेकोट्या पेटू लागतात. ज्यांना अंगभर कपडे, लोकरीचे उबदार स्वेटर असतात, त्यांना या शेकोट्यांची गरज कोणती? अशांसाठी 'कॅम्प-फायर' ही आनंदाची पर्वणी. सहलीची हवा याच दिवसांत लहरु लागते. मग शेकोटी, हात शेकत गाणी, नृत्य, खेळ आलेच. पण जिथे अंगभरून कपड्यांची वाण असते, तिथे शेकोटीची ऊब घेत रात्र जागवावी लागते.

डिसेंबर अखेरच्या थंडीतच काटेरी हलव्याची याद येऊ लागते. अलीकडे पैसे टाकले की, काटेरी हलवा मिळतो. पण पंचेचाळीस-पन्नास वर्षांपूर्वीच्या संक्रांतीची आठवण दर वर्षी मनातून उजळतेच. स्वत: हलवा तयार करून तो सुरेखशा नक्षीदार कागदी डब्यातून गुरुजन, मित्र-मैत्रिणींना वाटण्याचा केवढा उत्साह असे! मग एक नाक मुरडून, हलक्या आवाजातील कुजबुज पण...

'त्या मिनूच्या हलव्याला काटाच फुटला नाही. गोलमटोल ती तसाच हलवाही.'

'नुसती अभ्यासात हुशार. पण छान हलवा कुठे जमतोय? नि पोळ्यांचे तर आशिया-आफ्रिकेचे नकाशे.'

'उषीला आई नाहीये ग. पण घरचं सगळं आवरते. तिच्या हलव्याला इतके सुरेख नि नाजूक काटे आलेयत, आणि अग खसखशीवर केलाय हलवा.'

जानेवारी लागण्यापूर्वी आईमागे भुणभुण सुरू होई. छोट्या बादलीतली चिमुकली शेगडी, त्यावर स्वच्छ तवा, हलवायला दोन शुभ्र, तलम, सुती फडकी, असा

जामानिमा आई... काकी... वहिनीकडून करून घ्यायचा नि मग मी हलवा स्वत: केलाय म्हणून मिरवायचे. वयाची पासष्टी गाठली की, जुन्या आठवणी गाभुळल्या चिंचेगत मिष्ठास होत जातात आणि त्या चोखून चोखून आठवाव्याशा वाटतात...

आमच्या घरात देवघर नव्हते. आजोबा असेपर्यंत आणि पुढेही खाण्यापुरते सणवार होत. म्हणजे होळीला पुरणपोळी किंवा गणेशचतुर्थीला उकडीचे मोदक वगैरे. पण माझ्या हट्टाकरिता आईला संक्रांतीचे हळदी-कुंकू करावेच लागे. मग वस्तू पण लुटाव्याच लागत. घर समाजवादी. आल्या-गेल्यांचे. सदा माणसांनी बहरलेले. सगळ्यांच्या घरी जाऊन बोलावणी करण्याचा दांडगा उत्साह. एका बाबतीत मात्र आई ऐकत नसे. साखर, तांदूळ, डाळ, शेंगदाणे किंवा निवडलेल्या भाज्या या वस्तूच ती लुटायला आणी. काचेच्या वा प्लॅस्टिकच्या वस्तूंना तिचा सक्त विरोध असे. मी मोठी होऊ लागले आणि तिचे नि घराचे वेगळेपण उमजू लागले. हळदी-कुंकवाच्या वाट्या ठेवण्याऐवजी गजरा, अत्तर, तिळगुळाच्या दोन घसघशीत वड्या किंवा लाडू यावर तिचा भर असे. जिला हवे ती आपण होऊन कुंकू लावून जाई. पण मग आग्रहाने बोलावलेल्या काही महिला संकोचून पण आवर्जून येत. त्यात वडील नसलेल्या सुमनची आई असे किंवा नवऱ्यापासून दूर राहून धनसिंगला वाढवणाऱ्या परदेशीभाभी पण असत.

त्या अदमुऱ्या दह्यासारख्या तेरा चौदाच्या वयात मनात अनेक प्रश्न उगवत. हळदी-कुंकू फक्त नवरा जिवंत असलेल्या बायकांसाठीच का? वाणही त्यांनाच का द्यायचे? वाण म्हणजे काय? वसा म्हणजे काय? कालपर्यंत नवरात्रात मला आपटे आजी 'कुमारिका' म्हणून जेवायला बोलवीत. माझ्या हाताच्या मनगटावर चंदनाची उटी लावीत, मला आटवलेलं दूध देऊन फळे, सुकामेवा देत. मग त्या वर्षी मात्र मला 'कुमारिका' म्हणून का नाही जेवायला बोलावले? ...? ... ?

हे प्रश्न जणू त्या काळात माझ्या मनात खोल खोल रुजले. गोंदले गेले. जणू त्यांचे आदिबंध बनले. ते मला नेहमीच सतावीत राहिले. त्यातूनच माझ्या मनाच्या दिशा उजळत गेल्या. क्षितिजे प्रकाशत गेली, विस्तारत गेली. शब्दांनाही पंख फुटून भरारण्याची ऊर्मी मिळाली.

...नवे वर्ष येतच असते. तशीच संक्रांतही येते. या संक्रांतीने सर्वांच्या मनात, लेकी-सुनांच्या मनात प्रश्नांकुरांचे काटे फुलावेत. त्या प्रश्नांची उत्तरे शोधित प्रकाशपर्वाकडे वाटचाल आपण सगळेच करुया.

❑

## ४४

# अनाघ्रात समुद्रानुभव...

त्याचे पहिल्यांदा पाहिलेले रूप. नितान्त नीरव. निळसर राखाडी रंगाची किनार, उत्तर दक्षिणेकडे नजर पोचेपर्यंत पसरलेली. पश्चिमेलाही नजर हरवून जाईपर्यंत गडद होत जाणारा राखाडी रंग. आणि पूर्वेकडे झाडांत लपलेली कौलारू घरे. भोवताली हिरव्या झाडांची, नारळी पोफळी, चिकू, जामून यांची दाटी. तेव्हा मी असेन सहा सात वर्षांची. तेव्हापासून त्याचे रूप मनात ठसले. त्याची तऱ्हेतऱ्हेची रुपे न्याहाळण्याचा छंद लागला.

उंबरगावला माझ्या आत्याचे दुमजली कौलारू घर होते. समोर भले मोठे अंगण. त्यात दोन बाजूला चिकूचे चक्क वृक्ष. पायऱ्या चढून गेले की लांबलचक व्हरांडा. मग बैठक. भला मोठा पितळी कड्यांचा झोपाळा. घरातल्या कर्त्या पुरुषाची... काकांची खास बैठक. मधल्या खोलीतही झोपाळा. थोडा लहान. त्यावर घरातल्या स्त्रिया हुश्श करून विश्रांती घ्यायला बसणार. संध्याकाळी त्यावर राज्य असायचे लेकीबाळी, मुलांचे. उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोळी आले की मला वेध लागत उंबरगावचे. मी नि पप्पा उंबरगावला जात असू. सकाळ संध्याकाळ समुद्रावर फिरायचे. भरती ओहोटीची आंदोलने डोळाभर पहायची. सुरूच्या घनदाट झाडीच्या मध्यातून मऊसूत वाळूतून, हातात चपला घेऊन पळायचे. एखादे दिवशी नावेतून खाडी ओलांडून नारगोळला जायचे. अर्थात बोट पलीकडच्या किनाऱ्याला लागे पर्यंत तोंडात राम... राम. देवाचे नाव. एक दिवस घाबरलेल्या मला आत्या म्हणाली ‘अग नावाडी वाकबगार असतात.

नाव उलटली तरी वाचवतात. अन् घाबरायचं कशाला? मी तुला रामरक्षा शिकवते. भीती वाटली की म्हणत जा. तुझी आई नि पप्पा तुला काय शिकवणार रामरक्षा? संध्याकाळी शुभंकरोती म्हणशील तेव्हा माझ्या जवळ ये.' आणि मी रामरक्षा शिकले. आत्याबाईचे ५०० एकराचे आंब्याचे वाडीचे शेत गुजरातेत होते. कडेनी वाहणारी खाडी. प्रत्येक आंब्याला काका; आत्याबाई पासून ते लेकरंबाळं, मामा, मामी सगळ्यांची नावे देत. उन्हाळ्यात घरी आंबे आले की सांगत 'शैला हा तुझ्या बापाच्या नावाचा' 'मामावाळा हापूस'. खा.' त्या शेतात पुढे टीव्हीवरच्या रामायणाचे शुटींगही झाले. तेंव्हा घर महाराष्ट्रात होते आणि शेत गुजरातेत. गेल्या ५५/५८ वर्षांत उंबरगाव बदललेय. व्यापारी शहर झालेय. ...पण नीरव, सुशांत समुद्रकिनारा, रसदार चिक्कू, तांदळाची भाकरी, मेतकूट भाताची लहानांची पंगत आणि रामरक्षा यांनी नटलेलं उंबरगाव माझ्या मनात गोठून गोंदले गेलेय.

त्यानंतर गेल्या चाळीस बेचाळीस वर्षांत मी अनेक सागर, महासागर अनुभवले. किंबहुना प्रत्येक सागराचे वेगळेपण न्याहाळण्याचा छंद लागला. ओरिसात अखिलभारतीय पातळीवरची स्त्री-अभ्यास परिषद होती. भुवनेश्वरला. नोव्हेंबरचे दिवस. परिषद संपताच कोणार्कचे सूर्य मंदिर, पहाटे साडेपाचलाच पूर्वेला पसरणारी उगवत्या सूर्याची लालीमा, चांदीपूरचा चांदण्यात चमचमणारा किनारा, यांचे दर्शन घ्यायचे होते. आणि मग अनायसे आलोच आहोत तर जगन्नाथपुरीचे मंदिरही पहायचे.

...पहाटे साडेचार वाजता चक्क थंड पाण्यानी आंघोळ. अंगावरची शाल घट्ट लपेटून आम्ही मैत्रिणी समुद्रकिनारा गाठायला धावत होतो. घड्याळाचा काटा पाचच्या पुढे सरकणारा. पाण्यात पाय बुडवून पूर्वेच्या दिशेने स्थिरावलेले. डोळे. चंदेरी प्रकाश. लक्षात आले की काही ढग क्षितीजाला टेकून मस्त लोळताहेत. समुद्रात नाहून उगवणाऱ्या कोमल अरुणाचे दर्शन नशिबात नसावे असे वाटून मनात ढग दाटले. इतक्यात आव्या... आयगो... आछेन... आछी... उगवला अशा शब्दांचे तुकडे आणि टाळ्या. जेमतेम पाच सहा सेकंदाचा काळ. सूर्य पहाता पहाता क्षितीजावर येऊन उभा राहिला.

...हजारो वर्षांपूर्वीच्या आदिमानवाचा ईश्वर चार भिंतीत, डब्याच्या चौकटीत बांधलेला नव्हताच! उगवत्या पहाटेचा स्पर्श अंगांगावरून फिरवणारा तो सूर्योदय मी मनात जपून ठेवलाय. ...महाबलीपुरमच्या महाकाय खडकाळ किनाऱ्यावरची पुनवेची चांदणी रात्र. भरतीच्या उन्मत्त लाटांचा धिंगाणा नुकताच वीस बावीस वर्षांनंतर अजूनही शांतावला नाही.

समोर दाक्षिणात्य शैलीचे दगडाचे कोरीव मंदिर एकाकी उभे असलेले. हा किनारा पुढे पुढे येतोय असा तेथील लोकांचा गाढ समज. अशी सात मंदिरे या काठावर होती. पण आता एकच उरले आहे. पहाता पहाता काळ्याभोर खडकांच्या किनाऱ्यावरचे लाटांचे चुणीदार वस्त्र फिटत गेले. पूर्ण चन्द्रमाथ्यावर. निसर्गाच्या नग्न सौंदर्याची निरामय किमया. एक अनाघ्रात समुद्रानुभव मी पदरात बांधून घेतला.

रामेश्वरला तीन समुद्रांचा संगम आहे. पूर्वेकडील बंगालच्या उपसागरावर हिरवाईची छटा आहे. तर दक्षिणेला घनगंभीर हिंदी महासागराची निळाई आणि पश्चिमेच्या अरबी समुद्रात फिकटगुलाबी रंग विसावलेला. पण या सौंदर्याला कुबट वास आहे. कारण आमच्या परमेश्वराच्या श्रद्धाभक्तीमध्ये आणि अंतर्गत असोशी आंधळेपणात ...अंधश्रद्धांत अपार अस्वच्छताही मिसळलेली असते. कन्याकुमारीत मात्र हा कुबट वास येत नाही. बोटीने विवेकानंद स्मारकावर जातांना तीन समुद्र संगमातल्या एकमेकांत समरसलेल्या तीन छटा निरखताना, तो उधाणलेला वारा अंगभरुन झेलतांना, स्मारकावरून दिसणाऱ्या हिंदी महासागराचे दर्शन घेतांना, 'भाकरी हाच परमेश्वर आहे' हे सांगणाऱ्या स्वामी विवेकानंदांच्या 'हिंदू' या शब्दातल्या विश्व कवेत घेणाऱ्या धर्मच्छटा मनात उगवत जातात. सर्वसामान्य माणसाला, दीन... दलित... वंचित, शेवटच्या पायरीवरच्या व्यक्तीला... ज्यात स्त्रियाही आल्याच; सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय देतो तो 'धर्म'. स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असलेल्या भाकरीरुपी परमेश्वराचा धर्म.

...आणि मग या त्रिसमुद्री संगमाने उजळलेले मन नेहमीच तरुण रहाते.

❑

# ४५

## तू ऐल राधा...

दैनिकात बातमी छापून आली होती. 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी एकत्र फिरणाऱ्या तरुण-तरुणींना अडवून एका संघटनेने त्यांना चक्क उठ-बशा काढायला लावल्या होत्या. सेंट व्हॅलेंटाईन यांच्या स्मरणार्थ हा 'प्रेमळ' दिवस पाश्चात्त्य देशात साजरा केला जातो. आपल्या आवडत्या 'प्रिय'ला आपल्या मनोभावना कवितेतून वा पत्रातून या दिवशी कळविल्या जातात. तो 'खास', याने की 'स्पेशल' दिवस संघटनांनी केलेला विरोध पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करण्यासाठी होता की, ज्या अतिरेकी व आचरटपणाने प्रेम व्यक्त करण्याच्या आचाराला वा कृतीला होता? की आपण किती 'देशप्रेमी' आहोत हे समाजाला दाखविण्यासाठी होता.

इसवी सन २७०चा काळ; म्हणजे सुमारे १ हजार ७३७ वर्षापूर्वीचा काळ रोमवर तेव्हा क्लॉडियस नावाचा दुष्ट राजा राज्य करीत होता. त्याला 'क्लॉडियस द क्रुअेल' असे म्हणत असत. त्याच्या राजवाड्याजवळ अतिशय सुंदर मंदिर होते. त्यात व्हॅलेंटाईन नावाचा अत्यंत मायाळू धर्मोपदेशक राही. रोमची जनता त्याच्यावर खूप प्रेम करी. राजा क्लॉडियस रोम मधील तरुणांना सातत्याने होणाऱ्या यादवी युद्धावर पाठवी. आपल्या लाडक्या जीवनसाथीला सोडून जाणे तरुणांना अगदी नकोसे वाटे. पण राजाज्ञा पाळावीच लागे. जेव्हा लढणारे सैनिकच कमी राहिले; तेव्हा राजाने फ़र्मान काढले की कोणीही विवाह करायचा नाही आणि ज्यांचे साखरपुडे पार पडले आहे ती लग्ने मोडून टाका. त्यामुळे अनेक प्रेमी स्त्रियांनी मृत्यू स्वीकारला. अनेक तरुण दुःखी झाले.

सेंट व्हॅलेंटाईनला जेव्हा हे कळले तेव्हा त्याला दुःख झाले. मंदिरात येणाऱ्या तरुणांची तो गुपचूपपणे प्रिय व्यक्तींशी भेट घडवून आणी व ईश्वरसाक्षीने विवाह लावी. पण हे गुप्त नाट्य जेव्हा दुष्ट सम्राटाला कळाले, तेव्हा त्याने धर्मोपदेशक व्हॅलेंटाईनला अंधार कोठडीत टाकले. व्हॅलेंटाईनने दुष्ट राजाची क्षमा मागितली नाही. तो मरण पावला तो दिवस १४ फेब्रुवारीचा होता. तेव्हापासून हा दिवस पाश्चात्य देशात साजरा केला जातो. अर्थात ही माहिती वाचलेली वास्तविक प्रेमी ही भावना वैश्विक आहे. रामायण, महाभारत या भारतीय महाकाव्यांत प्रीतीच्या विविध छटा, त्यातील व्यक्तिरेखांमधून व्यास महर्षींनी रंगविल्या आहेत. रुक्मिणी–कृष्ण किंवा सत्यभामा–कृष्ण यांच्या प्रीतीपेक्षा राधा–कृष्णाचे निरामय, सतेज प्रेम हजारो... शेकडो वर्षांपासून भारतीयांना मोहवते. सामान्य माणसापासून ते कलावंतापर्यंत सर्वांना ऊर्जा देते. ते प्रेम अमेय असते आणि पाश्चात्त्यांच्या इ. स. २७०पेक्षा किती तरी आधीपासून ते समाजमान्यता पावलेले आहेत. आम्ही भारतीयांनी ते एका विशिष्ट दिवसात बंद केले नाही. भारतीय प्रेमात सात्त्विकता आहे. ते केवळ शरीरसुखात अडकलेले नाही. त्यात मानसिक उत्कटता आहे. प्रीतीचा वैश्विक आदिबंध 'राधे'च्या प्रेमातून वा 'मिरे'च्या प्रेमातून व्यक्त होतो.

मला नेहमीच असे वाटते की, संपूर्ण समर्पणात्मक निरामय प्रीती स्त्रीच करू शकते. क्वचित पुरुषही! अर्जुन, त्याला दिलेल्या शिक्षेच्या काळात ईशान्येकडील सप्त भगिनींपैकी मणिपूर राज्यात गेला. त्या भागात तेव्हाही स्त्रिया स्वतंत्रपणे निर्णय घेत. तेथील राजकन्या चित्रांगदा अर्जुनाच्या प्रेमात पडली. सहवासातून बभ्रुवाहनाचा जन्म झाला. शिक्षा पूर्ण झाल्यावर अर्जुन परत गेला. मात्र युद्धाच्या वेळी तिने बभ्रुवाहनाला अर्जुनाकडे पाठविले. परंतु ती मणिपुरताच राहिली. दमयंती अत्यंत देखणी होती. ती नलराजात मनाने गुंतली होती. तिच्या विवाहप्रसंगी सगळे देव नलाचे रूप घेऊन तेथे आले. पण तिने अचूकपणे नलराजाच्या गळ्यात वरमाळा टाकली. पुरुष अधिक करून शारीरिक प्रेमात अडकतात; त्यामुळे तृप्ती झाली की ते मोकळे होतात. तिथे समर्पण नसते. दमयंतीने प्रेमाचा संदेश हंसाबरोबर पाठविला. इंद्राच्या शापाने दग्धावस्थेत तळमळणाऱ्या यक्षाने, प्रेमाचा संदेश रामगिरी पर्वतावरून उत्तरेकडे जाणाऱ्या मेघासोबत पाठविला. शकुंतलेने दुष्यंत राजावर प्राण–शरीर ओवाळून टाकले भरताला जन्म देण्यात धन्यता मानली.

कवी अनिलांनी ही म्हटले आहे...

**वाटेवर काटे वेचित चाललो,**
**चाललो जसे फुलाफुलांत चाललो किंवा**
**... जवळ तसे काहीच नव्हते फक्त हाती हात होते.**

(कुसुमावती आणि अनिल दोघांची या वर्षी जन्मशताब्दी आहे.)

...आपणही निरामय, वैश्विक प्रीती, भावनेची प्रतिष्ठा अबाधित ठेवूनच विरोध करावा आणि प्यार व्यार करनेवालोने भी पाश्चात्त्यांचे अंधानुकरण विकृत पद्धतीने कशाला करायचे? आपल्याकडे काय कमी प्रेमगीतं आहेत प्रियाला पाठवायला? आणि निरामय प्रेमात (प्लेहॉनिक... अशारीरिक नव्हे हं) हाती आलेले काटेही फुलासारखेच जपायचे असतात. 'प्यासा' काय म्हणतो?

**हमने तो जब कलियाँ मांगी**
**काटों का हार मिला**
**जाने वो कैसे लोग थे**
**जिनके प्यार को प्यार मिला...**

राधेचे प्रेम कधीच 'म्हातारे' होत नाही. ते ताजेच राहते. तनामनाने एकरूप होण्याची क्षणैक तृप्तीही नेहमीच चिरतरुण असते. म्हणूनच कवी म्हणतो–

**तू ऐल राधा, तू पैल संध्या**
**जीवनाच्या संध्यासमयीही तू,**
**चैतन्यमयी ऊर्जा देणाऱ्या**
**बहराच्या बाहूंची... असतेस.**

❑

४६

# श्रावण अंगणी...

श्रावण अगदी अंगणात नाही तर उंबऱ्यावर येऊन ठेपतो आणि अनेकांच्या, अगदी ऐंशीच्या उंबरठा पार केलेल्यांपासून ते नुकतीच पंचविशी ओलांडलेल्यापर्यंतच्या मनात आपोआप उमटू लागतात ओळी...

**श्रावणमासी, हर्ष मानसी,**
**हिरवळ दाटे चोहींकडे।**
**क्षणात येते सरसर शिरवे,**
**क्षणात फिरुनी ऊन पडे।।**

आणि ही ताजी हिरवळ तनामनात झुळकू लागते. गैरसमजांचे काळे ढग कमी होऊन स्वच्छ निरभ्र ऊन पडते. अशा वेळी माहेरच्या आठवणीचे शहारे अंगभर लहरु लागतात. ओठांवर चव घुटमळू लागते आईच्या हाताच्या खांडवीची. नागपंचमीला तवा चुलीवर ठेवायचा नाही ही परंपरा. देशावर पुरणाची उकडलेली दिंडं करतात, तर कोकणात तांदळाचा रवा साजूक तुपावर भाजून, त्यात गुळाचे पाणी घालून केलेला शिरा. थाळ्याला तूप लावून अलवार हाताने पसरवायचा. वर ओलं खोबरं, वेलचीची पूड, बदामाचे काप घालून चौकोनी रेशमी वड्या पाडायच्या. भेंडीची भाजी, सोलकढी, गरम वाफेचा भात, नारळाची चटणी नि खांडवी असा बेत आजोबा असेपर्यंत घरी होईच. मी खांडवी करते; पण ती तोंडात घोळणारी नि रेशीम स्पर्श असे काही जमत नाही.

नागपूजा अत्यंत प्राचीन आहे. तैत्तिरीय संहितेत, पुराणात नागाचा उल्लेख आहे. विष्णूचे आसन शेषनाग, तर शिवाच्या गळ्यात नाग. जैन धर्मात नागाचा उल्लेख आहे. बुद्धाच्या जन्मानंतर नंद उपनंद या नागांनी त्याला स्नान घातले असा उल्लेख आहे. सिंधू नदीच्या परिसरात प्रत्येक गावात नागमूर्ती होत्या. बौद्ध काळात ब्राह्मण नागपूजा करीत असत. चिनी प्रवासी ह्युअेनत्संगने नोंदवून ठेवले आहे. सौराष्ट्र, उत्तर प्रदेशात चंबा, कांगडा खोरे, काश्मीर येथे गावागावांतून नागमंदिरे आहेत. तक्षशीलेचे राजे नाग होते. अश्वमेध यज्ञात लोहितावादी आणि बायस या नागांचे पूजन करावे असे सांगितले आहे. हिमालयात शेषनाग, अनंतनाग, संतनाग, इंद्रनाग यांची देवळे प्रसिद्ध असून चिनाब नदीच्या तिरावर वासुकीचे मंदिर आहे. काश्मीरचे राजे कर्कोटकाच्या वंशाचे आहेत असे राजतरंगिणी हा काश्मीरच्या वंशाच्या इतिहासाची प्रत्यक्ष नोंद असलेला ग्रंथ नोंदवितो. केरळमध्ये नायरांच्या घरात काउस नावाचे छोटे सर्प मंदिर असते. नागाला ते कुलदैवत मानतात. बंगालमध्ये नागमंडळ हा नृत्यप्रकार प्रचलित आहे. महाराष्ट्र, छत्तीसगडमध्ये श्रावणात नागपूजा करतात. पंजाबमधील सफदोन या गावी जनमेजयाने सर्पसत्र केले या समजुतीने विशेष नागपूजा केली जाते.

नागांचे पाताळात स्वतंत्र जग आहे अशी कल्पना भारतात रूढ आहे. नागकन्या विलक्षण देखण्या असतात. पृथ्वीवरच्या सुंदर, पराक्रमी पुरुषांवर भाळतात. त्यांना नागलोकात नेतात असा कल्पनाबंध अनेक लोककथांतून येतो. अर्जुनाची एक पत्नी उलुपी ही नागकन्या होती. शेष हा नागराज; तो कामवासनेचे प्रतीक मानला जातो. या संदर्भातली एक लोककथा. द्रौपदी ही पाच पतींची पत्नी. तिला आळीपाळीने एकेकाकडे जावे लागे. या गोष्टीचे एक स्त्री म्हणून तिला अत्यंत दुःख असणारच. या वर्मावर दुर्योधन तिला एकटीला गाठून 'आज कुणाची पाळी?' असे विचारून बोट ठेवत असे. हे दुःख ती कोणाजवळ बोलून दाखवणार? एक दिवस तिने आपले मन श्रीकृष्णाजवळ मोकळे केले. श्रीकृष्णाने द्रौपदीस सांगितले. 'आज शेषाची नव्हती' एवढेच उत्तर दे. दुर्योधनाने पुन्हा हा प्रश्न विचारला नाही. दुर्योधनाच्या पत्नीचा उपभोग घेण्यासाठी शेष येई अशी जांभुळख्यानांसारखी कथा लोकवाङ्मयातून मिळते. नाग वा सर्प कामवासनेचे प्रतीक मानले जाते. कटनर या मानववंश शास्त्रज्ञाने सर्प हे सुफलीकरणाचे प्रतीक मानले आहे.

नागपंचमी हा श्रावणातला सण सुफलीकरणाशी जोडला आहे. नाग हा क्षेत्ररक्षक मानला जातो. वारुळाची माती सर्वांत सुफल, संपूर्णत्वाने भरलेली असते. भूमीच्या सर्जन क्षमतेचे प्रतीक वारूळ तर नाग हे पुरुषत्वाचे... पुरुषत्वाचे प्रतीक हा कल्पनाबंध

भारतीय मनात रुजलेला आहे. नागाची विजेसारखी नागमोडी, वेगवान चाल त्याचे लखलखीत तेज. त्यानंतर भूमीला सहस्रधारी भिजवणारा पाऊस त्यानंतर फुलणारी हिरवी किमया.

ज्येष्ठ-आषाढात शेतकरी, शेतकरणी शेतीची मशागत आणि पेरणीच्या धांदलीत गुंतलेले असतात. श्रावणात थोडी उसंत मिळते. अशा वेळी निवांतपणे थकवा दूर करण्याची, मनमोकळे करण्याची हक्काची जागा माहेरच. महाराष्ट्रात नागपंचमी आणि माहेर यांचा अतूट अनुबंध आहे.

बंधूच्या रूपाने नाग आमच्या भावजीवनात स्थिर झाला आहे. त्याच्या विषयीचे भय वाटतेच. ते दूर करण्याची ही सांस्कृतिक रीत. पेरलेले बियाणे उंदरापासून वाचवणारा तोच. नागपंचमी केवळ भावनिक, सांस्कृतिकच नव्हे तर जातीय सलोख्याचे रूप. ही आहे पंचमी आधी ४-५ दिवसांपासून महिला एकत्र येऊन फेर धरतात, गाणी म्हणतात. त्यातून माहेरची ओढ आणि सासरचा त्रास या बद्दल मनमोकळं करतात.

**बारा सणाला नेऊ नकोस**
**पंचमीला रे ठेवू नको...**

**मैत्रिणींना साद घालताना त्या म्हणतात,**
**वाण्या-बामणाच्या लेकी**
**वारुळाला येता का कुणी?**
**साळ्या कोष्ट्याच्या मुली**
**वारूळाला येता का कुणी?**
**लेकीच्या भेटीला आसुसलेली माया लेकाला विनवते**
**आली वर्साची पंचमी**
**जारे सुभाना बाळा**
**जारे बाळाई बोलावू**
**लोकाच्या लेकी माहेरात**
**आमची बाळाई सासरात**
**सासरी बहीण मनोमनी साद घालते,**
**पंचमीचा सण नागोबा वेगीला**
**मुऱ्हाळी यावा मला,**
**पाठी भाऊ मागितला...**

**वेडाबागडा भाऊ बहिणीला असावा**
**चार आण्याची चोळी एका रात्रीचा विसावा...**

खणकणाऱ्या काचेच्या बांगड्या घालून, झाडाला बांधलेले झोके... स्वप्नांचेही, आभाळाला भिडवताना तिने मनातली चिरंतन व्यथा आभाळाला नोंदवली. आज काळासोबत सासर माहेरच्या संकल्पना बदलत चालल्या आहेत. तरीही

**सासराच्या वाटे कुचूकुचू काटे**
**माहेरच्या वाटे गुलाल-बुक्का दाटे...**

या ओळी ऐकल्या की बाईचे मन भरून येतेच नाही का? शेवटी माहेर ते माहेर!

❑

४७

# अक्षरांना अर्थ देऊन...

**'आम्ही आहोत महा-तारे,**
**आम्ही नाही म्हातारे'**
**'ज्येष्ठांचा सन्मान करा'**

आपल्या ज्येष्ठत्वाचे नारे देत एक समुदाय रस्त्याने जात होता. त्यात निवृत्त अधिकारी, तंत्रज्ञ, विविध विषयांचे प्राध्यापक, अध्यापक, श्रम केल्याशिवाय पोटाला भाकर मिळणे दुरापास्तच असे थकिस्त श्रमिक, निवृत्त व्यावसायिक... असे अनेक होते. महिला होत्या. निवृत्त परिचारिका, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या. पण महिलांच्यात सर्वाधिक संख्या होती एकाकी, वृद्ध, निराधार बंदिनींची.

ज्येष्ठ नागरिक संघ आणि एका स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात सहभागी होताना मनात उद्याची आशा होतीच. कारण आयोजनात अनेक तरुण-तरुणी होते. 'आहे रे' या वर्गात समावेश असलेल्यांच्या मनात 'नाही रे'ची झोळी ज्यांच्या हाती आली आहे, अशांसाठी काही रचनात्मक कार्यक्रम राबविण्याची उमेद होती. त्यांनी संकल्प सोडला. हे सारे जसे व्हायला हवे तसे झाले पण तरीही माझ्या मनाला एक वेदना चिरत गेली...

भारतीय जीवनरितीच्या गाभ्यात ज्येष्ठांचा सन्मान ही भूमिका मूलतःच आहे. महानुभाव पंथाची आद्यकवयित्री महदंबा ज्ञानी होती. तिच्या संदर्भात गोविंद प्रभू म्हणत 'म्हातारी चर्चकः काही तरी पुसतचि असे।' जी व्यक्ती सतत चर्चा करणारी, एखाद्या

विषयाचा शोध घेणारी असते तिला 'म्हातारी वा म्हातारा' म्हणण्याचा प्रघात होता. वृद्धत्व अनुभवाच्या समृद्धीचे प्रतीक असते. मग आजच्या विज्ञानमय युगात ज्येष्ठांना आमची 'दखल' घ्या असे म्हणण्याची वेळ का यावी? वैज्ञानिक शोधांमुळे माणसाची आयुमर्यादा सतत वाढते आहे. वृद्धांचे जगणे दीनवाणे होऊ नये यासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था विविध प्रकल्पांद्वारे प्रयत्न करीत असतात. पण तरीही, वृद्धांनी संघटितपणे 'वृद्धत्व' सर्वार्थाने समृद्ध कसे होईल याची दिशा शोधायला हवी. प्रख्यात शिक्षणशास्त्रज्ञ वि. वि. चिपळूणकर यांनी 'पसायदान' ही अभिनव कल्पना मांडली. विविध खात्यांतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांजवळ त्या त्या विषयांचे ज्ञान आणि अनुभव असतो. त्याचा लाभ तो सर्वांना देऊ शकतो. एखादा निवृत्त कर्मचारी वृद्धांसाठी असणाऱ्या शासकीय योजनांचा लाभ वृद्धांना मिळवून देऊ शकतो.

'वृद्धत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' या केशवसुतांच्या ओळी आपल्याही अनुभवाला येतात. काही दिवसांपूर्वी एका गृहस्थांचे पोस्टकार्ड आले. ते आणि त्यांचे तीन मित्र काही स्वयंसेवी संस्थांचे काम पाहावे यासाठी येणार होते. अक्षर अत्यंत सुरेख. नेटके. त्यातून वयाची थरथर जाणवत होती. नळदुर्गचे 'आपलं घर', अथणी येथील ज्ञानप्रबोधिनिचा प्रकल्प व अंबाजोगाई येथील 'मानवलोक-मनस्विनी' या प्रकल्पांना ते भेट देणार होते. वृद्धत्वातही काही नवे निरखून, नव्यांच्या माथ्यावरून हात फिरविण्याची, मदत करण्याची ऊर्जा चैतन्य देणारी होती आणि ते आले. ''काका, काही वर्षांपूर्वी काकूंचे निधन झाले. त्यानंतर केले जाणारे धार्मिक कर्मकांड टाळून तुम्ही मदत पाठवली होती. काकूही शिक्षिका होत्या. दर वर्षी आम्ही तुम्हांला वार्षिक अहवाल पाठवतो. या वयात, मुंबईहून इतक्या दूर... त्यापेक्षा तिथूनच...''

''अगं ज्या संस्था मी वर्तमानपत्रांतून पाहिल्या, ज्यांच्याशी विचारांचे नाते जोडले. त्या डोळे मिटण्यापूर्वी प्रत्यक्ष पाहाव्यात, त्यांना शुभेच्छा द्याव्यात. समविचारी वृद्धांना त्यांची ओळख करून द्यावी, असे मनोमन वाटले. मी ८८ वर्षांचा झालोय. हा माझा पन्नाशीतला पुतण्या. त्यालाही नवी वाट दाखवायला हवी. थांबला तो संपला,'' काकांनी माझे बोलणे मध्येच तोडून खणखणीत आवाजात पासष्टी ओलांडलेल्या मानसकन्येला बजावले.

बाबा आमट्यांवर उधळून प्रेम करणारा माझा मित्र काही दिवसांपूर्वी दूरध्वनीवरून सांगत होता, ''अगं, बाबांना ब्लड कॅन्सर असल्याचे कळले नि सरळ नागपूर गाठले. तर बाबा निवांत. अरे मी इतक्यात जात नाही. माझी दोन कामं राहिली आहेत. ती पूर्ण व्हायलाच हवीत. मी ४-६ दिवसांनी वरोऱ्याला जाईन तेव्हा तू मला समोर हवास.''

मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे सेनानी स्वामी रामानंद तीर्थांच्या खांद्याला खांदा लावून लढणारे शिक्षणमहर्षी बाबासाहेब परांजपे यांची जन्मशताब्दी नुकतीच झाली. निजामशाहीत होरपळणाऱ्यांना लढवय्या सैनिकांची अधिक गरज आहे हे ओळखून हिप्परगा येथील अनंतराव कुलकर्णी यांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय विचारांच्या शाळेत बी. एस्सी. झालेले बाबासाहेब शिक्षक म्हणून गेले आणि निजामाविरुद्ध आंदोलनातील तरुण मनांना वाणीने चेतावणारा या लढ्यात झोकून द्यायला प्रवृत्त करणारा तरुण तेजस्वी वक्ता ही ओळख त्यांची मराठवाडाभर झाली. निजामाने त्यांनाही मृत किंवा जिवंत पकडून आणण्यासाठी दहा हजार रुपयांचे इनाम ठेवले होते. मराठवाडा १७ सप्टेंबर १९४७ रोजी मुक्त झाला. बाबांनी शिक्षणाद्वारे ज्ञान, विज्ञान, राष्ट्रनिष्ठा, सर्वधर्म समभाव, जातीविरहित समाज रचनेचे संस्कार करणाऱ्या शाळा, महाविद्यालये सुरू केली. धनिकांना त्यात सहभागी करून घेतले आणि संसारही थाटला, तोही जात परंपरांच्या सीमा ओलांडून. अत्यंत साधेपणाने आयुष्य शिक्षणासाठी समर्पित केले. पंचवीस वर्षांपूर्वी त्यांचा अमृतमहोत्सव अंबाजोगाईत झाला. बाबा आणि सिंधूताईंनी मला एक आगळे चिरस्वरूपी माहेर दिले. त्या समारंभात मी सहजपणे माझ्या भावना व्यक्त केल्या होत्या. ते शब्द केवळ बाबांचे न राहता अनेक ज्येष्ठ प्रेरकांसाठी आहेत.

**अक्षरांना अर्थ देऊन श्वास प्रेरित चालणे**
**अमृता वोल्हाविती ही समर्पित जीवने...**

असे अनेक तेजस्वी 'महा तारे' होऊन गेले, आहेत आणि होतील. अक्षरांना अर्थ देऊन, विचारांना तनामनात पेरत जाण्याची ऊर्जा त्यांच्याकडून ज्येष्ठांनी घ्यायलाच हवी ना?

❑

## ४८

# रंगवल्ली... रांगोळी

पहाटेचे जेमतेम चार वाजलेले असत. पक्षांची किलबिल नुकतीच सुरू झालेली असे. पावलांचे धावते झपझप आवाज घरासमोरच्या रस्त्यावरून, उजवीकडून डावीकडे अस्पष्ट होत जात. गाढ झोपेत असलेली मी टक्क जागी होई. ''आई, आज नवरात्र सुरू झाले बहुदा. बघ ना एकवीरा मंदिराकडे पहाटेच लोक चाललेत. ऊठ आज आजेपाडवा आहे ना?'' आईला गदागदा हलवणारी मी.

सगळा वाडा गाढ झोपेत असे. मला मात्र शेणाचा सडा घालून रांगोळीने अंगण सजवण्याचे वेध लागत. आमच्या घरात सण उत्सव खाण्यापुरते साग्रसंगीतपणे साजरे होत. पप्पा पक्के समाजवादी होते. आईने त्या काळच्या रितीनुसार पतीच्या हाताला हात लावून 'मम' म्हणण्याची परंपरा कायम ठेवली होती. पण पहिल्या माळेच्या दिवशी ती आजेपाडवा, तिच्या वडिलांची-माझ्या दिवंगत आजोबांची आठवण म्हणून, आवर्जून साजरा करी. ज्येष्ठ सद्गृहस्थांना जेवायला बोलावले जाई. त्यांचा पिता म्हणून सन्मान केला जाई.

घर आग्रा रस्त्यावर भर बाजारात होते. त्यामुळे अगदी एवढेसेच अंगण हातात येई. गायी दिसल्या की, शेण गोळा करण्यासाठी आम्ही मैत्रिणी धावत असू. अवघे अंगण तऱ्हेतऱ्हेच्या रांगोळ्यांनी आकंठ भरून जाई. ठिपक्यांच्या पारंपारिक रांगोळीबरोबरच, सुंदर पाना-फुलांची रांगोळी, मध्यभागी अदृश्य उभी रेषा कल्पून दोन्ही बाजूंनी अगदी तंतोतंत समान आकृती काढण्याचा प्रयत्न केलेले फ्री हँड...

नंतरची प्रत्येक सकाळ रांगोळीची, घर सजावटीची असे ती थेट, देव दिवाळीपर्यंत. त्या उमलत्या वयात सण-व्रते, उत्सव त्यातला स्त्रियांचा भरभरून उत्साह हे संपन्न सांस्कृतिक ठिपके माझ्या मनात कायमचे उमटले आणि कदाचित त्यातूनच लोकव्रते, लोकोत्सव, लोकसाहित्य, त्यातील स्त्रियांचा सहभाग हा विषय मी शोधनासाठी निश्चित केला आणि लक्षात आले की स्त्रीप्रधान व्रतोत्सवात रांगोळीला विशेष महत्त्व आहे. तामिळनाडू, आंध्र, केरळातील अंगण आजही मोकळे नसते. पहाटे उठून स्त्रिया ते बहरवून टाकतात. दिवसभर ते स्वागतशील असते. सणासुदीला महाराष्ट्रातले काहींचे अंगण सजते. पण रोज सकाळी सजणारे अंगण आज हरवत चाललेय.

रंगवल्ली ही एक चौसष्ट कलांपैकी महत्त्वाची कला मानली आहे. तिचा उगम धर्माच्या अनुबंधातून झाला असावा. ती मूर्तिकला वा चित्रकलेच्याही पूर्वीची आहे असे मानले जाते. कोणत्याही मांगलिक कृत्यात रंगवल्ली आवश्यक असते. ही प्रथा भारतभर आहे. भोजनाची तृप्ती वाढावी, वातावरण निर्मिती आणि शुभंकर म्हणून रांगोळी काढली जाते. 'प्रतीक' हा रांगोळीचा आधार आहे. रंगवल्ली... रांगोळी ही जणू सांकेतिक भाषाच होती. स्वस्तिक, सूर्यचंद्र, नागयुग्म... अशा अनेक आकृती विविध भावबंध दर्शविणाऱ्या असतात. रांगोळीसाठी तांदुळाची पिठी, गारगोटीचे पीठ यांचा वापर केला जातो. मात्र केवळ पांढरी रांगोळी काढणे अशुभ मानले जाते. त्यात गुलाल वा कुंकवाचा वापर आवश्यक मानला जातो.

रांगोळीचे आकृतिप्रधान व वल्लरीप्रधान असे दोन भेद आहेत. राजस्थान, उत्तर प्रदेश, महाराष्ट्रात आकृतिप्रधान रांगोळ्यांचे प्रकार आढळतात. बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू वगैरे भागात वल्लरीप्रधानता लोकप्रिय आहे. भारताच्या प्रत्येक प्रांतात रंगवल्लीचे नाव आणि आकृतिबंधही वेगळा आहे.

दहाव्या शतकातील नलचंपू या ग्रंथात उत्सवप्रसंगी घरासमोर रांगोळी काढण्याचा उल्लेख आहे. हेमचंद्राने बाराव्या शतकात लिहिलेल्या 'देशीनाम माले'त तांदळाची पिठी वापरण्याचा उल्लेख आहे. त्याच शतकातील सोमेश्वराच्या मानसोल्हासात 'धुलिचित्र' या नावाने तर श्रीकुमाराच्या 'शिल्परत्नात' 'क्षणिक चित्र' असा रांगोळीचा उल्लेख आहे. ही कला किमान दोन हजार वर्षांपूर्वीची असावी. जैन आणि पारशी धर्मांतही रांगोळी अशुभ निवारक मानली जाते. हादगा व भुलाबाई हे महाराष्ट्रातील कुमारिकांचे लोकोत्सव तर सांझी हा मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेशातल्या काही भागात खेळला जाणारा लोकोत्सव. त्यात सांत्या (स्वस्तिक) सप्तर्षी, केळीचे झाड, म्हातारा म्हातारी, अष्टपाकळ्यांचे कमळ वगैरे प्रत-आकृती पारंपारिक शैलीत काढल्या जातात.

आजही अंगणात रांगोळी काढून देवीचे स्वागत करताना गृहिणी गुणगुणते

**साजिरे अंगण, शेणाने सारविले ।**
**वर रेखिते मी रंगावली ।।**
**घरी ये ग योगेश्वरी ।**
**तुझ्या सोन्याची पावली ।।**
**भांग भरते मोत्यानं; कुंकू कपाळी भरते ।**
**नव्या धानाचे तुरे मी, तुझ्या तोरणा बांधते ।।**

❑

४९

# घट...

भारतीय जीवनरितीचा मूल बंध 'घट' किंवा 'कलश' आहे. बैलांचा नांगर वापरात येईपर्यंत 'स्त्री' समाजाच्या केंद्रस्थानी होती. माती, मृदघट, शेण, गोवऱ्या आणि धान्य व सूप यांना स्त्री व्रतोत्सवात महत्त्वाचे स्थान आहे. हे सर्वच व्रतोत्सव भूमीशी, तिच्यातील उर्वरा शक्तीशी जोडलेले आहेत. स्त्री आणि भूमी... माती यांच्या विषयीची कृतज्ञता त्यातून व्यक्त होते. प्राचीन भारतीय लोकजीवनाचे वैशिष्ट्य मातृसत्ता होते. हा समाज कृषीजिवी होता. कृषिसमृद्धी, जमिनीचे सुफलीकरण आणि भूमीरुप स्त्री-देवता यांच्यातील अतूट एकात्मतेचा आदिबंध समाजमनातून आजही नाहीसा झालेला नाही.

अश्विनात नवरात्राचे घट बसतात. देवीस्वरुपातील आदिशक्तीची ती पूजा असते. तुळजाभवानी, एकवीरा, माहूरची रेणुका, अंबाजोगाईची योगेश्वरी, कोल्हापूरची अंबा... महालक्ष्मी ही देवीची मूळ ठाणी. ही सर्व आदिशक्तिपीठे फक्त स्त्री देवतांचीच मंदिरे आहेत. ती मातृरुप 'आई' ची मंदिरे आहेत. त्यांच्या शेजारी कोणताही पुरुषदेव वा सहचर नाही. त्यामागचा गूढार्थ क्रांतिकारक आहे.

स्त्रीमध्ये निर्मिती करण्याची यातुशक्ती... जादू आहे, या कल्पनेतून आदिमानवाला तिच्याबद्दल भय वाटले. पण त्याच वेळी स्तन्य पाजणारी, बालकाची काळजी घेणारी, त्यांच्यावर कोसळणाऱ्या अशुभाचा संहार करण्यास जागरूक असलेली स्त्री सुरक्षितता देणारी असल्याचा प्रत्यय आला. संस्कृतीच्या विकासात जाणिवांच्या कक्षा रुंदावत गेल्या आणि निर्मितीत पुरुष सहयोगाची कल्पना आली.

नवरात्रोत्सव मूलतः जमिनीच्या उर्वशक्तीशी संबंधित असल्याने पहिल्या दिवशी पत्रावळीवर शेत, गोठा, तबेला, वारुळ, वडाखालची माती, चौरस्त्याची माती, हत्तीच्या पायाखालचा रस्ता, संगम या ठिकाणची माती... अशी अष्ठमृद पसरतात. त्या मातीत मिसळीचे धान्य... बीजकरण एकत्र करून मिसळतात. गावातील पाटील, देशमुख यांच्या घरातील प्रमुख महिला कारभारिण नवरात्रीपूर्वी पक्ष-पंधरवड्यात विविध बियाणे एकत्र करून ठेवत असे. ते गावातल्या छोट्या शेतकऱ्यांना, भूमिहीनांना देते. त्यात गहू, जोंधळा, करडई, धने, भुईमूग असतेच. ते तृप्त मनाने दिल्यास त्याच्या दसपट समृद्धी घरी येते अशी श्रद्धा आहे.

घट हे गर्भाशयाचे प्रतीक आहे. या काळात भूमीच्या तीन रूपांची आराधना केली जाते. विशेष करून कुमारिकांची पूजा केली जाते. कुमारिकांचे प्रतीक सरस्वती, लक्ष्मी ही सुवासिनी आणि अनिष्टापासून रक्षण करणारी काली. ज्येष्ठ-आषाढात पेरलेले धान्य पणात येऊ लागते. दाण्यात दूध भरू लागते. या काळात धान्याने शेतेभाते बहरलेली असतात. त्यातून अन्न, धनधान्यरुपी मातृरुप सुवासिनी लक्ष्मी हाती यावी, तिचे रोगराईपासून रक्षण व्हावे, म्हणून काली... विघ्नहर्ती भवानी. घटांत विविध विहिरींचे, नदीचे पाणी ठेवतात. त्या घटातले पाणी बीजमिश्रीत मातीवर शिंपडतात. माती ब्रह्मदेवाने निर्माण केली व कश्यप मुनींनी अग्निमंत्रित केली अशी कल्पना आहे.

नवरात्र खरिपाच्या पिकांचे स्वागत आणि रबीच्या पिकांची उगवण शक्ती मोजणारी जणू प्रयोगशाळाच आहे. पूर्वी शेतातील परिपुष्ट निरोगी कणसे आढ्याला अलगद बांधून ठेवीत अशा कणसांचे दाणे काढून नवरात्राच्या मातीत मिसळून त्यावर घट मांडीत. अशा घटातले झिरपते पाणी बियाण्याला योग्य प्रमाणात मिळे. ज्या बियाण्यांचे अंकुर रसरशीत, जोमदार ते पीक त्या वर्षी भरारीने येणार असा अंदाज शेतकरी बांधत. माती, कुंभ तयार करणारा कुंभार यांना समाजात प्रतिष्ठा होती. लग्नात, संक्रांतीला कुंभाराचा मानसन्मान केला जातो. कुंभार मडके वाजवून पारंपरिक गीतांतून जीवनाचे तत्त्वज्ञान गातात. त्याला 'डहाका' म्हणतात. नवरात्रात घटाच्या वर रोज एक फुलांची उतरती माळ टांगतात. नवरात्राचा पाचवा दिवस म्हणण्याऐवजी पाचवी माळ असे म्हणण्याचा प्रघात आहे. दहा दिवसरात्र समईतील ज्योती तेवत्या राहतील याची काळजी घेतली जाते. दिवा सुफलीकरणाचे प्रतीक असतो.

घट हे 'जीवा'च्या अस्तित्वाचे प्रतीक. त्यातील चैतन्याचे प्रतीक दिवा. स्त्रीचा गर्भ सुलक्षणी असावा म्हणून गर्भादान समारंभ. त्यात 'घट' पूजा असते. माणूस मरण पावल्यावरही मडके सोबतीला असतेच. पण तो 'घट' न राहता 'मडके' होते. ते मडके

फोडतात त्या दगडाला अष्मा म्हणतात. आज एकविसाव्या शतकात मृत जीव कावळ्यात जाणे, पिंडाला कावळा शिवला तर आत्म्याला मुक्ती या कल्पनांवर विश्वास न ठेवणाऱ्यांची, वैज्ञानिक दृष्टिकोनातून मानवाच्या मृत्यूची चिकित्सा करणाऱ्यांची, मृत्यूनंतर शरीरदान, दृष्टिदान, मूत्रपिंडदान करणाऱ्यांची संख्या वाढते आहे. वैज्ञानिक दृष्टी स्वीकारताना आपल्या वर्षानुवर्षे सतत ताजेपणाने टिकलेल्या परंपरांचा चिकित्सक नजरेने शोध घेणेही महत्त्वाचे आहे. त्यातील चिरंतन संकल्पनांचा शोध नव्याने पुढे जायला प्रेरणा देणारा आहे.

❑

५०

# आला श्वास, गेला श्वास ...एक भास!

‘ताई, आज बोलू का तुमाले? इतके दिस बोललेच न्हवते. तुमचं भ्यावच वाटायचं. पन आता हितं आल्यापासून जरा भीड चेपलीया. बोलू का?”

“...अगं बोल की. काय सांगायचंय? तुला ताण पडतो का कामाचा? भाजी, आमटी तूच करतेस ना? तुझ्या हाताला छान चव आहे हं.”

“ताई, सगळा जलम लोकांचा सैंपाक आन् धुणीभांडी करण्यात, खरकटी काढण्यात गेला. धुण्या-भांड्यापरीस सैपाकात मन लई रमायचं. मन लावून फोडणी घातली की भाजीला चव येणारच की...! त्याचं काय वं कौतीक? पन् चांगलं म्हटलंत तुमी. बरं वाटलं. काय सांगू? मी ओल्या हळदीची म्हायेरला. मायकडे आल्ये, ते मला परत न्हेलंच न्हाई... त्या दादापाला माजं फेंदरं, नकटं नाक, बुटकी उंची आवडली नाही. त्याची माय मला पहायला आली वती. माज्या बापांन धा हज्जार रुपये मोजून मला त्याच्या उपरन्याला बांधलं. लगीन झालं की, तिसऱ्या रोजाला मामा येती-जाती न्यायला आला. पन पुन्ना त्यांनी घरात घ्येतलंच नाई. मायनी माप प्रयत्न केला...”

“मला शानी हून बी लई वरसं झाली. आमच्या डोंगरात आभाळ फुटून पाऊस झाला वता. तवा मी शानी झाल्ये. लई लई वरसं झाली. मी नि मायच ऱ्हातो. भाऊ हायता दोन. पन ते कोन कुनाचे. तुम्ही म्हंता कस्टाची भाकर चवदार असती. खराय ते.

पन माय लई थकलीय. ती किती दिस कस्ट करणार. मी तिला दूर न्हाई करनार. पण तिच्या नंतर मी एकलीच. मी म्हातारी झाले... थकले की मला कोन?...?..."

" आई माय! बोलतच बसले वो मी. अजून त्या जाधवांच्या घरची धुनी-भांडी ऱ्हाइलीत," असे म्हणत सावू उठून गेली. पण मनात रुखरुख पेरून गेली...

...आणि आचानक एक दिवस सकाळी सहा वाजताच दारावरची घंटा वाजली. दार उघडून पाहते तर सावू दारात उभी. लठ्ठपणाकडे झुकणारा उभा-आडवा बांधा. गोरा गुलाबी रंग. चेहेऱ्यावरचे गोंदवण खुलून दिसे. "ताई चहाची लई जोरात तहान लागलीय. मी चा पिते नि तुमालाबी बिन साखरेचा करून द्येते,' असे म्हणत ती आत आली. हात, पाय, तोंड धुवून तिच्या जवळच्या नॅपकीनला हात, तोंड पुसत गॅसकडे गेली 'घ्या. मीबी पिते नि मग सांगते खबरबात,' असे म्हणत मग मधला चहा चवीने संपवला. कप विसळून पालथे घातले आणि ती भिंतीला टेकून बसली. "ताई परभणीच्या प्रिंसीपॉल वाकडे मॅडमकडे मला तुमी पाठवलत नि माझं लाईफच बदललं. त्यांच्या पिताजींची मी माझे पिताजी समजून सेवा केली. हागणे मुतणे काढले. अंग पुसून घ्यायची लुळा-पांगळा जीव. डोळे लई बोलके होते. त्यांचा जीव लई खंतवायचा. डोळ्यातून पाणी व्हायचं. मी पाठीवरून हात फिरवीत मायेने विनवायची, 'लेक म्हणजे आपली मायच असते पिताजी. लहानाचं मोठं करताना आई नाही का लेकराची शी काढीत?' मग मातर ते मुकाट्यानं समदं करून देत. ताई तेच पुण्य मला उपयोगी पडलं. मॅडमनी मला सरकारी होस्टेलात हेडकुक म्हणून नोकरी लावून दिली. त्यामुळे विदर्भ, कोकणपण बघाया मिळालं. ...ताई, मी लातुरात तीन रुमचं रोहाऊस बुक केलंय. माज्या नवऱ्यानं लई मारलं. वकील होता. पन आधीची लफडी. माज्या पाठीवरच्या तापलेल्या सळीने दिलेल्या माराच्या खुणा अजून आहेत. पन मोठ्या जावेचा पोरगा बरा आहे. त्याला लहान व्हता तवा मी माया लावली. तवा असंल चार वरसांचा. त्यानं माझा मारपन पाहिला. तो ममईत असतो. तो मला मदत करतो. त्यानंच हे रो हाऊस पाहून दिलं. पयले दोन लाख भरले. दरमहा तीन हजार देते. पुढच्या मे महिन्यात घराचा ताबा मिळंल. कागदं आनलीत, तुमी ती पाहून घ्यावा. ममईचं पिल्लू लई गोड हाय. तुमी पाठवलंत ती मानसं मानुसकीची हाईत. त्यांना लेकरु सांभाळाया बाई मिळाली म्हनून आले. आपल्या मराठवाड्यातील मानसं कशी मोकळी चाकळी. कुणाच्या खान्या-पिन्याकडे बघनार न्हाईत. तिकडे म्हंजी दोन फुलके बाईला नि दोन पुरसांला. की झालं! मला कसे पुरावेत दोन-तीन फुलके? त्यांचं काम बी झालंय. म्हणून आले परत."

“भैय्याच्या मैत्रिणीचा मुलगा स्पॅस्टिक म्हंजी डोकं पावरबाज पन अंग वाकडे तिकडे, असा हाय म्हने. तिथे बाई पायजे असे भैय्या म्हनले होते. मी जाया तयार हाय. लई मायेने करीन लेकराचं मी. ताई मी बी पन्नास वरसांची झाल्ये की. अजून बारा-पंधरा वरसं उमेदीनं काम करीन. पन फुडे काय? मी येकटीच. ताई, म्हातारपन येकटीनंच काढायचं का हो? लई रिकामं रिकाम वाटतंय आताच. हे जगणं म्हंजी एक सपन नाहीतर भासच का वो?”

थोडा वेळ निस्तब्ध शांतता. ‘येते ताई’ असं म्हणून ती निघून गेली.

**आला श्वास... गेला श्वास... एक भास!**
**हवेत विरलेले असे लक्षावधी भास...**

❑

५१

# थंडी, थंडी ...थंडी

थंडीची कुडकुडणारी लाट वर्षा-दोन वर्षांनी येतच असते आणि खरे तर आपण मध्यमवर्गीय माणसे तिची वाट पाहतोच. बे एकम् बेच्या पाढ्याच्या तालावर जगणाऱ्या माणसांना हा बदल खूप हवासा वाटतो. खरेतर आश्विन पुनवेला शेकोटी पेटवून गप्पाष्टकांचा डाव मांडायला सुरुवात होते. पण अलीकडे कोजागिरी, दिवाळीचे पहिले पाणी बिनाथंडीतच जातात.

'दिवाळी संपली. तुळशीचं लगीन हाकेवर आलंय. पण थंडी पळाली की!' 'यंदा शेकोटीची मजा लुटायला मिळणार की नाही?' असे संवाद ऐकू येत आहेत, तोवर थंडीबाई दारात येऊन शीळ घालतात आणि दृष्टी सृष्टीचा नूर बदलून टाकतात. कधी पूर्वेच्या बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ थैमान घालते, तर कधी दक्षिणेकडच्या हिंदी महासागरावर वादळे घोंगावतात. एकूण काय थंडीची लाट येतेच. रस्त्यावर, घरासमोर, बंगले-वाडे यांच्या पटांगणात, मोकळ्या जागेवर शेकोट्या पेटायला लागतात. हूहूहू हात शेकत गप्पांचे डाव, आठवणींच्या भेंड्यातही तरंगायला लागतात आणि थंडीची रंगत वाढत जाते.

थंडी प्रेमीजनांची, नवविवाहितांची विशेष लाडकी.

**थंडगार ही हवा**
**जवळ तू हवा हवा**
**थंडगार ही हवा ।**

एकमेकांच्या मिठीत विवाहाची बंधने अधिक घट्ट होत जातात. एकमेकांची खरी ओळख पटत जाते. शेकोट्यांच्या साक्षीने काही जण प्रेमाच्या नाजूक बंधनात अडकून जीवनसाथी बनतात, तर काहींची नाजूक बंधने संथ तळ्यात खडा टाकल्यावर कसे तरंग उठतात तशी क्षणिक ठरतात. तरीही ती अधमुऱ्या तरुणाईतल्या पहिल्यावहिल्या प्रीतीची आठवण असते... कधी बाबा आमट्यांच्या हेमलकसा... आनंदवनाच्या छावणीत पेटवलेली शेकोटी. भारतातून एकत्र आलेली तरुणाई. गप्पा गाण्यांची मैफल. तीही अर्ध्याकच्च्या हिंदीतली. एखादी मऱ्हाटी सावळी देखणी बाला नि काश्मीरमधला उंचपुचरा लालबुंद गोरा, सडसडीत कॉलेजकुमार नेत्र पल्लवी. मग शब्दांची देवघेव 'अरि ये थंडी तो हमारे कश्मीरमे चौबीस घंटे रहेती है। आईये हमारे यहाँ। रंग बिरंगे फूलोंकी... गुलाबोंकी घाटी हैं।'

'बुलाओ तो सही. आयेंगे ना!'

हां जरुर. आओगी तो वापस जाना मुश्कील होगा'

मग उत्तराऐवजी लाजून खाली पाहून हसणे. तर कधी आंतरविद्यापीठ एन. एस. एस. शिबीरे. तीही डिसेंबर-जानेवारीच्या मुहूर्तावरची. तिथेही ज्वालांनी लहरणाऱ्या शेकोट्या आणि त्यांच्या साक्षीने फुलणारी प्रीतीची फुले.

...अशा फुलांच्या आता फक्त आठवणी. २५-३० वर्षे उलटून गेलेली. पण थंडीतली शेकोटी पेटली की, पांढऱ्या केसांच्या मनातही काळाआड लोपलेल्या खुणा... काही तृप्तीच्या तर काही निसटलेल्या क्षणांच्या, जाग्या होतातच!

आताही थंडीची लाट अंगावर कोसळते आहे. अशा वेळी महाविद्यालयात असताना मनात ठसलेली गाणी आठवतातच. आणि गाणी गाणारा आवाज तबकडीत बंद करुन त्यांना चिरतारुण्याचा वसा देणारा शास्त्रज्ञ थोरच. तर ओठावर ओळी आल्याच

**ठंडी ठंडी हवा**
**पूँछे उनका पता**
**याद आये सखी री,**
**तो झूमे बता**
**ठंडी ठंडी हवा ऽऽ**

आठवणींमध्येही हवीशी ऊब असतेच. कधीच न कोमेजणारी. थंडीच्या दिवसांतच दुपारी भरणाऱ्या शाळा सकाळच्या होतात. आहे ना ताप? सकाळच्या

साडेसहा सातच्या थंडीत ते मित्र शाळेत निघालेले. शाळेच्या ड्रेसमध्ये... अर्धी निळी पॅंट आणि अर्ध्या बाह्यांचा पांढरा शर्ट. त्यात कुडकुडत स्लिपर घालून चालणारे तीन जण आणि एक मात्र पायात बूट. ड्रेसवर घातलेला लांब बाह्यांचा लोकरीचा स्वेटर, डोक्याला गरम टोपी आणि गळ्यात आईने विणलेला मफलर... असा एखादाच!

...आता ऊस गाळपाचा हंगामही सुरू झालाय. आमच्या गावाच्या आसपास अनेक साखर कारखाने, एक दिवस सकाळी फिरून येत असताना काही बैलगाड्या दिसल्या. त्यात दोन-तीन लेकरं, त्यांची माय, गाडी हाकणारा बाप, सहा-सात वर्षांची पोर तान्हं लेकरू जोजवीत गाडीत बसलेली. माय गाठोडीत चाचपीत शोधाशोध करणारी. थंडीत काकडणारं पोरगं डोळ्यासमोर पुस्तक घेऊन बसलेलं...

काही दिवसांपूर्वी गावाकडे गेलो होतो. वाटेत साखर कारखाना लागला. तिथेही झोपड्या टाकलेल्या मजुरांच्या जोड्या. कारखान्यावर कामाला येतात त्यांच्या एकच नवी आणि चांगली गोष्ट या दोन वर्षांत जाणवतेय.

कारखान्याच्या आवारात पोरांसाठी साखरशाळा. पहिली ते सातवीच्या मुलांना शिकविणारे शिक्षक. शाळेला लागून अंगणवाडी. मुलींच्या कडेवरची लेकरं त्या अंगणवाडीत आणि पोरी उत्साहाने शाळेत. या साखरशाळा स्वयंसेवी संस्था चालवीत असल्याने तिथले शिक्षक वेळेवर येतात. मन लावून शिकवतात. शिवाय काळा गुंडाळीफळा, रंगीत, पांढरे खडू, हजेरी पुस्तक, मधला खाऊ तोही पोटभर, वगैरे वगैरे. एकूण चांऽऽगभलंऽऽ. तर,

**थंड थंड थंडी, वाजवाज वाजली**
**ओठांची बोबडी घशात अडकली...**

❑

५१

# हे स्वरांनो गंध व्हा रे...

सुस्नात पहाट नेहमीच बहरत राहते. मग ती पहिल्यावहिल्या अनोख्या मनोमीलनाची असो, अवघ्या देहातून धुंद स्पर्शगंध लहरवत जाणारी असो किंवा जीवनात हाती येणाऱ्या पहिल्या यशाची असो. ती पहाट जीवनभर अखेरच्या क्षणापर्यंत दरवळत राहते अंगा अंगातून तनामनातून.

आणि जीवनाची पहाट म्हणजे प्रत्येकाचं घुंगुरवाळं बालपण. माथ्यावर मायेचा, खात्यापित्या घरांचा कुटुंबवत्सल हात असावा. स्वप्नांची क्षितिजे मनात पेरणारे, ध्येयाचे कवडसे दाखवून त्यातले आवडते कवडसे हाती कसे धरावेत, तसेच त्यांच्या शोधाची दिशा दाखवणारे शिक्षक... पालक भवताली असावेत. मग ही जीवनाची पहाट अलगदपणे हाती येते. पण अशी पहाट किती जणांच्या वाट्याला येते..?

कचराकुंडीतील कागद वेचणारी, हॉटेलमध्ये वा दुसऱ्याच्या घरी काम करणारी छोटी मुलेमुली यांच्या जीवनातही घुंगुरवाळं बालपण येतं. पण हाती येत नाही. मनात ओढ आणि काहीतरी हरविल्याची खंत जागवीत ते दुरून निघून जातं. शाळेची दारें शासनाने सताड उघडी ठेवली तरी, पोटातली भूक आणि घरातले अठराविश्वे दारिद्र्य त्यांना शाळेपासून दूरच ठेवते. बालमनात प्रश्न सतत उगवत असतात. पानांचा रंग हिरवाच का? प्रत्येक झाडांच्या पानांची हिरवाई वेगळी. काहीवर पिवळट छटा तर काहींचा रंग तांबूसपणाकडे झुकणारा. आकारही वेगवेगळे. आमच्या घराजवळ मारुतीचे देऊळ होते. पिंपळ वृक्षाचा मधोमध आधार देऊन रचलेले. शाळेत जाताना ते

दिसलेकी. मग आपोआप हात जोडले जात. त्यावर नव्याने झुलणारी, कोवळी... गुलबट... रेशमी पाने दिसत. दवाखान्यात नुकत्याच जन्मलेल्या बाळांसारखा कोवळा गुलाबी रंग... आपण जन्मलो तेव्हा आपलाही रंग असाच असणार. मग तो का आणि कसा बदलला? असे हजारो प्रश्न माझ्याही मनात उगवत. या प्रश्नांची उत्तरे शाळेत गेल्यावर शिक्षकांच्या सहवासातून सापडतात. अर्थात त्यासाठीही ध्यास घ्यावा लागतो. शाळेत न जाणाऱ्या मुलांच्या मनातही असे प्रश्न उगवत असतील. पण उत्तर कोण देणार? आज काल अशा मुलांसाठीही चार तासांची शाळा चालविण्याचा प्रकल्प एनजीओ... अशासकीय संस्थांना दिला जातो. माझ्या रोजच्या रस्त्यावर अशी शाळा आहे. ११-१२ वाजता ही मुले बाहेर खेळताना दिसतात. मग गुरुजी आले की काय शिकवतात? काल काय शिकवलं? तुला चित्र काढायला आवडतं का रे? शाळेत गुरुजी कोणते खेळ शिकवतात? चौथीची किंवा सातवीची परीक्षा देणार का? मग पुढे काय? शाळेत एखाद्या ताई शिकवतात कारे?... मी नेहमीच त्यांच्याशी गप्पा मारत असते. ''आजी मला चित्र काढाया लई आवडतं. पण कागद, पेणशील कोण देणार?''

''मला शिणमातली गाणी छान म्हंता येतात. मी कामाला जाते ना तिथं त्या चित्रांच्या पेटीत... टीवीत लहान पोरंबी छान गानी म्हंताना मी पाहिलीत.

...गानं म्हनंल की माय गांगते.'' कधी मधी माझ्या मास्तरांशीही गप्पा ''भाऊ शाळेत किती लेकरं?'' माझा प्रश्न. ''हायता की पंचेचाळीस. पटावर'' गुरुजींचे उत्तर.

'पण दिसतात सतरा-अठराच.'' मी ''व्हय बावीस लेकरं ऊस तोडायला गेलीत मायबापासोबत.'' 'पण मग शासनाकडून पैसे मिळसात ४५ जणांचे. ते...?''

ताई आमी पगारी नोकर पंधराशे रुपये मोजून घेतो. दुसरीकडे तर सहासातशेच मिळतात. ही संस्था नेकीची हाय. बाकीच्या बाबतीत आमी कशाला नाक खुपसावं?...'' तर हे असं गुरुजीचं उत्तर...

जीवनात योणाऱ्या भवतालच्या माणसांची, आकाशातल्या चांदण्या... उगवता सूर्य... चंद्र, भवतालची हिरवाई, हिमालयाची बर्फाळ शिखरे, वळणे घेताना पोटात पेटका आणणारे अरुंद रस्ते, बेभान वाहणाऱ्या नद्या, उसळते सागर... अशा अनेकांशी संवाद साधण्याचे वेड तरुणाईत अनेकांना लागते. त्यातलीच एक मीही. हे वेड सांभाळता सांभाळता संध्याकाळ कधी होते ते कळत नाही. हे संवाद जणू कोमल... शुद्ध... तीव्र... अनवट... वादी, संवादी स्वरच. कळत नकळत शब्द... अक्षरातून ते

सुर वाहू लागतात. मग वाढती सांजवेळही सूरमयी बनून जाते. स्वरांचे गंधकोष होतात. संवादाचा अखेरचा स्वर आळवताना म्हणावेसे वाटते,

**हे स्वरांनो गंध व्हारे, दशदिशांना झेपणारे...**
**तनमनातून लहरणारे, हे स्वरांनो गंध व्हारे...**

❑

संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर आपल्याला ताजमहाल पाहून आल्यासारखे होते. यातल्या व्यक्ती, स्थळ, विचार, लोकसाहित्य धूसरपणे आठवत राहते पण आपल्या मनात वेगळंच चांदणे पडलेले असते, ते असते डॉ. शैला लोहियांच्या संवेदनशीलतेचे, त्यांच्या विचारांचे, त्यांच्या काव्यात्म प्रतिभेचे.

**– प्रा. विश्वास वसेकर**

---



**डॉ. शैला लोहिया**

वडील ॲड. शंकरराव परांजपे समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते. गोवा सत्याग्रहात सहभागी. आई शंकुतला परांजपे राष्ट्र सेवा दलाच्या कार्यकर्त्या. हरिजन सेवा संघाच्या कार्यकर्त्या. राष्ट्र सेवा दलाच्या मध्यवर्ती कलापथक महाराष्ट्र दर्शन मध्ये सहभाग, त्या काळात ललित लेखनास सुरूवात. १९६२ च्या दसऱ्यास डॉ. द्वारकादास लोहियांशी आंतरजातीय विवाह आणि अंबाजोगाईत स्थायिक. १९७० जून पासून स्वामी रामानंद तीर्थ कला व वाणिज्य महाविद्यालयांत मराठी विषयाच्या अधिव्याख्याता म्हणून रुजू.

१९७५ च्या आणीबाणीत डॉ. लोहीया तुरूंगात, या काळात साने गुरूजी रूग्णालयाची धुरा सांभाळली. १९८२ पासून मानवलोकचे काम सुरू. संस्थेच्या स्थापनेत प्रमुख भूमिका. त्यातील अनुभवाची परिणती १९८४ साली मानवलोक संचलित मनस्विनी महिला प्रकल्पाची स्थापना करण्यात आली. या विभागाच्या सुरूवातीपासूनच प्रकल्प प्रमुख म्हणून स्वयंसेवी वृत्तीने काम पाहतात.

---

**प्रकाशित साहित्य :**

**लोकसाहित्य** – भूमी आणि स्त्री, भोंडला भुलाबाईची गाणी–तुलनात्मक अभ्यास

**कथा** – स्वरांत, तिच्या डायरीतील पाने.

**ललित** – वाहत्या वाऱ्यासंगे, मनतरंग, देश परदेश,गजाआडच्या कविता, (काव्य)

**साहित्य** –
* सात रंग सात सूर – (बाल – कादंबरी)
* जगावेगळा ससांर (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
* इत्ता इत्ता पानी
* बाबाचा परसाद
* सुखाची वाट, (प्रौढ साक्षरांसाठी कादंबरीका)
* होईन मी स्वयंसिध्दा या पुस्तकाचे शासनातर्फे प्रकाशन

Disha Publications